भावचंद्रिका

श्री

॥ गीता ॥

॥ भावचंद्रिका ॥

श्रीकृष्णार्जुनसंवाद

मराठीभाषेंत
रामचंद्रशास्त्री मुंडले यांचे साहाय्यानें
बाळजी स्कंदरजी
याणींकरून
मुंबईंत गणपतकृष्णाजी यांचे छापखान्यांत

छापिली

संवत् १८९६
शके १७६१

सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनं
दनः॥पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं-
गीतामृतं महत्॥१॥ पृथापुत्रावत्सा
निजनयनयुग्में निरखितां॥ सुगोपें
ओढीला मृदुतरकरें स्पर्शकरितां॥
रुपेनें पान्हेला बहुउपनिषद्धेनुनिकर
तुह्मीप्या तें हें हो सुमनि पय गीतासु
मधुर॥१॥

श्रीगीतेचा अर्थ प्रकट लिहिला प्राकृ
त भला ॥ रमो येथें वाटे निखिलजन
हो श्री स्थिर मला ॥ श्री संतोषा पावो-
ओ अणु लघु गुणीं ही बुधजन ॥ महादे
वी रोषा न च विनवि ऐसें मम मन ॥ १

॥ श्री ॥

॥ अर्जुनविषाद ॥

श्रीगणेशायनमः ॥ ॥ पूर्वसंकेताप्रमाणें पांडव अज्ञातवास भोगून प्रकट जाहले असतां त्याणीं आपल्या राज्यविभागार्थ कौरवांशीं बोलणें घातलें, त्यास दुर्योधन सर्वप्रकारें अमान्य जाहला, त्याजवर मोठा युद्धप्रसंग मांडला, त्यासमयीं रणामध्यें जें जें होईल तें तें आपणास घरीं स्वासनीं वर्चेवर समजावें अशी धृतराष्ट्रास इच्छा झाली, ती पूर्ण करण्याविषयीं व्यासानीं ज्ञानचक्षु देवून संजयास योजिलें. त्याप्रत धृतराष्ट्र प्रश्नकरितो, हे संजया, धर्माचें क्षेत्र असें जें, कुरुक्षेत्र, त्याचा ठायीं युद्ध करायासाठीं मिळाले असे माझे पुत्र आणि पांडूचे पुत्र, काय करिते जाहले तें मला सांग. १

संजय सांगतो त्यासमयीं राजा दुर्योधन पांडवांचा सेनेचा व्यूह पाहून द्रोणाचार्याप्रत ये

॥अर्जुनविषाद॥

उन बोलता जाहला. २ गुरुजी, तुमचा शिष्य
द्रुपदराजाचा पुत्र धृष्टद्युम्न त्याणें पांडवांचा
थोरसेनेचा व्यूह रचिला पहा! ३ यासेनेचाठा
यीं भीमार्जुनासारिखे, आणि युयुधान, विराट
द्रुपद, ४ धृष्टकेतु, चेकितान, काशिराज, पुरुजि
त, कुंतिभोज, शैब्य, ५ युधामन्यु, विक्रांत, उत्त-
मौजा, तसाच सुभद्रेचा पुत्र अभिमन्यु, आणि
द्रौपदीचे पुत्र हे सर्व महारथ आहेत. ६ आतां
आपल्या सेनेचाठायीं विख्यात कोण आहेत त्यां
ची सूचना करितों, ती ऐकावी. ७ आपण तसेच
भीष्माचार्य, कर्ण, कृपाचार्य, अश्वत्थामा, विकर्ण
सोमदत्ति ८ आणिरवी बहुत शूर मजकरितां जी
विताची आशा टाकून प्राप्त जाहले आहेत. आणि
ते सर्व शस्त्रसंपन्न असून युद्धविद्येमधें पर-
म निपुण आहेत. ९ आपल्या अगणित सेनेचें
आधिपत्य भीष्माकडे आहे. आणि शत्रूचा प
रिमित सेनेचें आधिपत्य भीमाकडे आहे.॥१०॥

॥ अर्जुनविषाद ॥

आतां तुह्मी सर्वयोद्धे यथाविभागें करून आ
पल्या आपल्या स्थानीं राहून भीष्माचार्यांस र
क्षा. ११

तें भाषण ऐकून दुर्योधनास प्रमोद करा
याकरितां भीष्माचार्यांहीं मोठ्यानें सिंहनादक
रून शंख वाजविला. १२ तत्क्षणीं असंख्यात
शंखादिवाद्यांचा दारुण शब्द जहाला. १३ त्या
समयीं कृष्णार्जुन शुभ्राश्वयुक्त उत्तम रथाव
र आरूढहोते त्यांहींही आपले शंख वाजविले.
१४ कृष्णानें पांचजन्य शंख, आणि अर्जुनानें
देवदत्त, भीमानें आपला पौंड्र शंख, वाजविला.
१५ आणि युधिष्ठिरें अनंतविजय, तसेंच नकु
ल सहदेवीं आपले सुघोष, मणिपुष्पक, शंखवा
जविले, १६ काशिराज, शिखंडी, धृष्टद्युम्न, वि
राट, सात्यकि, १७ राजाद्रुपद, द्रौपदीचेपुत्र, सु
भद्रेचापुत्र, इत्यादिक वीरांहीं आपलेआपले पृ
थक् पृथक् शंख वाजविले. १८ त्या घोषानें को

रवांची हृदयें विदारणपावलीं. आणि दशदिशा प्रतिध्वनित जहाल्या. ॥१९॥

मग अर्जुन कौरव युद्धाविषयीं सिद्ध जाहले. आणि शस्त्रें चालूं जाहलीं. असें पाहून धनुष्य सिद्धकरून २० कृष्णाप्रत बोलताजाहला. हे कृष्ण, दोन सेनेंचांमध्यें माझा रथ उभा कर. २१ ह्मणजे मी युद्धाविषयीं कोण सिद्ध आहेत. आणि ह्या सिद्धरणभूमीचाठायीं कोणाबराबर युद्ध करावें २२ आणि येथें दुर्बुद्धि दुर्योधनाचें प्रिय करायास कोण मिळाले आहेत तें सर्व अवलोकीन. २३

संजय ह्मणतो, कृष्णें अशी प्रार्थना ऐकून दोन सेनाचामध्यभागीं रथ उभाकरून २४ कौरवांचा फळ्याकडे अर्जुनांची नेत्रें लाववून त्याकरवीं भीष्मद्रोण प्रमुख त्यापक्षाचे मुख्य योद्धे पाहविले. २५ तेव्हां अर्जुन दोनही सेनाचाठायीं पाहता जहाला. त्यामधें कितीएक

॥ अर्जुन विषाद ॥ १ ॥

तीर्थसरूप, तसेच आजे, गुरु, मामा, भाऊ, पु
त्र, नातू, मित्र, २६ सासरे, स्रुहृत्, असे सर्वही
आप्त आहेत असें कांहींवेळ पाहून २७ त्याचा
हृदयीं फार दया लोटली, आणि खेद पावतहो
त्साता कृष्णाप्रत बोलता जाहला.

हे कृष्णा. युद्ध करायाकरितां जमलेहेसा
रे आपले नातेचार आहेत असें पाहून माझी
आगें सैल होतात, आणि मुख शुष्क होतें त
सें शरीर कांपतें, आणखीं माझा आंगावर
रोमांच उभे राहतात, २९ हातांतून गांडीव ध
नु गळतें, तसाच त्वचेच्याठायीं दाह होतो! मज
उभें राहण्याचीही शक्ति नाहीं, कांकीं माझें म
न भोंवतें, ३० आणिदुश्चिन्हें सभोंवतीं मा
झा दृष्टीस पडतात. आणखी आपल्या आ
प्तजनास मारून कांहीं स्रुख दिसत नाहीं.
३१ अगा हे कृष्णा, मीं विजयातें इछित नाहीं,
मला राज्यनको, मला स्रुख नको आह्मास राज्यें

करून काय, विषयभोगें करून काय, जीवितें करून काय? ३२ कांकीं ज्यांसाठीं राज्यविषय भोग इच्छावे, तेच धन आणि प्राण टाकून, या सिद्धरण भूमीच्या ठायीं युद्धाकरितां उभे राहिले आहेत. ३३ हे गुरु, बाप, लेंक, आजे, नातू, मामा, सासरे, मेहुणे, ३४ यांस माराव्याची इच्छा मी त्रैलोक्य राज्याचा लोभें करूनही करणार नाहीं. मग या लहान भूगोलाचा तर पदार्थ काय! ३५ या कौरवांस मारून आह्मी काय सुख पावों? यद्यपि ते दुष्ट आहेत खरे; तथापि आह्मी त्यांस मारिलें तर दोषी मात्र होवूं ३६ यास्तव हे आमचे जवळचे आप्त यांस मारावें हें आह्मास केवळ अनुचित आहे. अगा हे कृष्णा, विचार करून पाहा, कुलक्षय करून आह्मास सुख कसें होईल.? ३७ जरी हे कुलक्षय आणि मित्रद्रोह करण्यांत पातक पाहात नाहींत, ३८ तथापि आह्मी तद्दोष जाणून त्या कर्मास कसें रे प्रवृत्त

व्हावें; ३९ कुलक्षयेंकरून अनादिसिद्ध कुलध
र्म बुडतात. त्या धर्मनाशानें तें सर्व कुल अध
र्मयुक्त होतें ४० तेणेंकरून कुलस्त्रिया व्यभि-
चारिणी होऊन वर्णसंकर होतो. ४१ तो सर्व कु
लास नरकांत पाडितो, आणि श्राद्धादिक कर्मे बु
डतात, त्यायोगानें त्यांचे पूर्वजही नरकांत पड-
तात. अशा वर्णसंकरकारक कुलोछेद दोषानें
जातिधर्मांचा आणि कुलधर्मांचा लोप होतो.
४३ आणि ऐकण्यातही असें आहे कीं जां मनु
ष्यांचा संततीत धर्म बुडतो त्यांस सद्गति होत
नाहीं. हरहर! कवढे थोर पातक करण्यास हो
आह्मी सिद्ध जहालों आहों! राज्यसुखाचा लो-
भेंकरून आह्मी स्वजन मारायास किंहो उद्यु
क्त झालों आहों। ४५ जरहे कौरव शस्त्रें घेऊन
अनिवारित येऊन मला अशस्त्र्याला या रण
भूमीचाठायीं मारितील तरमीं त्यांस सुखें
मारूं देईन ४६

॥सांख्ययोग॥२॥

संजय ह्मणतात हे धृतराष्ट्रा, अर्जुन असें बोलून आपले धनुष्यबाण टाकून शोकाविष्ट होत्साता भर सेनेमध्यें रथाचा मध्यभागीं बसता झाला. ४७

॥सांख्ययोग॥

॥अध्याय॥२॥

त्याप्रकारें अर्जुनास कृपाविष्ट आणि अश्रुयुक्तनेत्र तसाच खिन्न पाहून, कृष्ण त्याप्रत बोलता जहाला. अगा हे अर्जुना, हा वेडेपणा आणि हीनत्व बापा या समरीं तुला कोठून प्राप्त झालें ? अरे ही स्थिति शूरोचित नव्हे, केवळ अस्वर्ग्य आणि अकीर्तिकारक आहे. २ तूं हा नपुंसकपणा स्वीकारूं नको, कां हा तुझ्या सारिख्याला योग्य नव्हे. हें तूं आपल्या हृदयाचें निंद्य दुर्बलत्व टाक, आणि उभा राहा कसा. ३

॥ सांख्ययोग ॥

अर्जुन ह्मणतो कृष्णा, भीष्माचार्य आणि द्रोणाचार्य, हे मला पूजेस योग्य आहेत; यांजवर युद्धाचाठायीं कठोरबाणेंकरून प्रहार करण्याचा निश्चय कसा करूं? ४ या अति पूज्य गुरूंस मारावें, त्यापेक्षां मीं जनांत भिक्षा मागून निर्वाह करीन तें बरें. कांकीं जर यांस मारिलें तर यांचा रक्तानें आर्द्र अशी द्रव्य आणि राज्यविलास भोग सेवावे लागतील. ५ आणखी यांचा जय होईल तो बरा किंवा आपला होईल तो बरा हेंच मुळीं आह्मास समजत नाहीं. कांकीं ज्यांस मारून आह्मास जीवनाची इच्छा नाहीं, ते हे धृतराष्ट्राचे पुत्र आह्मापुढें युद्धास उभे राहिले आहेत. ६ माझा मूळस्वभाव, कृपा आणि पापभीति यांहीं करून नष्ट झाला आहे. तर मीं विनंती करितों मला खराखुरा चांगला विचार यासमयीं कोणता तो सांग. मी तुझा शिष्य आहें, यास्तव मला शरणागताला स्वधर्माविषयीं शिक्षा कर. कां

कीं या धर्मसंकटेंकरून माझी बुधी भ्रमली आहे. ७

हे कृष्णा, जरी या भूमीच्याठायीं निष्कंटक राज्य प्राप्त झालें, किंबहुना सकलदेवांचें आधिपत्य मिळालें, तरीं इंद्रियें शुष्क करणारा असा हा माझा शोक शमविणारें कांहीं मला दिसत नाहीं

संजय बोलतात, हे धृतराष्ट्रा, अर्जुनानें कृष्णाप्रत असें भाषण करून आपणास युद्धकर्तव्य नाहीं ह्मणून सांगितलें; आणि तो उगा झाला. ९ त्यासमयीं कृष्ण हास्यवदनकरून अर्जुनाप्रत बोलता जहाला; अरे अर्जुना, शोककरायास योग्य नव्हेत, त्यांचा शोक करितोस, आणखीं पंडितांचे वाद बोलतोस. परंतु पंडित कांहीं मेरल्याचा किंवा जित्याचा शोक करित नाहींत. ११ हे अर्जुना मीं तूं आणखी हे राजे, कधीं नवतों असें नाहीं, आणखीं आपण सर्व पुढें नसणार असें नाहीं. आत्म्यास यादेहीं

॥सांख्ययोग॥२॥

जसें बाळपण, तरुणपण, आणि वृद्धपण, प्राप्त होतें, तसीच देहांतर प्राप्ति होते, असें जो पक्कें मानितो तो कांहींही घडलें असतां गडबडतना हीं. १३ इंद्रिय वृत्तींस जे विषयसंबंध होतात ते शीत, उष्ण, सुखदुःख देतात. ते येतातजातात. ते अनित्य आहेत. यास्तव हे भारता, त्यांचें सहन कर. १४ कांकीं जा धैर्यवान् पुरुषास हे गडबडवि त नाहींत, आणिजो सुखदुःखें समान मानितो, तो मोक्षास योग्य होतो. १५ कल्पितवस्तूस आहेपणा नाहीं. सत्यवस्तूस अभाव नाहीं. या दोघांचाही निर्णय तत्त्वद्रष्टे पाहातात. १६ जाणें हे सर्वपदार्थ उत्पन्न केले, त्यास नाश नाहीं असें जाण. या अव्ययवस्तूचा नाश करायास कोणी समर्थ नाहीं. १७ नित्य आणि अविनाशी तसा च दुर्ज्ञेय अशा आत्म्याचीं आवरणें हे देह अंत वंत आहेत. यास्तव हे अर्जुना, तूं युद्धास उठ. १८ जो या आत्म्यास मारणारा असें मानितो, आ-

णि जो यास मारिला असें मानितो, ते दोघेही जाणत नाहींत. कांकीं हा कोणास मारीतनाहीं, आणि यासही कोण मारित नाहीं. त्यावस्तूस झाली आहे, अथवा पुढें होईल असें ह्मणतां येत नाहीं. कांकीं ती वस्तू जन्मरहित, तसीच सर्वदा एकरूप, आणि शाश्वत तसीच पुरातन आहे; ती शरीराबराबर मारिली जात नाहीं. २० जो यावस्तूला अविनाशी, नित्य, जन्मरहित, आणि अव्यय असें जाणतो, त्यापुरुषाला मीं यावस्तूस मारायास शकेन किंवा मारवीन असें कसें वाटेल? २१ जसा मनुष्य जीर्णवस्त्रें टाकून नूतनवस्त्रें परिधान करितो, तसा हा आत्मा जीर्णकुडी टाकून, नूतन कुडीतें धरितो २२ याआत्म्याला शस्त्रें छेदित नाहींत, अग्नि जाळित नाहीं, पाणी कुजवित नाहीं, वायु शुष्क करित नाहीं, २३ कांकीं हा आत्मा अछेद्य, अदाह्य, अक्लेद्य, आणि आशोष्य, असा आहे,

॥सांख्ययोग॥२॥

आत्मा नित्य आणि सर्वव्यापी, स्थिर, अचल,
२४ अदृश्य, अचिंत्य, अबाध्य, आहे. यास्तव हें
जाणून तूं शोक करूं नयेस. २५ असें असतांही
आत्मा देहाबरोबर मरतो, असें जरी मानितोस,
तरीं तुला शोकाचें कारण नाहीं. २६ कां कीं जन्मा
धीन पदार्थास मृत्यु निश्चित आहे; तसेंच मर
णाधीनास पुनर्जन्म आहे. तस्मात् या अपरि
हार्य गोष्टीचा शोक करणें तुला योग्य नाहीं. २७ भू
तांची पूर्वस्थिति अव्यक्त आहे; मध्यस्थिति मा
त्र उघड आहे; पश्चात् स्थिति अव्यक्तीं आहे. तर
अशांचा शोक कां करितोस ? २८ कोणी आत्म्या
स आश्चर्यवत् मानितात: कोणी याजविषयीं
आश्चर्यानें बोलतात, तसेंच ऐकतात, परंतु या
चें वर्णन ऐकत असतां एकही यातें जाणत ना-
हीं. २९ हा आत्मा सर्वांचा शरीरांत निरंतर अवि
नाशी आहे; तस्मात् तूं या भूतांचा शोक कर-
ण्याविषयीं योग्य नाहींस. ३० तूं आपल्या जा

ति धर्माकडेस पाहा, ह्मणजे तुला हें कांपणें अ
योग्य असें समजेल. क्षत्रियास युद्धधर्म प्रा
प्त होय, त्यापरता दुसरा थोर धर्म नाहीं. ३१ अ
गा हे पार्था, तुझ्या इच्छेप्रमाणें हें स्वर्गद्वार तुझ्या
समोर उघडलें आहे. असें हें युद्ध, भाग्यवान्
क्षत्रियांस मात्र प्राप्त होतें. ३२ यानंतर जर हा
युद्धधर्म न करसील, तर स्वधर्मास आणि कीर्ती
स टाकून पापातें पावशील. ३३ जन तुझी अ
क्षय अकीर्ति गातील- आणि संभाविता सतर
अकीर्ति मरणाहून अधिक आहे. ३४ हे सर्व म
हारथ, तूं भयास्तव रणापासून परत गेलास
असें मानितील; आणि जे तुला बहु मानितात त्या
मध्येंही तूं लघुत्व पावशील. ३५ तुझे शत्रु बोलूं न
येत त्या गोष्टी तुजविषयीं बोलतील, आणि
तुझ्या शौर्यशक्तीची निंदा करितील. याहून
फार दुःख तें काय? ३६ जर तूं मारला गेलास त
र स्वर्गातें पावशील, आणि विजयी जहालास

तर पृथ्वीतें भोगिसील. यास्तव ऊठ, आणि युद्धाचा निश्चय कर. ३७ सुखदुःख लाभ, अलाभ, जय, पराजय, समान करून युद्धास सिद्ध हो. अशानें तुला दोष घडणार नाहीं. ३८

ही तुला सांख्य ह्मo ब्रह्म त्याविषयीं बुधि सांगीतली. आतां योगाविषयीं ऐक. ज्याबुद्धीकरून युक्त होत्साता कर्मबंधातें त्यागिशील. ३९ येथें कर्माचा नाश नाहीं, आणि प्रत्यवाय नाहीं. या धर्माचें स्वल्पही आचरण महद्भयापासून सोडवितें. ४० यांत एकच बुद्धि आहे, आणि ती निश्चयात्मक आहे. अनिश्चित पुरुषांचा बुधि अनंत आहेत, आणि त्या प्रत्येक बहुशाख आहेत. ४१

अल्पमति पुरुष वेदवादीं रत होत्साते, क्षणभंगुर स्वर्ग सुखाला, आत्मज्ञान आणि तत्फल मोक्ष यांहून अधिक मानून त्यापरतें दुसरें कांहीं नाहीं असें ह्मणतात; आणि अमृतपान

पावूं, अजरामर होउं, इत्यादिकजीं पुष्पितवाक्यें त्याहींकरून भुलून, जन्मकर्में देणारी आणि नानाप्रकारच्या कर्मांनीं व्याप्त अशा भोगैश्वर्यप्राप्तीची इच्छा करितात. परंतु ह्या त्यांचा निश्चय अविचार सिद्ध आहे. अशा पुरुषांची चित्तवृत्ति एकाग्र होत नाहीं. ४४ वेद तीन गुणाच्या कार्याचें प्रतिपादन करितात. तूं त्रैगुण्यातीत हो. आणि द्वंद्वरहित तसाच निरंतर सत्वस्थ राहा. श्रम आणि काळजी यांतें टाक. आणि जितचित्त हो. ४५ भरपूर जलाशयांत जितुकें स्नानादिक प्रयोजन घटमात्रजलानें होतें, तितुकें जाणत्या जिज्ञासूला सर्ववेदीं, उपनिषद्भागानें होतें. ४६

तुझा कर्माचांठायींच अधिकार-तस्मात् कर्मकरल्याचा फळांवर वासना कदापिही ठेउंनको. तसेंच फलहेतूनें कर्म करूंनको. अकर्मी आग्रह धरूंनको. ४७ योगस्थ, ह्म० समचित्त होत्साता, अभिमान सोडून, कर्माचा बरावाईटपरिणा

म समान मानून, स्वधर्म आचर. अशा समत्वास योग ह्मणतात. ४८ बुद्धियोगाहून, ह्म० निष्काम कर्माहून, काम्यकर्म अत्यंत नीच आहे. याम्त व बुद्धीचा आश्रय कर. कांकीं फलकामुक दीन आणि दुःखी असतात. ४९ या सृष्टीत बुद्धियुक्त पुरुष पुण्य आणि पाप या दोंतें मानित नाहीं. याम्तव तूं अशा बुद्धियोगाकारणें झट योग, ह्म० कर्माच्या ठायीं चातुर्य होय. ५०

ज्ञानीपुरुष कर्माचें फल टाकून, जन्मबंधापासून मुक्त होऊन निरुपद्रवपदाप्रत जातात ५१

जा समयीं तुझी बुद्धि तुझ्या अंतःकरणाच्या मालिन्यास तरेल, त्या समयीं तुला ऐकिल्याचें, आणि ऐकायाचाचें तात्पर्य समजून, त्या विषयीं वैराग्य पावशील. ५२ जेव्हां नाना शास्त्र श्रवणें करून संशययुक्त झालेली अशी तुझी बुद्धि निश्चल होऊन ईश्वरध्यानीं अचल राहील, ते व्हां तूं तत्वज्ञान पावशील. ५३

॥ सांख्ययोग ॥ २ ॥

अर्जुन विचारितो, हे कृष्णा. स्थितबुद्धि ध्यानस्थाची रखूण कोणती? त्याणें बोलावें काय? असावें कसें आणि वागावें कसें? ५४

कृष्ण सांगतात. हे पार्था, जो मनुष्य मनातील सर्व वासना टाकितो, आणि आपणाच्या ठायीं आपण संतुष्ट होतो, त्याला स्थितबुद्धि असें ह्मणतात. ५५ ज्याचें मन विपत्तींत गडबडत नाहीं, आणि जो संपत्ती विषयीं निरिच्छ आणि खी ज्याचे चिंता, भय, क्रोध, गेले आहेत, अशा स्थितबुद्धि पुरुषास मुनि असें ह्मणतात. ५६ जो सर्व गोष्टींत लोभरहित असतो, जो शुभ पावोन आनंदानें प्रशंसा करित नाहीं, आणि अशुभ पावोन द्वेषानें निंदा करित नाहीं, अशा पुरुषाची बुद्धि स्थित झाली असें जाणावें. ५७ आणि जो, जसा कांसव अंगांचें आकर्षण करितो तसा विषयांपासून इंद्रियांचें आकर्षण करितो, तो एक स्थितबुद्धि समजावा. ५८ केवळ विषयत्या

ग्यासच स्थितप्रज्ञ ह्मणतात असा अर्थ नाहीं. कांकीं कांहींएक प्रसंगेकरून अज्ञानेही विषय निवृत्त होतात. तर ज्याची विषयमूलवासनाही गेली तो स्थितप्रज्ञ जाणावा. ५९ अत्यंत मथन करणारीं अशीं इंद्रियें मनोजयाविषयीं यत्न करणार अशाही ज्ञानीपुरुषांच्या मनाचें आकर्षण करितात. ६० त्यांस स्वाधीन करून सावध आत्मपर असा स्थितप्रज्ञ असतो. इंद्रियें ज्याचा स्वाधीन त्याची बुद्धि निश्चल जाणावी. ६१

विषयाचें ध्यान करणार पुरुषांस, त्याविषयांत संग होतो, विषयसंगापासून काम होतो, कामापासून क्रोध होतो, ६२ क्रोधापासून मोह होतो, मोहापासून स्मृतिभ्रंश पावते, स्मृतिभ्रंशेकरून बुद्धि नष्ट होते, बुद्धिनाशेंकरून पुरुष नाश पावतो. ६३ स्वाधीन चित्त पुरुष आपलीं इंद्रियें रागद्वेषरहित करून, मनाचा आज्ञेंत वागवितो. तो विषयांतें भोगित होत्साता

ही, ब्रह्मसुखातें पावतो. ६४ तें प्राप्त होतांच तो सर्वदुःखापासून सुटतो. असें त्याचें चित्त प्रसन्न झालें ह्मणजे त्याची बुधि ब्रह्मीं दृढ होते. ६५ जो पुरुष या विषयाचें श्रवण मनन करित नाहीं, त्यास ज्ञान आणि भावना नाहीं, भावनारहितास शांति नाहीं, जास शांति नाहीं त्यास सुख कोठून ? ६६ ज्याचें मन विषयप्रवृत्त इंद्रियांस अनुसरतें, त्यापुरुषाच्या बुध्दीस तें जसें वादळ समुद्रांत नौकेस तसें घेऊन जातें. ६७ तस्मात् ज्याचीं इंद्रियें मनासहवर्तमान विषयांपासून निवृत्त आहेत, तो स्थितप्रज्ञ होय. ६८ त्यांस* अज्ञजनांच्या रात्रीच्याठायीं दिवस, आणि त्यांच्या दिवसांच्याठायीं रात्रि असते. ६९.

जशीं सागरांत उदकें शिरतात तेणेंकरून तो विकार न पावतां भरलाच राहतो, तसे ज्या पु

---

* ब्रह्मप्रकाशीं भूतें निद्रित असतात तेथें हा जागृत असतो आणि प्रपंचीं भूतें जागृत आहेत तेथें हा निद्रित असतो. सारांश इतरजन अज्ञानी आणि हा ज्ञानी ह्मणावयाचा प्रकार

रुषाप्रत विषयप्रवेश करितात, तो मोक्ष पावतो: विषंयासक्त पावत नाहीं. ७० जोपुरुष सर्वकाम त्यागून, वासनारहित वागतो, आणि जास अहंकार आणि अभिमान नाहीं, तो मोक्षातें पावतो. ७१ अगा हे अर्जुना, ही ब्रह्मवेत्याची स्थिति होय. ही प्राप्त झाली असतां मनुष्य मोह पावत नाहीं. अंतकाळींहीजरीं ही स्थिति प्राप्त झाली, तरी तो निर्वाणब्रह्मीं मिळतो.

॥कर्मयोग॥

॥अध्याय॥३॥

अर्जुन बोलतो, अगा हे जनार्दना, जर तुझा मतें कर्मयोगाहून ज्ञान अत्यंत प्रशस्त आहें, तर या घोरयुध्दकर्माचाठायीं मजकां प्रवर्तवितोस? १ तूं मिश्रितासारिख्या वचनेंकरून माझा बुध्दीस भ्रम वितोस, असें मला वाटतें. यास्तव जेणेंकरून मी कल्याण पावेन, असें

॥ कर्मयोग ॥ ३ ॥

एक कायतें निश्चयकरून मला सांग. २

कृष्ण सांगतात. हे पापरहिता, निष्ठेचे मार्गदोन ते मीं तुला मागे सांगीतले: विचार समर्थांचा ज्ञानमार्ग, आणि योग्यांचा कर्ममार्ग सांगीतला ३

मनुष्यास कर्म न केल्यानें ज्ञाननिष्ठा प्राप्त होत नाहीं. तो कर्मजन्य चित्तशुध्दीवांचून केवळ सन्यासानेंच सिध्दीतें पावत नाहीं. ४ कोणही पुरुष कधीं क्षणमात्र कर्मकेल्या वांचून राहात नाहीं. कारण सत्व, रज, तम, हे तीन प्रकृति गुण पुरुषाला अवश्य कर्मकरण्या विषयीं प्रवर्तवितात. ५ जो पुरुष आसक्त असून कर्मेंद्रियांस आटोपून बसतो, त्यास ढोंगी असें ह्मणतात. कांकीं त्याचें मन विषयांकडेस लंपट असतें. ६ तरजो मनासहवर्तमान इंद्रियांस वशकरून वासनारहित कर्म करितो, तो स्तुत्य होय. ७ तूं नियत कर्मआच

॥ कर्मयोग ॥ ३ ॥

र. अकर्मापेक्षें कर्म अत्यंत चांगलें आहे. कर्म न केल्यानें तुझा देहव्यवहारही चालणार नाहीं. ८ हा जन ईश्वरभक्तिवांचून इतर स्वर्गादिकामनेनें कर्मांत प्रवृत्त झाला आहे, यामुळें बंधन पावतो. तस्मात् हे कुंतीपुत्रा, तूं त्या सर्वकामना टाकून ईश्वरप्रीत्यर्थ स्वधर्म आचर. ९

जेव्हां पूर्वीं ब्रह्मदेवानें प्रजा उत्पन्न केल्या, तेव्हां त्यांस, त्याच वेळेस धर्म लावून दिल्हा. आणि सांगीतलें कीं "या धर्मेंकरून तुह्मी वृद्धीतें "पावा. हा तुमचे सर्व मनोरथ पूर्ण करिता अ"सो. १० या धर्मेंकरून देवांस तृप्त करा. आणि "ते देव तुह्मास तृप्त करोत. असे तुह्मी परस्परां"स तृप्त करित होत्साते, परम कल्याणातें पावा"ल. ११ दान इत्यादि धर्मेंकरून संभावित असे "देव तुह्मास इच्छित भोगांतें देतील. जो, त्यांहीं जें "दिलें, त्याचा भाग त्यांस अर्पिल्यावांचून भोगि"तो तो चोरच होय. १२ जे यज्ञशेष अन्नावांचू

॥ कर्मयोग ॥ ३ ॥

"न भोजन करित नाहींत, ते सर्व दोषांपासून
"मुक्त होतात. जे आपणासाठींच अन्न शिजि
"वितात, ते स्वयें पापरूप होत, आणि भोजन
"ही पापाचें करितात." १३ भूतें अन्नापासून उ
त्पन्न होताहेत, तें अन्न पर्जन्यापासून, पर्जन्य
यज्ञापासून, त्या यज्ञाची उत्पत्ति कर्मापासून,
१४ कर्म वेदापासून, वेद ब्रह्मापासून. तस्मात्
सर्वव्यापक ब्रह्म यज्ञाच्या ठायीं नियमें करून रा
हिलें आहे. १५

पापी पुरुष इंद्रियांच्या ठायीं रममाण होऊ
न जो यां प्रवर्तिचक्रातें अनुसरत नाहीं, त्याचें
जिणें व्यर्थ होय. १६

परंतु जो पुरुष आपलेच ठायीं रत असतो,
आणि आपला आपण तृप्त असतो, आणि आ
पला आपल्यांत संतुष्ट असतो, त्यास कांहींच
कर्तव्य नाहीं. १७ त्यास केल्यांत आणि न के
ल्यांत प्रयोजन नाहीं. आणि त्यास सर्वभूतीं

कोणत्याच अर्थाचा संबंध नाहीं. १८ यास्तवनि रंतर आवश्यक कर्म, फलवासना टाकूनकर. कांकीं जोपुरुष अनसक्तपणें कार्यकर्म करितो, तो मोक्षातें पावतो. १९

कर्मेंकरूनच जनकादिक सिद्धिपावले. आणिरवी लोक संग्रहार्थही तुला कर्मकेलें पाहिजे. २० कांकीं थोरांचें पाहून लहानवागतो. कारणजें तो करितो त्यास लोक अनुसरतो. २१ अगा अर्जुना मला स्वतः यात्रैलोक्यांत कांहीं कर्तव्य नाहीं, अथवा मला अप्राप्तवस्तुमिळावयाची आहे असें नाहीं. तथापिमी, कर्मकरितोंच आहें. २२ जर मीजपून कर्माचाठायीं लक्ष न देईन, तर लागलेच सर्व मनुष्य माझा मार्ग धरतील. २३ जर मी कर्म न करीन, तर हे जन अव्यवस्थित होतील. आणि मी वर्णसंकराचा कर्ताहोईन, आणि प्रजांचा नाश करीन. २४ जसे अज्ञजन फलेच्छेनें कर्म करितात, त

॥ कर्मयोग ॥ ३ ॥

सींच ज्ञान्यानें लोकसंग्रहार्थ फलेच्छेवाचून कर्में करावीं. २५ कर्मकिडे जांचा ओघ अशा अज्ञाच्या बुद्धिभेद करूंनये. विद्वान् मनुष्यानें सर्वकर्में स्वयें यथास्थित करून, मूढप्रीतीनें करीत असें करावें. २६

अहंकारानें मोहितपुरुष प्रकृतीच्यागुणानीं क्रियमाण कर्मांचा मींच कर्त्ता असें मानितो. २७ परंतुजोपुरुष जडचैतन्याचा वेगळेपणा जाणतो, तोपुरुष प्रकृतीचे गुण आपआपलीं कर्में करितात, असें मानूनआपणआपला निराळा असतो. २८ प्रकृतीच्या गुणानीं मोहितपुरुष देहादिक गुणाच्याठाईं आणि कर्मांच्याठायीं आसक्त असतात. त्याकिंचित्ज्ञास, सर्वज्ञानें कर्मापासून चळवूं नये. २९

अर्जुना, सर्वकर्में माझाठाईं अर्पणकर. आणि एकाग्रचित्तकरून आशा, ममता, शोक, यांस सोड. आणि युद्धाचा निश्चय कर. ३०

॥ कर्मयोग ॥ ३ ॥

जे मनुष्य दृढ विश्वासानें या माझ्या मताप्रमाणें निरंतर चालतील, आणि त्या विषयीं कांहींच कल्पना मनांत आणणार नाहींत, ते कर्मापासून मुक्त होतील. ३१ आणि जे यास तुच्छवत् मानून याप्रमाणें वागणार नाहींत, ते सर्वज्ञानरहित, अविवेकी, नष्ट; ह्मo स्वर्गापवर्ग भ्रष्ट असें जाण. ३२

ज्ञानवान्ही पुरुष आपल्या स्वभावानुरूप वर्तणुक करितो. सर्वभूतें आपआपल्या स्वभावास अनुसरतात. तेथे निग्रहकाय करील? ३३ सर्वइंद्रियांचा विषयांत प्रीति आणि द्वेष आहेत, त्यांचा स्वाधीन शाहण्यानें होऊं नये. कांकीं ते उभयतां शत्रु होत. ३४ परधर्म कितिकां चांगला असेना, आणि कितिकां सांग आचरिना, तथापि स्वधर्म कसाही असो, आणि कसाही आचरो, तो त्यापेक्षें फार प्रशस्त होय. स्वधर्मी मरण बरें; परध-

र्मांत भय आहे. ३५

अर्जुन प्रश्न करितो, हे कृष्णा, मनुष्यास पापाचरणीं काय प्रवर्तवितें ? दिसण्यांत असें येतें कीं हा इच्छित नसतां याची बलात्कारानें तेथें योजना होते. ३६

कृष्ण सांगतात, हा काम, हा क्रोध, रजोगुणापासून उत्पन्न झालेला, आणि सर्वग्रास करणारा, महापापस्वरूप-हा दोषाचरणीं प्रवर्तविणारा असें जाण. ३७ जसा धुरानें अग्नि, मलानें दर्पण, अथवा वेष्टनानें गर्भ आच्छादित असतो, तसा हा जन त्याणें वेष्टित आहे. ३८ अर्जुना याकामरूप नित्य वैऱ्यानें ज्ञात्याचें ज्ञान आच्छादित आहे. या अग्नीची शांति करणें मोठें कठिण कर्म आहे. ३९ इंद्रियें, मन, आणि बुद्धि ही याचें स्थान आहें, असें ह्मणतात. यांचा आश्रय करून हा ज्ञानातें आच्छादून जीवाला मोहित करतो. ४० तस्मात् तूं आ

॥ ज्ञानयोग ॥ ४ ॥

दी इंद्रियाचें नियमन करून या ज्ञानविज्ञान नाशक पाप्याचा पराजय कर. ४१

इंद्रियें बाह्यप्रपंचाहून पर आहेत. इंद्रियांहून मन पर, मनाहून बुधि; आणि जो बुधीहून परतो तो. ४२ याप्रमाणें बुधीहून पर आत्म्यास जाणून आणि मनाला बुधीचा योगें करून या दुर्जय कामशत्रूचा पराभव कर. ४३

॥ ज्ञानयोग ॥

॥ अध्याय ॥ ४ ॥

कृष्ण ह्मणतात, मी हा अविनाशी योग पूर्वी सूर्यास वर्णिला, सूर्यानें मनूस सांगीतला, आणि मनूनें इक्ष्वाकूस उपदेशिला. १ तो असा परंपरेनें चालला. त्यास राजर्षि जाणत होते; पुढें बहुकालानें त्याचा लोप झाला. २ तूं माझा भक्त आणि सखा आहेस, ह्मणोन तोच पुरातन योग आज मी तुला सांगीतला. हें उत्तम र

स्य होय. ३

अर्जुन प्रश्न करितो, कृष्णा, तुझें जन्मतर सूर्याचा आलीकडचें. तेव्हां तूं सूर्यास हा योग उपदेशिला हें मी कसें समजावें? ४

कृष्ण उत्तर करितात. अर्जुना, तुझीं आणि माझीं जन्में बहुत गेलीं, तीं सर्व मी जाणतों, तूं जाणत नाहींस. ५

यद्यपि मी जन्मातीत, आणि अविनाशी, तसाच सर्वभूतांचा स्वामी आहे, तथापि आपल्या प्रकृतीचा ठाईं राहून, स्वशक्तीनें जन्म धारण करितो. ६ जाजा वेळेस धर्माची ग्लानि होते, आणि अधर्माचें प्राबल्य होतें, त्यात्या समयीं मी या जगांत प्रकट होतों. ७ असा मी युगायुगाचा ठाईं साधूंचा रक्षणार्थ, दुष्टांचा नाशार्थ, आणि धर्माचा संस्थापनार्थ अवतार धरितों. ८

अगा हे अर्जुना, जो माझें जन्म, आणि

॥ज्ञानयोग॥४॥

कर्म असें अलौकिक आहे, असें तत्वेंकरून जाणतो, तो देहांतर पावत नाहीं. तो मत्स्वरूपीं मिळतो. ९ बहुतं एक प्रीति, भय, क्रोध, यांस टाकून मदाकार होत्साते माझा आश्रयेंकरून ज्ञानतपेंकरून पवित्र होत्साते, मत्स्वरूपीं मिळाले. १० मनुष्य सर्वप्रकारें माझा मार्गास अनुसरतात. त्यांत जे जशी माझी सेवा करितात, तसा मी त्यास अनुकूळ होतों. ११

मनुष्यलोकीं कर्मापासून सिधि त्वरित होते, म्हणून तिचा इच्छेनें कामुक मनुष्य इंद्रादि देवताचें आराधन करितात. १२

मी चार वर्ण गुणेंकरून, आणि कर्मेंकरून, निराळे असे निर्माण केले. त्यांचा मी कर्त्ता असतांही मला अकर्त्ता आणि अविकारी असें जाण. १३

मला कर्मलेप नाहीं. आणि मला त्यांचा फलाचा ठाईं इच्छा नाहीं. असें जो मला जाण

तो, तो कर्मेंकरून बध्द होत नाहीं. १४ पूर्वींचेही मुमुक्षु हें जाणूनच कर्म करीत होते. यास्तव तेजसें करीत तसें तूं कर्म कर. १५ कर्म कोणतें, आणि अकर्म कोणतें, याविषयीं विद्वान्ही भ्रांत आहेत. आतां तें कर्म कायतें मी तुला सांगेन जें जाणून तूं अशुभापासून सुटशील. १६ कर्म, विकर्म, आणि अकर्म, यांच्यात त्यांचा बोध झाला पाहिंजे. कर्मांचा मार्ग गहन आहे. १७ जो कर्मांत अकर्म, आणि अकर्मीं कर्म पाहतो, तो मनुष्यांत ज्ञाता, आणि योगी, आणि सकलकर्म कर्त्ता होय. १८

जाचे सर्व उद्योग, वासना, आणि संकल्प, ह्म॰ मी करितों असा अभिमान, यां रहित, आणि ज्याचीं कर्में ज्ञानरूप अग्नीनें दग्ध, अशा पुरुषास बुधजन पंडित ह्मणतात. १९ तो कर्मांचा फलाची वासना टाकितो, आणि नित्यतृप्त तसा निराश्रय असा असतो, आणि

तो कर्माचाठायीं प्रवृत्त असतांही कांहींच क रीत नाहींसा असतो. २० ज्यास आशा नाहीं, ज्याचीं चित्त, देह, आणि इंद्रियें, हीं स्वाधीन आ हेत, आणि ज्याणें संसार सोडिला, तो केवळ शरीर धर्म करित होत्साता, पापातें पावत नाहीं. २१ जो देवानें प्राप्त होईल त्यांत संतुष्ट, ज्यास द्वंद्व सुखदुःखादि भेद, आणि मत्सर नाहीं, तसाच सिद्धि, आणि असिद्धि, यांच्या ठाईं समान, तो कर्में करूनही बंधन पावत नाहीं. २२ ज्याचा कर्तृत्वाभिमान गेला, जो कर्मबंधापासून मुक्त, ज्याचें चित्त ज्ञानी स्थित आहे, आणि जो शुद्धभक्ती करितां कर्म आचरितो, त्याचें कर्म सर्वप्रकारें लीन होतें. २३ आत्मज्ञान्यास यज्ञांतील पात्रें, द्रव्य, अग्नि, यजमान, आणि देवता, तसेंच त्याकर्माचें फल, सारांश सर्व कर्म ब्रह्ममय होय. २४

कित्येक देव यज्ञ करितात, ह्म० इंद्रादि

॥ज्ञानयोग॥४॥

देवताप्रीत्यर्थ हवन करितात. कित्येक ज्ञांन यज्ञ करितात, म्ह० ब्रह्मरूप अग्नींत जीवाचें आत्मरूपेंकरून हवन करितात, म्हणजे ज्या उपाधीनें चैतन्यास जीवदशा प्राप्त झाली, त्या उपाधीचा निरासकरून त्यास शुद्धरूपेंकरून निर्विशेष ब्रह्मांत मिळवितात. २५कित्येक नियमरूप अग्नीचाठाईं कर्णादिकइंद्रियांचें हवन करितात, आणि कित्येक इंद्रियरूपअग्नींत शब्दादिविषयाचें यजन करितात, म्ह० इंद्रियांस विषयविमुखकरून त्यांत शब्दादिविषयांचें अर्पणकरितात. २६ आणिखी कित्येक ज्ञानदीपित,अशाबुद्धि नियमरूप अग्नींत इंद्रियकर्में,आणि प्राण कर्में, होमितात. २७ तसेंच कित्येक द्रव्ययज्ञ, म्ह०वापी, कूप, दानादिक करणारे आहेत. कित्येक तपोयज्ञ, म्ह० चांद्रायणादितप करणारेआहेत. कोणी योगयज्ञ करणारे म्ह० यम,निय-

॥ ज्ञानयोग ॥ ४ ॥

आसन, प्राणायाम, प्रत्याहर, धारणा, ध्यान समाधिरूप योग करणारे आहेत. कोणी स्वाध्याय, म्ह० वेदपाठ तद्रूप यज्ञ करणारे आहेत; तसेच स्वाध्याय ज्ञानयज्ञ करणारे आहेत. हे यज्ञकर्ते अति तीव्र व्रत होत. २८ कित्येक प्राणाचें अपानांत हवन करितात, म्ह० उर्ध्व वायूस अधोवायूंत नेतात, तसेंच प्राणांत अपानास ओढितात, आणि दोघांचाही गति रोधून प्राणायाम करितात. २९ कित्येक विषय निवृत्त होत्साते प्राणांत प्राणास होमितात. म्ह० इंद्रियांचा मनाच्या ठाईं, मनाचे चित्ताच्या ठाईं, आणि चित्ताचा अहंकारीं संहार करितात. हे सर्व यज्ञकर्ते आपापल्या यज्ञाचरणेंकरून पापापासून शुद्ध होतात. ३० पंच महायज्ञाचें शेष अशा अमृताख्य अन्नास भोगणारे चित्तशुद्धिद्वारा सनातन ब्रह्माप्रत पावतात. यज्ञ न करणारास

हा लोक नाहीं. मग बापा अर्जुना परलोक कोठून होणार ? ३१

असे नाना विधयज्ञ वेदामधें विस्तारित आहेत, परंतु ते सर्व कायिक, वाचिक, मानसिक, कर्मापासून होत असें जाण. हें जाणून मुक्त होसील. ३२ या बाह्यांतर द्रव्यमय यज्ञांहून ज्ञानयज्ञ श्रे० सर्व काया. वाचा, मन, यांचा प्रवृत्तीची उपरमदशा हा अत्यंत चांगला होय. हा मागें ज्ञानयज्ञ सांगीतला, त्याचा परिपाक जाणावा. ज्ञानांत सर्व कर्म आहे. ३३ तें ज्ञान तत्वद्रष्टे ज्ञानी यांपासून, नमन, प्रश्न, सेवा, याहीं करून संपादन कर. ३४ ह्मणजे तूं पुनः अशा मोहांत पडणार नाहींस, आणि तुला सर्व भूतें ब्रह्ममय दिसतील. ३५ यद्यपि तूं अति पापी असलास, तथापि ज्ञानरूप नौकेनें निःसंशय पापरूप समुद्रास तरशील. ३६ जसा

॥ज्ञानयोग॥४॥

प्रदीप्त अग्नि काष्ठांस भस्म करितो, तसा ज्ञानाग्नि सर्व कर्मांस भस्म करितो. ३७ सृ ष्टींत ज्ञानासारिखें पवित्र अन्यवस्तु नाहीं. जो पुरुषयोग, ह्म० निष्काम कर्मानुष्ठान, अ थवा समाधि, याणेंकरून परिपक्व, तो का लेंकरून तें आत्मज्ञान पावतो. ३८ श्रद्धावा न्, तत्पर, जितेंद्रिय, असा पुरुष ज्ञानातें पाव तो. त्यास पावून सत्वर मुक्त होतो. ३९ आ णि अज्ञ, श्रद्धाहीन, तसाच संशयात्मा पुरुष, नाश पावतो. संदिग्धचित्त पुरुषास ह्यालो क, आणि परलोक, तसें सुखही नाहीं. ४० ज्या णें योगेंकरून कर्मांचा त्याग केला, आणि ज्याचे संशय ज्ञानेंकरून अगदीं फिटले, अ शा ज्ञान्यास कर्में बंधन करायास असम- र्थ आहेत. ४१ तस्मात् ज्ञानरूप खड्गेंकरू न हा आपल्या हृदयांतील अज्ञानकृत संश य छेदून उभा राहा, आणि निष्काम कर्मकर.

॥संन्यासयोग॥

॥अध्याय॥५॥

अर्जुन प्रश्न करितो. हे कृष्णा, तूं एकवेळ कर्म टाक असें सांगतोस, आणि पुनः कर अ सें सांगतोस, तर या दोहोंतून चांगलें कोण- तें तें निश्चित सांग. १

कृष्ण सांगतात. कर्मत्याग, आणि क र्मयोग, हे दोघेही कल्याण करते आहेत. परं तु त्यागाहून योग बरा. २ जो प्रीति आणि द्वेष यांहीकरून रहित तो नित्य संन्यासी जा णावा. असा पुरुष द्वंद्वरहित असतो, आणि तो सुखें बंधापासून मुक्त होतो. ३ सांख्य, आणि कर्मयोग यांस पृथक् असें अज्ञ बो लतात, पंडित बोलत नाहींत. एकाविषयीं चांगली निष्ठा असली ह्मणजे दोहोंचें फल पावतो. जें स्थान सांख्यांस प्राप्त होतें, तेंच योग्यासही होतें. जो सांख्य, आणि योग, या

॥ संन्यासयोग ॥ ५ ॥

उभयतांस एक जाणतो तोच जाणतो म्ह॰ तोच ज्ञाता. ५ कर्म केल्यावांचून कर्मत्याग होणें मोठें दुःख आहे. कर्म करणारा मुनि ब्रह्मप्रत शीघ्र पावतो. ६ जो पुरुष कर्में करित असतां शुध्दात्मा, तसाच जितचित्त, आणि जितेंद्रिय, आणि सर्वभूतमय आत्मा असें पाहतो, तो कर्मेंकरून लेप पावत नाहीं. ७ तत्ववेत्ता पुरुष, दर्शन, श्रवण, स्पर्शन, आघ्राण, भोजन, गमन, निद्रा, श्वास, भाषण, विसर्ग, ग्रहण, उन्मेष, निमेष, हे सर्व व्यापार होत असतां, आपण कांहींच करित नाहीं; इंद्रियें आपल्या विषयीं वर्ततात, असें निश्चयेंकरून मानितो. ९ जसें कमलपत्र जलानें लिप्त होत नाहीं, तसा जो पुरुष निःसंग कर्म करून ब्रह्मीं अर्पितो, तो पापानें लिप्त होत नाहीं. १० योगीपुरुष अभिमान टाकून केवळ शरीर, मन, बुध्दि, इंद्रियें, यांहींकरून चित्त

शुध्यर्थ कर्म करितात. कर्म करित असतां कर्म फलाचा त्याग केल्यानें अनंत सुख प्राप्त होतें. आणि रिकामा पुरुष वासनेचा योगानें फलासक्त होवून बंधन पावतो. १२ जितेंद्रिय पुरुष मनासहवर्तमान सर्व कर्माचा त्याग करून, देहरूप नवद्वार नगरांत कांहीं न करित होत्साता, आणि न करवित होत्साता, सुखें करून असतो. १३

चिदात्मा प्रभु, या जडवर्गास कर्तृत्व आणि कर्म उत्पन्न करित नाहीं, तसा यांस कर्म फलाचा योगही करित नाहीं. स्वभाव प्रवर्ततो. १४ व्यापक चिदात्मा कोणाचें पापपुण्य घेत नाहीं. अज्ञानानें ज्ञान आच्छादित आहे, तेणें करून प्राणी मोह पावतात. १५ परंतु जेव्हां तें अज्ञान विचारानें नाश पावतें, तेव्हां ज्ञान सूर्यवत् आत्मस्वरूपास प्रकाशवितें. १६ ज्यांची बुद्धि परब्रह्मीं, तेंच ज्यांचा आत्मा, ते

॥ संन्यासयोग ॥ ५॥

थेंच ज्यांची निष्ठा, आणि तेंच ज्यांचा परम आश्रय, असे पुरुष ज्ञानेंकरून निर्धूतपाप होऊन, ते मोक्ष पावतात. १७

विद्याविनयसंपन्न ब्राह्मण, बैल, हस्ती, श्वान, आणि चांडाल, इत्यादि सर्वांचाठायीं पंडित परब्रह्मस्वरूप समान पाहतात. १८ ज्यांचें मन सर्वभूतीं समानभाव पावलें, ते येथेंच जन्मातीत झाले. आणि ब्रह्मीं राहिले. कारण कीं ब्रह्म समान आणि निर्दोष आहे.

प्रियपदार्थाच्या प्राप्तीकरून हर्ष, आणि अप्रियपदार्थाच्या प्राप्तीनें उद्वेग पावूं नये आणि स्थिरबुद्धि असा मोहरहित ब्रह्मज्ञानसंपन्न, आणि ब्रह्मीं स्थित असें असावें. २० निद्रेंत विषयांचा विस्मरणेंकरून अद्वैतपणानें जा सुखाचा अनुभव होतो, तत्सुखरूप ब्रह्मवेत्ता होय. परंतु ब्रह्मवेत्त्यास इतुकाच विशेष, कीं ज्ञानास्तव तें सुख अक्षय असतें. २१

॥ संन्यासयोग ॥ ५ ॥

विषयभोग दुःखदाते होत. कांकीं त्यांस आदिअंत आहेत. यास्तव त्यांत ज्ञाता पुरुष रमत नाहीं. २२ जो यावद्देह कामक्रोधांचा वेगास सहायास शकतो, तो मनुष्य योगी तसा सुखी होय. २३ जो अंतरीं सुखी, ज्याचा अंतरीं आराम, आणि जो अंतर्ज्योति म्हणजे हीं तीन ज्यास इंद्रियद्वारा नाहींत, तो पुरुष योगी. तो ब्रह्ममय होत्साता परमानंद पावतो. २४ जे ऋषि पापापासून शुद्ध, तसेच मुक्तसंशय, जितचित्त, आणि सर्वभूतांच्या कल्याणाविषयीं तत्पर आहेत, ते निर्वाण ब्रह्मातें पावतात. २५ कामक्रोधरहित आणि जितचित्त, तसेच तत्ववेत्ते अशा यतींस मरणात् प्राक्, आणि अनंतर निर्वाण ब्रह्म आहे. २६

बाह्य विषय मनांत यवूं न देतां, भ्रुकुटीच्या मध्यभागीं दृष्टि ठेवून, ध्यानस्थ होत्सा

ता, प्राणं, अपान यांस नाकांत समान करू
न, इंद्रिय मन, बुध्दि, यांस जिंकून, मोक्षतत्प
र, आणि काम, भय, क्रोध, रहित निरंतर मु
क्त, असा मुनि; यज्ञ, आणि तपें, यांचा भो
क्ता, आणि अनंतकोटि ब्रह्मांडनायक, सर्व
भूतांचा स्नेहन्, अशा मला जाणून कैवल्य
पद पावतो. २९

॥ अध्यात्मयोग ॥

॥ अध्याय ॥ ६ ॥

कृष्ण ह्मणतात, कर्मफल टाकून जोक
रायाचें कर्म करितो, तो सन्यासी तसा योगी
होय. जो श्रौत स्मार्ताग्नि रहित, आणि कर्मेंद्रा
कणारा तो योगी नव्हे. १ हे पांडवा, ज्याला स-
न्यास ह्मणतात, तोच योग असें जाण. ज्या
णें संकल्प त्याग केला नाहीं तो योगी होत
नाहीं. २ योगमार्गाची इच्छा होण्यास निष्का

म कर्म, तीव्र, वैराग्यद्वारा कारण होय; आ-
णि योगाचा सिद्धतेस साधन कर्मत्याग होय.
३ जेव्हां इंद्रियांचे विषय, आणि तत्प्रापककर्
में यांचाठाईं आसक्त होत नाहीं, तेव्हां त्यास
र्व संकल्प सन्यासीपुरुषास योगारूढ म्ह०
योगप्रवृत्त, अथवा योगारंभी म्हणतात. ४
अशा क्रमानें कर्मद्वारा चित्तशुधीतें संपादून
योगारूढानें आपलाआपण, अभ्यास आ
णि वैराग्य यांचा बलेंकरून उद्धार करावा.
आपणास प्रपंचखेदांत घालूनये कांकीं आ
पणच आपला मित्र, आणि शत्रु, होय. ५. म
नानें मनाचा जय केला म्हणजे तें मित्र होय;
न केला म्हणजे तेंच शत्रु होय. ६ शीत, उष्ण,
सुख, दुःख, मान, अपमान, यांचाठाईं ज्याचें
चित्त निर्विकार, अशा शांतपुरुषांचें चित्त के
वळ समाधिस्थ होतें. ७ ज्याचें चित्त ज्ञानवि
ज्ञानेंकरून पूरित, आणिजो कूटस्थ, म्ह० वि

कारें रहित, तसा विजितेंद्रिय, आणि जास मृत्तिका, पाषाण, तसें सुवर्ण ही समान आहेत, अशा पुरुषास योगी ह्मणतात. ८ सुहृत, मित्र, शत्रु, उदासीन, मध्यस्थ, द्वेष्य, आणि संबंधी, तसे साधु, आणि पापी, यांचाठाई जा पुरुषाची बुध्दि समान तो श्रेष्ठ होय. ९

योगाभ्यासी पुरुषानें वासना, आणि परिग्रह, टाकून एकलाच एकांती राहून, आणि चित्त, तसें इंद्रियांसहवर्त्तमान शरीर स्थिर करून, निरंतर बुध्दीचा समाधि करावा. १० त्याचा प्रकार. शुध्द स्थानीं आपणास आसनार्थ, मध्यम प्रतीचें, ह्म० अत्यंत उच्च, तसें अति नीच नव्हे, असें मृन्मय स्थंडिल करून, त्यावर दर्भ, आणि दर्भावर कृष्णाजिन, कृष्णाजिनावर वस्त्र घालून, ११ त्या अचल आसनीं बसून, चित्त, आणि इंद्रियें, यांचा क्रिया आटोपून, मन, एकाग्र करून.

॥ अध्यात्मयोग ॥ ६ ॥

चित्तशुद्ध्यर्थ योग करावा. १२ शरीर, मस्तक, तसी मान, यातें समान, कंपरहित, स्थिरपणें धारण करून, दृष्टि नासिकाग्रीं ठेवून, दिशांतें न पाहतां; १३ शांतचित्त, भयरहित, ब्रह्मचारि व्रतस्थ असून, मच्चित्त होवून माझाठाईंच मनाचें नियमन करून, केवळ मत्पर असावें. १४ याप्रकारें निगृहीत चित्त योगी निरंतर चित्ताचें समाधान करित होत्साता, मोक्ष परम आणि मीजीचा आश्रय अशा शांतीतें पावतो. १५

फार भोजन करणारास, किंवा भोजन न करणारास, तसें फार निजणारास, आणि केवळ जागणारास, योग सिद्ध होत नाहीं. १६ तर ज्याचे आहार, विहार, परिमित आहेत; ज्याची कर्माचाठाईं व्यवस्थित प्रवृत्ति; तसें ज्याची निद्रा, आणि जागर, परिमित आहेत, अशा पुरुषास दुःखभंजनक

रणारी असा योग होतो. १७ जासमयीं नि
रुध्द, असें चित्त, आत्मस्वरूपींच राहतें, आ
णि पुरुष सर्व कामनांपासून निस्पृह होतो,
त्यासमयीं त्यास योगी ह्मणतात. १८ यो
ग करणाऱ्या योग्याचा नियमित चित्तास
निवातस्थानींचा अचंचलदीपाची उपमा हो
य. १९ जा योगावस्थेंत, योग सेवेनें निरु
ध्द असें चित्त, लीन होतें, आणि अशा चित्तें
करून निर्विकल्प आत्म्यास पाहात होत्सा
ता आत्मस्वरूपीं संतोष पावतो. २० तें अ
नंतसुख, केवळबुध्दिग्राह्य आहे - इंद्रियां
स अगोचर होय. जास्वरूपीं राहिला अ
सतां कांहींच अनुभवित नाहीं, आणि त्या
तत्वापासून चळत नाहीं. २१ जें प्राप्त झा-
लें असतां अन्यलाभास त्यासारिखा थोर
मानित नाहीं. जेथें राहत असतां पुरुषास
महत् ही दुःखचलन करित नाहीं. २२ या

॥अध्यात्मयोग॥६॥

दुःखसंयोगाचा ह्म० अंतःकरणसंबंधाच्या वियोगाचें नाम योग असें जाणावें. तो योग निर्वेदरहित होवून निश्चयानें अभ्यासावा. २३ संकल्पापासून उत्पन्न अशा सर्व कामातें निखालस टाकून, मनेंकरून इंद्रिय समुदायातें विषयांपासून आवरून, दृढबुद्धीकरून, हळूहळू विषयांपासून उपरत व्हावें. मनास आत्मसंस्थ करून कांहींच चिंतूं नये. २५ हें अस्थिर मन जेथेंजेथें जातें, तेथून तेथून आटोपून आणून स्वरूपीं ठेवावें. २६ अशा शांत चित्त, रजोगुणरहित, ब्रह्मभूत, आणि पापरहित,

योग्याला उत्तम सुख स्वयें प्राप्त होतें. २७ कल्मषरहित योगी, असें निरंतर मनाचें समाधान करित होत्साता, अनायासें ब्रह्मीं मिळोन परमानंदैकरूप सुखातें पावतो. २८ सर्वत्र समदर्शन, असा योगी, सर्व भू

ता आपणास, आणि आपणांत सर्वभूतांस पाहतो. २९ जो मला सर्वांत पाहतो, आणि सर्वांस माझ्याठायीं पाहतो, त्याचा मी नाश पावत नाहीं, म्ह० मी त्याला दूर नाहीं, आणि माझा तो नाश पावत नाहीं, म्ह० तो मला दूर नाहीं, म्ह० आमचें एकमेकांस तिरोधान होत नाहीं. ३० जो भेदरहित होत्साता सर्वभूतस्थित अशा मला भजतो, तो योगी सर्वप्रकारें वागत असतां, माझ्याठाईंच असतो. ३१ अगा हे अर्जुना आपणासारिखेंच लोकांस सुख दुःख होतें असें समजून, जो प्राणिमात्रास पीडा करित नाहीं, तो योगी श्रेष्ठ गणला आहे. ३२

अर्जुन पुसतो. हे कृष्णा, हा तूं जो साम्येंकरून योग सांगीतला त्याची स्थिति स्वभावाचा चांचल्यामुळें मला स्थिर वाटत नाहीं. ३३ मन चंचल आणि मथनशील, बलवत्,

आणि हट्टी आहे. त्याचा निग्रह वायूचा निग्र
हासारिखा मी मोठा दुष्कर मानितों. ३४

कृष्ण उत्तर करितात. हे महाबाहो, निः
संशय मन चंचळ आणि दुर्निग्रह आहे. त
थापि अभ्यास, तसें वैराग्य, यांहींकरून
याचा निग्रह होतो. ३५ माझा मतें अजितचि
त्तपुरुषास योग दुष्प्राप होय. परंतु जो स्वा
धीन चित्त, अशा प्रयत्न करणारास, उपायें
करून प्राप्त व्हावयास शक्य आहे. ३६

अर्जुन प्रश्न करितो. हे कृष्णा, भावें
करून योगमार्गीं प्रवृत्त पुरुष, प्रयत्न करि
त असतां, जर त्याचें मन, योगापासून चळू
न त्यास योगसिद्धि झाली नाहीं, तर तो को
ण त्या गतीप्रत पावतो ? ३७ तो कर्ममार्ग,
आणि योगमार्ग, यांपासून भ्रष्ट, निराधा
र होऊन जाता ब्रह्ममार्गीं मूढ, असा, छिन्न अ
भ्रा सारिखा नाहींसा होत नाहींना ? ३८

॥ अध्यात्मयोग ॥ ६ ॥

हे कृष्ण, हा माझा संशय निःशेष छेदा
वयाविषयीं तूं योग्य आहेस. तूजहून आण
खी कोणीही संशय दूर करणारा नाहीं. ३९
कृष्ण सांगतात. अरे बापा, त्याचा इह
परत्र नाश नाहीं. कल्याण करणारा कोणीही
दुर्गतीस पावत नाहीं. ४० (अपघातानें) यो
गापासून भ्रष्ट पुरुष पुण्यलोकांप्रत जावून,
तथें बहुत वर्षें वास करून, पवित्र श्रीमंताचा
घरीं पुनः जन्म घेतो. ४१ यद्वा बुद्धिमान् अ
शा योग्यांचा गृहीं जन्म धारण करितो. लो
कांत असें जन्म होणें परम दुर्लभ होय. ४२
तेथें तो पूर्व देहींचा बुद्धी संयोगास पावतो,
आणि पुनः योग सिद्ध्यर्थ यत्न करितो. ४३
तो पराधीन असला तथापि त्यास पूर्वाभ्या
स योगास लावितो. तो योगाची इच्छा बाळ
गीत असतांही कर्मकांड वेदातीत होतो.
(म्ह० त्यास पित्रादिक अन्यकर्माकडे लाव

णारे यांची आज्ञा अनुल्लंघ्य नाही. ४४ आणि तो योगी प्रयत्नेंकरून यत्न करित होत्साता निष्पाप असा, अनेक जन्मेंकरून, सिद्ध होऊन, मोक्ष पावतो. ४५ तपस्वी ह्म० कृच्छ्रचांद्रायणादि करणारे; आणि ज्ञानी, ह्म० शास्त्रीय ज्ञानवान् कर्मी, ह्म० अग्निहोत्रादि कर्म करणारे, यां सर्वांहून योगी अतिश्रेष्ठ होय. तस्मात् हे अर्जुना तूं योगी हो. ४६ सर्व योग्यामधें जो मदर्पित अंतःकरणेंकरून भाविक होत्साता मला भजतो, तो मला अतिमान्य होय. ४७

॥ विज्ञानवर्णन ॥

॥ अध्याय ॥ ७ ॥

कृष्ण ह्मणतात, हे अर्जुना, माझाठाईं चित्त ठेवून, योगातें करित होत्साता, मदाश्रित असा मला निःसंशय जा रीतीनें जाणशील तेंस

॥विज्ञानवर्णन॥७॥

भ भ म्ह. १ हें ज्ञानविज्ञान मी तुला निःशेष सांगेन. जें जाणून आणखीं दुसरें कांहीं येथें जाणायाचें राहत नाहीं. २

सहस्त्र मनुष्यांत एखादा पुरुष सिद्धिसाठीं यत्न करितो. आणि यत्न करणाऱ्या अशा सिद्धांत एखादा मला यथार्थ जाणतो. ३ माझी प्रकृति अष्टविध आहे. तिचे प्रकार पृथ्वी, उदक, अग्नि, वायु, आकाश, मन, बुद्धि, आणि अहंकार, हे होत. ४ ही प्रकृति अपर म्ह० जड होय. याहून श्रेष्ठ दुसरी जीवभूत प्रकृति जाण. जी या जगाचें धारण करिते. हीपर, म्ह० चैतन्यरूप, होय. ५ या दोन प्रकृति सर्वभूतांचे कारण होत. मी सर्व जगाचें उत्पत्तिकारण, आणि लयाचें स्थान, होय. ६ मजहून दुसरें कांहीं नाहीं. सूत्रांत मण्यासारिखा, सर्वप्रपंच माझाठाईं प्रोत, म्ह० ओविला आहे. ७ उदकाचाठाईं मी रस

आहें. चंद्रसूर्याचाठाईं मी प्रभा आहें. सर्व वेदांचाठाईं मी प्रणव, ह्म० ॐ कार आहें. आकाशीं शब्द आहें. मनुष्यांचाठाईं मी पुरुषत्व आहें. ८ पृथ्वीचाठाईं मी सुगंध आहें. अग्निचाठाईं मी दहन शक्ति आहें. सर्व भूतांचाठाईं जीवन ह्म० आयुष्य, यद्वा, अन्न मी आहें. तपस्व्यांचाठाईं मी तप आहें. ९ हे अर्जुना सर्वभूतांचें मी सनातन बीज होय असें जाण, बुद्धिमंताची बुद्धि मी आहे. तेजस्व्यांचें तेज. १० बलवंताचें बल; कामराग विवर्जित, असें मी आहें. आणि भूतांचाठाईं धर्मास विरुद्ध नव्हे असा काम मी आहें. ११ सात्त्विक ह्म० ज्ञानवैराग्येश्वर्यादिक, राजस ह्म० लोभ इत्यादिक, आणि तामस ह्म० निद्रालस्यादिक, हे त्रिगुणमय भाव मजपासून झाले असें जाण. परंतु मी त्यांचाठाईं नाहीं. ते माझाठाईं आहेत. १२ या तीन गुणमय भावनानीं हें सर्वजग मोहित

॥ विज्ञानवर्णन ॥ ७ ॥

होत्साते, यांहून मी वेगळा असें मला जाणत
नाही. १३ ही प्रपंचरूप गुणमयी माझी दैवी
माया दुरतिक्रम आहे. जे मजप्रतच पाव
तात, ते इला तरतात. १४ जांचें ज्ञान मायेनें
आहृत. असे पापी. मूढ. आणि नराधम, ह्म.
नीचमनाचे. असुरभावाप्रत राहिले होत्सा
ते मजप्रत येत नाहींत. सांशः; माया, वि
क्षेप; आणि आवरण, या दोन शक्तीकरून,
सर्व अनर्थाचें मूळ होय. १५

हे अर्जुना पीडित ज्ञानेछु. अर्थार्थी, आ
णि ज्ञानी. असे चतुर्विध पुण्यवान् लोक मला
भजतात. १६ त्यांत ज्ञानी नित्ययुक्त तसाच
एकभक्ति ह्मणून विशिष्ट होय. ज्ञान्यास मी
अत्यंत प्रिय आहें, आणि तो मला प्रिय आहे.
१७ हे सर्व चतुर्विध भक्त श्रेष्ठच होत. परंतु
ज्ञान्यास मी माझा आत्मा असें मानितों-कां
कीं तो माझा ठाईं समाहितचित्त होत्साता. सर्वो

॥ विज्ञानवर्णन ॥ ७ ॥

त्कृष्ट गति रूप अशा मला मत्प्राप्त्यर्थ भज
तो. १८ बहुजन्मानीं सर्वांचाठाईं वासुदेव
आहे अशा ज्ञानेंकरून संपन्न होत्साता, म
जप्रत पावतो. असा ज्ञानवान् अति दुर्लभ
होय. १९ ज्यांचें ज्ञान नाना प्रकारच्या मनोरथें
करून गेले, अशे स्वभाव बद्धपुरुष, त्यात्या
मनोरथांचे दाते अशा देवांच्या आराधनेसवि
हित, तेते नियम आचरून, त्यात्या देवतांप्रत
पावताहेत. २० जोजो भक्त भावेंकरून, ज्याज्या
देवतेस पूजायास इच्छितो, त्याच्या त्याच्या त्या
श्रद्धेस मीच अचल करितों. २१ तो त्या श्र
द्धेनें युक्त होत्साता, त्या देवतेस प्रसन्न करितो.
आणि परिणामीं मीच आज्ञापिले अशा इष्ट
मनोरथांतें पावतो. २२ परंतु अशा अल्पबु
द्धीस अशाश्वत फळ होतें. देवभक्त देवांप्रत
जातात. माझे भक्त मात्र मजप्रत पावतात.
२३ माझ्या सर्वोत्तम अशा परतत्वास नजा-

॥विज्ञानवर्णन॥७॥

णत्त ह्यास्तव मूढ निराकार अशा मला साका
र मानितात. २४ मी सर्वांस अस्पष्ट आहे.
कांकीं मी योगमायेनें आच्छादित आहें. मूढ
लोक मी जन्ममरण शून्य आहें असें जाण:
त नाहींत. २५ हे अर्जुना. भूत, भविष्य, वर्त्त
मान भूतांस, मी जाणत्तों. परंतु मला कोणी
जाणत नाहीं. २६ इच्छा, आणि द्वेष, यां पा
सून उत्पन्न अशा द्वंद्व मोहेंकरून सृष्टींत
सर्व भूतांच्या बुध्दि मोह पावतात. २७ ज्यास
न्मार्गस्थ जनाचें पापनाश पावलें आहे, तेत्या
द्वंद्व मोहा पासून मुक्त होत्साते, दृढव्रत धरू
न, मला भजताहेत. २८ जे जरामरणापा:
सून मुक्त व्हावयाकरितां, मला आश्रय करू
न, यत्न करित्तात, ते परब्रह्म जाणतात, आ
णि संपूर्ण अध्यात्म, ह्म० त्वंपदार्थजीव, आ
णि सर्वकर्म, ह्म० तत्त्वंपदार्थांचा ज्ञानाचे सा
धन भूत, अशे सर्वस्वधर्म. यांस जाणतात.

॥विज्ञानवर्णन॥७॥

२९ अधिभूत, अधिदेव, आणि अधियज्ञ, यांसहित अशा मला जे उपासितात ते मरणकालींही मातें स्मरतात. ३०

॥पुरुषोत्तमयोग॥

॥अध्याय॥८॥

अर्जुन प्रश्न करितो. हे पुरुषोत्तम, ब्रह्म तें काय? अध्यात्म काय? कर्म तें काय? अधिभूत कशाला ह्मणतात? अधिदेव काय? या देहांत अधियज्ञ कोण? आणि तो जाणावा कसा? जितचित्त पुरुषानीं अंतकालीं तुला जाणावा कसा? २

कृष्ण सांगतात. जें अविनाशि, आणि परम, ह्मणजे श्रेष्ट तें ब्रह्म होय. अध्यात्म ह्मणजे स्वभाव. भूतांचा सात्त्विकादिक स्वभाव आणि उत्पत्ति यांचें कारण, अशा द्रव्य युक्त यज्ञादि क्रियांस कर्म ह्मणतात. ३ अधिभूत,

॥ पुरुषोत्तमयोग ॥८॥

[illegible] अधिदेव ह्म॰ सर्वदेहांत राह
णारा सर्वदेवतात्मा हिरण्यगर्भ जो तो होय.
अधियज्ञ, ह्म॰ यज्ञाभिमानी विष्णु, तो सर्वां
चा देहांत मीच होय. ४ अंतकालीं मलाच स्म
रत होत्साता कलेवरातें ह्म॰ देहातें टाकून जो
प्रयाण करितो, तो निःसंशय मजप्रत पावतो.
५ सारांश निरंतर जीजी भावना असते, तीती
अंतकालीं होते. आणि कलेवर त्यागानंतर त
दनुरूप परिणाम पावतो. ६ यास्तव तूं सर्व
काल माझेंच स्मरण कर, आणि युद्ध कर. तु
झें मन आणि बुद्धि माझाठाईं ठेव, ह्मणजे तूं
निःसंशय मजप्रत पावशील. ७ जो मनुष्य
अभ्यासयोगयुक्त, आणि अनन्यगामिचित्तें
करून दिव्य अशा परमपुरुषातें निरंतर चिं
तितो, तो त्याप्रत पावतो. ८ प्रयाणकालीं अ
चल मनेंकरून भक्ति आणि योगबल यांहीक
रून युक्त होत्साता, भ्रुकुटीचा मधें प्राणातें स

---

* पंचमहाभूतें.

ध्यकू ठेवून जो सर्वज्ञ, पुराण. जगाचा अंतर्यामी सूक्ष्माहून सूक्ष्म, सर्वांचा धाता. अचिंत्य रूप, आदित्यवर्ण, अविद्येहून पराचीन, अशा पुरुषातें स्मरतो, तो त्या परपुरुषाप्रत पावतो. १०

आतां जास वेदवेत्ते अक्षर बोलतात. जाचाठाई रागरहित सन्यासी प्रवेश करितात, आणि जातें इच्छिणारे ब्रह्मचर्यातें धारण करितात, त्यापदाची मी तुला थोडक्यांत वळख करून देईन. ११ सर्व इंद्रियांचा निग्रह करून, आणि हृदयीं मनाचा निरोध करून आपला प्राण मूर्धस्थानीं ह्म० भ्रुगुटीचा मध्यभागीं ठेवून. योगधारणेच्याठाई राहिला असा. १२ ॐम्. अशा एकाक्षर ब्रह्मातें स्मरणपूर्वक उच्चारित होत्साता. जो देहत्याग करितो, तो परमगतीप्रत पावतो. १३ जो अनन्यचित्त निरंतर मला स्मरितो, त्या नित्ययुक्त योग्यास

मी सुलभ आहें. १४ महात्मेपुरुष याप्रकारें
परम सिद्धीप्रत पावले होत्साते मजप्रत ये
तात, ते पुनः दुःखालय अशा जन्मातें पावत
नाहींत. १५ हे अर्जुना, ब्रह्मभुवनासहवर्तमा
न सर्वलोकांपासून पुनरावृत्ति होते. परंतु
जो मजप्रत पावतो, त्यास पुनर्जन्म नाहीं. १६
ते प्रसिद्ध अहोरात्र वेत्तेजन, ब्रह्मदेवाचा दिवस
सहस्र चौकड्या पर्यंत, आणि तसीच रात्रि
ही सहस्रयुगचतुष्टयावधि असें जाणतात.
१७ तो दिवस प्राप्त जहाला ह्मणजे सर्वव्यक्ति
अव्यक्तापासून होतात. आणि ती रात्रि प्राप्त
झाली ह्मणजे सर्वअव्यक्ती लीन होतात. १८
हा भूतसमूह परवश ह्म० अविद्या काम क
र्माधीन होत्साता पुनःपुनः दिवससमयीं हो
ऊन रात्रिसमयीं लीन होतो. १९ जो सर्वभू
त समूह लयीं नाश पावत नाहीं, तो पर, आ
णि व्यक्तीपासून वेगळ्या भावाचा होय. तो अ

व्यक्त, आणि सनातन आहे. २० जारें अव्यक्त आणि अक्षर असें ह्मणतात त्यासच परमगति ह्मणतात. ज्याप्रत पावोन पुनः निवृत्त होत नाहीत. असें तें माझें परम धाम होय. २१ तो परमपुरुष अनन्य भक्ती करून लभ्य होय. भूतें ज्यांचा अंतःस्थ होत, आणि ज्याचा हा सर्वप्रसार होय. २२

आतां योगी ज्याकाळीं गलें असतां आवृत्ति, आणि ज्याकाळीं गेले असतां अनावृत्ति पावतात, त्याकालातें मी तुला सांगेन.

ब्रह्मवेत्तेजन अग्निज्योति, दिवस, शुक्लपक्ष, उत्तरायण, यांचा देवतांच्याठायीं प्रयाण करित होत्साते ब्रह्माप्रत पावतात. २४ योगी ह्म॰ कर्मी, धूमरात्रि, कृष्णपक्ष, दक्षिणायन. यांच्या देवतांच्याठायीं प्रयाण करित होत्साता चांद्रमस ज्योतीप्रत जावून निवृत्त होतो. २५ या शुक्ल, आणि कृष्ण, दोन जगाच्या शा

श्चन गाते अशा मान्य आहेत. प्रथम गतीनें पुनरावृत्ति होत नाहीं- दुसरीनें पुनर्जन्म होतें. २६ या दोन गति जाणत होत्साता योगी मोह पावत नाहीं- तस्मात् हे अर्जुना, तूं सार्वकाल योगयुक्त हो. २७ योगी, हें जाणून वेदाध्ययन, यज्ञानुष्ठान, आणि तपदान, यानें जें पुण्यफल शास्त्रांत वर्णिलें आहे, त्या सर्वांस अतिक्रमितो, आणि आद्य आणि पर अशा स्थानाप्रत पावतो. २८

॥ राजविद्यागुह्ययोग ॥

॥ अध्याय ॥ ९॥

कृष्ण ह्मणतात. अत्यंत गोप्य असें हें (ज्ञप्तिमात्रस्वरूप) गुणाच्या ठाईं दोषाविष्करण न करणार अशा तुला मी अनुभवसहित सांगेन: जें जाणून संसारापासून मुक्त होसील. १ तें विद्यांचा राजा, गोप्यांचा राजा, पवित्र, उत्तम प्रत्यक्षावगम, ह्म० वस्तूस प्र

त्यक्ष दाखविणारें, धर्मयुक्त, अव्यय, आणि करायास सुलभ होय. २ या धर्मावर विश्वास न ठेवणारे पुरुष मला न पावोन, मृत्युसंसारमार्गीं निवर्ततात. ३

मी माझ्या अव्यक्तस्वरूपानें हें सर्व जग व्यापिलें आहे. सर्व भूतें माझ्याठाईं भासतात-मी त्यांच्याठाईं नाहीं, ४ आणि तीं माझ्याठाईं नाहींत. हा माझा ऐश्वरयोग, ह्म॰ माझी भूतांसह वर्त्तमान युक्ति घटना, पहा ! माझा आत्मा भूतांचा धारणकर्त्ता होय-त्यांच्याठाईं आश्रित नाहीं-त्यांचा रक्षिकर आहे. ५ जसा सर्वव्यापक महान् वायु, आकाशीं स्थित आहे, तशीं सर्व भूतें माझ्याठाईं स्थित आहेत असें जाण. ६ हे कौंतेय कल्पक्षयीं सर्व भूतें माझ्या प्रकृतीप्रत जातात आणि कल्पाच्या आरंभीं मी त्यांस पुनः उत्पन्न करितों. ७ मी आपल्या प्रकृतीचा आश्रय करून, स्वभाववशें

करून कामक्रोधाद्यधीन अशा या भूतग्रामा स पुनःपुनः नानाविध उत्पन्न करितों. ८ तींउ त्पत्त्यादिकर्में मला बंधन करित नाहींत. कांकीं मी त्या कर्मी उदासीनाचेपरि आसक्तिशून्य आहें. ९ माझ्या प्रवर्तकपणानें प्रकृति चराच रांस उत्पन्न करिते. हे कौंतेय याहेतूकरून ज गद्भ्रमण पावतें. १०

मूढजन माझें परतत्त्व न जाणून भूतां च्या महेश्वर असाही मनुष्यदेहाप्रत आश्रि त जो मी त्या माझी अवज्ञा करितात. ११ तेरा क्षसी, आणि आसुरी, म्ह० रजस्तमोमयी अ शा मोह करणाऱ्या प्रकृतींचा आश्रय करित होत्साते, निष्फल ज्यांचा आशा, निष्फल ज्यांचीं कर्में, निष्फल ज्यांचें ज्ञान, तसेंच विवेकहीन असे होत. १२

महात्मेतर दैवी, म्ह० सत्वप्रधान अशा प्रकृतीप्रत आश्रित होत्साते, भूतांचा आदि.

आणि अव्यय अशा मला जाणून मातें एकाग्रचित्तानें भजतात. १३ कोणी नित्य सावधान असे दृढव्रतें धारण करून यत्न करित होत्साते, सतत कीर्त्तन, नमस्कारादि द्वारा भक्ति करून मला उपासितात. १४ कित्येक ज्ञानयज्ञें करून यजन करित होत्साते, मला उपासितात. तसे कित्येक एकत्वें करून, पृथक्त्वें करून, बहुप्रकारें करून, विश्वतोमुख अशा मला उपासितात. १५ क्रतु, म्ह० देवता ध्यानरूप संकल्प मी; यज्ञ, म्ह० श्रौत. स्मार्त्त, देवतोद्देशें करून, द्रव्यत्याग मी; स्वधा म्ह० पितरांचें अन्न मी औषध म्ह० मनुष्यांचें अन्न मी, मंत्र मी. मीच आज्य म्ह० घृत. मी अग्नि, मी हुत. १६ या जगाचा पिता मी, माता, धाता, आणि पितामह मी, वेद्य मी, पवित्र मी, ॐकार मी, ऋग्वेद, सामवेद, आणि यजुर्वेद मी होय. १७ गति, भर्त्ता, प्रभु, साक्षी, निवास, म्ह० आश्रय, शरण, म्ह० रक्षक,

॥ राजविद्यागुह्ययोग ॥ ९ ॥

आणि स्थितृत् मी. प्रभव म्ह० उत्पत्तिस्थान मी; आणि लयस्थान मी. निधान मी. अव्ययबीज मी होय. १८ सूर्यरूपें करून ताप तों मी. वृष्टि मी. तीचा निग्रह आणि उत्सर्जन मी च करितों. अमृत म्ह० जीवन. आणि मृत्यु मी. सत् मी, तसें असत् मी होय. १९

तीनवेद विद्या जाणणारे, आणि सोमपान करणारे, पापरहित होत्साते. यज्ञें करून यजन करून मजप्रत स्वर्गगतीतें प्रार्थितात. तें पुण्य अशा इंद्रलोकाप्रत पावोन स्वर्गीं दिव्यदेवभोगातें भोगितात. २० ते त्या विशाल स्वर्गलोकास भोगून पुण्याचा क्षय झाला. म्ह मृत्युलोकाप्रत पुनः पावतात. या प्रकारें विषयकामुक पुरुष, वेदत्रयीमधें उक्त असा हा धर्म म्ह० काम्ययज्ञ त्याप्रत अनुसरतात. त्यांचा मागें जाणें येणें लागतें. २१ जे अनन्यपणें चिंतित होत्साते मला उपासितात, त्यानि

त्य भक्तांचें योगक्षेम ह्म॰ सर्वकृत्यभार मी वा
हतों. जे अन्यदेवतांची सेवा श्रद्धेकरून करिता
त, त्यासही माझीच सेवा त्यांत घडते-तीं विधि
पूर्वक मात्र घडत नाहीं. २३ मीच सर्वयज्ञाचा भो
क्ता आणि फलदाता होय. जन मला यथार्थ जाण
त नाहींत ह्मणूनच्यवतात. देवव्रत ह्म॰ इंद्रादिदे
वार्चक देवांप्रत जातात; पितृव्रत पितरांप्रत जाता
त; पिशाचयाजक पिशाचांप्रत जातात; आणि म
द्याजक मजप्रत पावतात. २५

पत्र, पुष्प, फल, जल, यांतें जो जितात्मा
मला भक्तिपूर्वक अर्पितो, त्याचें तें भक्तीनें अ
र्पिलेलें मी स्वीकारितों. २६ हे अर्जुना, तूं जें का
य करितोस, भक्षितोस, होमितोस, देतोस,
आणि तपतोस, तें सर्व मदर्पण कर. २७ ह्मण
जे शुभाशुभ फल देणार अशा कर्मबंधनें
करून मुक्त होसील; आणि सन्यास योगीं
समाहितचित्त होत्साता, मजप्रत पावशील.

॥पुरुषोत्तमयोग॥९॥

२८ मी सर्वभूतीं समान आहें. मला कोणी द्वेष्य, तसा प्रिय नाहीं. परंतु मला जे भक्तिपूर्वक भजतात, ते माझ्याठाईं आहेत, आणि मी त्याच्याठाईं आहें. २९ कोणी कितीका दुराचार असेना, जर तो मला अनन्यभावेंकरून भजतो, तर तो साधूच मानावा. त्याचा तो निश्चय उत्तमप्रकारचा होय. ३० तो शीघ्र धर्मात्मा होतो, आणि शाश्वत शांतीतें पावतो. हे कौंतेय, तूं पक्कें जाणकीं माझा भक्त नाश पावत नाहीं. ३१ जे पापयोनि स्त्री, वैश्य, शूद्र, तेही मला आश्रय करून परगतीप्रत पावताहेत. ३२ मग भक्त, आणि पुण्य, ह्म॰ पवित्र असे ब्राह्मण, तसे राजर्षि पावतील हें काय सांगावें. हा लोक अनित्य, आणि असुख आहे, असा विचार करून मला भज. ३३ मच्चित्त, माझा भक्त, मत्प्रीत्यर्थ यजन करणारा हो; आणि मला नमस्कार कर. असा योग करून, मत्परायण होत्साता आत्मा अशा मज

विभूतियोग ॥ १० ॥

प्रत पाव सील. ३४

॥ विभूतियोग ॥

॥ अध्याय ॥ १० ॥

कृष्ण ह्मणतात. हे महाबाहो, पुनः माझें उत्तम वचन ऐक. जें आदरयुक्त जो तूं त्या तुझें हित व्हावें या इच्छेनें तुला मी सांगेन. १

सुरगण, तसेंच महर्षि, माझा ऐश्वर्यातें जाणत नाहींत. कारण कीं मी सर्व देवांचा तसाच महर्षींचा आदि होय. २ सर्वलोकांचा महेश्वर, ह्म० परमेश्वर, आणि कारणशून्य, अतएव जन्मातीत, असें मला जो पुरुष जाणतो, तो मनुष्यांत ज्ञाताः तोच सर्व पापापासून मुक्त होतो. ३ बुद्धि, ज्ञान, असंमोह, क्षमा, सत्य, दम, शम, सुख, दुःख, भव, ह्म० उत्पत्ति, भाव, ह्म० सत्ता, भय, अभय, अहिंसा, समता, संतोष, तप, दान, यश, अयश, असे प्रथक् प्रकारचे मनोभाव भूतांस मजपासून होतात. ५ प्राचीन भृग्वादि सप्तर्षि, आ

णि तसेंच सनक, सनंदन, सनातन, सनत्कु-
जात, हे चार महर्षि, आणि स्वायंभुवादिक चतु
र्दश मनु, हे सर्व (हिरण्यगर्भरूप) अशामा
झ्या मनापासून झाले (ते माझ्यागाईं निष्ठावान्
होत) त्यांपासून लोक, आणि या स्थावरजंग
मादिक प्रजा उत्पन्न झाल्या आहेत. ६ ही मा
झी विभूति, आणि योग, यांस जो तत्वें करून
जाणतो तो निर्विकल्प समाधियुक्त होतो. ७
मीं सर्वांचा प्रभव, मजपासून सर्व उत्पन्न होतें,
असें मानून भावनायुक्त ज्ञानी मला भजता
त. ८ ते मच्चित्त तसे मद्गत प्राण असे परस्प-
रांस बोधवित होत्साते, आणि माझेंच कथन क
रित होत्साते, आपआपल्यांत संतोष पावता
त, आणि रमतात. ९ जे माझ्या सेवेस निरंत
र लागतात, त्यांस मी प्रीतिपूर्वक त्या बुद्धियो
गातें देतों, जाणेंकरून ते मजप्रत पावतात.
१० आणि मी कृपाळुपणानें, आत्मभावीं स्थि

॥ विभूतियोग ॥ ९ ॥

त असा ज्ञानदीपें करून त्यांचा अज्ञानजनित तमाचा नाश करितों. ११

अर्जुन प्रश्न करितो. तूं परब्रह्म, परधाम, परम पवित्र वस्तु होस. सर्व ऋषि, देवर्षि, नारद, असित, देवल, व्यास, हे तुला, आदिदेव जन्मातीत, व्यापक, दिव्य, शाश्वतपुरुष, असें ह्मणतात. १३ आणि तूंही मला तसेंच सांगतोस. हे केशवा, हें सर्व जें मज प्रत बोलतोस, तें मी सत्य मानितों. तुझ्या व्यक्तीतें देव जाणत नाहींत. तसेंच दानव जाणत नाहींत. १४ हे भूत भावन, हे भूतेश, हे देवदेव, हे जगत्पते, तूं स्वयें आपण आपणास जाणतोस. १५ तर ज्या विभूतीकरून तूं या लोकांस व्यापून राहतोस, त्या तुझ्या दिव्य विभूतीतें तूंच अशेषेंकरून सांगायास योग्य आहेस. १६ हे योगिन्, मी तुझें निरंतर चिंतन करित असतां तुला कसें जाणावें? कोणकोणत्या पदार्थी मी तुझें

चिंतन करावें ? १७ तूं आपला योग आणि वि भूति, ह्मo ध्यानावलंबनभूत. आकृतिभेद वि स्तरेंकरून पुनः सांग. कांकीं तुझ्या वचनामृ त प्राशनेंकरून मला अद्यापि तृप्ति होत नाहीं.

कृष्ण ह्मणतात फार चांगलें तर बापा! हे कुरुश्रेष्ठ, दिव्य अशा माझ्या विभूति मुख्य त्वेंकरून मी तुला सांगेन. माझ्या विस्तारास अंत नाहीं. १९

सर्व भूतांच्या हृदयीं स्थित असा जो आ त्मा तो मी. भूतांचें जन्म स्थिति कारण, तसें लयस्थान मी होय. २० सूर्यामधें मी विष्णु आहें. ज्योतीमधें मी अंशुमान् असा रवि होय. मरुतामधें मी मरीचि. आणि नक्षत्रांत मी चंद्र होय. २१ वेदांत सामवेद मी. आणि देवांत इं द्र मी आहें. इंद्रियांत मन मी. आणि भूतां ची चेतना मी होय. २२ रुद्रांत शंकर मी; आ णि यक्षराक्षसांत कुबेर मी होय. वसूंत पाव

क मी. पर्वतांत मेरू जो तो मी आहें. २३ पुरो
हितांत मुख्यपुरोहित बृहस्पति मला जाण.
मी सेनापतींत स्कंद. तसा जलाशयांत सा-
गर मी होय. २४ महर्षींत मी भृगु. वाणींत ए
काक्षर स्म० ॐ कार मी. यज्ञांत जपयज्ञ मी;
आणि स्थावरांत हिमालय मी आहें. २५ त
सा सर्व वृक्षांत अश्वत्थ, आणि देवर्षींमधें ना
रद मी होय. गंधर्वांत चित्ररथ, तसा सिद्धांत
कपिलमुनि मी आहें. २६ अश्वांत अमृतम
थनसमयीं झाला असा उच्चैःश्रवा मला जाण.
गजेंद्रांत ऐरावत, आणि मनुष्यांत राजा मी.
असें जाण. २७ आयुधांत वज्र, आणि धेनूंत
कामधेनु मी आहें. उत्पत्तिकर्त्ता असा जो का
म तो मी होय. सर्पांत वासुकी; तसा नागांत,
अनंत, जलचरांत वरुण, आणि पितरांत अ
र्यमा मी होय. नियमन कर्त्यांत यम मी. २९ दे
त्यांत प्रल्हाद मी. कलनकर्त्यांत काल मी. मृ

गांत सिंह; आणि पक्ष्यांत गरुड मी जाण. ३०
वेगवंतांत वायु मी आहें. शस्त्रधरांमधें दाश
रथिराम मी. झषांत ह्म॰ मत्स्यादिकांत मकर
मी आहें. नदींत जाह्नवी ह्म॰ भागीरथी मी. ३१
भौतिकांचा आदिमध्य आणि अंत मी आहें.
विद्यांत अध्यात्मविद्या; आणि भाषणांत वा
द मी. ३२ अक्षरांत अकार; तसा समास स-
मुदायांत द्वंद्व मी आहें. आणिखी अविनाशी
काळही मीच होय. तसाच धाता, ह्म॰ कर्मफ
लप्रद. आणि विश्वतोमुख असा मी आहें. ३३
सर्व हरण करणार असा मृत्यु मी. पुढें होणा
रांच्या उद्भव मी. नारींत कीर्ति, श्री, वाणी, स्मृ
ति, मेधा, धृति, क्षमा, मी होय. ३४ सामांत ब
हत्साम; आणि छंदांत गायत्री मी होय. मा
सांत मार्गशीर्ष; तसा ऋतूंत वसंत मी. ३५
कपटकृतींत द्यूत मी. तेजस्व्याचें तेज मी.

अथवा पवित्र कर्त्यांत

॥ विभूतियोग ॥ १० ॥

जय आणि व्यवसाय[+] मी. सात्विकांचें सत्व मी. ३६ वृष्णींत वासुदेव, आणि पांडवांत धनंजय, (अर्जुन) मी होय. मुनींत व्यास. आणि कवींत उशना (शुक्र) कवि मी आहें. ३७ दमनकर्त्यांचा दंड मी; आणि जयेच्छावंतांची नीति मी, गुह्यांत मौन मी; आणि ज्ञानवंतांचें ज्ञान मी. ३८ तसेंच अर्जुना, सर्व भूतांचें बीज मी होय. मजवांचून चराचर भूत नाहीं. ३९ माझ्या दिव्य विभूतींचा अंत नाहीं. हा विभूतींचा विस्तार मी एकदेशें करून सांगीतला. ४० जेंजें भूत ऐश्वर्ययुक्त, आणि श्रीमत्, आणि बलयुक्त, तेंतें माझ्या तेजाच्या अंशापासून उत्पन्न असें जाण. ४१ परंतु अर्जुना, तुला हें बहु ज्ञान कशास. मी एकांशें करून या जगातें व्यापून राहिलों आहें. ४२

+ उद्यम किंवा निश्चय.

॥ विश्वरूपदर्शन ॥

॥ अध्याय ॥ ११ ॥

अर्जुन ह्मणतो, माझा अनुग्रहार्थ परम गुह्य असें अध्यात्म संज्ञितजें वचन तूं सांगीतलें त्याणें करून माझा मोह गेला. १ हे कमलपत्राक्ष, तुजपासून भूतांचे सृष्टि संहार मी विस्तरशः ऐकिले. आणि अव्यय असें तुझें माहात्म्य ही ऐकिलें. २ हे परमेश्वर, आपण जगदाधार, असें तूं सांगतोस, हें सत्य होय. हे पुरुषोत्तम, आतां मी तुझें ऐश्वररूप पाहूं इच्छितों. ३ यास्तव मीतें पहावयास शक्त आहें, असें जर मानितोस, तर त्या तुझा अव्ययरूपास मला दाखीव. ४

कृष्ण बोलतात, तर पार्था माझीं शतशः सहस्त्रशः नानाविध, दिव्य, नानावर्ण, नानाकृति, अशीं रूपें पहा. ५ आदित्य, वसु, रुद्र, अश्विनीकुमार, तसेंच मरुत्, यांस पहा–पूर्वी कधीं पाहिलीं नाहीं, अशीं आश्चर्यें पहा. ६

॥ विश्वरूपदर्शन ॥ ११ ॥

अर्जुना, या माझा देहीं सर्व स्थावर, जंगम, जग, एकावयवीं स्थित असें आज पहा. आणखी त्याहून अन्य जें पाहूं इच्छितोस तें सर्व पहा. ७ परंतु या तुझा चर्मचक्षूकरून तूं मला पाहण्यास शक्त नव्हेस. यास्तव मी तुला दिव्यचक्षु देतों, त्याणें करून हा माझा ऐश्वर योग पाहा. ८

संजय सांगतात, हे राजन्, असें बोलून महा योगेश्वर असा हरि, अर्जुना कारणें परमेश्वर रूप दाखविता झाला. ९ जा रूपाच्याठायीं अनेक मुखें, तसीं नयनें, तसींच अद्भुत दर्शनें, आणि दिव्य भूषणें, आणि दिव्य उद्यत आयुधें. १० जें रूप दिव्यपुष्पें, तसीं वस्त्रें याहीं करून सुशोभित, आणि दिव्य गंधें करून अनुलिप्त, सर्वाश्चर्यमय, देव, अनंत, आणि विश्वतोमुख होय. ११ जर आकाशांस हस्त्र सूर्यांची कांती एकदांच प्रकटेल, तरती त्या

॥ विश्वरूपदर्शन ॥ ११ ॥

महात्म्याचा कांतीस उपमा साजेल. १२ त्या देवदेवांचा शरीरीं अर्जुन त्या समयीं, अनेकप्रकारें विभक्त असें, सर्व जग पाहता झाला. १३ त्यानंतर तो विस्मित, आणि ज्याचा अंगावर रोमांच उभे राहिले आहेत, असा मस्तकें करून, देवास नमस्कार करून, हात जोडून बोलता जहाला.

हे देव, तुझा देहीं देव, आणि भूतविशेषांचे समुदाय, तसा कमलासनस्थ ब्रह्मा, ईश, सर्व ऋषि, दिव्य उरग यांनें पाहतों. १५ तुला मी सर्वत्र अनंतरूप, आणि अनेक बाहु, तसीं उदरें, नेत्रें, आणि वक्त्रें, याहीं करून युक्त पाहतो. परंतु तुझा आदि, अंत, आणि मध्य, मला दिसत नाहीं. हे विश्वेश्वर, विश्वरूप, तुला किरीट, गदा, चक्रधारी, आणि तेजांचा राशी, सर्वतः दीप्तियुक्त, आणि दुर्निरीक्ष्य, तसा प्रदीप्त. अग्नि. आणि सूर्य, यांसीं तुल्य कांति, आणि अप्रमेय असा पाहतों १७ जाणायास योग्य,

॥ विश्वरूपदर्शन ॥ ११ ॥

असें परम अक्षर तूं आहेस. तूं या विश्वाचें पर निधान होस. तूं शाश्वत धर्माचा रक्षक होस. तुला सनातन, तसा अव्यय, मी मानितों. १८ आदिमध्यांत रहित, अनंतवीर्य, अनंतबाहु, तसा चंद्रसूर्यनेत्र, प्रदीप्ताग्निमुख, आणि स्वतेजें करून या विश्वास तापविणारा असा तुला मी पाहतों. १९ स्वर्ग पृथ्वीचें मध्य, आणि सर्व दिशा तूं एकल्यानें व्याप्त आहेत. हे महात्मन्, अद्भुत आणि उग्र असें हें तुझें रूप पाहून तीन ही लोक प्रकर्षें करून व्यथा पावेल. २० हे दैत्यांश दुर्योधनादिक तुजप्रत प्रवेश करिताहेत. कितीएक भीतहोत्साते प्रांजलि म्ह० बद्धांजलि होवून तुज स्तविताहेत. महर्षींचे आणि सिद्धांचे समुदाय स्वस्ति असें बोलून अनेक स्तुती करून तुला स्तविताहेत. २१ रुद्र, आदित्य, वसु, आणि साध्य, तसे विश्व संज्ञक देव, अश्विनी कुमार, मरुत्, उष्मप, गंधर्व, यक्ष, असुर,

॥ विश्वरूपदर्शन ॥ ११ ॥

सिद्ध, यांचे समुदाय विस्मित होत्साते, सर्व तु
ला पाहताहेत. २२ हे महाबाहो, महत्, दंष्ट्रा
कराल, अनंत मुखें, नेत्रें, भुज, ऊरु, चरण, उ
दरें, यांहींकरून युक्त अशा तुझा रूपास पाहू
न लोक मज सारिखे प्रकर्षेकरून व्यथित
झाले आहेत. २३ याप्रकारें मी तुला आका-
श व्यापी, तसा दीप्त, अनेकवर्ण, आणि विस्ता
रित मुख, दीप्त विशाल नेत्र, असा प्रत्यक्ष पा
हत असतां माझें चित्त प्रव्यथित झालें आहे.
माझें धैर्य मला सोडितें, मी शांतीतें पावत ना
हीं. २४ दंष्ट्रा म्ह० दाढा यांहींकरून भयंकर,
आणि कालाग्नितुल्य अशा तुझा वदनांस, पा
हून मला दिशा समजत नाहींत. आणि मला
स्वास्थ्य होत नाहीं तर, हे देवाधिदेव, हे जगन्नि
वास, प्रसन्न हो. २५ हे धृतराष्ट्राचे पुत्र. राज-
समुदायांसहवर्तमान, आणि भीष्म, द्रोण, त
सा कर्ण, हेही आमचा मुख्य योध्यां सुद्धां दं

॥ विश्वरूपदर्शन ॥ ११ ॥

ष्ट्राकराल, आणि भयानक अशा तुझा मुखां
प्रत त्वरित प्रवेश करिताहेत- कितीएक तुझा
दंतांचा मध्यभागीं चूर्णित मस्तक असे दिस
ताहेत. २७ जसे नदींचा उदकांचे प्रवाह समु
द्राप्रत अभिमुख होत्साते जाताहेत, तद्वत् हे
नरलोकवीर. जाज्वल्यमान अशा तुझा मुखां
प्रत प्रवेश करिताहेत. २८ जसे पतंग समृद्धवे
गहोत्साते प्रदीप्त अग्नीप्रत नाशार्थ प्रवेश
करितात, तसे लोक समृद्धवेगें करून तुझा मु
खांप्रतं नाशाकरितां शिरताहेत. २९ तूं प्रदीप्त
मुखें करून आसमंतात् ग्रासित होत्साता, सर्वलो
कांतें अतिशयें करून आस्वादितोस. हे विष्णो,
तुझा उग्रकांति, तेजें करून सर्वजगास पूर्णक
रून अत्यंत तापताहेत. ३० हे देवश्रेष्ठ, तुला
नमस्कार असो. प्रसाद कर. आणि सांग कीं तूं,
असा उग्ररूप कोण आहेस. आद्य अशा तुला
मी जाणूं इच्छितों. तुझी ही प्रवृत्ति किमर्थ आ

हे हें मी जाणत नाहीं· ३१

कृष्ण सांगतात, मी या लोकांचा क्षय कर्त्ता महान्, असा काल येथें आपले समोर जे सर्व उभे आहेत, त्यांस एकदांच ग्रासायास प्रवर्त्तलों आहें· यास्तव जे शत्रु सैन्यांत योधे स्थित आहेत, ते सर्व तुजवांचूनही मरण पावतील· ३२ तस्मात् तूं युद्धास ऊठ, यश घे, शत्रूंस जिंक, आणि समृध्द ह्म० संपत्तियुक्त राज्य भोग, ते शत्रु मीच यापूर्वींच मारिले आहेत. हे सव्यसाचिन्,तूं निमित्त मात्र हो, भय पावूं नको· ३३ द्रोण, भीष्म, आणि जयद्रथ, तसा कर्ण, तसेच अन्यही योध वीर मी मारिले आहेत, त्यांस तूं जिंक, युध्द कर, ह्मणजे तूं रणांत शत्रूंस जिंकिशील· ३४

संजय सांगतात- हें कृष्णाचें भाषण ऐकून, अर्जुन अतिभीत असा कांपत होत्साता, कृतांजलि होऊन, नमस्कार करून, कृष्णाप्रत

॥ विश्वरूपदर्शन ॥ ११ ॥

पुनः सगद्गद बोलता जहाला. ३५

हे हृषीकेशा, तुझ्या कीर्तीकरून जग हर्ष पावतें, आणि तुझ्या सेवेंत रंजतें. राक्षस भयार्त्त होत्साते दिशोदिशीं पळताहेत. सिद्ध संघ तुला नमिताहेत. ३६ हें युक्त होय. थोरांहून थोर, आणि ब्रह्म्याचा आदिकर्त्ता, अशा तुला ते कां वंदन करणार नाहींत? हे अनंत! हे देवेशा! हे जगन्निवास! तूं अक्षर, म्ह० शुद्ध ब्रह्म, होस. जें ब्रह्म सद्रूप, आणि असद्रूप, तसेंच सदसत्. यांहून पर होय. ३७ तूं आदिदेव, आणि पुराणपुरुष होस. तूं या विश्वाचें परनिधान होस. ज्ञाता, आणि ज्ञेय. तूं परधाम, म्ह० आश्रय, तूं होस. हे अनंतरूप, हें विश्व तूं व्यापिलें आहे. ३८ वायु तूं, यम तूं, अग्नि तूं, वरुण तूं, चंद्र आणि प्रजापति तूं, प्रपितामह म्ह० ब्रह्मदेवाचा पिता तूं होस. तुला सहस्त्रवार नमोनमः पुनः पुनः तुला नमस्कार असो. ३९ तुला पुरोभा-

गीं, आणि पृष्ठभागीं नमस्कार असो- तुला स
र्वत्र नमस्कार असो. हे अनंतवीर्य, तूं अपरि-
मित पराक्रम होस. आणि सर्वव्यापी ह्मणोन
सर्वरूप होस. ४० तुझा महिमा नजाणून, तुला
मी सखा असें मानून, प्रमादें करून, अथवास्ने
हें करून, हटानें हे कृष्णा ! हे यादवा ! हे सख्या!
असें बोलिलों. ४१ आणि क्रीडा, शयन, तसेंच
आसन, भोजन, यांच्याठायीं एकांतीं किंवा मंड
ळींत जो उपहासार्थ असत्कार केला, त्याची
अप्रमेय अशा तुजप्रत मी क्षमापना करितों. ४२

तूं या चराचर लोकांचा पिता आहेस, आ
णि यास पूज्य, तसा याचा श्रेष्ठ, गुरु होस. या
लोकत्रयांत तुला समान कोणी नाहीं, मग अ
धिक कोठून असणार ? तूं अप्रतिम प्रभाव हो
स. ४३ तस्मात् मी देहातें भूमीच्याठायीं धरून
दंडवत् नमस्कार करून ईश्वरा स्तुत्या तुझा प्र
साद मागतों. पितापुत्राचें, प्रियप्रियेचें, सखा

॥ विश्वरूपदर्शन ॥ ११ ॥

सख्याचें जसें साहातो, तसें तूं माझें साहावें.
४४ कधींही पाहिलें नव्हतें, तें विलोकून मी हर्ष
पावलों, आणि खीं भयेंकरून माझें मन फा-
र व्यथा पावलें आहे. यास्तव हे देवेशा! हे ज
गन्निवास! दया कर, आणि तुझें देवरूप मला
दाखिव. ४५ शिरीं किरीटास, आणि हातीं गदा
चक्रांस, धरणार असा मी तुला पाहूं इच्छितों. हे
सहस्त्रबाहो, हे विश्वमूर्त्ते, तर त्या चतुर्भुज स्वरू
पाचें धारण कर. ४६

कृष्ण ह्मणतात — हे अर्जुना, मी प्रसन्न होवू
न, आत्मसामर्थ्येंकरून, तेजोमय, तसें विश्वा
त्मक आणि आद्यंतरहित, असें हें माझें परमरूप
तुला दाखविलें, जें तुजहून अन्यानें पूर्वीं पाहिलें
नव्हतें. ४७ हे कुरुकुलींचा वीरा, तुजवांचून अ
न्यास या नृलोकीं वेदयज्ञ यांचा अधिगम, आ-
णि दानें, आणि क्रिया, तसीं उग्रतपें, यांहींकरू
न माझें असें दर्शन दुर्लभ होय. ४८ या माझा

॥ विश्वरूपदर्शन ॥ ११ ॥

घोर रूपास पाहून तूं व्यथा पावूं नको. भयरहित आणि संतुष्टचित्त होऊन पुनः हें माझें यथापूर्वरूप पाहा. ४९

संजय सांगतातः- वासुदेव असें अर्जुनाप्रत भाषण करून, आपलें पूर्ववत् रूप त्यास दाखविता झाला. याप्रकारें त्या महात्म्यानें सौम्य शरीर धारण करून, भीत अशा अर्जुनाचें आश्वासन केलें. ५०

अर्जुन ह्मणतो- हे जनार्दन, तुझा सौम्य अशाया मानुषरूपास पाहून आता मी सचेतास्थिरचित्त होत्साता प्रकृतीवर आलों. ५१

कृष्ण ह्मणतात- जें माझें अत्यंत दुर्दर्श, असें अद्भुतरूप त्वां पाहिलें, त्या रूपाचा दर्शनाविषयीं देवही निरंतर इच्छा करितात. ५२ जसा तूं मला पाहता झालास, तसा मी वेदें करून, तपें करून, दानें करून, यज्ञें करूनही, पाहिला जाणार नाहीं. ५३ परंतु मी अनन्यभ

न्ती करून मात्र तत्वेंकरून जाणायास आणि पाहावयास आणि प्रवेश करायास शक्य होय. ५४ जो पुरुष मत्प्रीत्यर्थ कर्मे करितो, आणि जो मला पर मानितो, आणि माझीच भक्ति करितो, जो संगवर्जित, तसाच सर्व भूतीं वैर रहित, तो मज प्रत पावतो. ५५

॥भक्तियोग॥

॥अध्याय॥१२॥

अर्जुन प्रश्न करितो-या प्रकारें जे योगाच्याठायीं सततयुक्त भक्त, त्यांत श्रेष्ठ योगवेत्ते कोण? सगुणोपासक, कीं निर्गुणोपासक?

कृष्ण सांगतात-जे नित्ययुक्त माझाठायीं मन ठेवून माझी उपासना करितात, ते मला अत्यंत युक्त वाटतात. २ जे सर्व भूतांच्या हितीं रत, आणि इंद्रिय समुदायास नियमून, सर्वत्र समबुद्धि होत्साते, अक्षर, तसा अनिर्देश्य, आणि

॥भवयोग॥१२॥

अव्यक्त, तसा सर्वव्यापक, आणि अचिंत्य, आणि कूटस्थ, अचल, तसा ध्रुव, अशा माझी उपासना करितात, तेही मजप्रतच पावताहेत. ४ परंतु जांचीं चित्तें अव्यक्तीं आसक्त त्यांस क्लेश अतिशयेंकरून अधिक लागतो. कांकीं देहवंतांस अव्यक्तगति दुर्लभ होय. ५ मत्पर होवून सर्व कर्में माझाठाईं अर्पून, अनन्य योगेंकरून, ध्यान करित होत्साते, मला उपासितात, अशा माझाठायीं प्रवेशित चित्त पुरुषांस, मृत्यु संसार सागरापासून, मी शीघ्र उध्दरितों. ७ तर माझाठाईंच मन ठेव, माझाठाईंच बुध्दि ठेव, ह्मणजे निःसंशय, यानंतर मजप्रत पावशील. ८ परंतु तूं एकदांच जर माझाठाईं चित्ताचें समाधान करायास अशक्त असलास, तर अभ्यासयोगें करून माझा प्राप्तीविषयीं यत्न कर. ९ जर अभ्यासींही असमर्थ आहेस, तर मत्प्रीत्यर्थ कर्मीं तत्पर हो. कांकीं मत्प्रीत्यर्थ कर्में करूनही सिध्दीतें पावसील.

॥ भक्तियोग ॥ १२ ॥

हेंहीकरण्याविषयीं जर असमर्थ आहेस, तरमा
झाठायीं अनन्य निष्ठा ठेवून, जितेंद्रिय होऊन, सर्व
कर्मफलाच्या त्यागकर. ११ अभ्यासापेक्षें ज्ञान
श्रेष्ठ होय, ज्ञानाहून ध्यान विशिष्ट, ध्यानापेक्षें
कर्मफलत्याग, कांकीं त्यागानंतर मोक्ष होतो. १२

जास द्वेष नाहीं, जो सर्वभूतांचा मैत्र, तसा
करुणाशील, ममता, आणि अहंकार, याहींकरू
न रहित, जास सुखदुःखें समान, क्षमावान्, १३
संतुष्ट, आणि निरंतर योगी, तसा जितेंद्रिय, आणि
दृढनिश्चय, ज्यानें मन, बुद्धि, माझाठायीं, असाजो
माझा भक्त तोमला प्रियहोय. १४ जापासूनलो-
क उद्वेग पावत नाहीं; आणिजो लोकांपासून स्व
येंउद्वेग पावत नाहीं; आणि हर्ष, मत्सर, भय, उद्वे
ग, पावत नाहीं, तोमला प्रिय होय. १५ जोनिरपे
क्ष, शुद्ध, दक्ष, उदासीन, आणि व्यथाशून्य, तसा
सर्वोद्योगांच्या परित्यागी, असा माझा भक्त, तोम
ला प्रिय होय. १६ जो हर्ष पावत नाहीं आणिद्वेष

करित नाहीं-जास शोक आणि कांक्षा नाहींत असा शुभाशुभांचा परित्यागी, भक्तिमान्, तो मला प्रिय होय. १७ शत्रुमित्रांचा ठायीं, आणि मानापमानीं, तसा शीतउष्ण, सुखदुःख, यांचा ठायीं सम, जो संगरहित, १८ जास निंदा, आणि स्तुति समान, तसा मौनी, आणिजें कांहीं यदृच्छालब्ध, त्याणें करून संतुष्ट, तसा गृहशून्य, आणि स्थिरबुद्धि, असा भक्तिमान् नर मला प्रिय होय. १९ जे भक्त श्रद्धायुक्त आणि मत्परहोत्साते या धर्मामृतास यथोक्त उपासितात, ते मला अत्यंत प्रिय होत. २०

॥ क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग ॥

॥अध्याय॥१३॥

अर्जुन प्रश्न करितो- हे केशव, प्रकृति, आणि पुरुष, क्षेत्र, आणि क्षेत्रज्ञ, तसें ज्ञान, आणि ज्ञेय, यांस मी जाणूं इच्छितों. १

॥ क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग ॥ १३ ॥

कृष्ण सांगतात- हे कौंतेय, या शरीरास क्षेत्र ह्मणतात; आणि या क्षेत्रास जाणणारा जो त्यास क्षेत्रज्ञ असें ह्मणतात. २ तो सर्व देहीं मीं असें जाण, आणि क्षेत्रही मीच असें जाण. क्षेत्राचें, आणि क्षेत्रज्ञाचें जाणणें, तें ज्ञान मला मत होय. ३

आतां क्षेत्राचें स्वरूप तसा प्रकार, आणि विकार, आणि ज्यापासून तें झालें, आणि खी ज्ञाचें स्वरूप तसा प्रभाव हें सर्व संक्षेपें करून सांगतों ऐक. ४ जें ऋषींहीं बहुप्रकारें वर्णिलें; वेदांहीं प्रतिशाखेंत अनेकप्रकारें गाइलें; तसें हेतुगर्भ आणि निश्चितार्थ अशा ब्रह्मसूत्रपदानीं सांगीतलें त्याचें श्रवण कर. ५

क्षेत्र ह्मणजे- पंचमहाभूतें, अहंकार, बुद्धि, अव्यक्त*, एकादश इंद्रियें, तसे पांच इंद्रियविषय, ६ आणि इच्छा, सुख, दुःख, तसा संघात**, चेत

---

* शरीर

** आत्मा इंद्रियें आणि मन एतद्रूप भोक्ता.

ना, ह्मणजे बुद्धि, आणि धृति, इतक्यांचा योग होय.

याप्रकारें तुला मी संक्षेपेंकरून क्षेत्र, विकारसहित सांगीतलें. ७

ज्ञान ह्मणजे अमानित्व. १ अदंभित्व, २ अहिंसा, ३ क्षांति ह्म० सहनशीलता. ४ आर्जव ह्म० सरलपणा, ५ आचार्योपासन. ६ शौच ह्म० शुद्धता. ७ स्थैर्य ह्म० मोक्षमार्गी विघ्नें झालीं असतांही त्यांची गणना न करणें, ८ आत्मविनिग्रह, ९

८ इंद्रियांचा अर्थांचाठाईं वैराग्य ह्म० त्यांचाठाईं प्रीति नसणें. १० अनहंकार, ११ जन्ममृत्युजराव्याधींचाठाईं दुःख आणि दैन्यादि दोष यांचें अनुदर्शन, १२. ९ पुत्र, दार, आणि गृहादिक यांच्याठाईं असक्ति ह्म० ममता. नसणें, १३ अनभिष्वंग ह्म० त्यांसच आपण असें मानून अभिमान न धरणें ह्म० पुत्रादिक सुखी आणि दुःखी असतां मी सुखी, मी दुःखी, असें न मानणें

॥ क्षेत्रक्षेत्रज्ञविभाग योग ॥ १३ ॥

१४ इष्टानिष्टोपपत्तीच्याठाईं समचित्तत्व, १५ १० अनन्य योगेंकरून माझ्याठाईं अव्यभिचारिणी भक्ति, १६ विविक्तदेशसेवित्व ह्म० एकांतीं राहणें, १७ जनसभेच्याठाईं अरति ह्म० अप्रीति, १८ ११ अध्यात्मज्ञाननित्यत्व, १९ तत्वज्ञानार्थदर्शन ह्म० तत्वज्ञानाचा प्रयोजनाचें पहाणें, यांस ज्ञान ह्मणतात. याहूनजें अन्य तें अज्ञान असें जाण. १२

आतां जें ज्ञेय तें सांगतों — जें जाणून प्राणी अमृतत्व ह्म० मोक्ष पावतो. त्यास आदि नाहीं, तें निर्विशेष ब्रह्म होय, त्यास सत् (आहे असें) ह्मणतां येत नाहीं, आणि असत् (आहे असें) ही ह्मणवत नाहीं. १३ जें सर्वत्र कर, चरण, नेत्र, मुखें, मस्तक, आणि श्रवणें, यांहीं करून युक्त होय, आणि जें लोकांत सर्वांस व्यापून राहातें. तें सर्वेंद्रियवर्जित असतां, सर्व इंद्रियें, आणि विषय यांसारिखें भासतें, तें सृष्टीचा आंतबा

हेरआहे. तें चर, आणि अचर, होय. १५ आणि सूक्ष्म ह्मणून अविज्ञेय होय. तें दूरस्थ असूनस मीपस्थ होय. अविभक्तअसून भूतांचागाईं वि भक्ताचेपरि राहिलें आहे. तें भूतांचा धारण, सं हार, आणि उत्पत्ति, यांचें कर्त्तें होय. तें ज्योतींचेंज्यो ति होय. आणि त्यास तमाहूनपर असें ह्मणतात. १७ तें ज्ञान, ज्ञेय, तसें ज्ञानगम्य होय. आणि तें सर्वांचें हृदयस्थ आहे. १८

याप्रकारें क्षेत्र ह्म० शरीर, तसेंच ज्ञान, आणि ज्ञेय, ह्म० जाणायाचें वस्तु, यांचें समासें करून निरूपण केलें. हें त्रयजाणूनमाझा भक्त मद्भाव ह्म० ब्रह्मभाव त्याकारणें युक्त होतो. १९

प्रकृति आणि पुरुष यादोघांस अनादि असें जाण. सत्व, रज, तम, हे गुण, आणि विका र, ह्म० तज्जन्य कार्य, हे प्रकृतिसंभव जाण. २०

*कार्यकारण कर्तृत्वेंकरून प्रकृति, आणि

---

*कार्य = शरीर आणि कारण ह्म० तदारंभक पंचमहाभू तादिक.

॥ क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग ॥ १३ ॥

सुखदुःखांचा भोक्तृत्वेंकरून पुरुष संसारका रण असें ह्मणतात. २१ पुरुष प्रकृतिस्थ होत्सा ता प्रकृतिजनित गुणास भोगितो. पुरुषास स दसद्योनि ह्म० उत्तमाधम मध्यम योनितज्जन्मा विषयीं कारण गुण संग होय. २२ पुरुष तो पर मात्मा ज्यास महेश्वर असें ह्मणतात. आणि तो. या देहाच्याठाईं उपद्रष्टा, (साक्षी) अनुमंता, आ णि भर्त्ता, (पालक०) आणि भोक्ता होय. २३

या प्रकारें पुरुषास, आणि प्रकृतीस, गु- णांसह वर्त्तमान जो जाणतो, तो कसाही वर्त्तत असतां पुनर्जन्म पावत नाहीं. २४

कितीएक आपण आपणास आपणाच्या ठाईं ध्यानेंकरून पाहतात. अन्य सांख्ययोगें करून, इतर कर्मयोगेंकरून, कित्येक हें न जाणत होत्साते दुसऱ्यापासून ऐकून त्याजवर मन ठेवि तात, तेही श्रुतिपरायण ह्मणजे श्रवणतत्पर हो त्साते मृत्यूस तरून जातात. २६

॥ क्षेत्र क्षेत्रज्ञ विभाग योग ॥ १३ ॥

हे पुरुषर्षभ सर्व स्थावर जंगम सत्व, क्षेत्र क्षेत्रज्ञ योगें करून उत्पन्न होतें. असें जाण. २७ परमेश्वरास सर्व भूतीं समान राहणारा, आणि तीं नाश पावत असतां, नाश न पावणारा असें जो पाहातो, तो पाहतो. २८ जो ईश्वरास सर्व भूतीं समान पाहतो, तो आपण आपला घात न करितां, परगती प्रत पावतो. २९ जो प्रकृतीच कर्म कर्त्री, आणि आपण अकर्ता असे पाहतो, तो पाहतो. ३० ज्या कालीं प्राणी भूतांच्या पृथक् भावास एकस्थ पाहतो. आणि त्या एकापासून विस्तार पाहतो त्या कालीं तो ब्रह्मरूप होतो. ३१ हे कौंतेय, हा अव्यय आत्मा शरीरस्थ असतांही कांहीं करित नाहीं, आणि लिप्तही होत नाहीं. ३२ कांकीं तो अनादि, तसा निर्गुण आहे. जसें सर्वगत आकाश सूक्ष्मत्वास्तव लिप्त होत नाहीं, तसा सर्व व्यापक आत्मा देहाच्या ठाईं लिप्त होत नाहीं. ३३ जसा एक सूर्य सर्व लोकांस प्रकाशवितो, तसा एक क्षेत्रज्ञ

॥ गुणत्रयविभागयोग ॥१४॥

सर्वक्षेत्रांस प्रकाशवितो. जे ज्ञानचक्षूकरून क्षेत्रक्षेत्रज्ञाचें अंतर, ह्म० भेद, यास पाहतात, आणि भूतप्रकृतीपासून मोक्ष होतो असें जाणतात, ते ब्रह्मपद पावतात. ३५

॥ गुणत्रयविभागयोग ॥

॥ अध्याय ॥१४॥

कृष्ण ह्मणतात-आतां ज्ञानामध्यें उत्तम ज्ञान तुला सांगेन. जें जाणून सर्व मुनि या संसारापासून परसिद्धि ह्मणजे मोक्ष त्याप्रत पावले.१

या ज्ञानाचा आश्रय करून माझें साधर्म्य ह्म० सार्वात्म्य सर्वनियंतृत्वादि धर्मसाम्य, त्याप्रत पावलेले पुरुष सृष्टीच्याठाईं होत नाहींत, आणि प्रलयीं व्यथा पावत नाहींत. २

माझी योनि ह्मणजे गर्भाधानस्थान महद्ब्रह्म ह्म० गुणात्मक माया होय. त्याचाठाईं मी गर्भ ठेवितों. त्यापासून सर्वभूतांचा संभव होतो.३

॥ गुणत्रयविभागयोग ॥ १४ ॥

सर्व भूतांच्या ठाईं नानाप्रकारच्या ज्या मूर्ति होतात त्यांची योनि म्ह० उत्पत्तिस्थान माया आणि बीजदाता पिता मी होय. ४

प्रकृतीपासून तीन गुण जाहले. त्यांचीं नावें- सत्व, रज, आणि तम ते अव्यय आत्म्यास देहाच्या ठाईं बंधन करितात. ५ त्यामधें अनामय, म्ह० रजस्तमोरहित, अतएव निर्मलत्वास्तव प्रकाशक, असा सत्वगुण सुखसंगेकरून आणि ज्ञानसंगेंकरून आत्म्यास बंध करितो. ६ रजोगुणास रागात्मक, आणि तृष्णा तसा संग यांचें कारण असें जाणतो. कर्मसंगेंकरून देहाभिमान्यास बंधकरितो. ७ तमोगुण अज्ञानापासून झाला, तो सर्वजीवांस मोह करणारा असें जाणतो- प्रमाद, आलस्य, आणि निद्रा यांहींकरून आत्म्यास बंधन करितो. ८ सत्वगुणाच्या भर सुखाच्या ठाईं, तसाच रजोगुणाच्या कर्माच्या ठाईं असतो; आणि तमोगुण ज्ञानाचें आवरण करून

॥ गुणत्रयविभागयोग ॥ १५ ॥

अज्ञानाच्या ठाईं असतो. सत्वगुण रजस्तमास, तसा रजोगुण सत्वतमास, आणि तमोगुण सत्वरजांस, पराभवून संभवतो. १० ज्या समयीं देहांत सर्वद्वारीं प्रकाश, आणि ज्ञान होतें, त्यास मयी सत्वगुणाची वृद्धी जाणावी. ११ रजोगुणाची वृद्धि झाली असतां, लोभ प्रवृत्ति, कर्मारंभ, अशम, आणि वासना, हीं होतात. १२ आणि तमोगुण प्रवृध झाला असतां, अप्रकाश, अप्रवृत्ति, प्रमाद, मोह, हे होतात. १३ देहोत्क्रमण समयीं सत्त्वगुणाची वृद्धि असतां, उत्तमवित् (ह्मणजे हिरण्यगर्भोपासक देव) यांच्या अमल लोकांप्रत पावतो. १४ रजोगुणीं देहविसर्जन झालें असतां, कर्मसंगीजनांच्या ठाईं पुनः होतो. तमोगुणीं देहपात झाला असतां, मूढयोनीच्या ठाईं जन्म पावतो. सात्विक कर्माचें फल निर्मल ह्म॰ दुखाज्ञानरूपमल शून्य आणि सात्विक, ह्म॰ ज्ञानवैराग्यादिक होय. राजसक

॥ गुणत्रयविभागयोग ॥ १४ ॥

र्माचें फल दुःख, आणि तामसकर्माचें फल अज्ञान होय. १६ सत्त्वगुणापासून ज्ञान होतें; रजापासून लोभ; आणि तमापासून प्रमाद मोह, आणि अज्ञान होतें. १७ सत्वस्थ ऊर्ध्वगति पावतात; राजसांला मध्यावस्थान होतें, आणि तामसांस अधोगति होते. १८

जेव्हां द्रष्टा (आत्मा) गुणाहून अन्य कर्त्ता असें पाहत नाहीं, म्हणजे गुणच कर्त्ते असें पाहातो, आणि आत्म्यास गुणाहून पर जाणतो, तेव्हां तो मद्भावातें पावतो. १९ जीव, या स्थूलदेहाचा उत्पादक अशा यां तीन गुणास अतिक्रमून, जन्म मृत्यु जरा दुःखेंकरून विमुक्त होत्साता, अमृतातें (मोक्षातें) पावतो. २०

अर्जुन प्रश्न करितो – हे प्रभो. त्रिगुणातीतास कोण त्या लक्षणेंकरून ओळखावें ? त्याचा आचार काय ? आणि कोण त्या उपायेंकरून तो त्यांस अतिक्रमितो ? २१

॥ गुणत्रयविभागयोग ॥१४॥

कृष्ण सांगतात - हे पांडव, ज्ञान प्रकाश, प्रवृत्ति - ह्मणजे संसारीं उद्युक्तत्व, तसा मोह हे असतां यांचा द्वेष, आणि हे नसतां त्यांची इच्छा करित नाहीं; २२ आणि उदासीनवत् असतो; तसा जो गुणेंकरून चळत नाहीं, आणि गुण वर्तत असतां तो स्तब्ध असतो, चलित होत नाहीं: २३ जो स्वस्थ, ज्यास सुख दुःखें समान, ज्यास मृत्तिका, पाषाण, आणि सुवर्ण हीं समान, ज्यास प्रिय आणि अप्रिय तुल्य, अतएव तो धैर्यवान्, ज्यास निंदा स्तुति समान, २४ जो मानीं, आणि अपमानीं, तसा मित्र, शत्रु यांच्या ठाईं सम, आणि सर्वोद्योगांचा परित्याग करितो, त्यास गुणातीत ह्मणतात. २५ जो अव्यभिचार भक्तियोगेंकरून मला सेवितो, तो या गुणांतें अतिक्रमून ब्रह्मभावाकारणें योग्य होतो. २६ अविनाशी, ह्मणजे स्वतः प्रमाणभूत, आणि अमृत ह्मणजे मोक्षसाधन, अशा ब्रह्माची ह्म० वेदाची, प्रतिष्ठा ह्म० पर्यवसान स्थान मी होय. शा-

॥ पुराणपुरुषयोग ॥ १५ ॥

१४ व अशा धर्माची प्रतिष्ठा ह्म० फलभूत मी. आणि अव्यभिचारि सुखाची प्रतिष्ठा ह्म० पराकाष्ठा मी होय. २७

॥ पुराणपुरुषयोग ॥

॥ अध्याय ॥ १५ ॥

कृष्ण ह्मणतात- ज्याचें मूळ ऊर्ध्व, आणि शाखा खालीं- वेद ज्याचीं पर्णें, अशा अश्वत्थवृक्षास अव्यय ह्मणतात*. जो त्यास जाणतो तो वेदवेत्ता होय. गुणें करून वाढलेल्या, विषयजांचे पल्लव अशा त्या अश्वत्थवृक्षाच्या शाखा अधः आणि ऊर्ध्व प्रसृत आहेत. आणि याचीं (अवांतरवासनारूप) मूळें कर्मानुसारि होत्साती खालीं मनुष्यलोकीं विस्तृत आहेत. २ येथे याचें रूप, आदि, अंत, आणि स्थितिही समजत नाहींत. अत्यंत वि

---

* भाव. संसार हा अश्वत्थ ह्म० क्षणभंगुर वृक्ष होय. याचें मूळ सर्वोपरि स्थित ब्रह्म अतएव तें ऊर्ध्व होय आणि त्यापासून उत्पन्न अव्यक्त महदहंकारादिक त्याचा शाखा यास्तव त्या खालीं होत.

॥ पुराणपुरुषयोग ॥ १५ ॥

रूढ ज्याचें मूल, अशाया अश्वत्थास, दृढ अशा अ-
संगरूप शस्त्रेंकरून छेदून, ३ त्यानंतर तें पद शो
धावें ज्यापदीं गलेले पुनः निवर्त्तत नाहींत; आणि
असी भावना धरावी कीं जेथून पुरातन प्रवृत्ति उ
त्पन्न झाली त्याचे आद्यपुरुषाप्रत मी शरण जातों.

जे मान मोहरहित, ज्याणीं संगदोष जिंकिले,
तसेजे आत्मध्यानपर, आणि जे निवृत्तकाम, तसे
सुखदुःखादि संज्ञद्वंद्वेंकरून विमुक्त जहाले, अ
से ज्ञानी त्या अविनाशि पदाप्रत जाताहेत. ज्यापदा
पासून पुनः निवृत्ति नाहीं. तें माझें परम धाम हो
य. ज्यांस सूर्य, चंद्र, आणि अग्नि प्रकाशवितना
हींत-तें स्वयंप्रकाश होय. ६ ईश्वर शरीरास व्या
पितो, आणि उत्क्रांत होतो, ह्मणून जीवलोकीं पु-
रातन असा जीव माझाच अंश होय. तो प्रकृति
स्थ अशा मनासहवर्त्तमान साहा इंद्रियांस नि
द्रा, प्रलय, समाधिकालीं आरोपितो. आणि तो वा
यु जसा पुष्पापासून गंधास घेऊन जातो, तसाजा

॥ पुराणपुरुषयोग ॥ १५ ॥

गृति, सृष्टि, आणि समाधि, विसर्जन यांचा का
ळीं आपल्या लयस्थानापासून या इंद्रियांस घे
ऊन विषयदेशाप्रत जातो. ८ आणि त्यांस (क
र्ण, नेत्र, त्वचा, जिव्हा, नासिका, तसें मन, या इंद्रि-
यांस) अधिष्ठून, ह्म० व्यापारयुक्त करून, विष
यांतें सेवितो. ९ मूढजन जीवास गुणयुक्त अ
सतां, तसा उत्क्रांत होत असतां, आणि राहात
असतां, तसा भोगभोगित असतां, पहात ना-
हींत-ह्म० गुणसंयोग, उत्क्रमण स्थिति, आणि
भोग यां इंद्रियादि धर्मांचा आरोपत्याचाठाईं क
रितात. ज्ञाते तर त्यास पहातात, ह्म० उत्क्रमणा
दिक उपाधीसच घडतें, शुद्ध आत्म्यास नाहीं अ
सें जाणतात. १० यत्न करणारे योगी आत्मा ह्म०
बुद्धि तीचाठाईं स्थित अशा त्या जीवास पहातात
ह्म० तो निःसंग तसा उत्क्रांत्यादिहीन आहे असें जा
णतात. अकृतात्मे ह्म० अशोधित चित्त असे मूढ
यत्न करित असतांही त्याला पाहत नाहींत. ११

॥ पुराणपुरुषयोग ॥ १५ ॥

सर्वजगास प्रकाशवितें असेंजें सूर्यगत, चंद्रगत, आणि अग्निगत तेज तें तेज माझें जाण. १२ मी आपल्या सामर्थ्यानें पृथिवीच्याठाईं प्रवेश करून भूतांचें धारण करितों, आणि जलमय चंद्र होऊन सर्व ओषधींस पोषितों. १३ मी अग्नि होवून जीवांच्या शरीराप्रत आश्रित असा प्राण, आणि अपान, यांहीं करून युक्त होत्साता चतुर्विध* अन्नाचें पचन करितों. १४ मी सर्वांच्या हृदयीं प्रविष्ट आहें. मजपासून स्मृति आणि ज्ञान तसें अपोहन, म्ह० विस्मृति, आणि अज्ञान हीं होतात. सर्व वेदें करून ज्ञेय तो मीच. वेदांचा कर्त्ता आणि वेदवेत्ता ही मीच होय. १५

लोकांत दोन पुरुष प्रसिद्ध आहेत – क्षरआ

---

* भक्ष्य १ भोज्य २ लेह्य ३ चोष्य ४ म्हणजे दांतानीं खायाचें १ तें अपूप पृथुकादि १ दंतां वांचून भक्षायाचें २ तें चरुपायसादि २ चाटायाचें ३ तें मधुशर्करादि ३ चोखायाचें ४ तें इक्षु आम्रादि ४

णि अक्षर, त्यांत सर्व भूतांस क्षर असें ह्मणता- त. कूटस्थास ह्मणजे ज्यास भोक्तृत्वादि संबंध नाहीं त्यास अक्षर ह्मणतात. १६ दोघांहून अन्य तो उत्तमपुरुष ज्यास परमात्मा ह्मणतात. जो ई- श्वर ह्मणजे मायोपाधि होत्साता, लोकत्रय ह्मं॰ उत्तमाधम मध्यम शरीरें त्यांप्रत प्रवेश करून त्यांचें धारण करितो. तथापि तो अव्यय होय. १७ ज्यास्तव मी क्षराक्षरातीत आहें त्यास्तव त्यांहू- न उत्तम होय. ह्मणून मी लोकीं, आणि वेदीं, पुरु षोत्तम नाम पावलों आहें. १८ जो ज्ञाता मला पुरुषोत्तम असें जाणतो तो सर्ववेत्ता होय. आ णि तो सर्व भावें मला भजतो. १९

.. हे भारत, या प्रकारें हें अत्यंत गुह्य शास्त्र मी तुला सांगीतलें. याला जाणून मनुष्य बुधि- मान् तसा कृतकृत्य होईल. २०

॥ देवासुरसंपद्विभागयोग ॥

॥ अध्याय ॥ १६ ॥

कृष्ण ह्मणतात-अभय-सत्त्वसंशुद्धि, ह्म० चित्तनैर्मल्य, ज्ञानयोगव्यवस्थिति, दान, दम, यज्ञ, स्वाध्याय, तप, आर्जव, ह्म० सरलता, १ अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, ह्म० कर्मसन्यास, शांति, अपैशुन, ह्म० परदोषप्रकाशन न करणें, भूतदया, अलोलुपत्व, ह्म० अलंपटपणा, मार्दव, ह्म० मृदुपणा, ह्री ह्म० लज्जा, अचापल, २ तेज, क्षमा, धृति, शुद्धता, अद्रोह, आणि अभिमानराहित्य, हीं दैवसंपत्ति जास असते त्याचीं लक्षणें होत. ३ असुरसंपत्तियुक्तांचीं लक्षणें दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, पारुष्य ह्म० निष्ठुर भाषण, अज्ञान हीं होत. ४ दैवी संपत्ति मोक्षार्थ, आणि असुरी बंधार्थ, होय. हे पांडव, तूं शोक करूं नकोस, कांकीं तुझें जन्म दैवी संपत्तीच्या ठाईं झालें आहे. ५ याप्रकारें या लोकांत दैव आणि आसुर असे दोन भूतसर्ग,

ह्मणजे भूतस्वभाव आहेत, त्यांतून दैवविस्तरें करून वर्णिला. आसुर काय तो मजपासून श्रवण कर. ६

आसुरजन प्रवृत्ति ह्म० धर्म. आणि निवृत्ति ह्म० अधर्म या दोहोंस जाणत नाहींत. त्यांचा ठाईं शौच, आचार, आणि सत्यहीं नाहींत. ७ ते या जगाला सत्यवर्जित आणि अप्रतिष्ठ ह्म० धर्माधर्म प्रतिष्ठारहित. आणि अनीश्वर, ह्म० नियंतृशून्य, असें बोलतात; आणि तें अपरस्परसंभूत ह्म० बीजांकुरवत् परस्पर कारणीभूत अशा धर्म आणि धर्मवासना यांचा सततपणानें होत नाहीं, स्त्रीपुरुषांचा संयोगेंकरून होतें. आणिखी काय आहे. सर्व कामहेतुक होय, असें ह्मणतात. ८ ही समजूत धरून नष्टात्मे आणि अल्पबुद्धि; उग्रकर्में करणारे अहित ह्मणजे हिंसा करणारे असे जगाचा क्षयार्थ उत्पन्न होतात. ९ ते मोहेंकरून खोटी समजूत स्वीकारून दुःपूर अशा

॥ दैवासुरसंपद्विभागयोग ॥ १६ ॥

कामाचा आश्रय करून, दंभ, मान, मदें करून, युक्त तसेजांचीं अनें अशुचि व्रत मर्यादिरापेक्ष, असे कर्मे करितात. १० आणि अपरिमेय अशा (योगक्षेमविषय) चिंतेचा मरणपर्यंत आश्रय करितात. आणि कामभोगच पुरुषार्थ असा निश्चय करून असतात. ११ आणि शतसंख्याक आशापाशें करून बद्ध, तसे काम, क्रोध, परायण होत्साते कामभोगार्थ अन्यायें करून द्रव्य संचयाविषयीं उद्योग करितात. १२ "हें आज मी मि "ळविलें या मनोरथातें पावेन, इतकें धन माझाजवळ "आहे, आणि इतकें आणिखी मला प्राप्त होईल; "१३ हा शत्रु मी मारिला. आणि दुसऱ्या शत्रूंस "ही मी मारीन. मी थोर, मी भोगसंपन्न, मी सि "द्ध, मी बलवान्, मी सुखी, १४ मी आढ्य, मी कुली "न, मजसारिखा दुसरा कोण आहे? मी यज्ञ क "रीन, दान करीन, आनंद पावेन." या प्रकारें ते अज्ञानविमोहित जन बोलत असतात. १५ ते अने

॥ दैवासुर संपद्विभाग योग ॥ १६ ॥

क चित्त, विभ्रांत तसे मोहरूप जालें करून समा
वृत्त आणि कामभोगीं अत्यासक्त होत्साते अशुचि न
रकांत पडतात. १६ ते आत्मसंभावित म्ह० आप
णास थोर मानणारे गर्विष्ठ. तसेंच धनमान, आ
णि मद यांहींकरून युक्त होत्साते, दंभेंकरून नामय
ज्ञ म्ह० नावाचे मात्र यज्ञ, त्यांहींकरून यजन करि
तात. विधिपूर्वक करित नाहींत. १७ आणि अहंकार
बल, दर्प, काम, क्रोध, यांचा आश्रय करून सन्मार्गा
ची निंदा करितात, आणि स्व परदेहांत माझा द्वेष
करितात. १८ असे द्वेष्टे क्रूर, अशुभ, जे नराधम,
त्यांस मी लोकांत आसुरीच योनीचा ठाईं निरंतर
टाकितों १९ असे ते जन्मजन्मी असुरयोनीप्रत पा
वूनें माझी प्राप्ति न होतां शेवटीं अधमगतीप्रत
जातात. २० आपला नाश करणार असें काम,
क्रोध, आणि लोभ, हें त्रिविध नरकाचें द्वार होय. या
स्तव यातिंहींचा त्याग करावा. २१ कां कीं या तीन
नरकांचा द्वारें करून मुक्त असा पुरुष आपल्या

॥श्रध्दात्रयवर्णन॥१७॥

श्रेयास आचरितो, आणि परिणामीं परगतीप्रत जातो. २२ जो शास्त्रविधीस टाकून कामकारेंकरून ह्म॰ यथेच्छ वर्त्ततो, तो सिध्दि सुख आणि परगति यांतें पावत नाहीं. २३ तस्मात् तूं कार्याकार्यव्यवस्थेविषयीं शास्त्रप्रमाण जाणून शास्त्रविधानोक्त कर्म कर. २४

॥श्रध्दात्रयवर्णन॥

॥अध्याय॥१७॥

अर्जुन प्रश्न करितो- जे शास्त्र विधीस सोडून श्रध्देकरून युक्त होत्साते यजन करिताहेत त्यांची निष्ठा कोणती? सत्व, रज, अथवा तम तें सांग?

कृष्ण सांगतात. जीवांस सात्विकी, राजसी, तामसी, असी त्रिविध श्रध्दा असते ती स्वभावजनित होय. तीस ऐक. २ सर्वांची श्रध्दा सत्वानुरूप आहे. हा पुरुष श्रध्दामय होय. ज्याची जी श्रध्दा तो तच्छ्रध्दारूप होय. ह्म॰ सात्विक श्रध्देकरून युक्त

तो सात्विक, राजस श्रद्धेकरून युक्त तो राजस, तामस श्रद्धेकरून युक्त तो तामस*. ३ सात्विक देवांचें, राजस जन, यक्ष, राक्षसांचें, तामस भूत प्रेत गणाचें यजन करितात. ४ जे अशास्त्र विहित घोर तप करितात, ते दंभ, आणि अहंकार, यांहींकरून युक्त आणि कामरागबळें करून संपन्न होत. ५ ते मूर्ख शरीरस्थ भूतग्रामास, म्ह० इंद्रिय समुदायास, आणि अंतः शरीरस्थ, अशा मलाही पीडा करितात. त्यांस असुर निश्चय असें जाण. ६

सर्वांस त्रिविध आहार प्रिय आहे. यज्ञ, तप, तसें दानहीं ही प्रत्येक त्रिविध आहेत, त्यांचे भेद ऐक. ७

आयुष्य, सत्व, बळ, आरोग्य, सुख, आणि प्रीति यांस वाढिवणारे, रसवंत, स्निग्ध, स्थिर, आणि हृदयास प्रीतिकरणारे असे आहार सा

* सारांश जसा ज्याचा स्वभाव तशीच त्याची श्रद्धा असते.

त्विकास आवडतात.८ अतिकटु, अत्यम्ल, अतिलवण, अत्युष्ण, अति तीक्ष्ण, अति रुक्ष, तसे अति विदाही, असे दुःखशोक रोगदेणारे आहार राजसाला इष्ट होत. ९ यातयाम म्ह० प्रहराचापूर्वी पाचित, सारांश थंड, रस रहित, दुर्गंधयुक्त, शिळें उच्छिष्ट, आणि अमंगल, असें भोजन तामसालाप्रिय असतें. १०

फलेच्छा सोडून यजन आवश्यकहोय, असें मनाचें समाधानकरून जा विध्युक्त यज्ञासआचरितात, तो यज्ञ सात्विकहोय. ११

फलानुसंधान धरून, अथवा दंभार्थजें यजितात, त्या यज्ञास राजस अ[illegible]

विधिहीन, आणिजांत [illegible] हीं, तसा मंत्र, दक्षिणाहीन, आ[illegible] अशा यज्ञास तामस असें म्हणतात. १२

देव, द्विज, गुरु, आणि ज्ञाते, यांचें पूजन, आणि शौच, सरलता, ब्रह्मचर्य तसी अहिं-

॥ श्रद्धात्रयवर्णन ॥ १७ ॥

सा यांस कायिक तप ह्मणतात. १४

सत्य प्रिय, तसेंच हित, आणि अनुद्वेगकर, असेंजें भाषण; आणि वेदाध्ययन यांस वाचिक तप ह्मणतात. १५

मनःप्रसन्नता, सौम्यत्व, मौन, आत्मविनिग्रह ह्म० मनोनिरोध भावसंशुद्धि ह्म० कपटराहित्य, इतुक्या समानस तप ह्मणतात. १६

हें त्रिविध तप फलेच्छा सोडून सावधानपणें परश्रद्धेकरून केलें असतां त्यास सात्विक तप ह्मणतात. १७

सत्कार, मान, पूजार्थ दंभेंकरून केलेल्या तपास राजस ह्मणतात. तें चल आणि अध्रुव [illegible]

[illegible] अविवेककृत दुराग्रह त्याणें करून शरीरास पीडा करून किंवा दुसऱ्याच्या उत्सादनार्थ केलेल्या तपास तामस ह्मणतात.

द्यावें अशा बुद्धीकरून प्रत्युपकारानुसं-

॥ श्रद्धात्रयवर्णन ॥ १७ ॥

धान न धरितां कालीं, देशीं, आणि पात्रीं, जें द्रव्य समर्पण तें सात्विक दान होय. २०

प्रत्युपकारासाठीं किंवा फलोद्देशें करून, आणि क्लेशें करून, जें द्रव्य समर्पण तें राजस दान होय.

सत्कार रहित आणि अवज्ञायुक्त, तसें अदेशीं अकालीं आणि अपात्रीं जें दान तें तामस होय. २२

ओम्, तत्, सत् ही त्रिविध ब्रह्माची संज्ञा होय. तीणें करून विधीनें आरंभीं ब्राह्मण, वेद, आणि यज्ञ केले. २३ या स्तव ब्रह्मवेत्त्यांचा यज्ञ दान तपोरूप विधानोक्त क्रिया ओम् असें उच्चारून निरंतर प्रवर्त्तताहेत. २४

तसें मुमुक्षु फलाभिसंधान रहित असे तत् असें उच्चारून विविध यज्ञ, तप, क्रिया, करितात. २५

सद्भावीं आणि साधुभावीं सच्छब्दाच्या प्रयोग करितात. तसा हे पार्था प्रशस्त कर्मीं हीं सत्

शब्दाचा प्रयोग करितात. २६ यज्ञ,दान,तप,
यांच्याठाईं जी स्थिति ह्म० निष्ठा तिलाही सत्ह्म
णतात. आणि परमेश्वर प्रीत्यर्थ कर्मासिही सत्
ह्मणतात. सारांश ओम् तत्सत् अशा ब्रह्मवा-
चक नामत्रयाचा श्रद्धापूर्वक उच्चारणें करून
सर्वकर्म सद्गुण होतें. २७

होम,दान,तपोनुष्ठान,भगवन्नामत्रय स्म
रण,तसें अन्य सर्वकर्म,अश्रद्धेकरून केलें अ
सतां त्याला असत् ह्म० अभावभूत ह्मणतात.
त्याचा इहलोकीं आणि परलोकीं उपयोग नाहीं.

॥ मोक्षयोग॥

॥ [illegible] ॥१८॥

[illegible] हे महाबाहो, हे हृषी
[illegible] णाऱ्या, संन्यासाचें
[illegible] ळें जाणूं इच्छितों.
[illegible] न्यकर्माचा सोडण्या

॥ मोक्षयोग ॥ १८ ॥

ला संन्यास असें विद्वान् जाणतात. आणि स र्वकर्मांचा फलत्यागास विद्वान् त्याग ह्मणतात. २ कितीएक मनीषी ह्म० मनोनिग्रह समर्थ, कर्म दोषासारिखें टाकावें असें सांगतात. तसेंच कितिएक यज्ञ दान तप कर्म हीं न टाकावीं असें सांगतात ३ त्यागाविषयीं माझा निश्चय सांगतों तो ऐक. ४

त्याग तीन प्रकारचा ह्मटला आहे. यज्ञ, दान, तप, हें कर्म टाकूनये तें करावेंच, कांकीं यज्ञ, दान, तप, हीं निष्काम पुरुषांस चित्त शोधक होत. ५ तरहींच कर्में, संग, आणि फलें, टाकून करावीं, असें माझें निश्चित उत्तम मत होय. ६ नियतकर्मांचा संन्यास योग्य नाहीं. अज्ञानें करून आ[illegible]र्मांचा त्याग, त्यास तामसत्याग ह्मणता[illegible]

कर्म दुःखरूप आहे असें मानून त्यास शारीरक्लेश, भयास्तव, त्यागितो तो त्याग राजस होय. तो करून पुरुष त्यागाचें फल पावणार नाहीं. ८

॥ मोक्षयोग ॥ १८ ॥

कर्म अवश्य कर्तव्य होय, असें जाणून नियत कर्म, संग आणि फल टाकून करितो, तो त्याग सात्विक मानिला आहे. ९

अतएव जो पुरुष सत्त्वसमाविष्ट ह्मं॰ सात्विक, तो त्यागी होय. तो बुधिमान् तसा छिन्नसंशय होत्साता असुखप्रद कर्माचा द्वेष करित नाहीं, आणि सुखप्रद कर्मी आसक्त होत नाहीं. १०

देहधारी पुरुषास संपूर्ण कर्माचा त्याग अशक्य होय. तस्मात् जो कर्मफलास टाकणारा, त्यास त्यागी असें यथार्थ ह्मणतात. ११

कर्माचें त्रिविध फल आहे. इष्ट, अनिष्ट, आणि [illegible] पूर्वोक्त त्याग न करणारास मरणानंतर [illegible] त्याग करणारास कधीं होत ना[illegible]

[illegible] जामधें कर्माची परिसमाप्ति [illegible] शास्त्रीं सर्वकर्माचा सिध्यर्थ [illegible] सांगीतलीं आहेत. तीं मजपासून

॥ मोक्षयोग ॥ १७ ॥

जाण. १३ अधिष्ठान ह्म॰ आश्रय ह्म॰ देह, १ कर्त्ता ह्म॰ अहंकार. २ करण ह्म॰ शब्दाद्युपलब्धि साधनतें पृथग्विध ह्म॰ पांचकर्मेंद्रियें, पांचज्ञानेंद्रियें, मन, बुद्धि, असें द्वादश प्रकारक, ३ आ आणि विविध पृथक् चेष्टा ह्म॰ व्यापार, ४ तसेंपांचवें दैव. ५ १४ मनुष्य कायिक, वाचिक, मानसिक जें धर्म्य किंवा अधर्म्य, कर्म आरंभितो. त्याला हे पांच हेतु असतात. १५ असें पांच कारणानीं कर्म होत असतां, अज्ञानास्तव जो आपणासच कर्त्ता असें पहातो, तो दुर्मति अगदीं जाणत नाहीं. १६ ज्यास अहंकार नाहीं, आणि ज्याची बुद्धि लिप्त नाहीं ह्मणजे जो आपणास बुद्धीहून पृथक् पाहतो, (यास्तव कर्तृत्वादि बुद्धिधर्म आपणांत पाहत नाहीं) तो पुरुष या [illegible]स मारून ही मारीत नाहीं, आणि बंधन [illegible] नाहीं. १७

ज्ञान, ज्ञेय, आणि परिज्ञाता, तीन कर्म प्रवर्त्तक होत. तसा कर्म संग्रहही करण, कर्म, कर्त्ता,

असा त्रिविध आहे. १८ ज्ञान, कर्म, आणि कर्त्ता या तिहींस कापिल शास्त्रीं गुण भेदें करून त्रिविध ह्मटलें आहे. तेंही यथास्थित ऐक. १९

विभक्त अशा सर्व भूतांच्या ठाईं, अविभक्त आणि अव्यय असा एक पदार्थ जाणें करून पाहातो, तें ज्ञान सात्विक जाण. २०

तें ज्ञान राजस जाण, जाणें करून भूतीं पृथग्विध असे नाना प्रकारचे पदार्थ दिसतात. २१

जें अल्प आणि एक कार्याच्या ठाईं पूर्णवत् लागलेलें, आणि तत्त्वार्थ शून्य तें ज्ञान तामस ह्मटलें आहे.

फलेच्छा न धरणाराने संग आणि रागद्वेषांस सोडून जें नियत कर्म केलें, त्यास सात्विक कर्म ह्मणतात. २३

सकाम अथवा साहंकार पुरुष जो बहुत आयासयुक्त कर्मास आचरितो त्यास राजस ह्मटलें आहे. २४

॥ मोक्षयोग ॥ १८ ॥

जे कर्म मोहेंकरून फळ, नाश, परपीडा, आणि पौरुष, याचा विचार न करितां आरंभिलें त्यास तामस ह्मणतात. २५

असंग, अहंकारानें न बोलणारा धैर्य, आणि उत्साह यांहींकरून युक्त, सिद्धि आणि असिद्धि यांच्याठायीं निर्विकार, अशा कर्त्यास सात्विक ह्मणतात.

विषय लंपट, आणि कर्मफलाची इच्छा करणारा, तसा लोभी, परपीडनशील, अमंगळ, तसा इष्टानिष्ट प्राप्तीच्याठाईं हर्ष शोक पावणारा, असा कर्त्ता राजस ह्मटला आहे. २७

अयुक्त ह्म० असावधान, प्राकृत ह्म० असंस्कृत बुद्धि, स्तब्ध ह्म० अनम्र, [illegible] सी, विषादी, ह्म० खिन्न, तसा [illegible] स तामस ह्मणतात. २८

बुद्धीचा आणि धारणे [illegible] ध असा भेद मी अशेष पृथ [illegible]

प्रवृत्ति, आणि निवृत्ति [illegible]

॥ मोक्ष योग ॥ १८ ॥

अभय, बंध, मोक्ष. यांसजी जाणती ती बुद्धि सात्विकी होय. ३०

जी बुद्धि, धर्म, अधर्म, कार्य, अकार्य, यांस यथास्थित जाणत नाहीं, ती बुद्धि राजसी होय.

जी तमेंकरून आवृत्त होत्साती, अधर्मास धर्म, आणि सर्व अर्थांस विपरीत मानिते, ती बुद्धि तामसी होय. ३२

जा अचल धारणेंकरून मन प्राण आणि इंद्रियें याचा क्रियांस योग ह्मणजे एकाग्रता तीणेंकरून धरितो, ती धारणा सात्विकी होय. ३३

जा धारणेंकरून धर्म, काम, आणि अर्थ, यांचें धारण करितो, आणि त्यांचा संबंधानें फ[illegible] ती [illegible] राजसी होय. ३४

[illegible] तिपुरुष निद्रा, भय, शोक, [illegible] डित नाहीं, ती धारणा [illegible] तीन प्रकारचें सुख ऐक.

॥ मोक्षयोग ॥ १८ ॥

ज्या सुखीं अभ्यासें करून रमतो आणि दुःखांत म्ह० मोक्ष त्याप्रत पावतो, ३६ जें आरंभीं विषवत्, आणि परिणामीं अमृतोपम, अशा आपल्या बुद्धीचा प्रसन्नतेपासून उत्पन्न झालेल्या सुखास सात्विक ह्मटलें आहे. ३७

जें सुख विषय आणि इंद्रियें यांचा संयोगें करून होतें, आणि जें आदीं अमृततुल्य, आणि परिणामीं, विषोपम तें सुख राजस होय. ३८

आदीं, आणि परिणामीं, बुद्धीस मोहकारक, आणि निद्रा, आलस्य, प्रमाद, यांपासून उत्पन्न असें जें सुख तें तामस ह्मटलें आहे. ३९

इहलोकीं किंवा स्वर्गलोकीं देवांत या प्रकृतिजनित तीन गुणें करून मुक्त असा कोणीही च नाहीं. ४०

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र, यांचीं कर्मेंही प्रकृतिजनित गुणानीं विभक्त आहेत.

शम, ह्मणजे मनोनिग्रह, दम, म्ह० इंद्रिय

निग्रह, तप, शौच, म्ह० बाह्याभ्यंतर शुध्दता, क्षांति म्ह० क्षमा, आर्जव म्ह० सरळपणा, ज्ञानविज्ञान, आणि आस्तिक्य, म्ह० ईश्वराचा ठाईं श्रध्दा, हें स्वाभाविक ब्रह्मकर्म, म्ह० ब्राह्मणत्वजातिज्ञापक कर्म होय. ४२

शौर्य, तेज, धृति, दक्षपणा, युध्दीं अपलायन, दान, आणि नियंतृत्व, हें स्वाभाविक क्षत्रियकर्म होय. ४३

कृषि, गोरक्ष्य, आणि क्रय, विक्रय, हें स्वभावजनित वैश्य कर्म होय. तसेंच शूद्राचें स्वाभाविक कर्म सेवा होय. ४४

आपआप[illegible]र्मी अभिरत मनुष्य सं[illegible] [illegible]सिध्दीचा प्रकार ऐक. ४५

[illegible]भूतांची प्रवृत्ति, आणि जाणें हें सर्व [illegible]हे, त्याला आपल्या कर्मानें आराधून [illegible]सिध्दीतें पावतो. ४६

जरि परधर्म उत्तमप्रकारें आचरिला, आ

णि यद्यपि स्वधर्म किंचित् अंगहीन असला, तथापि तो त्यापेक्षां अति प्रशस्त होय. मनुष्यस्वभाव नियतकर्मातें करित होत्साता दोषातें पावत नाहीं. ४७ स्वाभाविक कर्म सदोष असलें तरीं टाकूं नये. धूमानें जसा अग्नि, तसीं, सर्व कर्में दोषांनीं वेष्टित आहेत. ४८ सर्वत्र असक्त बुध्दि, आणि जितात्मा, म्ह॰ शांतचित्त, आणि विगतस्पृह, म्ह॰ तृष्णा रहित, असा पुरुष संन्यास म्ह॰ पूर्वोक्त सात्विक त्याग त्याणेंकरून परम नैष्कर्म्य सिध्दीनें पावतो. ४९ त्या सिध्दीस पावून जा प्रकारें तो ब्रह्मीं मिळतो तो प्रकार संक्षेपेंकरून मजपासून जाण— जी ज्ञानाची परनिष्ठा होय. म्ह॰ जापेक्षें अन्य जाणायाचें शेष नाहीं. ५०

विशुध्द बुध्दीकरून युक्त [illegible], धैर्येंकरून, आत्मा म्ह॰ देहेंद्रिय संघात, याचें नियमन करून, म्ह॰ दृढासन होवून, शब्दादि विषय,

---

× स्वरूपतः कर्मत्याग लक्षण सिध्दि

आणि राग, द्वेष, यांतें टाकून, ५१ एकांत, से-
वा शील, तसा मिताहार, जाचीवाणी, देह, आ
णि मन हीं नियमित असा, निरंतर ध्यानयोग
पर, आणि वैराग्याप्रत उपाश्रित, असा पुरुष,
५२ अहंकार, बल, दर्प, काम, क्रोध, परिग्रह, ल-
लोभ, यांतें सोडून, ममता रहित, आणि शांत हो
त्साता, ब्रह्मत्वाकारणें योग्य होतो. ५३ तो ब्रह्म
रूपपुरुष, प्रसन्नचित्त होत्साता, शोक आणि
इच्छा करित नाहीं, आणि सर्वभूतीं सम असा,
पर अशा माझ्या भक्तीतें पावून, तीच्या योगें करून,
माझें व्यापकत्व आणि स्वरूप यांस तत्वतः जा
णतो-त्यानंतर मला तत्वेंकरून जाणून मन्मय
होतो. ५४

[illegible] माझाच आश्रय करून. निरंतर
सर्व कर्मांतें करित होत्साताही, माझ्या प्रसादें क
रून शाश्वत अशा अव्यय पदाप्रत पावतो.
चित्तें करून सर्वकर्मांचें माझाठाईं अ-

र्पण कर ; आणि मत्पर होत्साता, बुद्धि योगाचा आश्रय करून निरंतर मच्चित्त हो. ५७ कांकीं असें केल्यानें तूं मत्प्रसादें करून सर्वदुर्गें ह्म० संकटें यातें तरसील. यानंतर जर तूं माझें वचन अहंकारानें ऐकिणार नाहींस, तर नाश पावसील. ५८ जर अहंकाराचा आश्रय करून युद्ध करणार नाहीं असें मानितोस, तर हा तुझा निश्चय मिथ्या होय. कांकीं प्रकृति ह्म० स्वभाव तुला त्याकडेस योजील. ५९ मोहें करून जा कर्मातें करायास इच्छित नाहींस, त्या कर्मातें, स्वाभाविक अशा आपल्या कर्मानें बद्ध असा परवश होत्साता, करशील. ६०

ईश्वर मायेकरून, क[illegible] सर्वभूतांस भ्रमण कर[illegible] हृदयदेशीं राहतो. ६१ [illegible] र्वभावें करून शरण [illegible] करून परशांतीतें, आणि शाश्वत स्थानाप्रत

॥ मोक्षयोग ॥ १८ ॥

पावसील. ६२

असें परमगुह्य ज्ञान मी तुला सांगितलें. याचा साकल्येंकरून विचार कर, आणि अनंतर तुला उत्तम दिसेल तसें कर. ६३

सर्व गुह्यांत अतिगुह्य असें माझें श्रेष्ठ वचन पुनः ऐक. नें, तूं माझा इष्ट होस, अतएव तुझ्या हितार्थ सांगतों. ६४ मच्चित्त असा माझा भक्त हो-माझेंच यजन कर-आणि मलाच नमन कर-ह्मणजे मज प्रत पावसील. हें तुला मी प्रतिज्ञापूर्वक सत्य सांगतों-कांकीं तूं माझा प्रिय आहेस. ६५ सर्व धर्मातें टाकून मला एकासच शरण जा-मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन-शोक करूं नकोस. ६६

हें पूर्वोक्त ज्ञान तूं, तपोरहित, आणि अभक्त, गुरुसेवा न करणारा तसा माझी निंदा करणारा, अशा पुरुषा कारणें कधींही सांगूं नये. ६७

जो पुरुष हें परमगुह्य माझ्या भक्तां प्रत च

र्णील,तो माझाठाईं परभक्तीतें करून निःसंशा-
य मजप्रतच पावेल. ६८ त्याहून मला मनुष्यांत
कोणी अत्यंत प्रिय कर्त्ता नाहीं,आणि पृथ्वींत
होणार नाहीं. ६९

या आमच्या धर्म्यसंवादाचें जो अध्ययन.
करील,त्यापुरुषानें ज्ञान यज्ञेंकरून माझें य
जन केलें अशी माझी मति होय. ७०

जोपुरुष दोषदृष्टिरहित,श्रद्धेकरून या
संवादाचें श्रवणमात्र करील,तोही मुक्त असापु
ण्यकर्त्यांच्या शुभलोकांप्रत पावेल. ७१

हे अर्जुना,मीजें सांगीतलें तें त्वां एकाग्र
चित्तेंकरून ऐकिलें कीं? [illegible]
न संमोह गेला कीं? ७२

अर्जुन बोलतो-हे [illegible] क
रून माझा मोह नाश पा[illegible]
ली-मी गतसंदेह झालों-[illegible]
ऐकेन. ७३

॥ मोक्षयोग ॥ १८ ॥

संजय, राजा धृतराष्ट्राप्रत ह्मणतात–हे राजा, या प्रकारें महात्मा असा वासुदेव, आणि पार्थ यांचा अद्भुत आणि रोमहर्षण अशा संवादातें मी ऐकता जाहलों. ७४ व्यासाच्या प्रसादेंकरून हें परम गुह्य साक्षात् कृष्णाच्या मुखापासून माझ्या कानीं पडलें–आणि मी योग ह्मणजे विश्वरूपस्वही पाहिलें. ७५ हे राजा, या कृष्णार्जुनाच्या पुण्य. आणि अद्भुत अशा संवादातें पुनःपुनः स्मरून, मी वारंवार हर्ष पावतों. ७६ आणि त्या हरीचा अत्यद्भुत रूपास पुनः पुनः स्मरून, मला महान् विस्मय होतो–आणि पुनःपुनः हर्ष पावतों. ७७ जेथे योगेश्वर कृष्ण, जेथे धनुर्धर पार्थ, तेथे श्री, विजय, ऐश्वर्य, आणि सुनीति राहतात, अशी माझी मति होय.

समाप्त

पत्र	ओवी	अशुध	शुध	प.	ओ.	अ.	शु.
२	१२	वाजविला	वाजविला	५१	१३	बुधीसयोग	बुधिसंयोग
५	१७	इछितं	इच्छित	५४	१७	त्याचाठाई	त्यांचाठाई
७	१०	संततीत	संततींत	५४	१८	भावनानीं	भावानीं
७	११	कवडे	केवडें	६०	१३	भ्रुगुटीचा	भ्रुकुटीचा
९	१२	इछा	इच्छा	६१	१३	अच्यक्ती	अव्यक्तीं
१२	१८	आशोष्य	अशोष्य	६२	५	असे	असें
		सपत्ती	संपत्ती	६२	७	जांचा	जाचा
१८	१५	इंद्रियानें	इंद्रियांनें	६८	४	त्यास	त्यांस
२१	१३	आहें	आहे	६९	५	त्याचाठाई	त्यांचाठाई
२२	४	मागे	मागें	७०	१७	प्रथकू	पृथक्
२५	१४	लक्ष	लक्ष्य.	७४	२	मेरू	मेरु
३०	१०	आहें	आहे	८०	२२	पावेल	पावले
३०	१२	करितो	करितों	९२	१०	ज्ञानें	क्षेत्रज्ञानें
३१	९	त्यास	त्यांस	९६	१२	आसतां	असतां
३३	७	द्वंद्व	द्वंद्वस्व.	९९	१२	जाणजो.	जाण.तो
३३	१२	ज्ञानी	ज्ञानीं	१००	६	समथी	समर्थी
३५	१२	इंद्रियाचा	इंद्रियांचा	१००	६	दृधी	दृष्टि
३८	१	एकंवेळ	एकवेळ.	१०२	१०	धर्यवान्	धैर्यवान्
३८	१०	यांहीकरून	यांहींकरून	१०४	६	त्याचे	त्याच
३९	१६	ब्रह्मी	ब्रह्मीं	१०८	१५	अरूरी	आरूरी
४१	४	होत्साती	होत्साते	१२०	४	आआणि	आणि
४२	१८	दष्टि	दृष्टि	१२०	१७	तीन	हीं तीन
४६	२	यातें	यांतें	१२२	२	जे कर्म	जें कर्म
४७	७	निचांत	निचात	१२२	७	सात्वि.	सात्विक

Singaran Butteeree

Singaran Butteeree

SINGASUN BUTTISHEE.

महाराष्ट्र सिंहासन बत्तीशी

लोकपरिज्ञानार्थ

मुंबापुरी पाषाणयंत्रांत

छापिली आहे

इसवी सन
१८३४

शालीवाहन शक
१७५६

Printed at the New Bombay Lithographic Press.

अनुक्रमणिका

श्री

सिंहासनी बत्तीशी

प्रारंभ

श्रीमंत प्रौढप्रताप शौर्यादार्याद्यनेक गुणविराजमान श्री भोजराजा धारानगराचे ठायीं राज्य करीत असतां कोणएके समयीं अवंतिनगराजवळ एक ब्राह्मणानें नवी भूमि साधून शेत पेरिलें होतें तें ओलें तेसमयीं त्याच्या संरक्षणाकरितां शेतामध्यें माळा करून तो ब्राह्मण त्याजवर नित्य बसत असे त्याणें जेसमयीं वरतें बसावें तेसमयीं त्याची बुद्धि मोटी उदार व्हावी आणि खालीं आला असतां पुनः पूर्ववत् व्हावी हा चमत्कार अनुभवून त्या ब्राह्मणानें जाऊन भोजराजास सांगीतलें तेव्हां मोटें आश्चर्य मानून राजा त्या ब्राह्मणाबरोबर शेतांत येऊन माळ्यावर चढला त्या वेळेस त्यास असें वाटलें कीं सर्वजनाचें दरिद्र दूर करावें नंतर खालीं येऊन पाहातो तों ती बुद्धी नाहीं - हा प्रत्यक्ष बुद्धिभेदाचा अनुभव घेऊन राजानें मनांत विचार केला कीं हा भूमीचा गुण किंवा येथें कांहीं वस्तु आहे तीचा

गुण

गुण हें पाहावें- नंतर त्या ब्राम्हणास बहूत द्रव्य देऊन राजानें तें शेत घेतलें आणि तेथें खाणिलें तों रत्नखचित चंद्रकांतमणीचें सिंहासन ज्यास बत्तीस रत्नपुतळ्या जडल्या आहेत असें पाहिलें तें मोटे प्रयासानें बाहेर काढून आपले नगरांत आणिलें आणि राजमंडपांत ठेविलें मग अनेक तीर्थोदकें अष्टोत्तरशत औषधी छत्र चामर खड्ग इत्यादिक राज्याभिषेक समयीं सिद्ध करऊन सुमुहूर्तीं श्री भोजराजा त्या सिंहासनावर बसूंलागला तेव्हां त्याजवरील जयानामें रत्नपुतळी मनुष्यवाणीनें बोलूंलागली हे भोजराजा ज्याचें औदार्य फार असेल त्याणें या सिंहासनावर बसावें इतरांस अधिकार नाहीं असें तीचें वाक्य ऐकून भोजराजा बहुत विस्मित होऊन तिला पुसूंलागला कीं मी याचकांस लाखोरुपये सहज देतों मजहून दुसरा उदार कोण आहे तें ऐकून त्या पुतळीने उत्तर केलें कीं जो आपल्या मुखानें आपली स्तुती करितो तो लघुता पावतो याविषयीं वचन

परैःप्रोक्ता गुणा यस्य निर्गुणोऽपि गुणी भवेत् इंद्रोऽपि लघुतां याति स्वयं प्रख्यापितैर्गुणैः ॥ १

याचा अर्थ- दुसऱ्यानी ज्याच्या गुणाची स्तुती केली तो पुरुष अल्पगुणी जरि असला तरि थोरी पावतो- आणि इंद्रहि ज

र आपला थोरपणा आपल्चे तोंडानें वर्णितो आहे तर तो ल घुता पावतो तें ऐकून भोजराजा लज्जायमान झाला परंतु ही र त्नाची पुतळी मनुष्यासारिखें बोलत्ये हें आश्चर्य मानून तिला पुसतों-हें कोणाचें सिंहासन व यावर बसणाराचें औदार्य कसें होतें तें सांग- याप्रमाणें राजाचें बोलणें ऐकून त्या पु तळी कथा सांगों लागली

उज्जनीनगरींत भर्तृहरी राज्यकरीत असतां कोणीएक ब्रा ह्मण देवीजवळ तपकरीत होता त्यास देवी प्रसन्न होऊन व र माग म्हणाली तेव्हां त्या ब्राह्मणानें अमरत्व मागीतलें असतां भवानी त्यास एक फळ देऊन बोलली कीं हें फळ जो खाईल तो अमर होईल नंतर तें फळघेऊन ब्राह्मण घरास आला आणि विचारकरूं लागला कीं दरिद्री मी अमर झालों तर फा र दिवस भिक्षा मागावी लागेल यास्तव हेंफळ राजास द्यावें म्ह णजे तो बहुत दिवस पृथ्वीचें पालन करील असा निश्चयक रून ब्राह्मणानें अतिआदरानें तें फळ भर्तृहरीस दिल्हें आ णि आपलें वर्तमान सांगीतलें तें ऐकून राजानें बहुत द्रव्य ब्राह्मणास देऊन तें फळ आवडीनें आपल्या स्त्रीस दिल्हें ति णें आपल्ये जारास दिल्हें-जारानें आपल्या वेश्येस दिल्हें तीवे श्या राजानें राखिली होती तिणें राजास नेऊन दिल्हें-त्याणें तें फळ पाहून चौकशी केली तेव्हां सर्व वर्तमान कळलें मग पश्चात्ताप पाऊन बोलला .

यांचिंतयामिसततंमयिसाविरक्ता साचान्यमिछतिज
नंसजनोन्यसक्तः अस्मत्कृतेतुपरितुष्यतिकाचिदन्या
धिकूतांचतंचमदनंचइमांचमांच २

याचा अर्थ- मीं जीचें नित्य चिंतन करितों ती मला सोडून दुसऱ्यावर प्रीति करित्ये-तोही दुसऱ्या स्त्रीची इछा करितो ती स्त्री माझेठायीं प्रीति करित्ये तस्मात् त्यास्त्रीला- त्यापुरुषाला-अशी प्रीति उत्पन्नकरणाऱ्या मदनाला-ह्यास्त्रीला- आणि मलाही धिक्कार असो- याप्रमाणें सर्वांची निंदा करून तें फळ त्याणें आपणच भक्षिलें आणि त्या तिरकाऱ्यानें राज्य सोडून वनवासास गेला- मग त्याचेठिकाणीं प्रधानानी जो राजा बसवावा तो वेताळानें मारावा याप्रमाणे बहुत राजे मारिले- हें वर्तमान भर्तहरीचा धाकटा बंधू विक्रम देशांतरीं गेला होता त्यास कळलें तेसमयीं तो सामान्य पुरुषाचा वेषधरून उज्जनीस आला आणि प्रधानांस विचारूंलागला कीं येथें कोणी राजा नाहीं याचेंकारण काय तेव्हां त्याणी वेताळाचें वर्तमान सांगीतलें- तें ऐकून विक्रम ह्मणतो मला राज्यपदी बसवाल तर मी हें राज्यचालवीन तेव्हां प्रधानानीं विचार केला कीं हा कोणी मोठा धैर्यवान आहे ह्मणून असें भाषण करितो तर यास राज्याभिषेक करावा- असा निश्चय करून त्यांही त्यास राज्यपदीं स्थापिलें मग त्याणें सायंकाळपर्यंत

राज्यकारभार करून रात्रीं नानाप्रकारचें अन्न सिद्ध करऊन आपल्या पलंगाजवळ ठेविलें आणि आपण तरवार घेऊन जागत बसला इतक्यांत तेथें वेताळ आला त्यास राजा बोलतो हे वेताळा हें बहुत प्रकारचें अन्न तुजसाठीं ठेविलें आहे तें आधीं खाऊन मग मला खा- तें ऐकून वेताळानें सर्व अन्न भक्षिलें आणि तितक्यांतच तृप्त होऊन आपल्या ठिकाणीं गेला- त्या दिवसापासून वेताळ नित्यानें अन्न खाऊन जात असे- एके दिवशीं विक्रमानें त्यास पुसलें कीं तुझी शक्ती आणि ज्ञान किती आहे तें सांग- तेव्हां वेताळ ह्मणाला मी जें इछिन तें करिन आणि मला भूत भविष्य वर्तमान कळतें तें ऐकून विक्रम ह्मणतो कीं माझे आयुष्यांत पांच वर्षें उणी अथवा अधीक कर बरें- वेताळानें उत्तर केलें कीं हें कोणाचे स्वाधीन नाहीं असें बोलून आपल्या ठिकाणीं गेला दुसरे दिवशीं विक्रमानें अन्न ठेविलें नाहीं तेव्हां वेताळ रागें भरून बोलला कीं अरे आज अन्न कां नाहीं ठेविलेंस- विक्रम बोलला कीं तुझ्यानें माझें आयुष्य उणें किंवा अधिक करवतनाहीं मग तुला नित्य बळी उगाच कशासाठीं द्यावा- तुझी इछा असली तर युद्धास सिद्ध हो- याप्रमाणें भाषण करून विक्रम हातांत तरवार घेऊन लढायीस उभा राहिला हें पाहून वेताळ ह्मणतो विक्रमा तुझ्या धैर्यानें मी संतुष्ट झालों यास्तव तूं कांहीं वर माग विक्रम बोलला ज्यावेळेस तुझें स्मरण करीन त्या

वेळेस

वेळेस येऊन माझें कार्य करावें ते मान्यकरून वेताळ गेला-मग मोट्या समारंभानें विक्रमाने आपणास राज्याभिषेक करविला आणि राज्य करूं लागला तों एके दिवसीं सिद्धसेननामा कवि उज्जनीस येऊन राजास आपण आलों असें कळविताझाला ते व्हां विक्रमानें भेटी-च्या अगोदरच त्यास चवदालक्ष रुपये आणि नऊ गांवांचें दानपत्र पाठऊन सेवकास सांगीतलें कीं अणखी कांहीं कवीची इछा असली तर त्यास सभेस घेऊन या-याप्रमाणे राजाना ऐकून दूतानी रुपये व ग्रामपत्र कवीस दिल्हें असतांही कवी सभेस गेला तों राजा पूर्वेस सुख करून बसला होता तेसमयीं कवीने हा श्लोक ह्मटला

अपूर्वेयं धनुर्विद्या भवता शिक्षिता कुतः मार्गणौ
घः समभ्येति गुणो याति दिगंतरं १

याचा अर्थ- हे विक्रमा ही अपूर्वधनुर्विद्या तुं कोणाजवळ शिकलास ज्याविद्येने बाण तुजकडे येतात आणि धनुष्याची दोरी बाहेर जाते याप्रकारें श्लोकाचा अर्थ दिसण्यांत येतो परंतु वास्तविक अर्थ असा होतो कीं तुं मागणारांस बहुत द्रव्य देतोस ही कीर्ति दिगंतिं जाते ह्मणून याचक तुजकडे येतात असा अर्थ समजून पूर्वदिशेचें राज्य यास द्यावें असें मनांत आणून विक्रम दक्षिणेकडे फिरून बसला मग कवीने दु

सरा

सरा श्लोक म्हटला

सर्वदा सर्वदोऽसीति मिथ्या त्वं कथ्यसे बुधैः नारयो
लेभिरे पृष्ठं न वक्षः परयोषितः

याचा अर्थ-हे राजा तूं सर्वदा सर्व देतोस अशी लटकीच तु
झी स्तुति लोक करितात-ती लटकी कशी ति ऐक-तूं शत्रूंस
पाठ आणि परस्त्रियांस हृदय हीं कधींही दिलीं नाहींस-हा
श्लोक ऐकून त्या कवीस दक्षिण दिशेचें राज्य द्यावें असें मनांत
आणून विक्रम पश्चिमेस बसला नंतर त्याणें तिसरा श्लोक म्हट
ला

अरयस्ते भयत्रस्ताः स्फुटिताः पटवद्ददि गलितं नेत्र
पातात्र राजन्चित्रमिदं महत् १

याचा अर्थ-हे विक्रमा तुझ्या भयानें तुझे शत्रु त्रास पावोन
त्यांचे हृदयघट फुटले त्यांतून उदक गळावें तें नेत्रांतून गळूं ला
गलें हा मोटा चमत्कार आहे तें ऐकून राजा उत्तरेस बसला
तों कवीनें चवथा श्लोक म्हटला

सरस्वती स्थिता कंठे लक्ष्मी: करसरोरुहः राजेंद्र कु
पिता कीर्तिस्तेन देशांतरं गता -

याचा अर्थ - हे विक्रमा तुझ्या कंठाचे ठाईं सरस्वती आणि हस्ताचे ठाईं लक्ष्मी राहिली ह्मणून रागाने कीर्ति देशांतरी गेली असें श्रवणकरून विक्रमाने कवीस नमस्कार करून सांगीतलें कीं तुला चारी दिशांचें राज्य दिल्हें तेव्हां कवीनें उत्तर केलें मी राज्य घेऊन काय करूं तें तुलाच असाव असो - तुझ्या दातृत्वाने मी फार संतुष्ट झालों नंतर राजास आशिर्वाद देऊन कवी आपल्ये ठिकाणास जाता झाला याप्रमाणें विक्रम राजा परोपकारी शूर असा लोकीक स्वर्गी कळून इंद्रानें त्यास सिंहासन पाठऊन दिल्हें मग त्याजवर बसून बहुत दिवस राज्यकरून शेवटीं तो स्त्रीसहित स्वर्गवासी झाला ते समयीं आकाशवाणी झाली कीं ह्या सिंहासनावर बसावयास आतां कोणी योग्य नाहीं यास्तव हें भूमीत पुरून ठेवा - मग प्रधानानीं तसेंकेलें तें हें सिंहासन आज तुला सहज सांपडलें आणि तूं याजवर बसावयास सिद्ध झाला आहेस परंतु विक्रमाची योग्यता तुझे आंगीं नाहीं ह्मणून तूं याजवर बसूं नयेस - याप्रमाणे जयापुतळीचें बोलणें ऐकून भोजराजा खिन्नहोऊन आपल्या महालांत गेला आणि मनांत विचार करितो आहे कीं ही एक पुतळी बोलिलीयावरून दुसऱ्याही बोलतीलसें वाटतें तर आपण कौतुकानें नित्य सिंहासनावर बसावयास जात असावें असें मनांत आणून पुनः दुसऱ्या दिवसीं सिंहासनाजवळ आला तेव्हां वि

जयानामें

जयानामें दुसरी पुतळी बोलूंलागली हे भोजराजा विक्रमा सारिखें औदार्य तुझें असेल तर या सिंहासनावर चढ तें ऐकून भोजराजा विचारितो- त्याचें औदार्य कसें होतें तें सांग- मग विजया सांगते

कथा - २

कोणे समयीं विक्रमराजा सभेस बसलाअसतां एक दरिद्री ब्राम्हण येऊन उगाच उभाराहिला तेव्हां प्रधानानी विनंती केली कीं हा बहुत दरिद्री आहे ह्मणून आपल्या जवळ आला आहे- तें ऐकून राजानें त्यास लक्षरुपये दिल्हे तेव्हां ब्राम्हण संतुष्टहोऊन श्लोक ह्मटला

संग्रहेण कुलीनानां राज्यं कुर्वंति पार्थिवाः आ
दिमध्यावसानेषु नत्यजंति-चतेंनृपं -

याचाअर्थ- हे राजा कुलीन पुरुषाचा संग्रह करून राजे राज्य करितात ह्मणून ते पुरुष राजास कधींही सोडित नाहीत याविषयीं एक कथा सांगतों ऐक

विशाल नगरींत नंदराजा होता तो भानुमती स्त्रीच्यास्वरूपास मोहित होऊन राज्यकारभार सोडिताझाला तेव्हां त्यास बहुश्रुत प्रधानानें विनंती केली कीं हे राजा गुरु वैद्य आणि

प्रधान

प्रधान याणीं केवळ मर्जीसारिखें बोलूं नये जें खरें असेल तें सांगा वें- अशी नीत आहे ह्मणून बोलतों ऐक आपण सभेस यावयाचें सोडिलें हें समजून शत्रू राज्यांत बहुत उपद्रव करूं लागले असें प्रधानाचें भाषण ऐकून नंदराजा ह्मणतो तूं खरें सांगतो स परंतु भानुमतीस सोडून मला क्षणभरही राहावत नाहीं यास काहीं उपाय करशील तर मी दरबारीं येईन असें राजाचें बोलणें ऐकून बहुश्रुत प्रधानानें चितान्याकरवीं भानुमतीचें चित्र काढून राजास दाखविलें तें राजानें शारदानंद गुरूचे हातीं दिल्हें तें पाहून त्याणें सांगीतलें- हें चित्र भानुमती सारिखेंच आहे परंतु तिच्या मांडीवर चिन्ह आहे तें येथें नाहीं असें त्याचें वाक्य ऐकून नंदराजास फार राग येऊन प्रधानास आज्ञा केली कीं शारदानंदास अरंण्यांत नेऊन मारून टाक- ती मान्य करून प्रधानानें त्यास आंपल्या घरीं नेला- आणि विचार केला कीं भानुमतीचे मांडीवरील चिन्ह याणें अंतर्ज्ञानानें सांगीतलें तें न जाणून राजाचे मनांत दुष्टबुद्धि आली आणि यास मारावयास आज्ञा केली परंतु मारला असतां प्रभूस पातक लागेल यास्तव लपुन ठेवावा- असा निश्चय करून शारदानंदास राजाज्ञा सांगून तळघरांत लपऊन ठेविला आणि मारला असें लटकेंच राजास सांगीतलें यानंतर येके दिवशीं राजपुत्र विजयपाळ अरंण्यांत शिकारीस गेला तेथें मोठा डुकर पाहुन त्याचे पाठिमागें एकलाच लागला तेव्हां डुकर पर्वताच्या गुहेंत शिरला

मग

मग राजपुत्र बहुत श्रमून पाणी पिण्यां करितां घोड्याखालीं उतरला इतक्यांत एक वाघ येत होता त्यास पाहून भयानें झाडावर चढला तों त्या झाडावर एक आस्वल वाघाच्या भयास्तव पूर्वींच बसला होता त्याची याची एकदृष्टी होतांच राजपुत्र घाबरा झाला तेव्हां आस्वल ह्मणाला तूं भिऊं नको मी तुझा घात करणार नाहीं तें ऐकून तो विश्वासानें त्याजवळ बसला आणि वाघही त्या दोघांस पाहून वृक्षाखालीं उभा राहिला मग रात्रीचे वेळीं विजयपाळास झोंप येऊं लागली तेव्हां आस्वल बोलिला तूं कांहीं संशय नधरितां माझे मांडीवर नीज तें ऐकून त्याच्या मांडीवर डोकें ठेऊन राजपुत्र निजला तेव्हां वाघ आस्वलास ह्मणाला तूं मी नित्य अरण्यांत राहाणारे आणि हा मनुष्य आपला शत्रू यास्तव यास खालीं लोटूनदे ह्मणजे दोघांचेंही कार्य होईल- आस्वलानें उत्तर केलें कीं तूं कितीही सांगीतलेंस तरी मी विश्वासघात करणार नाहीं तेव्हां वाघ उगाच बसला मग मध्यरात्र झाल्यावर विजयपाळ उठला त्याची मांडी उशास घेऊन आस्वल निजला तेसमयीं वाघ राजपुत्रास ह्मणतो तूं या आस्वलाचा विश्वास धरूंनको कां राजनितींत सांगीतलें आहे श्लोक

नदीनांचनखीनांच शृंगिणांशस्त्रपाणिनां विश्वासो
नैवकर्तव्यः स्त्रीषुराजकुलेषुचपि १

याचा अर्थ-नदी-तिखटनखांची जनावरें- तसेच शिंगाचे पशु-हातियारी-स्त्रिया-राजे-यांचा विश्वास धरूनये अशी निति आहे त्यापून तुला सांगतों तूं या आस्वलास खालीं ढकलूनदेशी णजे मी त्यास खाऊन तुला वाटदेईन- तें ऐकून राजपुत्रानें त्यास खालीं लोटिलें तेव्हां- तो पडतांपडतां सावधहोऊन एका खांदीस धरून पुनः आपल्या ठिकाणी आला तें पाहून राजपुत्र भयानें थरथरां कांपुंलागला- त्यास आस्वल ह्मणतो तूं माझें भय मानून को मी तुझ्या शरीरास उपद्रव करणार नाहीं परंतु माझ्या शापानें तुला ससेमिरा या अक्षरांचें वेड लागेल- जेव्हां हीं अक्षरेंजा धीं आहेत ज्यांस असे चार श्लोक माझ्या मनांत आहेत ते तुला कोणी ऐकविणारा भेटेल तेव्हां तुझें वेड जाईल मग सूर्योदय होतांच वाघ आणि आस्वल आपल्या ठिकाणीं गेले- विजयपाळ विश्वासघाताच्या पातकामुळें ससेमिरा हीं अक्षरें ह्मणत वेडाहोऊन रानांत फिरोंलागला- त्याचा घोडा नगरांत एकलाच आला तो पाहून नंदराजा चिंतायुक्त होऊन पुत्राच्याशोधार्थ सैन्यघेऊन वनांत गेला तों विजयपाळ ससेमिरा ह्मणत फिरत आहे असा पाहिला त्यास घरीं आणून उपाय बहुत केले परंतु त्याचें वेड जाईना तेव्हां बहुश्रुतप्रधानास ह्मणतो कीं जर आज शारदानंद असता तर यास बरेंकरिता-प्रधान बोलला कीं आपल्या शहरांत दोंडी पिटऊन लोकांस कळवावें ह्मणजे कोणीतरी यास बरेंकरणारा भेटेल- तें ऐकून नंदराजानें तसेंकरायास आज्ञाकेली नंतर बहुश्रुतप्रधान आपल्या घ

रीं

रीं येऊन शारदानंदास तें वर्तमान सांगतां झाला तेव्हां तो म्हणाला तूं राजाजवळ जाऊन सांग कीं मांझी कंन्या बहुत चतुर आहे ती कांहीं उपाय करील तें ऐकून बहुश्रुतानें तसेंच राजास सांगून पुत्रा सहित त्यास आपल्या घरास आणिलें नंतर कंन्या पडद्यांत बसवितों असें बोलून शारदानंदास पडद्याचे आंत बसवून बाहेर राजास पुत्रादिकांसह वर्तमान बसविलें ते समयीं शारदानंद अंतर्ज्ञानानें अरंण्यातील सर्व वर्तमान जाणून हे चार श्लोक पढता झाला

सद्भावप्रतिपन्नानां वंचनेकाविदग्धता- अंकमारुह्य
सुप्तानां हंतुः किंन्नामपौरुषं १

याचा अर्थ- ज्याणें आपल्यावर विश्वास ठेविला त्यास ठकविलें तर त्यांत काय चातुर्य- मांडीवर निजला त्याचा जीव घेतला तर त्यांत काय पराक्रम केला हा श्लोक ऐकतांच राजपुत्रानें एक अक्षर सोडून दिल्हें आणि सेमिरा हें बोलुं लागला तीं शारदानंदानें दुसरा श्लोक म्हटला

सेतुंगत्वा समुद्रस्य गंगासागरसंगमं ब्रह्महत्या विमुच्येत मित्रद्रोही नमुच्यते २

याचा अर्थ- गंगेचा समुद्राशीं जेथें संगम झाला त्याठिकाणीं अथवा

थवा सेतुबंधरामेश्वरी गेलें असतां ब्रह्महत्येचा दोषजातो परंतु मित्रद्रोही पापापासून कोटेंच मुक्त होतनाहीं हें ऐकतांच विजय पाळें दुसरें अक्षर सोडून मिरा हें ह्मणूंलागला तेव्हां शारदानंदानें तिसरा श्लोक ह्मटला

मित्रद्रोहीकृतघ्नश्च तथाविश्वासघातकः त्रयस्तेन
रकंयांति यावच्चंद्रदिवाकरौ ३

याचा अर्थ-मित्राचा घातकरणारा-उपकार नजाणणारा-विश्वास देऊन घातकरणारा-हे तिघे जोंवर सूर्यचंद्र आहेत तोंपर्यंत नरकीं राहातात-हा श्लोक ऐकून राजपुत्रानें तिसरें अक्षर टाकिलें आणि रा ह्मणूंलागला तेव्हां शारदानंदानें चवथा श्लोक ह्मटला

सिद्धांतःसर्वशास्त्राणा मयंनकलुषंपरं विश्वासघा
तात्पुण्यंच नपरोपकृतेःपरं ४

याचा अर्थ-सर्वशास्त्रांचा सिद्धांत असा आहे कीं विश्वासघाता परतें दुसरें थोर पातक नाहीं-आणि परोपकाराहून दुसरें मोठें पुण्य नाहीं हा श्लोक ऐकून राजपुत्रानें वेड गेलें आणि तो रानांतील झालेलें वर्तमान राजास सांगताझा

ला तेवेळीं राजा पडद्यांतिल्ये कन्येस पुसतां हे मुली तूं गांवांत राहातेस अरंण्यांत कधींही जात नाहीस असें असतां हे थील वर्तमान तुला कसें कळलें तें सांग तेव्हां शारदानंद बोलिला देव ब्राह्मणाच्या प्रसादें करून माझ्याजिव्हाग्री सरस्वती आहेति च्यायोगानें मीं सर्व जाणतों असें भानुमतीचे मांडीवरचें चिन्ह जाणिलें तें ऐकतांच नंदराजाची खुण पटली आणि पडदा दूर करून पाहिलें तों शारदानंद बसला आहे त्यास राजानें आणि विजयपाळानें साष्टांग नमस्कार घालोन आपल्या घरीं नेलें अशी कथा ब्राह्मणानें विक्रमास सांगीतली तेव्हां त्याणें त्या ब्राह्मणास कोटिरुपये दिल्हे याप्रमाणें तुझें औदार्य असेल तर या सिंहासनावर बैस असें विजयापुतळीचें भाषण ऐकून भोज राजा खिन्नहोऊन आपल्या माहालीं गेला-पुनः दुसरे दिवशीं सिंहासनाजवळ आला तेव्हां तिसरी पुतळी जयंती बोलिली हे भोजराजा विक्रमासारिखें तुझें धैर्य असेल तर या सिंहासनावर बैस तेव्हां भोजराजानें विचारिलें त्याचें धैर्य कसें होतें तें सांग मग जयंती सांगत्ये

कथा ३

विक्रमराजा राज्यकरीतअसतां पृथ्वीवर कोठें काय चमत्कार आहे तो आपणास कळावा ह्मणोन दूत चहुंकडे पाठवीत असे-एके दिवशीं दूतानें येऊन सांगीतलें कीं चित्रकूटपर्वतावर

टपर्वतावर देवीचें देउळ आहे त्याच्या पुढें नदी आहे त्यांत जो पु ण्यवान् आहे त्याणें स्नान केलें असतां तीचें पाणी स्वछ होतें-आ णि पापी मनुष्यानें केलें तर सर्वपाणी गढूळ होतें- हा मोटा च मत्कार आहे-दुसरें-त्या देवीजवळ एक ब्राह्मण बहुत दिव स तपश्चर्या करितआहे परंतु त्यास भवानी प्रसन्न होतना हीं- असें ऐकून विक्रमानें त्या पर्वतावर जाऊन नदींत स्ना न केलें तों उदक स्वछ झालें त्यावरून आपण पवित्र आहें अ सें समजोन त्याणें देवीस नमस्कार केला नंतर ब्राह्मणाजव ळ जाऊन त्यास विचारिलें कीं तूं येथें किति दिवस अनुष्ठा न करित आहेस-त्याणें उत्तर केलें- तीनतपें परंतु अझून देवीस माझी करुणायेत नाहीं असें ऐकून विक्रमराजा देवी ची स्तुती करूं लागला तथापि ती प्रसन्न होइना तेवेळीं राजानें विचार केला कीं हें शरीर कधींतरी व्यर्थ जाणार त्यापेक्षां ब्रा ह्मणाच्या कार्याकरितां आज देवीस अर्पण करावें हें बरें-अ सा निश्चय करून हातांत तरवार घेऊन आपलें शिर तोडूं ला गला तें राजाचें धैर्य पाहुन देवी प्रत्यक्ष होउन त्याचा हात धरून बोलली कीं तुला जें पाहिजे तें माग- राजा बोलला कीं मला तूं एक घटिकेंत प्रसन्न झालीस आणि हा ब्राह्मण बहुत दिवस तप करितो यास कां वरदेत नाहींस तें सांग भवानी सांगते- अरे याचा भाव शुद्ध नाहीं ह्मणून मी याव र कृपा करीत नाहीं-ह्मटलें आहे

नकाष्ठेविद्यतेदेवो नपाषाणेनमृन्मये भावेहिवि
द्यतेदेव स्तस्माद्भावोहिकारणं १

अर्थ - काष्ठ पाषाण मृत्तिका - यांचेठाई देव राहातनाही तर भावाचेठाई राहातो - म्हणून माझी कृपा व्हावयास भावच कारण आहे - असें ऐकून विक्रम म्हणाला हे भवानी तुं जर मला प्रसन्न झालीआहेस तर या ब्राह्मणानें कार्य कर हें मागतों - तें मान्य करून देवी ब्राह्मणाची इछा परिपूर्ण करितीझाली नंतर विक्रमराजा अवंती नगरास येताझाला - हीकथा सांगोन जयंती बोलली असें तुझें धैर्य असेल तर या सिंहासनावर बेसनें ऐकून भोजराजा फार खंती होऊन माघारां फिरला पुनः दुसरे दिवशीं सिंहासनावर बसूंलागला तेव्हां अपराजिता चवथी पुतळी बोलली हे भोजराजा विक्रमासारिखें तुझें औदार्य असेल तर यासिंहासनाचे पायरीवर पायदे - तेव्हां त्याणें विचारिलें त्यानें उदारत्व कसें होतें तें तूं सांग - मग अपराजिता सांगते

कथा ४

अवंतीनगरींत विक्रमराजा राज्यकरितअसतां त्याचा पराक्रम पाहून स्वर्गलोकीं इंद्रादिकदेवहि त्यास भीतहोतें म्हणतें आहे

उद्यमःसाहासं धैर्यं बलंबुद्धिःपराक्रमः षडेतेयत्र तिष्ठंति तत्रदेवोपिशंकते १

अर्थ- उद्योग- भाचाट कर्म- धैर्य बळ बुद्धि-पराक्रम-हे सहा गुण ज्याचे विशेष आहेत त्यास देवहि भितात- असा सर्व गुणयुक्त विक्रमहोता एकदिवसीं त्याणे विचार केला कीं लक्ष्मी अतिचंचल आहे-इचा भरवसा नाहीं-तर सत्कर्मानें ईचा व्ययकरून पुण्यजोडावें असा निश्चय करून यज्ञास आरंभ करिताझाला- नंतर सर्व यज्ञसामग्री सिद्ध करवून सर्वांस बोलावणीं पाठविलीं आणि एका ब्राह्मणास सांगीतलें कीं तूं जाऊन समुद्रास आमंत्रण कर- तेव्हां तो ब्राह्मण गंधाक्षता घेऊन समुद्राजवळ येऊन उभा राहिला आणि ह्मणतो हे सागरा- तुला विक्रमराजानें यज्ञाच्या समारंभास बोलाविलें आहे कृपाकरून आलें पाहिजे- तें ऐकून समुद्र प्रत्यक्ष होऊन बोलतो हे ब्राह्मणा विक्रमानें प्रीतीकरून आमंत्रण पाठविलें तेणेंकरून मला बहुत संतोष झाला परंतु ईश्वरानें मला आज्ञा केली आहे कीं तुं आपली मर्यादा सोडून जाऊनको ह्मणोन मला येतां कामास नये तरमी त्यास ही चार रत्नें देतों तीं नेऊन दे- यांचे गुण सांगतों ऐक-ह्या पहिल्या रत्नाची पूजाकरून प्रार्थना केली असतां जितकें द्रव्य पाहिजे तितकें उत्पन्न होईल- दुसऱ्या पासून जें अन्न पाहिजे तें निघेल तिसऱ्या पासून

पासून जें सैन्य पाहिजे तें सिद्ध होईल- चवथ्यापासून ज्या अलंका
रांची इछा असेल ते प्राप्त होतील- असें सांगून रत्नें ब्राह्मणाकडे
देता झाला- ब्राह्मणानें तीं रत्नें घेऊन विक्रमाजवळ येऊन सर्व
वर्तमान सांगीतलें- तेव्हां विक्रम त्या ब्राह्मणास ह्मणाला तुं समु
द्राजवळ जाऊन थोर कार्य केलेंस- तर तुला जें रत्न पाहिजे तें ए
क यांतून घे- ब्राह्मण ह्मणाला मी आपल्या घरीं जाऊन सर्वांस
विचारीन नंतर जें घेणें तें घेईन- राजानें तीं चाही रत्नें त्याच्या स्वा
धीन केलीं- मग तो ब्राह्मण आपल्या घरीं येऊन सर्वांस तें वर्त
मान सांगता झाला तेव्हां त्याची स्त्री ह्मणाली अन्नप्राप्तीचें रत्न घ्या
वें ह्मणजे आयास न करितां अन्नें मिळतील- पुत्र बोलला सैन्य
उत्पन्न होईल तें घ्यावें- कन्या ह्मणाली द्रव्यें करून सर्व अनकूळ
होतें तें आपल्याजवळ नाहीं ह्मणोन बहुत श्रम करावे लागतात
यासाठीं द्रव्यप्राप्तीचेंच रत्न घ्यावें- सून ह्मणाली माझ्या आंगाव
र काहीं वस्त्रा नाहींत ह्मणून मला माझ्या वहिणी हिणावितात
तर ज्यापासून अलंकार उत्पन्न होतात तें घ्यावें- अशा सर्वांचा
इछा निरनिराळ्या होऊन चौघेंही कलह करूं लागलीं- तें पाहून
ब्राह्मणानें चाही रत्नें विक्रमास परत देऊन सांगीतलें कीं राजा
माझे घरीं चार मनुष्यें आहेत त्या चवघांचि बोलणी चार प्रकार
चीं पडतात यास्तव मला एकहि रत्न नको- तें ऐकून विक्रम
त्या ब्राह्मणास तीं चारही रत्नें देऊन संतुष्ट करिता झाला- अ
शी कथा सांगोन अपराजिता ह्मणाली हे भोजराजा याप्रमाणें

तुझें

तुझें औदार्य असेल तर यासिंहासनावर बैस- तेव्हां भोजराजा लज्जायमान होऊन आपल्या रंगमाहालांत गेला पुनः प्रातःकाळीं सिंहासनावर बसूंलागला तों पांचवि पुतळी जयघोषा बोलली हे भोजराजा विक्रमासारिखा उपकार जाणता तुं आहेस तर ह्या सिंहासनावर बैस- राजानें विचारिलें विक्रम उपकार जाणता कसा होता तें सांग- जयघोषा सांगत्ये

कथा-५

अवंती नगरांत देवदत्त नामा एक ब्राह्मण अग्निहोत्री राहात असे तो समिधा आणावयाकरितां अरण्यांत गेला होता- तें दिवसीं विक्रमराजा त्याच अरण्यांत शिकारीस जाऊन एकटाच एका डुकरामागें लागला होता तेव्हां डुकर पळोन गेला आणि राजा वाट चुकून इकडेतिकडे फिरूंलागला- तें देवदत्त ब्राह्मणानें पाहून राजास आपल्ये आश्रमांत आणिलें आणि फळें उदक देऊन स्वस्थ केलें- आणि आपण बरोबर येऊन नगरास पोंचिविलें- तेव्हां विक्रमानें त्या ब्राह्मणास बहुत द्रव्य देऊन सांगीतलें हे ब्राह्मणा हा तुझा उपकार माझ्यानें फिटणार नाहीं- मी तुझा ऋणीआहें- ब्राह्मण संतुष्टहोऊन आपल्या घरास गेला त्यादिवसापासून तो ब्राह्मण राजाचेघरीं येतजात असे- एकेदिवसीं ब्राह्मण मनांत ह्मणतो कीं राजा जें बोललाहोता तें खरें किंवा खोटें याची प्रचीत पाहुं ह्मणोन त्यानें राजपुत्र लहान

हान होता त्यास खेळवायानिमित्तें आपणाकडे घेवून कोणास नक
ळतां आपल्या घरीं नेऊन ठेविला-तेव्हां राजपुत्रास कोणी नेलें
हें समजून विक्रमादिक सर्व दुःखी झाले आणि त्याचा शोध करूं
लागले तों त्या ब्राह्मणानें पुत्रावरचा एक अलंकार काढून सेव
काचे हातीं विकावयास दिल्हा तो राजसेवकानीं पाहिला आणि
त्यास विचारिलें कीं ही वस्तु तूं कोठून आणिलीस तेव्हां तो ह्मणा
ला देवदत्त ब्राह्मणानें मजजवळ विकावयास दिल्ही-तें ऐकून रा
जसेवकानीं देवदत्तास राजसभेस आणिलें ते समयीं विक्रमा
नें त्यास पुसलें हीवस्तु तुला कोठें सांपडली - ब्राह्मण बोलला
हे माहाराज तुझा पुत्र मी लोभास्तव मारिला हीवस्तु त्याचे अं
गावरली - तें ऐकून सर्वलोक बोलूं लागले कीं या दुष्ट ब्राह्मणास
बहुत शासन करावें विक्रम ह्मणाला हे देवदत्ता तूं माझा पुत्र
मारिलास तथापि मी तुला शिक्षा करावी हें योग्य नव्हे-कांमी
तुझा अगोदरचा उपकारी आहें- याप्रमाणें भाषण करून पु
त्राचा किमपि खेद न करितां त्या ब्राह्मणास विक्रम बहुत द्रव्य
देताझाला - असा विक्रमाचा आचार पाहून देवदत्त संतुष्ट झा
ला आणि पुत्रास आणून राजाच्या स्वाधीन करिताझाला- ही
कथा सांगोन जयघोषापुतळी ह्मणाली- हे भोजराजा असा तूं उ
पकार जाणता आहेस तर या सिंहासनावर पाय दे- तें श्रवण
करून भोजराजा माघारा गेला- पुनः दुसरे दिवसीं प्रधानादिक
बरोबर घेऊन सिंहासनाजवळ आला तेव्हां साहावी पुतळी

लीलावती

लीलावती बोलली हे भोजराज विक्रमासारिखा तूं गुणज्ञ असशील तर यासिंहासनावर बैस भोजराजानें विचारिलें विक्रमामध्यें गुणज्ञता कसी होती तें सांग- मग लीलावती सांगते

कथा ६

विक्रमराजा राज्यकरित असतां एका जोहाऱ्यानें एक उत्तम रत्न आणून राजास दाखविलें कीं ज्याच्या प्रकाशें करून पाहणाराचे डोळे दिपत असत- राजानें रत्न पारखी बोलाविले त्याणी त्या रत्नाची कीमत कोटि रुपये केली- तें थोडें वाटून विक्रमानें ते समयीं अकरा कोटि रुपये त्या जोहाऱ्यास देऊन आज्ञा केली कीं असींच आणखी दाहा रत्नें घेऊन एका महिन्याचे आंत ये- तो राजाज्ञा मान्य करून तो जोहारी देशांतरीं गेला तेथोन त्याप्रमाणें दाहा रत्नें घेऊन येत असतां वाटेंत मोठा पर्जन्य पडोन एका नदीस उतार होत नाहीं असें पाहिलें तेव्हां जवळचे गांवांत गेला तेथें एक रामदास सावकार होता त्याला आपलें वर्तमान सांगीतलें- रामदास म्हणाला- मला जर यांतली पांच रत्नें देशील तर मी नाव देऊन तुला अवंतीस नेऊन घालीन- तें ऐकुन जोहाऱ्यानें विचार केला कीं यास जर रत्नें न दिल्हीं तर एक महिन्याचा आंत यावें असी राजाज्ञा आहे ती मोडेल आणि राजास क्रोध येईल का राज्याचें फळ हेंच

कीं

कीं आज्ञा व्यर्थ होऊं नये - म्हटलें आहे

आज्ञामात्रफलंराज्यं ब्रह्मचर्यफलंतपः परिज्ञानफ
लाविद्या दत्तभुक्तफलंधनं १

अर्थ- राजाची आज्ञा सर्वांनी मान्य करावी हेंच राज्याचें फळ-ब्रह्मचर्य असावें हेंच तपाचें फळ-विद्याभ्यासाचें फळ हेंच की ज्ञान व्हावें-धनाचें फळ हेंच कीं भोग आणि दान करणें म्हणोन राजाज्ञा नमोडेल तें करून मग झाला व्यवहार विक्रमास कळवावा- असा निश्चय करून पांच रत्नें त्यासावकारास देऊन त्याच्यानातेंत बसला आणि अवंतीनगरास जाता झाला- नंतर विक्रमापुढें पांचरत्नें ठेऊन तो जोडारी उभा राहिला- राजानें त्यास पुसलें कीं दुसरीं पांचरत्नें कोठें आहेत तेव्हां त्याणें हात जोडून राजास सर्व वर्तमान सांगीतलें आणि बोलला महाराज आपली आज्ञा पालन व्हावी म्हणून मी असें केलें आणि तिसा दिवसांत आंत आलों तें ऐकून विक्रमानें विचार केला कीं हा मोठा प्रमाणिक आणि बुद्धिवान् होय राजाज्ञा नपाळिल्यास मोठा दोष घडतो हें खरेंच आहे

आज्ञाभंगोनरेंद्राणां विप्राणांमानखंडनं एथक्शय्याचनारीणाम शस्त्रविहितोवधः

अर्थ-

अर्थ- राजाची आज्ञा मोडणें- ब्राम्हणाचा मानभंग करणें- कारणावांचून स्त्रीस निराळी निजविणें- हीं तिन्हीं त्यांच्या वधासमान होतात- असें जाणोन याणें पांच रत्नें सावकारास दिल्हीं असा त्याचा गुण घेऊन विक्रमराजाने त्या ब्राह्मणास तीं आणलेलीं पांच रत्नें बक्षीस केलीं ही कथा सांगान लीला वती पुतळी म्हणाली हे भोजराजा विक्रमा सारिखे गुण तुज मध्यें नसतां व्यर्थ तूं या सिंहासनाची आशा कां धरितोस तें ऐकून भोजराजा माघारां गेला पुनः दुसरे दिवसीं सिंहासनाजवळ गेला तों मंजुघोषा सातवी पुतळी बोलली दुसऱ्याची इछा तृप्त करणें हा गुण विक्रमा सारिखा तुजमध्यें असेल तर या सिंहासनावर बैस- तेव्हां त्याणें विचारिलें तो त्यांत कसा होता तें सांग मंजुघोषा सांगते

कथा ७

विक्रमराजा एकेदिवसीं वसंत ऋतुमध्यें चंपक वनांत गेला तें वन असें पाहिलें कीं रम्य पुष्करिणी अनेकप्रकारच्या कमळें करून युक्त- हंस मयुर कोकिळ यांहींकरून शोभित नाना प्रकारचे वृक्ष वेली आणि जाई जुई चमेली मालती मोगरी इत्यादिकानी वेष्टित असें पाहुन तेथें एक रमणीय बंगला बांधवून त्यांत बहुत कारंजीं करवून स्त्रियां बरोबर जलक्रीडा करूंलागला- त्यावनांत एक तपस्वी तप करीत होता

होता त्याणें तो राजाचा विलास पाहुन आपल्या मनांत विचार केला कीं ह्यालोकीचें सुख सोडून स्वर्गलोकींच्या सुखाची इछा करणें यांत काय विशेष येथें अनेक प्रकारिचे कष्ट भोगून मेल्यानंतर त्या लोकचे भोग भोगावे यापेक्षां येथेंच विषयसुख भोगावें हें फार बरें दिसतें- असें मनांत आणून तो तपस्वी विक्रमाजवळ गेला राजाने त्याचा सत्कार करून पुसलें कीं आपली इछा काय आहे तो बोलला हे राजा मी देवीजवळ तप करित असतां देवीने दर्शन दिलाकीं तूं तप पुरें कर तुझ्या तपाने मी प्रसन्न झाल्यें तर तुं विक्रमाजवळ जाऊन संसार सुखाचा अनुभव माग असा दृष्टांत झाला तो तुला सांगीतला- संसार सुख भोगाया विषयीं देवीची आज्ञा आणि माझीही इछा आहे- असें त्या तपस्याचें भाषण ऐकून विक्रम आपल्या मनांत ह्मणाला याला देवी दर्शन देऊ अथवा न देऊ परंतु यास माझी क्रीडा पाहुन येथें आपण क्रीडा करावी अशी इछा झाली आहे ती आपण पुरवावी- मग विक्रमानें तेथें मोटें नगर वसऊन त्या नगराचा राज्याभिषेक त्या तपस्यास केला आणि त्याचे उपजीविके करितां दुसरेहि बारा गांव त्यास दिल्हे तेणेंकरून तो तपस्वी संसार सुखातें अनुभविता झाला- ही कथा श्रवण करून भोजराजा अंतःपुरांत गेला पुनः प्रातःकाळीं सिंहासनाजवळ येऊन उभा राहिला तों जयसेना आठवी पुतळी बोलली हे भोजराजा विक्रमासारिखें त्याचें साहासकर्म असेल त्याणेंच ह्या सिंहासनावर बसावें तेव्हां भोजराजानें विचारिलें

त्याचें

त्याचें कर्म कसें होतें तें सांग. जयसेना सांगत्ये.

कथा-८

अवंतीनगरांत विक्रमराजा राज्यकरीत असतां धनकोटनामा एक सावकार अनेक व्यापार करून बहुत द्रव्यमिळविता झाला- कोणे एके दिवसी धनकोटाच्या शरीरीं समाधान नाहिसें झालें तेसमयीं त्याणें विचार केला कीं ह्या मृत्युलोकिंची वस्ती फार अशाश्वत आहे हें समजोन ब्राह्मणानें परलोकाचें साधन करावें तें सोडून मूर्खजन पापकर्में करितात आणि कोट्यावधि रुपये असले तरी आणिखी इछीतात त्यांस चांगलें इहलोक सुखही प्राप्त होत नाहीं आणि पारलौकिक सुखाचाही लाभ नाहीं तर आतां सर्वव्यवहार टाकून आपण दानधर्मादि पुण्य कर्म करावें- हेंचबरें असा निश्चय करून तो सावकार कर्मविपाकादिक शास्त्रा प्रमाणें सकळ दानें करून तीर्थयात्रेस गेला तेथें बहुत धर्म करून माघारी येत असतां त्याणें समुद्राचे कांठीं एक देवालय पाहिलें त्यांत जाऊन देवीचें दर्शन घेतलें तों तिचे डावेबाजूस स्त्रीपुरुषांची धडें व मस्तकें निराळीं होऊन पडली होतीं आणि उजवे बाजूस एकाचिऱ्यावर लिहिलेलें होतें कीं जो पुरुष अचाट करणीचा असेल त्याणें आपल्या हातानें आपलें शिर देवीचे पुढें तोडावें म्हणजे हीं स्त्रीपुरुषें जिवंत होतील- तें पाहून सावकार विस्मित होऊन अवंतीनगरास आला आणि देवीचा प्रसाद व काहीं जवाहीर घेऊन विक्रमाच्या भेटीस

स गेला ह्मटलें आहे

रिक्तपाणिर्नपश्येतु राजानंदेवतांगुरुं दैवज्ञंभिषजं
मित्रं फलेनफलमादिशेत्

अर्थ- कांहीभेट नेल्यावांचून रिकाम्याहातीं राजा-देव-गुरु-ज्योतिषी-वैद्य-मित्र यांचें दर्शन घेऊं नये- आपल्या शक्तीप्रमाणे फलादिक जें अनकुल असेल तें पुढें देऊन कार्यबोलणें तें बोलावें त्या सावकाराने भेट पुढें ठेविली तेसमयीं विक्रमानें त्यास विचारिलें कीं कोठें कांहीं विशेष चमत्कार पाहिला असल्यास तर सांग- तें ऐकून धनशेटानें देवीजवळ पाहिलेला चमत्कार सांगीतला तेव्हां राजास फार आश्चर्य वाटलें आणि त्या सावकारास बरोबर घेऊन त्याठिकाणीं गेला तों तेथें धनशेटानें सांगीतल्या प्रमाणेंच आहे तें पाहून विक्रमानें हृदय त्या स्त्रीपुरुषां विषयीं बहुत कळवळलें- आणि परोपकाराकरितां तो आपलें शिर तोडूं लागला तेव्हां देवी प्रत्यक्ष त्याचा हात धरून बोलली हे विक्रमा तुं दुसऱ्यासाठीं आपले प्राण कां देतोस- राजानें उत्तर केलें हे जगदंबे सर्वांचें कल्याण असावें सर्वांनी सुखी व्हावें असें माझ्या मनांत आहे परंतु तें माझ्या स्वाधीन नाहीं ह्मणून मी आपले प्राण अर्पण करितों की जेणेंकरून हीं स्त्रीपुरुषें उठोन सुख पावतील तें ऐकून देवीनें तीं स्त्रीपुरुषें जिवंत केलीं मग विक्रम तेथील राज्य त्यास देऊन आपण अवंतीस येता झाला

वी

ही कथा ऐकून भोजराजा खिन्न होऊन माघारां गेला- पुनः प्रातः का ळीं सिंहासनाची पायरी चढूं लागला तों मदनसेना नवबीपुतळी बो लली हे भोजराजा विक्रमासारिखें तुझे धैर्य असेल तर या सिंहास नावर तुं बैस तें ऐकून त्याणें विचारिलें विक्रमाचें धैर्य कसें होतें तें सांग मग मदनसेना सांगते

कथा-९

विक्रमराजा राज्यकरीत असतां त्याचे जासूद कोठें काय आ हे हें पाहावयाकरितां सर्वदेशांत फिरत असत हें राजास योग्य च होय म्हटलें आहे

गावः पश्यंतिगंधेन वेदैः पश्यंति वाडवाः चारैःप
श्यंति राजान श्चक्षुर्भ्यामितरेजनाः

अर्थ- वासानें पशु जाणतात- वेदानें ब्राह्मण पाहातात-दूत द्वारा राजे जाणतात- आणि इतर लोक प्रत्यक्ष नेत्रानेंच पाहून समजतात- असा तो राजा राज्यकरीत असतां एके दिवशीं का श्मीर देशाहून जासुद आला त्याणें वर्तमान सांगीतलें कीं काश्मीर देशांत निर्जलपुरनामें एक नगर आहे त्यांत पाण्याचा मोठा दुका ळ होता म्हणून हरिदास सावकारानें लाखों रुपये खर्चून मोठें एक तळें बांधिलें तेणेंकरून सर्वनगरास उदक पुष्कळ झालें आ

णि

णि तळ्यास पाट बांधिले त्या पाण्याने जीं शेतें पिकुं लागलीं तीं ब्राह्मणा
स दान दिल्हीं- कांहीं एकादी वर्षी असें झालें कीं त्या तळ्यांत एक देवी ये
ऊन राहिली तिणें त्यांतील सर्व उदक शोषून तळें कोरडें पाडिलें आ
णि सावकारास दृष्टांत दिला कीं मी येथें येऊन राहिलें असतां म
ला तुं बळी दिला नाहींस ह्मणोन मीं हें कृत्य केलें आतां जर तूं मला
बत्तीस लक्षणी पुरुषाचा बळी देशील तर मी संतुष्ट होऊन तळ्यांत
सर्वदा अपार पाणी करीन असें स्वप्न पाहून सावकाराने एक लक्ष
रुपयांचा सुवर्णपुतळा करून तळ्यांत ठेविला आणि त्याच्या जवळ
एक खांब पुरून त्याजवर लिहिलें आहे कीं जो बत्तीस लक्षणी पुरुष
असेल त्याणें आपलें रक्त या तळ्यांतील देवीस देऊन तळ्यास पाणी
लावावें आणि हा सुवर्णाचा पुतळा घ्यावा- जासूद ह्मणतो हें महा
राज असें वर्तमान मी आपल्या दृष्टीनें पाहून आलों- तें ऐकून विक्र
म जासुदास घेऊन त्या तळ्याजवळ गेला तेथें त्याणें सांगितल्याप्रमा
णें पाहून त्या नगरांत एका ब्राह्मणाच्या घरीं उतरला नंतर त्या ब्राह्म
णास ह्मणाला तुं हरिदासाकडे जाऊन त्यास विचार कीं ह्या तळ्या
स पाणी लाविलें तर सोन्याचा पुतळा देऊन आणिखी काय देशील
तें स्वहस्तें लिहून दे- ब्राह्मणानें सावकारास तसें पुसलें तेव्हां त्याणें
स्वसंतोषानें लिहून दिल्हें कीं दुसरे पन्नास हजार रुपये देईन- तें
पत्र घेऊन ब्राह्मण आला- रात्रौ विक्रमराजा हातांत ढाल तरवा
र घेऊन एकटाच तळ्यांत गेला आणि जलदेवतेची स्तुति करून

ह्मणाला

ह्मणाला हे देवि मी बत्तीसलक्षणी पुरुष तुला आपलें सर्वशरीर अ र्पण करितों हें घेऊन लौकर जळानें तळें पूर्ण करावें- असें बो लोन खड्गानें आपलें शिर तोडूं लागला तेव्हां देवी राजाचें धैर्य पाहून प्रसन्न झाली आणि त्याचा हात धरून बोलली हे विक्रमा कांही वर माग- तो ह्मणाला हें तळें सर्वदा उदकानें भरलेलें अ सावें येवढें मागतों तें देवीनें मान्य करितांच तळें परिपूर्ण भर लें नंतर विक्रमराजा त्या ब्राह्मणास सुवर्णाचा पुतळा आणि प न्नास सहस्र रुपये देवखून आपण अवंतीस येता झाला- ही क था सांगोन मदनसेना ह्मणाली हे भोजराजा असे विक्रमाचे प रोपकार करण्या विषयीं धैर्य ऐकोन अद्यापि त्याच्या सिंहासना वर बसावयाची इच्छा धरितोस तस्मात् तुजसारिखा अवि चारी पुरुष दुसरा कोणीच नाही असें ऐकोन भोजराजा अंतः पुरांत जाता झाला पुनः दुसरे दिवसीं सिंहासनाजवळ गेला तों मदनमंजरी हाही पुतळी बोलली हे भोजराजा विक्रमासारि खा तुझा पराक्रम असेल तर या सिंहासनावर बैस त्याणें पुसलें विक्रमाचा पराक्रम कसा होता मदनमंजरी सांगत्ये

कथा १०

विक्रमराजाचा उपाध्याय शंकरशर्मा होता त्याचा पुत्र कम लाकर नामा होता तो सोळा वर्षांचा झाला तथापि कांही वि

द्याभ्यास करीना म्हणून त्याचा पिता म्हणाला अरे कमलाकरा तुं मो
टा झालास अद्यापि विद्याभ्यास करीत नाहीस हें फार वाईट करितो
स कां विद्ये वांचून पुरुषाचें जिणें व्यर्थ होय-म्हटलें आहे

विद्याविधिविहीनेन किंकुलीनेनदेहिना अकुलीनो
पिविद्वान्यो देवैरपिपूज्यते

अर्थ-विद्यारहित जो पुरुष तो मोठ्या कुळांतला असला त
थापि त्यास कोणी पुसत नाहीं- नीच कुळांतही झालेला असो नवि
द्वान आहे तर त्याची पूजा देवही करितात- असा पित्याचा उपदे
श ऐकून कमलाकराने विचार केला कीं पित्यानें जी गोष्ट सांगी
तली ती खरी आहे-विक्रमराजा पंडितांस बहुत धन देऊन सन्मान
करितो आणि मूर्खांशी भाषणही करीत नाहीं तस्मात् विद्येवांचून आ
पली प्रतिष्ठा होणार नाहीं तर आतां देशांतरीं जाऊन विद्याभ्यास क
रावा हें बरें-मग तो काश्मीर देशास गेला तेथें विमलभट्ट उपाध्याय
मोठा थोर विद्वान् होता त्याच्या घरीं जाऊन त्यास साष्टांग नमस्कार
करून सर्व वर्तमान सांगताझाला तेव्हां उपाध्यायानें त्यास जवळ ठे
ऊन घेतला असतां त्याणें उपाध्यायाची सेवा केली तेणेंकरून तो प्र
सन्न होऊन त्यास सर्व विद्या सांगताझाला म्हटलें आहे.

गुरुशुश्रूषया विद्या पुष्कलेन धनेन वा अथवा विद्यया
विद्या चतुर्थे नोपलभ्यते -

अर्थ गुरूच्या शेवेकरून अथवा पुष्कळ धन देऊन किंवा आ
पली विद्या सांगून दुसऱ्याची विद्या घ्यावी - या तीन उपायांवांचू
न चौथ्या प्रकारानें विद्या प्राप्त होत नाहीं - नंतर तो कमलाकर
बहुत विद्या शिकला आणि गुरूची आज्ञा घेऊन आपल्या गावां
स येत असतां वाटेंत कांती पुरीस राहिला तेथें नरमोहिनी
नामें एक कलावंतीण फार सुंदर होती तिला पाहून त्यास का
म विकार झाला तेव्हां तेंथील लोकानीं सांगीतलें की हिच्या
घरीं जो पुरुष जातो त्यास राक्षस मारितो तें ऐकून तो खि
न्न होऊन अवंतीस आला आणि राजाचें दर्शन घेतलें राजा
नें विचारिलें की देशांतरिं कांहीं नवल पाहिलें असेल तर सां
गावें तेव्हां कमलाकरानें नरमोहिनीचें वर्तमान सांगीतलें -
विक्रमानें मनांत विचार केला कीं या ब्राह्मणाचें मन तीजक
डे लागलें आहे ह्मटलें आहे

वेधा द्वेधा भ्रमं चक्रे कांतासु कनकेषु च तासु तेषु
प्यनासक्तः साक्षाद्भर्गो नराकृतिः

अर्थ- ब्रह्मदेवानें मोहकरणारे पदार्थ दोन उत्पन्न केले-एक स्त्रिया-दुसरें धन-यांस पाहून जो मनुष्य भुलत नाहीं तो केवळ महादेव जाणावा मग विक्रमराजा त्या वेश्येचे गावां गेला आणि रात्रौ राक्षसास मारून तीस सुखी केलें-दुसरे दिवसीं तिला कमलाकरासमोर उभी केली तिचीं सर्व भूषणें काढविलीं डोईचे केश मोकळे सोडविले तेव्हा तीचें सौंदर्य फार उणें दिसों लागलें मग राजा भट्टजीस ह्मणतो ब्राह्मणा अशीला पाहून तूं कायह्मणोन भुललास अरे हे स्तन मासाचे गोळे आहेत हें हिचें तोंड थुंकी लाळ याणी भरलेलें असें आहे अशा दुर्गंध पदार्थाचा अंगीकार करणे तो संतती करितांच करावा असा राजाने विषयाचा उपहास केला तेणेंकरून भट्टजीचा मनांतील कामविकार शांत झाला नंतर राजाने एक सुंदर स्त्री मेळवून भट्टजीचें लग्न करून दिल्हें ही कथा सांगोन मदनमंजरी ह्मणते हे भोजराजा असा पराक्रम तुजमध्यें असेल तर या सिंहासनावर बैस तें ऐकोन तो माघारा गेला दुसरे दिवसीं सिंहासनाजवळ गेला तों शृंगारकलिका नामें अकरावी पुतळी बोलली भोजराजा विक्रमासारिखें त्याचें दयाळुत्व असेल त्याणेंच याजवर बसावें इतरांस अधिकार नाहीं त्याणें विचारिलें कीं विक्रमाचें तें कसें होतें सांग शृंगारकलिका सांगत्ये

कथा ११

विक्रमराजा राज्यकरीत असतां कोणी एकयोगी नर्मदेच्या कांठीं योगाभ्यास करीत असे त्यास राजानें पालखी पाठवून बोलाविलें तेव्हां त्याणें उत्तर केलें मीं विषयाची आशा सोडिली आतां राजाजवळ यावयाचें मला काय प्रयोजन आहे म्हटलें आहे

आशायायेदासास्तेदासाः सर्वलोकस्य- आशायेषां
दासीतेषांदासायतेविश्वं १

अर्थ— जे आशेचे स्वाधीन झाले ते सर्वलोकांचे दास होतात आणि आशा ज्यांचे स्वाधीन झाली त्यांचे सर्वलोक दास होताहेत- आणिखी- आशा धरिल्यानें पापेंही घडतात म्हटलें आहे

लोभमूलानिपापानि व्याधयोरसमूलकाः स्नेहमूला
निदुःखानि त्रयंत्यक्तासुखीभवेत्

अर्थ— पापानें मूळ लोभ- रोगाचें मूळ आवडेल तें खाणें दुःखाचें मूळ स्नेह होय- तस्मात् हीं तीन ज्याणें सोडिलीं तो सुखी होतो असा त्याचा निरोप ऐकोन विक्रमराजा त्याच्या दर्शनास गेला आणि त्याचि सेवा बहुत दिवस करिताझाला एके दिवसीं योग्यानें संतुष्ट होऊन योगबळानें एक फळ उत्पन्न केलें आणि हें भक्षिलें असतां मरण येईतोंपर्यंत शरिरास कांहीं रोग हो

णार

णार नाहीं असा त्याचा गुण सांगोन फळ विक्रमास दिल्हें तें घेऊन राजा अवंतीस येतअसतां वाटेंत एक रोगी रक्तपितीने हातपाय झडोन पडला होता त्यास पाहून विक्रमास कळवळा आला आणि विचार करिताझाला कीं याचें दुःखपाहून आपण सुखाची इछा करणे हें योग्य नव्हे नंतर त्याणें तें फळ रोग्यासदिल्हे आणि आपण अवंतीस येताझाला अशी कथा ऐकोन भोजराजा सिंहासना पासून परतला पुनः दुसरे दिवसीं सिंहासनाजवळ गेला तों नरमोहिनी बारावी पुतळी बोलली हे भोजराजा विक्रमासारिखे परोपकार तुझ्यानें होतील तर या सिंहासनावर बैस त्याणें विचारिलें की विक्रमानें कोणावर उपकार केले ते सांग नरमोहिनी सांगत्ये

कथा- १२

विक्रमराजाने नियम केला होता कीं साहामहिनें राज्यकारभार करून प्रजांचें संरक्षण करावें आणि साहामहिनें प्रधानास कारभार सोंपून आपण अनेक देशाटन करीत असावें तेथें जे कोणी गरीबदुबळे आटळतील त्यास दुःखापासून सोडवावे असा काळ वांटिला होता तेणेंकरून सर्वजन सुखी असत आणि राजाही निश्चित पणाचें सुख भोगीत असे म्हटलें आहे

भात्रासमंनास्तिशरीरपोषणं भार्यासमंनास्तिशरीरतोषणं

रतोषणं विद्यासमंनास्तिशरीरभूषणं चिंतासमंनास्ति शरीरशोषणं

अर्थ- आईसारिखें शरीराचें रक्षण करणार दुसरें नाहीं स्त्री सारिखें शरीरास सुखदेणार आणखी नाहीं विद्येसारिखें शरीरास अन्यभूषण नाहीं चिंतेसारिखें शरीरास क्षीणकरणारें दुसरें नाहीं

अर्थातुराणांनपितानबंधुः कामातुराणांनभयंनलज्जा क्षुधातुराणांनबलंनतेज श्चिंतातुराणांनसुखंननिद्रा

अर्थ- द्रव्याची इछा ज्यांस फार आहे ते बाप आणि भाऊबंद याची भीड राखित नाहींत जे स्त्रीच्या व्यसनी लागले त्यांस भय आणि लाज वाटत नाहीं जे भुकेनें व्याकुळ त्यांस तेज आणि बळ नसतें ज्यांस चिंता आहे त्यांस कोठेही सुख होत नाहीं आणि निद्रा येत नाहीं- एके समयीं राजा ज्योतिर्लिंगाचे दर्शनास जातअसतां वाटेंत एकारात्रीस वृक्षाखालीं वसतीस राहिला त्या वृक्षावर अनेक देशीचे पक्षी बसून नाना प्रकारच्या गोष्टी बोलत होते त्या ऐकोंलागला- राजास पक्ष्यांची बोली समजत असे- त्यांतील एकपक्षी दुसऱ्यांस सांगतो अहो बंगाल

देशांत

देशांत उमरखेट नामें नगर आहे तेथें एका राक्षसानें बहुत मनुष्यें भक्षिलीं तेव्हां सर्वांनी त्याची प्रार्थना केली कीं हे समर्था तूं अशीं माणसें मारशील तर कांहीं दिवसांनी सर्व नाहिंशी होतील मग तुझा चरितार्थ चालणार नाहीं तर आह्मी तुला नित्यानें एक एक माणूस देत जाऊं तें खाऊन तुवां स्वस्थ राहावें यांत तुझें आणि आमचें बरें आहे- राक्षसानें तें मान्य केलें नंतर त्या नगरकऱ्यांनीं दर घरास पाळी लाविली ती पाळी उद्यां एका फकीरावर आली आहे तो फकीर बहुत पक्ष्यांस पोशित असतो त्यांस राक्षसानें मारिल्यावर तेथें आह्मास दाणापाणी मिळणें कठीण आहे-असें त्याचें भाषण ऐकून सर्व पक्षी श्रमी होऊं लागले त्यांचें दुःख पाहून विक्रम राजा त्याक्षणीं दिव्यपादुका पांयीं घालून त्या नगरास गेला आणि त्या फकीरास ह्मणाला तूं बहुत जीवांचें पालन करितोस आणि माझ्यानें कांहींच होत नाहीं ह्मणोन मी आपल्या जीवास कंटाळलों आहें तर तुझ्याजागीं मी राक्षसापाशीं जातों तें ऐकून तो ह्मणाला बाबा तुझी इछा मी तुला जा ह्मणोन सांगणार नाहिं- मग विक्रम त्या राक्षसाचे जेवायाचे शिळेवर जाऊन बसला- विक्रमास पाहतांच राक्षसाची दुष्टबुद्धि गेली आणि त्यास पुसतो तूं कोण आहेस- राजानें उत्तर केलें तूं आपलें काम कर माझी चौकशी कशास करितोस राक्षस बोलला नाहीं नाहीं तुला पाहातांच माझी दुष्टबुद्धी गेली- तुझें धैर्य पाहून मी प्रसन्न झालों काय पाहिजे तें माग-विक्रम ह्मणाला तूं आजपासून मनुष्यें खाऊं नकों तें मान्य करून

तो राक्षस द्वीपांतरीं गेला आणि विक्रमराजा अवंतीस आला- अशी कथा ऐकून भोजराजा माघारां गेला पुनः दुसरेदिवसी सिंहासनाजवळ आला तों भोगनिधी तेरावी पुतळी बोलली हे राजा तुझें धैर्य विक्रमासारिखें असेल तर यावर बेस भोजराजानें विचारिलें विक्रमाचें धैर्य कसें होतें तें सांग भोगनिधी सांगत्ये

कथा- १३

विक्रमराजा राज्यकरीत असतां अवंतीचेठाई कोणी एक भद्रसेननामा सावकार मरण पावला तेव्हां त्याचा पुत्र पुरंदरनामक विचार करीता झाला कीं सर्व हें नाशवंत आहे- द्वीबापाची अवस्था झाली तशीच माझी होणार असें विचारून तो प्रपंच्यावर निस्पृह होऊन घरच्या सर्वसंपत्ती ब्राह्मण दीन अंध इत्यादिकांस देता झाला ह्मटलें आहे

> उदारस्यतृणंवित्तं शूरस्यमरणंतृणं विरक्तस्यतृ
> णंभार्या निःस्पृहस्यतृणंजगत्

अर्थ- उदार पुरुषास द्रव्य तृणवत् शूरास मरण विरक्तास स्त्री- निःस्पृहास सर्वजग तृणाचेपरी तुछ वाटतें याप्रकारें तो विरक्त होऊन तीर्थयात्रा करावयास जाताझाला कोणे एके रात्रीस भद्रेश्वरनामक देवाचेदेवळांत राहिला होता तेथें रानांत को

णी

णी मोठ्यानें रडूं लागलें तें ऐकून त्याणे तेथील राहाणारास पु शिलें कीं हें कोण रडतें - लोक ह्मणाले आह्मीही असेंच नित्य ऐ कतों परंतु आमच्यानें रात्रीचें अरण्यांत जाऊन शोधकरवत नाहीं - जो मोटा धैर्यवान असेल तोच याचा शोध करील - पु रंदर यात्राकरून अवंतीस आला तेव्हां त्याणें तीगोष्ट विक्रमास सांगीतली तीऐकून राजा त्यास बरोबर घेऊन त्या देवळांत गे ला तेथें रात्रीस रडणें ऐकून त्याच्या सुमारानें अरंण्यांत गेला तों मोटा एक राक्षस एक्या स्त्रीस मारितो आणि ती रडत्येआ हे असें पाहून राजा त्यास ह्मणतो अरे दुष्टा ही गरीब स्त्री इला तुं कां व्यर्थ मारितोस तुजमध्यें सामर्थ्य आहे तर ये मशीं ल ढ - पाहुं तुझा पराक्रम - असें ऐकतांच तो राक्षस चालोन आला तेव्हां विक्रमानें युद्ध करून त्यास मारिलें आणि त्या स्त्रीस वि चारिलें तुं कोण तुला हा कां छळित होता ती सांगत्ये मी ब्रा ह्मणी आहें आपल्या पतीस बहुत गांजीत होत्यें ह्मणून राग नें त्याणे प्राण दिला आणि राक्षस होऊन मला नित्य मारी त होता त्या दुःखापासून आज मला तुं सोडविलेंस मी तुझी फार उपकारी झाल्यें तर पतीचें द्रव्य बहुत आहे तें सर्व तुला मि देत्यें - असें बोलोन मोहोरांचे सातहांडे राक्षसानें रानांत पुरुन ठेविले होते ते दाखविले विक्रमराजा दुसरेदिवसीं तें सर्व द्रव्य गरीबगुरीबांस देऊन आपण अवंतीस येताझाला - अशी कथा ऐकून भोजराजा माघारा जाताझाला दुसरेदिव

सीं

सीं सिंहासनाजवळ आला तों रतिप्रिया चौदावी पुतळी बोलली हे भोजराजा विक्रमासारिखा दाता असेल तोच यावर बसेल इत रांस अधिकार नाहीं तें ऐकून त्याणें विचारिलें विक्रमाचें दातृ त्व कसें होतें सांग - रतिप्रिया सांगत्ये

कथा - १४

राजा विक्रम देशाटण करीत असतां कृष्णातीरीं गेला तेथें पु राण कथन चाललें होतें तें ऐकत बसला त्यासमयीं पुराणिका नें हा श्लोक वाचिला

परोपकाराय फलति वृक्षाः परोपकाराय वहंति
नद्यः परोपकाराय दुहंति गावः परोपकारार्थमि
दं शरीरं

अर्थ - परोपकारासाठीं वृक्ष फळतात - परोपकारासाठीं न द्या वाहातात - गाई परोपकारासाठीं दूध देतात हें शरीर प रोपकारासाठींच ईश्वरानें दिलें आहे इतक्यांत एक ब्राह्मण प त्नी कडुन स्त्रीस घेऊन येत होता तो कृष्णेंत बुडों लागला ते व्हां त्याणें पुराणास लोक बसले होते त्यांस बहुत हाका मारि ल्या परंतु त्यास काढायास कोणही गेला नाहीं तेव्हां विक्रमा नें नदींत उडी घातली आणि त्यास बाहेर काढिलें मग तो ब्रा

त्मण

म्हण राजास म्हणतो मी आज स्त्रीसहित प्राणांस मुकत होतों तो तुझ्या योगानें वांचलों तर मी जें बारा वर्षें तप केलें आहे त्याचें पुण्य तुला दिलें - असें म्हणून तो राजाच्या हातीं उदक घालता झाला नंतर विक्रम अवंतीस येत असतां वाटेंत विकाळ स्वरूप एक ब्रह्मराक्षस उभा राहिला आणि म्हणाला हे महापुरुषा मी या ब्रह्मराक्षस योनींत दुःख पावतों माझा उद्धार कर तें ऐकून राजानें ब्राह्मणानें दिलेलें पुण्य त्या ब्रह्मराक्षसास दिलें तेणें करून तो पापासून मुक्त होऊन स्वर्गास गेला आणि विक्रम अवंतीस येता झाला अशी कथा ऐकून भोजराजा माघारा गेला पुनः दुसरे दिवशीं सिंहासनाजवळ गेला तेव्हां सुमित्रा नामें पंधरावी पुतळी बोलली हे भोजराजा विक्रमासारिखा तुझा ईश्वरावर भरंवसा असेल तर या सिंहासनावर बैस ह्मणे विचारिलें विक्रमाचें तें कसें होतें सांग सुमित्रा सांगते

कथा १५

विक्रमराजा तीर्थयात्रा करीत असतां कोणे एके समयीं आवढ्या नागनाथास गेला तेथें देवळांत एक योगी होता त्याणें त्यास बोलाविलें आणि विचारिलें हे विक्रमा तूं राज्य टाकून असा कां फिरतोस - विक्रम बोलतो आपणासारिख्या साधूंचें दर्शन घ्यावयास योगी म्हणतो तिकडे कोणी शत्रु आल्यास तुझें राज्य कोण रक्षील - तरी प्रधानादिक असले तरी धन्यावांचून त्यांस तेज अ

सत

मन नाहीं - विक्रम ह्मणतो की तिंना मी कशास करूं - ज्याणे मला राज्य दिलें त्यास याची काळजी आहे याविषयीं मी एक कथा सांगतो ऐक.

पूर्वी जयखंड नगरींत जयशंकर नामा राजा राज्य करीत होता - एके समयीं दायादानीं त्याचें राज्य कपटानें घेऊन त्यास गांवा बाहेर लाऊन दिलें मग तो स्त्रीसहित देशोदेशीं फिरत असतां भद्रावती नगरी जवळ रात्रौ एके वडाखालीं निजला त्या वडावर पांच यक्ष राहात होते ते आपआपल्यांत बोलूं लागले ह्या नगरीचा राजा मरण पावला आहे त्यास पुत्र नाहीं आतां हें राज्य कोणास द्यावें - त्यांतील एक बोलला की स्त्रीपुरुषें फार संकटांत आहेत यांस देऊंयां - तें सर्वांनी मान्य केलें तें ऐकून राजा दुसरे दिवशीं स्त्रीला घेऊन त्या नगरांत गेला तों तेथें प्रधानादिकांनीं हत्तीण ज्याला माळ घालील तो राजा करावा असा निश्चय करून सोंडेंत माळ देऊन हत्तीण सोडिली होती तेव्हां यक्षांनी आपल्या सामर्थ्यानें हत्तीणी करवीं शंकर राजाचा गळ्यांत माळ घालविली मग प्रधानांनीं त्यास राज्याभिषेक केला असा तो राजा राज्य करीत असतां त्यावर शत्रू चढून आला तेसमयीं जयशंकर राजाची स्त्री ह्मणाली हे महाराज परचक्रानें सर्व नगरास वेढा घातला अद्यापि आपण कांहीं उद्योग करीत नाहींत याचें कारण काय त्याणें उत्तर केलें ज्याणी मला राज्य दिलें तेच यास रक्षण करतील मी कशास काळजी करूं असें बोलोन जयशंकर राजा

जा राज्य बसला मग यक्ष आपल्या मनांत ह्मणतात की याणें आ
म्ह्यावर विश्वास ठेविला आहे तर आह्मास याचें राज्य रक्षण क
रणें प्राप्त आहे. नंतर यक्षानीं आकाशांतून पाषाणवृष्टी करून प
रचक्राचा पराभव केला तें कौतुक पाहून राणी बोलली हें कर्म यक्षा
वाचून दुसऱ्याचें नव्हे- बरें येवढे उपकार यक्ष आह्मांवर कां क
रितात असें बोलत असतां तेथें यक्ष येऊन ह्मणाले आह्मी पूर्व
जन्मी कांहीं एक दोघास्तव मत्स्य होऊन लाहानशा तळ्यांत पाण्या
वांचून घाबरे होऊं लागलों तेव्हां हा तुझा पती कुंभार होता याणें
आह्मास मोठ्या सरोवरांत नेऊन सोडिलें तो उपकार स्मरून आ
ह्मीं यास राज्य दिलें आणि संरक्षणही केलें असें त्यांचें भाषण
ऐकून राजानें त्यांस नमस्कार केला नंतर ते आपल्या स्थानास
गेले ही कथा ऐकून योग्यानें प्रसन्न होऊन विक्रमास चिंताम
णी रत्न दिलें- तें घेऊन तो उज्जनीस येत असतां वाटेंत ए
क ब्राह्मण येऊन ह्मणाला मी दरिद्रानें बहुत त्रासलों माझें दरि
द्र दूर करावयास तूं समर्थ आहेस तें ऐकून विक्रम त्यास चिं
तामणी देऊन आपल्या नगरास गेला ही कथा श्रवण करून भो
ज राजा माघारां गेला पुनः दुसरे दिवसीं सिंहासनाजवळ आ
ला तों प्रेमावती सोळावी पुतळी बोलिली हे भोज राजा विक्रमा
सारिखें ज्याचें सामर्थ्य असेल तोच याजवर बसेल- भोज राजा पु
सूं लागला विक्रमाचें सामर्थ्य कसें होतें सांग प्रेमावती सां
गत्ये

कथा १६

विक्रमाचा एक मित्र सुमति नामा होता तो काशीयात्रा करून अवंतीस येत असतां वाटेंत एका देवालयांत उतरला तेथें येक कढई तेलानें भरून तीच्याखालीं जाळ लाविला होता आणि उस्मानें सर्व साहित्य करून ठेविलें होतें तें पाहून सुमतीनें लोकांस विचारिलें कीं येथें काय आहे त्यांणीं सांगीतलें या गांवांत मदनमंजरी राजकन्या बहुत सुंदर आहे तिनें नियम केला आहे कीं जो या कढईंत उडी टाकून जीवंत निघेल त्याची मी स्त्री होईन आणि सर्व राज्य त्यास देईन यासाठीं बहुत राजपुत्र आले आहेत कितीएक या कढईंत उडी टाकून मेले- असें लोक सांगताहेत. तों मदनमंजुरी देवीच्या दर्शनास आली तिला पाहातांच सुमति बहुत मोहित होऊन मनांत ह्मणतो आहे- काय हें सौंदर्य अशी सुंदर स्त्री ज्यास मिळेल तो धन्य तोच पुण्यवान- व्यर्थ माझा जन्म असा तो तीच्या चिंतेनें फार दुःखी होऊन अवंतीस आला विक्रमाची भेट झाली तेव्हां त्याणें विचारिलें सख्या तूं शुष्क कां झालास त्याणें मदनमंजरीचें वर्तमान सांगीतलें तें ऐकून विक्रम मनांत ह्मणतो हा माझा मित्र याचें दुःख दूर करावें हें मला योग्य होय संकटकाळीं जो कामास न पडे तो मित्र कशाचा- नंतर तो सुमतीस ह्मणतो सख्या मदनमंजरीच्या गांवांत आडुं चाल तें ऐकून सुमतीस बहुत आनंद झाला- मग दोघेजण योगपीठावर बसून त्या देवळांत गेले तेथें सु

मतीनें

मतीने सांगीतल्याप्रमाणें पाहून राजा त्या कढईजवळ गेला इतक्यां त मदनमंजरी तेथें आली आणि विक्रमास पाहून आपल्यामनांत खिन्नहोऊन ह्मणाल्ये हायहाय असा दिव्यपुरुष मजकरिता आला आणि आतां माझी दुष्टप्रतिज्ञा पाहून माघारा जाईलकीं - मग ती राजास ह्मणाली हे महापुरुषा मी मनासारिखा पती मिळा वा ह्मणोनच अशीप्रतिज्ञा केलीहोती ती आतांराहो - मीतुलावर त्यें विक्रम बोलला हेंठीकनव्हे जरकां मी कढईत उडीन घालितां तुझा पती झालों तर यांत दोघांचीही अपकीर्ति होईल आणि सर्व लोकहां सुं लागतील ह्मणोन तुझीप्रतिज्ञा मी शेवटास नेतों नंतर तुंमीसां गेन तसेंकर - असें तिशीं बोलोन विक्रमानें वेताळाचें स्मरण करून त्या कढईत उडी टाकिली तेसमयीं वेताळानें अमृत शिंपूनरा जास बाहेर काढिला - तो बाहेर येतांच पहिल्यापेक्षां अधिक सुंदर दिसों लागला तेव्हां मदनमंजरी त्यास नमस्कार करून बोलली रा जा तुझा जयजयकार असो तुझ्या सारिखे अवतारी पुरुषांचे आधा रानेंच ही पृथ्वी राहिली आहे - ह्मटलें आहे

येदीनेषु दयालवः स्पृशति यानल्पोपि न श्रीमदो व्यग्रा येच
परोपकारकरणे हृष्यंति येयाचिताः स्वस्थाः संतिच यौव
नोन्मदमहाव्याधिप्रकोपेपि ये नेः स्त्रभैरिव सुस्थिरैः कि
ल भरक्रांता धरा धार्यते

अर्थ-जे पुरुष दीनांचेठाईं दयाळु--ज्यांस संपत्तीनें गर्व होत नाहीं जे परोपकार करण्यांविषयीं सर्वांचे पुढें-कोणी कांहीं मागीतलें असतां ज्यांस हर्ष होतो-तारुण्याचे भरामध्यें असतां उन्मत्त होऊन ज्यांचें चित्त चंचळ होत नाहीं-ते पुरुष मला वाटतें कीं या पृथ्वीचे टेंके होत-असी मदनमंजरीने विक्रमाची स्तुती केल्यानंतर विक्रम तीस ह्मणाला तूं माझ्या मित्राची स्त्री हो-ती बोलली मी तुझीच स्त्री होईन दुसऱ्यास पती करणार नाहीं-विक्रम ह्मणाला तू सांगशील तें मी ऐकेन असें तूं आगोदर मान्य केलेंस ह्मणोन मी येवढें हें साहस कर्म केलें तर आतां तुला माझें ह्मटलेलें करणें प्राप्त आहे तें ऐकून मदनमंजरी निरुपाय झाली आणि तीणे सुमीत्रास वरिलें-मग विक्रमराजा सुमीत्रास तें राज्य देऊन आपण अवंतीस आला-ही कथा ऐकून भोजराजा माघारीं गेला पुनः दुसरे दिवसी आला असतां सुप्रभा नांवाची सत्यावी पुतळी ह्मणाली राजा विक्रमासारिखें दान तुझ्यानें होईल तरच यासिंहासनावर बैस-त्याणें विचारिलें विक्रमानें दान कोणास केलें सुप्रभा सांगते-

कथा-१७

राजा विक्रम कोणिएके दिवसीं शिकारीस गेला होता तो मोटा एक डुकर पाहून त्याच्या पाठीस लागला असतां डुकर पर्वताचे गुहेंत शिरला ह्मणोन त्याने पाठीमागें राजाही गुहेंत गेला-तो तेथें पाताळांत जाण्याचा मार्ग होता तो पाहून त्याणें विचार केला कीं या विवरांत उतरलें असतां कोठें जातो तें पाहुंया-मग तो घोड्याच्या खांद्यावर बसून

न त्या मार्गानें गेला तो पाताळांत पावला - तेथें बळीचे द्वाराजवळ शं
ख चक्र गदा पद्म असीं चार आयुधें हातांत घेऊन विष्णु उभा होता
त्यास पाहिलें आणि साष्टांग नमस्कार घातला तेव्हां विष्णुनें वि
क्रमास आलिंगन देऊन बळीचे घरांत नेला - बळीनें त्यास आप
ल्याजवळ बसऊन विचारिलें तूं येथें कोणीकडे आला आहेस - विक्र
म ह्मणाला आपलें आणि श्रीविष्णुचें दर्शन घ्यावें ह्मणोन आलों - ती
इछा माझी परिपूर्ण झाली - मग उभयतांनीं नाना प्रकारच्या गोष्टी के
ल्या - नंतर बळीनें विक्रमास सांगीतलें - माझे राज्यांतील तुला जी
वस्तू पाहिजे ती माग - मी देईन - तें ऐकून विक्रम ह्मणाला माहा रा
जा तुमचें दर्शन झालें यांत माझे सर्व मनोरथ पूर्ण झाले - दुसरें मला
कांहीं नको - बळी ह्मणतो विक्रमा तूं संकोच धरितोस - तुला माझे मै
त्रीची आठवण राहावी असें माझ्या मनापासून आहे यासाठीं तुला
आवडेल तें मी द्यावयास सिद्ध आहें - ह्मटलें आहे.

ददातिप्रतिगृण्हाति गुह्यमाख्यातिपृछति भुंक्तेभोजयते
चैव षड्विधंप्रीतीलक्षणं

अर्थ - आपली वस्तू मित्रास देतो - मित्रानें दिली ती घेतो - आपली
गुह्यगोष्ट मित्रास सांगतो - मित्राची पुसतो - मित्राचे घरी जेवावयास जा
तो - आणि त्यास आपल्या घरीं जेवावयास बोलाविते - ऐसा सा प्रकारची
प्रीतीच आहेत - याप्रमाणें बळी बोलला असतां विक्रम उगाच राहिला नं

तर

नर बळीनें सर्पाच्या मस्तकावरचा एक अमोलीक मणी विक्रमास दिला
तो घेऊन विक्रम गेलेल्या मार्गानें माघारा भूतळावर आला - आणि अ
वंतीस येत असतां वाटेंत एक्या ब्राह्मणानें त्याची प्रार्थना केली - राजा मी
फार दरिद्री आहे माझें दरिद्र दूर कर - हें ऐकून राजास दया आली
आणि तो दिव्यमणी जवळ होता तो देऊन त्या ब्राह्मणास संतुष्ट केलें अ
शी कथा ऐकून भोजराजा माघारा गेला पुनः दुसरे दिवसीं आणखी वि
क्रमाची कीर्ती श्रवण करावयाकरितां सिंहासनाजवळ आला तो कुरंगन
यना अदराची पुतळी बोलली राजा विक्रमासारिखा परोपकार तुझ्यानें हो
ईल तर या सिंहासनावर बैस - त्याचा परोपकार कसा होता तो मी सांगत्ये
ऐक

कथा-१८

कोणी एका ब्राह्मणानें चंद्रसेनराजाजवळ विक्रमाची बहुत स्तुति के
ली ती ऐकून त्याणें मनांत आणिलें कीं विक्रम आपला शत्रू होय - तर
त्यापेक्षां आपली कीर्ति अधीक होईल तें करावें असा निश्चय करून चंद्र
सेनानें देवीजवळ तपश्चर्या केली तेव्हां देवीनें प्रसन्न होऊन त्यास वर दि
ला कीं तूं आपल्या शरीराची आहुती दे म्हणजे मी तुझ्या भारभार सोनें दे
त जाईन - त्यावरून तो राजा नित्यानें बहुत वेळ अग्नींत उडी टाकीत होता
आणि वरा प्रमाणें देवी त्यास जीवंत करून त्यास भारभार सुवर्ण देत
ती - तितकेंही सोनें तो विक्रमाच्या ईर्षेस्तव ब्राह्मणास देत असे - हें वर्त
मान विक्रमास कळलें तेव्हां त्याणें विचार केला कीं चंद्रसेन राजा माझे ईर्षे

करितां

करितां एवढें दुःख भोगितो तर आपण त्याचें दुःख दूर करावें असा निश्च य करून तो देवीजवळ गेला. आणि तिची प्रार्थना करून ह्मणतो- हे जगदंबे तूं सर्वांचें दुःख दूर करितेस असी तुझी कीर्ती लोकामध्यें गा जत आहे- तर आतां माझ्या देहाची एकदांच आहुती घेऊन चंद्रसे नास अक्षय लक्ष्मी यावी त्यास वारंवार अग्नीत पडायाचा श्रम देऊं न ये- अशी प्रार्थना करून विक्रमानें कुंडांत उडी टाकिली- तेव्हां देवी प्र सन्न झाली आणि त्यास जीवंत करून ह्मणाली- हे राजा तुजसारिखा परो पकार करी दुसरा होणार नाहीं दुसऱ्याचें दुःख दूर करायासाठीं आपल्या प्राणावर उदार होणें हें फार कठिण आहे त्यांतही चंद्रसेन तुझा द्वेष क रीत असतां तूं त्यास दुःख न व्हावें ह्मणोन आपला प्राण दिल्हास तस्मा त् तुझी बरोबरी करणारा कोण आहे राजा- तर आतां तुझी प्रार्थनामी मान्य केली असें बोलोन देवी गुप्त झाली- विक्रमराजाही अवंतीस गे ला अशी कथा ऐकोन भोजराजा माघारा गेला- पुनः दुसरे दिवसी सिं हासनाजवळ आला तेव्हां एकुणीसावी पुतळी चंद्रज्योती बोलली हे भो जराजा विक्रमासारिखें दुर्घट कर्म तुझ्यानें होईल तर या सिंहासनावर बैस तें ऐकोन भोजराजा विचारितो आणि कोणतें दुर्घट कर्म केलें तें- सांग- चंद्रज्योती सांगते

कथा- १९

राजा विक्रम राज्य करित असतां कोणी एक ब्राह्मण विंध्यपर्वता वरून येऊन राजास भेटला- राजानें त्यास विचारिलें- आपण कोठीं

नमस्कार

चमत्कार पाहिला असेल तो सांगावा- ब्राह्मण बोलला राजा मी जो चमत्कार पाहिला आहे तो सांगितला असतां तुला खोटें वाटेल- म्हणोन मी सांगावयास अशंकतो- असें ऐकोन राज्याने बहुतच आग्रह केला तेव्हां तो ब्राह्मण सांगूं लागला राजा एक मी पृथ्वी प्रदक्षणा करावयास निघालों तो विंध्याचळावर पावलों तेथें एक तळें पाहिलें त्या तळ्यांत एक खांब आहे त्यावर रत्नजडित सिंहासन आहे तो खांब सूर्य उगवला म्हणजे दिसों लागतो मग जसा जसा सूर्य चढतो तसा तसा तो खांब उंच वाढत जातो- तेथील लोक असें सांगतात कीं मध्यान्हीं सूर्य त्या खांबावरल्या सिंहासनावर बसोन अमृत प्राशन करीत असतो- नंतर जसा जसा सूर्य उतरतो तसा तसा तो खांब पाण्यांत बुडतो सूर्य मावळतांच खांब दिसनासा होतो- त्या तळ्यांत जो स्नान करितो त्याची सर्व पापें जातात तें ब्राह्मणाचें भाषण ऐकोन विक्रमास बहुत आश्चर्य वाटलें- मग आपण दोग पादुका पायांत घालून त्या तळ्या जवळ गेला- [illegible] दिवस उगवतां ब्राह्मणानें सांगीतल्याप्रमाणें खांब दिसों लागला त्यास नमस्कार करून विक्रम त्याजवर जाऊन बसला तोंडानें सूर्यमंत्राचा जप करितो आहे- मग जसाजसा खांब उंच गेला तसा तसा विक्रमास अधिक दाह होऊं लागला तो दुपार दिवस येतां येतां प्राण कासावीस होऊन मरण पावला- नंतर तेथें पहरी सूर्य त्या सिंहासनावर बसोन अमृतप्राशन करीत असतां त्याणें अमृत शिंपून विक्रमास जीवंत केलें- तेसमयीं विक्रमानें स्तुती करून सूर्यास प्रसन्न केला- तो वर माग म्हणाला तेव्हां विक्रमानें प्रार्थना केली हे

देवा

देवा तुझें दर्शनच होणें दुर्घट - तें होऊन तुजशीं भाषण झालें आतां आणखी काय मागुं - तें ऐकोन सूर्यानें आपले कानांतील कुंडलें काढून विक्रमास दिलीं आणि सांगीतलें या कुंडलांपासून नित्य एक भार सोनें उत्पन्न होईल - असें बोलून सूर्य आकाशीं गेला - सायंकाळीं विक्रम पृथ्वीतळीं येऊन अवंतीस जात असतां वाटेंत त्याणें एक ब्राह्मण कुटुंबवत्सळ अत्यंत दरिद्री पाहिला तेव्हां त्यास तीं सूर्यानें दिलेलीं कुंडलें अर्पण केलीं आणि आपण अवंतीस आला - ही कथा ऐकोन भोजराजा माघारा गेला पुनः दुसरे दिवशीं सिंहासनाजवळ आला तों चंद्रकांती नावाची पुतळी बोलली विक्रमासारिखें साहासकर्म तुझ्यानें होईल तर या सिंहासनावर बैस - तें ऐकोन त्याणें विचारिलें कीं विक्रमानें कोणतें साहस कर्म केलें - चंद्रकांती सांगते

कथा - २१

कोणीएक माधवनामा ब्राह्मण बहुत चतुर गाणारा स्वरूपवान असा होता - त्याणें ज्या राजाजवळ जावें त्या राजाचे मनांत यावें कीं हा मदनासारिखा सुंदर आणि गुणवंत आहे यास पाहून आपल्या स्त्रिया मोहित होतील - याजकरितां याला आपले राज्याबाहेर काढून द्यावा - असें बहुत ठिकाणीं झाले त्यावरोन तो माधव पश्चात्ताप पावोन तीर्थयात्रा करीत असतां फिरत फिरत देवनगरीस आला - तेथें कामसेनराजाचे घरीं कामकंदला नामें कळावंतीण नृत्य करीत गान होती तेथें दरवाजांत उभा राहिला आणि तें गायन ऐकून बोलला कीं गायन करणारी तर बहुत चतुर आहे परंतु एक

पारे

पारे सर्व मूर्ख आहेत - असें दोनतीनवेळ बोलला तें सेवकानें राजास सां
गीतलें - राजा सेवकास म्हणाला कीं त्यास विचार कीं तूं सर्वांस मूर्ख म्ह
णतोस तें कसें तें सांग - सेवकानें तसें विचारिलें तेव्हां माधव म्हणाला ये
थें जो मृदंग वाजवितो आहे त्यास आंगठा नाहीं म्हणोन त्याची थाप चांगली
उठत नाहीं इतकें या गाण्यांत उणें आहे तें कोणाचे लक्षांत येत नाहीं असें
सेवकानें तें राजास सांगीतलें असतां राजानें चौकशी केली तेव्हां असमज
लें कीं मृदंगी याचे एकाचा आंगठा कापिला आहे मग कामसेन राजानें
दुसरा मृदंगी आणवून माधवास वस्त्रें भूषणें दिली आणि त्यास आणू
न बसविलें आणि कामकंदलेस सांगीतलें हा ब्राह्मण फार चतुर आहे त
र जितका तुझ्यांत गुण असेल तितका आज यास दाखीव - तें ऐकोन ति
नें उत्कृष्ट नाच व गायन केलें - तो तिचा गुण पाहून माधव फार प्रसन्न
झाला आणि बाहवा म्हणोन त्याणें राजानें दिलेलें सर्व तिला दिलें तें रा
जास न सोसवून त्याणें सेवकास आज्ञा केली कीं या ब्राह्मणी यास गांवाबा
हेर लाऊन द्या - आज्ञा होतांच तितकेरात्रीं सेवकांनीं त्यास गांवा बाहे
र नेऊन सोडिला तेव्हां समयीं माधव एक श्लोक म्हणून विचार करितो

माता यदि विषं दद्यात् विक्रीणाति पिता सुतं राजा हरति सर्व
स्वं तत्र का परिदेवना

अर्थ - जर कां आई विष देईल - अथवा बाप पुत्रास विकील -
किंवा राजाच सर्वस्व हरील - तर तेथें कोणाचा उपाय चालणार आहे -
असा

असा तो चिंता करीत बसला आहे तंव इकडे कामकंदला नाच करून
घरास आली आणि आपल्या चाकरांस म्हणाली त्या ब्राह्मणास शोधक
रून याजपाशी घेऊन या- हें ऐकोन तिचे शहरीस सेवकानीं शोधकरू
न माधवास तीचे घरीं नेला- नंतर ती फार श्रमी होऊन बोलली -
माधवा मजकरितां तुझा अपमान झाला तर आतां जितका मला आ
नंदात आईल तितका घाल तूं था - प्रातःकाळीं तुजकरितां राजानें मा
झा प्राण घेतला तथापि मला मान्य आहे असें म्हणून तीणें गायना
स आरंभ केला तें सुस्वर गायन ऐकोन माधवास वाटलें कीं ही कोणी
स्वर्गाची अप्सरा तर आली आहे काय- मग तीचें गाणें संपल्यावर माध
वानें गाईलें तें ऐकोन कामकंदलेचा गर्व जाऊन तीनें आंगावर रोमां
च उभे राहिले आणि डोळ्यांवाटें आनंदाश्रूंच्या धारा चालूं लागल्या- ते
व्हां तीस वाटलें कीं हा कोणी साक्षात् गंधर्वच आहे काय- याप्रमा
णें तीं उभयतां गायनाचे रंगांत कांहीं वेळ दंतकथांत पाहाट झाली ते
व्हां माधवास राजाचें स्मरण होऊन तो कामकंदलेस बोलला आतां
मी जातों नाहींतर मजकरितां राजा तुला यातना करील कामकंदला
बोलली माधवा तुझे सारिखा गायनाचा भोगी सोडून मी या मूर्खाज
वळ पाऊलभर राहाणार नाहीं मी तुझे बरोबर येते माधव म्हणाला ही
गोष्ट मध्यां अनवधक आहे ईश्वराचे ठायीं जें असेल तें घडो
परंतु आतां तर मी निघोन जातों मागाहून तुला नेण्याचा य
त्न करीन — हें ऐकोन तिस बहुत दुःख झालें माधवास ही ग
हिंवर आला मग तो तसाच उठोन रडतरडत गांवाबाहेर गेला त

तर

र तीच्या वियोगानें अत्यंत दुःखित असा देशोदेशीं फिरत असतां विक्रमा
ची कीर्ति ऐकोन अवंतीस आला आणि एका देवळांत राहिला तेथें रा
त्रीस कामकंदलेचा अतिशय शोक करीत बसला आहे इतक्यांत विक
माची स्वारी आली त्याणें त्यास पाहिलें आणि पुशिलें हे ब्राह्मणा तुला का
य दुःख आहे तें सांग रे मी विक्रमराजा तुझें दुःख दूर करीन तें ऐकोन मा
धवानें सर्व वर्तमान सांगीतलें तेव्हां विक्रम ह्मणाला ब्राह्मणा - आधीं वे
श्येशीं प्रीति करणें - मग तीच्या विरहयातनेंत हा मोठा वेडेपणा - रे तीध
नी करितांच पुरुषाला आपली प्रीति दाखवितात स्वतः - माधव बोलला रा
जा तूं ह्मणतोस तें खरें आहे परंतु ती तशी नव्हे - ती माझ्या गुणाची जा
णती आहे ह्मणोन आह्मी उभयतां एकत्र असल्यावांचून फार दिवस वां
चणार नाहीं - तें ऐकोन विक्रमानें त्या ब्राह्मणास आपल्या घरीं आणिलें आ
णि सुंदर वेश्या गायनकलेंत निपुण अशा त्याचे पुढें उभ्या करून त्यास
ह्मणाला या स्त्रियांतून जी तुला पाहिजे ती घे - माधव बोलला राजा
कामकंदलेसारखी कामकंदलाच तर तीचा आणि माझा योग करशी
ल करन हा देह ठेविन - तो त्याचा निश्चय पाहून दीनदयालु राजा त्या
स बरोबर घेऊन सर्वसैन्यसुद्धां देवनगरीजवळ गेला आणि कामसे
न राजास पत्र लिहिलें कीं मी विक्रमराजा कामकंदलेकरितां येथें आ
लों आहें - तिला पाठवून दे नाहींतर युद्धास सिद्ध हो - कामसेनानें उ
त्तर लिहिलें कीं मी कामकंदला देणार नाहीं युद्ध करायास सिद्ध आहें त
व्हां विक्रमानें विचार केला कीं आधीं कामकंदलेच्या प्रीतीची परीक्षा
पाहून नंतर युद्ध करूं - मग तो एकटाच तीच्या घराजवळ गेला आ

णि

णि मी वैद्य आहें असें बोलला- तें ऐकून दासींनीं त्यास माडीवर नेऊ
न कामकंदलेस दाखविलें तेव्हां राजा तीचें नाव विचारून तीची परिक्षा
करून बोलला- इला विरहाचें दुखणें आहे तें ऐकोन कामकंदलाबो
लली- तर याचा उपाय तुजपाशीं नाहीं- मग उगाच कां श्रम घेतोस
राजानें उत्तर केलें खरेंच- गोष्ट गनली- नाहींतर तुला ज्याचा विरह
आहे तो पुरुष आणून दिला असता परंतु थोडेच दिवस झाले- मा
धव तुझें नांव घेतां घेतां मरण पावला- ते शब्द कर्णीं पडताच ती
वेश्या माधवा माधवा असें ह्मणोन प्राण सोडिती झाली. ते पाहून
घरांतील सर्व मनुष्यें रडों लागलीं त्यांस विक्रम बोलला तुह्मी रडूं
नका इला मूर्छा आली आहे. औषध आणून मी आतां सावध करीन
असें सांगोन राजा माधवाजवळ आला आणि त्यास कामकंदलेचें
वर्तमान सांगीतलें ते ऐकतांच कामकंदले कामकंदले असें बोलोन
त्याणेंही प्राण सोडिला- तेव्हां विक्रम पश्चाताप पावोन ह्मणतो- हाय
हाय दोघांची हत्या मला झाली आतां हा दोष घेऊन माघारें जाण्या
पेक्षां येथेंच मरावें हें बरें- असा निश्चय करून अग्नी पेटऊन आंत
उडी टाकूं लागला तसमई वेताळ प्रगट होऊन ह्मणाला- राजा प्राण
देऊं नको मी एक वस्तु देतों ही त्यांच्या मुखांत घाल ह्मणजे ती जीवं
त होतील- असें बोलोन तो विक्रमास अमृतसंजीवनी औषधी देता
झाला- ती घेऊन विक्रमानें तसें करीतांच दोघेंही जीवंत झाली- नं
तर राजानें कामसेनास जिंकिलें आणि कामकंदला माधवाचे स्वाधी
न करून त्यास कामसेनाचे राज्यावर स्थापिला आणि आपण उज्जनी

स

स गेला ही कथा ऐकोन भोजराजा माघारी गेला दुसरे दिवशीं आला तेव्हां एकविसावी पुतळी सौभाग्यमंजरी बोलली- हे भोजराजा विक्रमासारिखे खरें खोटें पाहाणें तुझ्यानें होईल तर या सिंहासनावर बैस त्याणें पुसिलें की विक्रमानें तें कसें होतें तें सांग तेव्हां सौभाग्य मंजरी- सांगत्ये

कथा-२१

एके दिवसीं विक्रमानें प्रधानास विचारिलें कीं मनुष्यांस बुद्धि येते ती त्याच्या पूर्वकर्मानें किंवा मातापिता गुरु यांच्या शिकविण्यानें येते तें सांग- प्रधानानें उत्तर केलें- हे महाराज जर दुसऱ्याच्या शिकवण्यानें बुद्धी येती तर मूर्ख कोणीच न होते सर्व लोक पंडितच होते- कां-सर्व मनुष्यांस असें वाटतें कीं आपल्यास सर्व विद्या याव्या आणि सुख व्हावें- परंतु हें कोणाच्या स्वाधीन नाहीं म्हणोनच कित्येक शहाणे व कित्येक मूर्ख असे होताहेत- राजा बोलला हें जर खरें तर लोक मुलांस विद्या शिकवण्याविषयीं श्रम कां घेतात- प्रधान म्हणाला पूर्वकर्मानेंच नाव देत तें प्रत्यक्ष येऊन मनुष्यास शिकवित नाहीं उद्योग द्वारा शिकविलें- यासाठीं उद्योग करावा- म्हटलें आहे

> उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीर्दैवं प्रधानमिति का पुरुषा वदंति दैवं निहत्य कुरु पौरुषमात्मशक्त्या यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः

अर्थ-

अर्थ- उद्योग करणारास फळ प्राप्ती होते- दैव च मुख्य असें जे को
णी ह्मणतात ते शाहाणे नव्हत- ह्मणोन दैवावर भार न घालतां यत्न क
रावा- मग यत्न करूनही कार्य सिद्धि न झाल्यास आपणाकडे दोष नाहीं
असें दोघांचें बोलणें झाल्यानंतर मंत्री ह्मणाला कीं महाराज या गोष्टी
विषयीं आपणास संशय असेल तर अनुभव घेऊन पाहिल्यानें तर नि
संशय होईल- मग त्या कालें विक्रमानें अरण्यांत एक बंगला बांधवि
ला आंत बारा वर्षांचें साहित्य ठेवून आपला पुत्र प्रधानाचा पुत्र कोतवा
लाचा पुत्र आणि ब्राह्मणाचा पुत्र असे लाहान लाहान वयाचीं चार मु
लें त्यांत ठेविलीं- आणि त्यांच्या रक्षणाकरितां मुक्या दायका ठेविल्या आ
णि घराभोंवताले रक्षक ठेऊन त्या मुलांस मनुष्याचा शब्दही ऐकूं न
ये असें केलें त्यास दोनतीन वर्षें गेलीं तेव्हां एके दिवशीं तेथें दैवरूपी ए
क पुरुष प्रकट झाला- त्याणें सर्व रक्षकांस मोह घालून मुलांस बोल
ण्यास शिकविलें- आणि आपण अदृश्य झाला- मग बारा वर्षें झालीं ते
व्हां विक्रमानें मुलांस आणविलें- आणि प्रथम आपल्या पुत्रास विचा
रिलें कीं बा रे तूं सुखी आहेस कीं- त्याणें उत्तर केलें- तुमच्या पुण्या
नें सुखी आहें- नंतर प्रधानाच्या पुत्रास विचारिलें- तो हात जोडून ह्म
णाला आपल्या कृपेनें कुशल आहे- मग ब्राह्मणाच्या मुलास पुसिलें- तो
आशीर्वाद देऊन ह्मणाला- राजा ईश्वरावांचून कोणी सुखी नाहीं- मनु
ष्य मात्रास कोणती तरी एकादी चिंता असते- चौथे कोतवालाच्या
पुत्रास पुसिलें तो प्रमाण करून बोलला- हे महाराज लोक चोरी चाहाडी
लबाड्या करितात त्यांस शिक्षा कशी होईल या काळजीत मी आहे- अ

शी

र्हीं त्यां चौघांचीं भाषणें ऐकोन विक्रमानें पुसिलें तुह्मास बोलायास को
णी शिकविलें तें सांगा- ते बोलले- कोणीएक पुरुष आला होता त्याणें
आह्मास बोलायास शिकवुन मी देंव असें सांगून गुप्त झाला- तें श्रवण
करून विक्रम प्रधानास ह्मणाला तूं बोलत होतास तें खरें झालें- आतां
माझा निःसंशय झाला कीं देवच मुख्य कारण होय- शिकविणारादीक
सर्व ही निमित्त मात्र- ही कथा ऐकोन भोजराजा माघारा गेला पुनः दुस
रे दिवसीं आला असतां लावण्यवती चोवीसावी पुतळी बोलली- हे भोज
राजा जो विक्रमासारिखा पुण्यवान असेल त्यासच हें सिंहासन प्राप्त हो
ईल त्याणें विचारिलें विक्रम कसा पुण्यवान होता तें सांग मग लावण्य
वती सांगते

कथा-२२

विक्रमानें कोणीएक शंखचूड नामक दुष्ट राजा होता त्यास मारून
त्याचें राज्य घेतलें- तेव्हां जुने कारभारी घरीं बसवुन नवे ठेविले आणि
आपण तेथें काहीं दिवस राहिला असतां एकेदिवसीं शंखचूडाचा प्रधान न
दींत स्नान करीत होता तों वरून एक सुंदर फूल वाहात आलें- तें घे
ऊन तो घरीं आला आणि मनांत ह्मणतो हें फूल बहुत करून इंद्राचे वनां
तलें असेल याचे सुगंधास आणि चांगुलपणास या लोकीं उपमा नाहीं-त
र आजी ही अप्रतिम वस्तु विक्रमास दिली असतां तो प्रसन्न होऊन आ
पणास काहीं कामकाज सांगेल असें मनांत आणून तें फूल त्याणें राजास
नेऊन दिलें- तें पाहातांच विक्रमास पूर्व जन्माची आठवण झाली- तेव्हां
त्या

त्या प्रधानास बोलतो- ह्या फुलाचा वृक्ष आणून देशील तर मी तुला जे पाहिजे तें देईन आणि न आणिलास तर तुझें सर्वस्व घेऊन तुला गांवा बाहेर घालवून देईन-- तें ऐकोन तो प्रधान घरीं आला आणि चिंता करितो आहे कीं ईश्वरानें मजवर मोठें संकट आणिलें- आतां वृक्ष आणायास नगेलों तर राजा सर्वस्व हरील- गेलोंतर तो सापडला तर बरें- नाहीं तर देशांतरीं राहावें लागेल- असो- परंतु नजाऊन परिणाम नाहीं- मग तो प्रधान एके नावेंत बसोन त्या नदिच्ये ओघासमोर चालला- जातां जातां बहुत दूर गेला- तों मोठें एक अरण्य लागलें त्यांतील सिंह वाघ आदिकरून पशु नदीतीरीं पाणी पीत होते- त्यास पाहून भयभीत झाला- इतक्यांत अकस्मात वरून तसलें एक फूल वाहात आलें तें पाहून थोडासा त्यास भरवंसा आला- पुढें जातो आहे तों असें दृष्टीस पडलें- कीं- त्या नदिचे तीरावरून एक मोटें झाड झुलंबलें आहे- त्याचे खांदीवर एक मासाचा पिंड आहे- त्यापासून एक एक रक्ताचा थेंब उदकांत पडतो- त्याचें फूल होऊन वाहात जातें- असें पाहून नावेंतून उतरला आणि तीरास येऊन त्याखालूं लागला तों त्या झाडाच्ये वरच्ये अंगी दुसरे तसेच पिंड दृष्टीस पडले परंतु त्या पिंडापासून रक्ताचे थेंब पडत नव्हते- याप्रमाणें पाहून तो प्रधान पुनः नावेंत बसून आपल्ये नगरास आला- आणि त्याणें तें वर्तमान विक्रमास सांगीतलें- तें ऐकोन विक्रम बोलला- ज्या पिंडापासून फुलें उत्पन्न होतात तो माझा देह आहे- आणि दुसरे पिंड पाहिलेस- ते- जे- माझे बरोबर राज्य कारभार करितात त्यांचे देह होत- पूर्वी मी असें उग्र तप केलें त्यणेंकरून मला राज्य प्राप्त झालें-

आणि

आणि माझ्या बरोबरच्यानींही नसेंच तप केलें ह्मणोन तें आज हें वैभव भो गिताहेत- जो प्राणी जसें कर्म करितो त्यासारिखें त्यास फळ प्राप्त होतें - याचा प्रत्यय दाखवायाकरितां तुला मी येथें पाठविलें- असें बोलोन वि क्रमानें त्या प्रधानास मोठें राजकाम सांगून संतुष्ट केला- अशी कथा ऐ कोन भोजराजा माघारा गेला दुसरे दिवसीं आला असतां करुणावती नांविसावी पुतळी बोलली- हे भोजराजा आतां मी एक विक्रमाची गोष्ट सांगत्यें ऐक

कथा-२३

एके दिवसीं विक्रमराजा सभेंत बसला असतां सुतारानें बहुत सुंद र एक लांकडाचा घोडा आणिला- आणि राजास ह्मणाला- हे महाराज- हा घोडा घेऊन याचें कसब पाहावें- विक्रमानें त्यास विचारिलें-कीं-यांत कोणता गुण आहे- सुतार बोलला- याजवर बसून कळ दाबिली ह्मणजे हा जिकडे पाहिजे तिकडे मनुष्यास आतित्वरेनें नेतो - हा यामध्यें गुण आहे- राजा ह्मणाला- तर यास फेरून दाखीव- तेव्हां तो सुतार वर बसो न अनेक प्रकारच्या चाली राजास दाखवून शेवटीं त्यास धांवडूं लागला- तेव्हां त्याजवर दृष्टीही ठरेनाशी झाली- असा त्याचा गुण पाहोन विक्रमा नें तो घोडा घेतला आणि सुतारास एक लाख रुपये दिले - तेव्हां तो ब हुत संतुष्ट होऊन ह्मणाला- राजा या घोड्यास फिरविल्यवेळेस टांच लावूं नये- जरकां ती लाविली तर मग हा कोणासही आटोपणार नाहीं- ह्म णोन एवढ्या गोष्टीचें मात्र पक्कें स्मरण ठेवावें- नंतर तो घोडा राजानें

आपल्या पागेंत ठेविला त्यास कांहींदिवस लोटल्यानंतर एकेदिवशीं
विक्रम अश्वशाळेंत गेला- आणि जवळ सरदार होते त्यांस म्हणतो- अ
हो- याजवर तुम्हास बसतां येईल- त्याणीं उभर केलें- यावर बसोन याला
फिरविणें हें कर्म सामान्याचें नव्हे- तेव्हां- राजा मी बसतों असें म्हणो
न त्याजवर बसला- आणि त्यास फेरूंलागला असतां विसरून त्या
स टांच मारिली- मारतांच तो उडोन आकाशमार्गानें जाऊं लागला-
तें पाहून सर्वलोक हाहाकार करूंलागले- मग तो घोडा मोठ्या ए
का अरण्यांत जाऊन एका वृक्षास अडकला तेव्हां विक्रम झा
डाखालीं उतरोन त्या अरण्यांत चहूंकडे फिरूं लागला तों एका झा
डा जवळ दोन विहिरी आणि एक बंगला आहे. असें पाहून ते
थें जवळ गेला- तों त्याबंगल्यांत पलंगादिक सर्व साहित्य ठेविलें आ
हे- आणि एक वानरी बसली आहे- असें पाहिलें- आणि चिंता
त म्हणतो- येथें कोणी लपून राहिला आहे काय- किंवा- कोणी
काहीं कारणास्तव हें साहित्य आणिलें असेल काय- मग तो त्याचा
शोध लागावा म्हणून झाडावर बसला- इतक्यांत तेथें एक ज
ती येऊन त्याणें डावे हाताच्या विहिरीतलें पाणी काढिलें आणि
त्या वानरीचे आंगावर शिंपिलें तेव्हां ती स्त्री होऊन त्याजशी बरोब
र विलास करूंलागली- नंतर त्याणें जातेसमयीं उजव्या हाताच्या
विहिरींतलें पाणी तिजवर शिंपून पुनः तीस वानरी केली- आणि
आपण निघोन गेला- तें आश्चर्य पाहून विक्रम झाडाखालीं उतरला
आणि त्याणें त्या विहिरीतलें पाणी काढून वानरीच्ये आंगावर टा

किलें

किलें - तेव्हां - ती स्त्री हंसून बोलली हे उदारा मला या दुःखापासून सोडीव - विक्रम ह्मणाला तूं येथें कशी आलीस - ती बोलली मी लाहानपणीं नकळतां आईबापाची कांहीं अमर्यादा केली - ह्मणोन त्याणीं मला या जनीच्या स्वाधीन केलें हा दुष्ट माझे फार हाल करितो - असें तिचें भाषण ऐकोन विक्रमास तिची दया आली - आणि त्याणें वीरांचें स्मरण केलें - तेव्हां तीन वीर समोर येऊन उभे राहिले - मग विक्रम एकाच्या खांद्यावर त्या स्त्रीस बसवून आपण एकावर बसला - आणि एका कडवीं तो लांकडाचा घोडा घेववून अवंतीस येता झाला - अशी कथा ऐकोन भोजराजा माघारां गेला दुसरे दिवसीं सिंहासनाजवळ गेला तों हंसगमना चोविसावी पुतळी बोलती झाली - राजा ऐक

कथा - २४

एके दिवसीं अवंतींत कोणे एका स्त्रीनें एक्या सावकाराच्या पुत्रास - आज रात्रीं माझ्या घरीं ये - ह्मणोन खूण केली - तें विक्रमानें पाहिलें आणि मनांत ह्मणतो - हरहर माझ्या राज्यांत असा अधर्म घडोनये - मी याचें निवारण करावें - ह्मटलें आहे - राज्यांत अधर्म होतां तो समजला असतां जो राजा त्याचें निवारण करीतनाहीं त्या पातकाचा करविता होतो - असें मनांत आणून रात्रीं राजा तीच्या घराजवळ गेला - आणि खिडकींतून बारीक खडे मारूं लागला - तेव्हां ती समजली - कीं आप

णें त्यास दिवसा बोलाविलें तो आपली खुण समजून आला आहे- तर अशा चतुरा बरोबर देशांतरीं जाऊन यथेष्ट सुखभो गावें- असा निश्चय करून ती रत्नभूषणाची पेटी घेऊन त्याच्या जवळ आली- आणि बोलिली सख्या चल आपण दोघें देशांतरीं जाउं आणि सुखानें राहुं राजा बरें ह्मणाला- आणि तिला घेऊन चालला तो नदीउतरोन एका रानांत गेला तेथें एके झाडाखालीं उभयतां बसली- मग राजा तीस ह्मणतो- गड्ये हें कर्म तूं वाईट केलें स या व्यभिचारकर्मांत परलोकीं तर सुखनाहींच- या लोकीं आहे ह्मणावें तर तेंही नाहीं- जो- लबाड- ठक- कृत्रिमी- घातकी- गरजू असतो- तोच पुरुष जारकर्मास धरतो- तर अशाच्या संगतींत सुख कैंचें व्यभिचारकर्मास राजाचें भय- स्वजनाचें भय- ज्ञातीचें भय- असें हें कर्म मोठें निंद्य होय ह्मणोन यांत कांहीं सुखनाहीं-पाहा बरें- जर मी तुला येथें या तरवारीनें ठाणून हें तुझें द्रव्य घेऊन गेलों- तर तूं काय करिशील- असें राजाचें भाषण ऐकोन तिची व्यभिचारबुद्धी गेली- आणि ती राजास नमस्कार करून बोलली- तूं धन्य आहेस- मी नरकांत पडत होत्यें त्या मला तूं आज राखिलीस- तर आतां मला घरीं नेऊन घाल- अतःपर मी असें कर्म करणार नाहीं- नंतर राजानें तिला तिच्ये घरीं पोंचविली- आणि आपण घरीं येता झाला ही कथा ऐकोन भोजराजा माघारीं गेला- दुसरे दिवशीं सिंहासनाजवळ आला तेव्हां रूपकांता पंचविसावी पुतळी बोलल्ये- राजा मी एक विक्रमाची कथा सांगत्यें ऐक

कथा-

कथा-२५

एके दिवसीं विक्रमराजा आपल्या रंगमहालांत गायन ऐकत अ
सतां शिवपूजेचा वेळ टळला- तेव्हां पश्चात्ताप पावोन ह्मणतो- हरह
र मला धिक्कार असो कीं मी विलासांत पडून आज एवढे वर्षांचें व्र
त मोडिलें- मी विषयांत पडून मोठें मूर्खपण केलें- तर मी आतां त
प करून शिवाची कृपा संपादीन- असा निश्चय करून त्याणें प्रधानाचे
स्वाधीन राज्य केलें- आणि तत्क्षणीच आपण नर्मदातीरीं एका अरं
ण्यांत तप करावयास गेला- तेथें अनेक तपस्वी तप करीत होते- को
णी पंचाग्नि साधक- कोणी धूम्रपानी- कोणी ऊर्ध्वबाहु- पर्णाशनी-
वायुभक्षक- ध्यानी- पूजक- वेदांतविचारी- चांद्रायणादिक व्रत करणारे- यो
गाभ्यास करणारे- कोणी आपल्या शरीराचा होम करणारे- असे तेथें विक्र
मानें तीस वर्षे तप केलें तेव्हां महादेव प्रसन्न होऊन वर माग ह्मणाला
विक्रम साष्टांग नमस्कार करून बोलला- हे देवा- मला आपले चरणाज
वळ ठेवा- आणि जे येथें तुझ्या दर्शनाकरितां आज वहुत वर्षे तप करि
ताहेत आणि जे करतां करतां मरण पावले त्या सर्वांस कृपा करून भेट
द्यावी- एवढें मागतों- असें विक्रमाचें भाषण ऐकोन ईश्वरानें आपल्या
गणास आज्ञा केली- कीं- जे तपस्वी मरण पावले आहेत त्यांला जीवं
त करणें ऐकोन तो गण तपस्यांचा अस्थींवर अमृत शिंपिता झाला
ते समयीं एक एक तपस्वी जीवंत होऊन शिवशिव हरहर असा ज
प करीत आनंदानें नाचूं लागला- मग त्या सर्वांस महादेवानें दर्शन दि
लें

लें आणि विक्रमास एक कमळाचें फुल देऊन सांगीतलें-कीं- हें कमळ जेव्हां कोमेल तेव्हां तूं समज कीं-आतां आपलें आयुष्य सारामाझिलें राहिलें आहे मग तूं माझ्याजवळ ये-आतां तूं जाऊन आपलें राज्यकर-असें सांगोन महादेव गुप्त झाला-नंतर विक्रम ईश्वराच्या आज्ञेवरून उज्जनीस आला-आणि पुनः राज्यकरूं लागला-ही कथा सांगोन रूपकांता म्हणाली-ज्याला महादेवानें राज्य कर अशी आज्ञा केली-त्याचे आसनावर बसणारा असा समर्थ कोण आहे-हें ऐकोन भोजराजा माघारा गेला-दुसरे दिवसी आला असतां देवनंदा सत्विसावी पुतळी बोलली हे राजा तुला सत्तावीस कथा सांगीतल्या आतां सोळि सांगत्ये-एक

कथा-२८

कोणेएके दिवसीं विक्रमराजा आपल्या प्रधानांस नीतिसांगता झाला-हे प्रधानहो ऐका-नानाचांचून लटकेंच वैराग्य दाखवूंनये मित्रास दुखवूंनये-अपराधावांचून कोणावर रागें भरूंनये-कोणास वाईट बोलूंनये-दुर्जनाची संगत करूंनये-भोळ्या अन्यायाशिवाय सक्तीस टाकूंनये-स्त्रियांवर विश्वास ठेऊन त्यांस गुह्यगोष्ट सांगूनये कोणी भविष्य सांगेल त्याची काळजी वाहूंनये लक्ष्मी स्थिर राहील असा भरवंसा धरूंनये चोरास बोळखूं देऊंनये बावगें भाषण करूंनये-दानपुण्यावांचून

मना

सुनादिवस जाऊं देऊं नये-ईश्वराचें भजन निरंतर करावें-आ
ई बापाचा उपदेश ऐकावा- नीचांची संगत धरूं नये- खोटी सा
क्ष देऊं नये मोठ्याही लाभाकरितां पाप कर्म करूं नये- देश-का
ळ-वर्तमान जाणून जें करणें तें करावें कोणाचा अभास लाड
येऊं नये- थट्टा करूं नये- सर्वांशी मिळून असावें- वडिलांचे मना
स येईल तें करावें- अडल्याचें साहित्य करावें- दुसऱ्याच्या भाग्या
ची आदरवाई न करावी- यौवन-धन-आणि-आयुष्य-ही चंच
ळ जाणावीं- एकल्यानें देशांतरीं जाऊं नये- आपल्या सामर्थ्याप्रमा
णें धर्म करावा- पुत्राचे फार लाड करूं नये- त्यांचा देऊं केलेल्या
चा मत्सर धांवें- काया वाचा मनानें नित्य परोपकार करावा-
मर्म कोणाचें काढूं नये- कोणाचें गुह्य उघडें करूं नये- सत्कर्मास
द्रव्य खरचलें तें व्यर्थ गेलें असें मानूं नये- नास्तिकपणा धरूं नये-
आपल्या योग्यते प्रमाणें इच्छा करावी- असंतोष भुलूं नये- अंतःक
रण स्वच्छ ठेवावें- आपली विपत्ती निष्कारण सांगूं नये- द्यूतकर्म क
रूं नये- दुसऱ्याचें विघ्न करण करूं नये- परस्त्रीवर इच्छा करूं नये-
आमदनी पेक्षां उणा खर्च करावा रिण काढून सण करूं नये- आपल्या
पराक्रमानें पोट भरावें- विद्ये विषयीं न सकोऊं नये- आशा मारावी-
काम जिंकावा- क्रोध आवरावा- मत्सर सोडावा- मद जिंकावा- मोह
खंडावा मृत्यूची आठवण नित्य ठेवावी- मनांत ईश्वराचें भय वागवा
वें- प्राणिमात्रावर दया करावी- संपत्तीन पूर्वस्थिती विसरूं नये- वि
पत्तीनें धैर्य सोडूं नये- नेकी पदरीं घ्यावी- दुसऱ्याचा गुण घ्यावा- लोभा

च्या

च्ये कल्याणाच्ये कामांत पुढें सरावें- ज्यांत आपला नाश आहे तें कर्म इंद्रियांस आवडतें ह्मणून करूं नये- देह सोडिल्यावर मागें कीर्ती राहील असें कर्म करावें- नम्र आणि मधुर असें भाषण करावें- दुसऱ्यास बरा मार्ग दाखवावा- याप्रमाणें देवनंदने सुखांतून विक्रमाची नीती ऐकोन भोजराजा माघारीं गेला- दुसरे दिवशीं सिंहासनाजवळ आला- तेव्हां देवांगना सत्ताविसावी पुतळी कथा सांगते

कथा-२७

राजा विक्रम राज्य करीत असतां एक सिद्धांती जोशी आला- त्यानें राजास सांगीतलें- मी भूत- भविष्य- वर्तमान- ही सर्व जाणतों- त्यास राजानें पुसलें यावर्षीत प्रजेस पर्जन्य सुख कसें आहे- जोशी ह्मणाला- महाराज यंदां रवि मध्य योग आहे- याकरितां पर्जन्य पडणार नाहीं- यास वचन

बुधशुक्रौ समीपस्थौ कुर्वतः सजलां महीं तयोरन्तर्गतो
भानुः समुद्रमपिशोषयेत

अर्थ- बुध आणि शुक्र हे दोघे जवळ असले तर वृष्टी सुफळ होते- आणि त्यांच्यामध्यें सूर्य असला तर पर्जन्य पडत नाहीं- तेव्हां विक्रमानें थोरथोर ब्राह्मणास बोलावून विचारिलें- कीं- पर्जन्य पडायास काय उपाय करावा- ते ह्मणाले वाजपेय यज्ञ करावा-

याग

मग विक्रमानें यज्ञास आरंभ केला - त्या यज्ञ समारंभामध्यें जे जे याचक आले त्यांचा त्याणें यथा योग्य सत्कार केला - यज्ञ समाप्तीच्येवेळेस इंद्रादिक देव प्रत्यक्ष येऊन विक्रमास बोलले - राजा आह्मी प्रसन्न झालों - आतां वर माग - विक्रम ह्मणाला - आजपासोन कधीही माझ्या देशांत अवर्षण होऊं नये - तें मान्य करून देव आपल्या स्थानास गेले - मग विक्रमानें कोट्यावधी ब्राह्मणास व इतर याचकांस मिष्टान्न भोजन घाललें आणि दक्षणा देऊन संतुष्ट केले - त्या दिवसापासून आजपर्यंत माळव देशांत कधींही अवर्षण पडलें नाहीं - ही कथा ऐकोन भोजराजा माघारा गेला - दुसरे दिवसीं आला तेव्हां त्रिविणी अठ्ठाविसावी पुतळी बोलली - हे भोजराजा मीही - तुला एक विक्रमाची कथा सांगत्ये - ती ऐक - आणि मग या सिंहासनावर बैस

कथा - २८

एके समयीं विक्रमराजा अरण्यांत शिकारीस गेला होता - तेथें यम - आणि - वरुण - दोघे देव त्याचें सत्व पाहावयास आले - यम वाघानें रूप धरून पाठीमागें लागला आणि वरुण रोडक्या गाईचें रूप धरून भयानें घाबरा घाबरा राजाजवळ धांवत आला - आणि ह्मणाला - राजा - मी तुला शरण आल्यें - मला राख - तें ऐकोन विक्रमास दया आली आणि तरवार घेऊन त्या गाईभोंवता फिरों लागला - वाघ राहून राहून गाईवर झडपा मारितों आहे - अशा संधींत थोडा पाऊस येऊन बहुत चिखल झाला - त्यांत ती गाय फसली - तेव्हां वाघ भूमी

वर पुछ आपटून मोठा भयंकर शब्द करीत घटकेघटकेस चवताळून ति
जवर येतअसे आणि विक्रमराजा त्याचें शस्त्रानें निवारण करीत असे- या
प्रमाणें राजानें पावसांत उभाराहून सर्वरात्र काढिली- प्रातःकाळ होतांच
यम आणि वरुण दोघेही देव प्रगट होऊन बोलले- राजा आम्ही देव- तु
झें सत्व पाहावयास आलों होतों तें तुझें पाहून प्रसन्न झालों- आतां तु
झ्या इछेस येईल तो वर माग- राजा ह्मणाला तुमच्या प्रसादानें मला स
र्व आहे उणेंकाही नाही- तर हें मागतों- की- आपली कृपा असावी- तें ऐ
कोन त्यांणी स्वर्गींची कामधेनू दिली- ती घेऊन राजा उज्जनीस येतअसतां
मार्गी एका दरिद्री ब्राह्मणानें ती मागीतली- विक्रमराजा त्यास ती देता
झाला- असी कथा ऐकोन भोजराजा माघारा गेला- दुसरे दिवसी आला ते
व्हां सुलोचना एकुणतिसावी पुतळी ह्मणाली हे भोजराजा मीही एक कथा-
सांगत्यें ऐक.

कथा- २९

एके दिवसीं विक्रमराजा उज्जनींत चोरबातमीस रात्री फिरत असतां
एका दरिद्री ब्राह्मणाच्या घराजवळ पावला- तों ब्राह्मण आणि त्याची स्त्री
उभयतां कांही बोलत होती- तें ऐकावें ह्मणोन बाहेर उभाराहिला- तेस
मयीं स्त्री- पतीस ह्मणत्ये- स्वामी आपण दरिद्रामुळें फार दुःख पावतां
ते विक्रमराजाजवळ याचनेस कां जातां- ब्राह्मण सांगतो- अगे- सद्यः
आपल्यास काळ प्रतिकूळ आहे- माझी विपत्ती राजाच्यानेंही दूर हो
णार नाही- तें ऐकोन विक्रम आपल्या घरास गेला- दुसरे दिवसीं
प्रातःका

प्रातःकाळीं त्या ब्राह्मणास बोलाऊन आणिलें आणि कोहळ्यांत गुप्त रत्नें भरून तें त्यास दान दिलें- तें नसमजतां ब्राह्मणानें एका सराफास- विकलें आणि पैसे घेऊन घरास आला- पुनः त्या रात्रीस राजा ब्राह्मणाचे घराजवळ आला- आणि ऐकतो आहे- तो ब्राह्मण स्त्रीस ह्मणतो- पाहिला स नमस्कार- कीं जो राजा याचकांस लाखोरुपये देतो त्याणें मला मुजरत बोलावून एकच कोहळादिला- तो बाजारांत एका चवलास गेला- हा शब्द माझे प्रारब्धाकडे राजाकडे नाहीं- तें ऐकोन विक्रम खिन्न झाला- आणि मनांत ह्मणतो हाकाळ यास प्रतिकूळ आहे खरा- यास आणखी द्रव्य देऊन तरी कायफळ- तर आतां काय करावें- कसें केल्यानें हा सुखी होईल- असी चिंता करितो आहे- तों तेथें एक पुरुष आला आणि ब्राह्मणाचे घरांत जाऊं लागला- त्यास राजानें विचारिलें- तूं कोण आहे स- आणि येवढ्या रात्रीस या घरांत जायाचें तुझें काय काम आहे- तें सांग- त्याणें उत्तर केलें ज्यास काळ ह्मणतात तो मी- ह्या ब्राह्मणाला छळा यास जातों आहे- राजा नमस्कार करून बोलला- देवा माझी एवढीप्रार्थना ऐक- कीं- तूं याचें वाट्याचें मला छळ आणि यास सुखदे- काळबोलला- बरें तर एक वर्ष पर्यंत तुला मी पीडीन- असें बोलोन गुप्त झाला- राजा आपले घरीं येऊन निजला- ब्राह्मणासही झोंप लागली- दुसरे दिवशीं प्रातःकाळीं सराफानें कोहळे चिरले तों आंत रत्नें निघालीं- तीं पाहून सराफ समजला- आणि ह्मणतो- हें राजानें त्या ब्राह्मणास गुप्त दान दिलेलें आहे- हरहर हें ब्राह्मणाचें द्रव्य कोणी घ्यावें- ह्मटलें आहे- दुसऱ्यानें नकळोन दिलेली किंवा मार्गावर पडलेली दुसऱ्याची वस्तू घेणें-

हें

हें चौर्य कर्म होय- मग तो-तीं रत्नभरित कोहळ्याचीं दोन अर्धें घेऊन ब्राह्मणाचे घरीं आला- आणि नमस्कार करून बोलला- भट्टजी बाबा- आपल्यास राजानें गुप्त दान दिलें होतें तें हें आपलें संभाळावें- तें पाहोन ब्राह्मण बहुत हर्षला आणि स्त्रीसहित आनंदानें प्रपंच करूं लागला- इकडे त्याच रात्रीस राजाच्या भांडारशाळेंत चोरी झाली- तीची प्रातःकाळीं चौकशी करिता हेत- तों कोठी- माहाल- पागावें- राजवाडा- यांस एकदांच आगलागली आणि सर्व जळालें- तेव्हां विक्रमराजा प्रधानांस रात्रीचें सर्व वर्तमान सांगोन आपण सेतुबंधरामेश्वरास गेला- तेथें देवळांत तपकरीत होता- तों एके दिवशीं चंद्रिचंदावरचा राजा देवाच्ये यात्रेस आला- तो विक्रमाचें अत्यंत सुंदररूप पाहून परमआनंद पावला आणि बोलता हे भद्रपुरुषा तुला पाहोन मी फार समाधान पावलों- मी इछितों कीं माझाजवळ तूं सदां असावेंस- विक्रम बरें ह्मणाला- मग तो राजा विक्रमास आपल्ये पट्टणास घेऊन गेला- तेथें एके दिवसीं असें झालें-की-राजाची स्त्री विक्रमाशीं गोष्टी सांगत बसली आहे तों तीची न्हायाची वेळ झाली- तेव्हां ती गळ्यांतील नवरत्नांचा हार समोरच्या खुंटीवर ठेऊन- बोलली- हे गुरूजी मी न्हाऊन येई पर्यंत आपण हा हार पाहावा- असें बोलोन ती गेली- विक्रम हाराकडे पाहात बसला आहे- त्या वेळीं काळानें त्या खुंटींत प्रवेश करून हार गिळिला- तें पाहून- विक्रम विचार करितो- की- हें अघटित कर्म घडलें- हें जर लोकांस सांगावें तर खरें वाटणार नाहीं- परंतु आपण सांगावें- जें होणार तें होऊ असत्य भाषण सर्वथा करूं नये- असा निश्चय करून तसाच

बसला

बसला आहे- इतक्यांत राजपत्नी येऊन पुसों लागली- की येथील हा
र काय झाला- त्याणें झालेलें वर्तमान सांगीतलें ती ह्मणाली तुह्मी मा
झी मस्करी करितां- विक्रम उगाच राहिला- तीणें तें वर्तमान आप
ल्या पतीस सांगीतलें- राजा येवोन विक्रमास एकांतीं पुसों लागला-
की- हार काय झाला तें सांग- त्याणें झालेलें वर्तमान सांगीतलें तें खरें
न वाटोन राजास फार क्रोध आला आणि त्याचे हात पाय तोडविला आ
ला- बिक्रमराजा त्या दुःखानें फार व्याकुळ झाला आणि रस्त्यांत पड
ला आहे- तों- तेथें एक तेली आला- त्यास दया येऊन विक्रमास त्या
णें आपले घरीं नेलें आणि औषध लाऊन बरें केलें- मग ह्मणाला
थोंट्या- तूं माझे घाण्यावर बसून बैल हाकीत जा- तें ऐकोन विक्रम
ह्मणाला तुझ्या घरांत जितक्या तेलाच्या घागरी असतील तितक्या
मी मंत्रानें भरून ठेवितों- त्यांतून तूं कितीही तेल काढिलेस तरी
उणें होणार नाहीं मग घाण्याचें काय काम- असें बोलोन बिक्रमानें
तसें केलें तेव्हां हजारों रुपयांची विक्री नित्य होऊं लागली- नंतर
तो तेली- मोटा एक बंगला बांधून त्यांत त्या थोंट्यास ठेविता झा
ला- तेथें जवळच राजकन्येचा वाडा होता एके दिवसीं सांजवेळेस-
बिक्रमराजा गायन करीत असतां दीपराग आलापूं लागला- तेणेंकरू
न राजकन्येच्या मंदिरांतील दिवे विझाले होते ते पुनः लागले तिणें
तो शोध करून आपल्या पित्यास सांगीतलें- कीं- जो पुरुष दीपराग
ह्मणोन दीप लावील त्यास मी पती करीन असा माझा निश्चय झाला-
ह्मणोन तेल्याच्या पुत्रास मी नवरा करित्यें- तें ऐकोन मातापित
रानीं

रानीं बहुत निषेध केला तथापि तिणें तोच थोंटा पती केला- एके सम
यीं एकांतीं राजकन्येनें थोंट्यास पुशिलें- कीं- तूं कोटचा- कोण आहेस
त्याणें झालेलें सर्व सांगीतलें तें ऐकोन ती- विक्रम माझा पती अशा सं
तोषानें त्याची बहुत सेवा करूं लागली- तेथें एके दिवसीं असें झालें- कीं-
त्या चंदीचंदावरच्या राजाकडे विलायतेच्या राजानें तीन सोन्याच्या पुतळ्या
वजनांत व आकृतींत एकसारिख्या- पाठवून विचारिलें- कीं- यांत- उत्त
म मध्यम- कनिष्ट- कोणती ती सांगावी- राजानें चार चतुर लोक बोला
वून परीक्षा केली- परंतु कोणासही त्यांत उणें अधीक आढळेना- रा
जा चिंतेंत पडला आहे- इतक्यांत तेथें- लक्ष्मी- बुद्धी- सत्य- आणि काळ
हीं चौघेजणें आलीं आणि बोलली- राजा आह्मांत थोर कोण तें सांग-
राजानें विचार केला परंतु चौघेही थोरच दिसोन आलीं- लहान मोठें
कांहीं कळेना तेव्हां तो फार चिंतेंत पडला- तें वर्तमान राजकन्येनें थों
ट्यास सांगीतलें- थोंटा ह्मणाला- माझे संकटकाळाचे दिवस तीन उ
रले आहेत ते सरले ह्मणजे मी निवाडा करीन- नंतर- चौथे दिवसीं-
राजानें थोंट्यास बोलावून आणिलें- तो ह्मणाला- मागें मी जेथें बसलों
असतां खुंटीनें हार गिळिला आहे तेथें बैठक करवा- प्रधानानें तसें केलें
नंतर थोंटयानें त्या तीन पुतळ्या आणवून फारवेळ परीक्षा केली परंतु
त्यांत काहींच अधीक उणें दिसेना- तेव्हां तो चौघींच्या कानांत काडी घा
लविली- तों एकीची तोंडांतून बाहेर निघाली- दुसरीची दुसऱ्या का
नांतून निघाली- तिसरीची पोटांत गेली असें पाहून त्याणें राजास सां
गीतलें- कीं- जिच्या तोंडांतून बाहेर काडी निघाली- ती पुतळी कनि

ष्ट होय- की- तिला काही गोष्ट सांगीतली तर दुसऱ्या जवळ सांगेल- जि च्या कानांतून निघाली ती मध्यम- की- ती- एका कानानें गोष्ट ऐकोन दु सऱ्या कानानें सोडील- मनांत धरणार नाही- जीच्या पोटांत काही राहि ली ती उत्तम की- तिला कोणी काही गोष्ट सांगीतली तर ती मनांतदे वील कोणापाशी बोलणार नाही- तें विक्रमाचें चातुर्य पाहोन सर्वांस आनंदझाला नंतर लक्ष्मी पुढेंहोऊन बोलली- की- सर्वांपेक्षां मी थोरआ हें- तीस विक्रमानें विचारिलें- की- जरतूं थोर तर विक्रमास काळ प्रति कूळ झाला तेसमयीं तुझें काहींच कां चाललें नाही- ती निरुत्तर झाली मग बुद्धी ह्मणाली मी थोर- त्याणें तिलाही तसेंच विचारिलें- तें ऐको न तीही उगीच बसली- मग धर्म बोलला सर्वांपेक्षां मी मोटा- त्यासही त्या णें तसेंच पुसिलें तोही निरुत्तर झाला- मग मूर्तिमंत काळ येऊन उभा राहिला- त्यास पाहातांच थोरयानें नमस्कार केला- इतक्यांत खुदीन हार गेला होता तो बाहेर आला- तेव्हां थोरदा काळास ह्मणतो- तूं प्र तिकूळ असतां कोणाचाही उपाय चालत नाही- ह्मणोन तूंच थोर- लक्ष्मी- बुद्धी- धर्म- हीं तूं अनुकूळ आहेस तरच सुख देऊंशकता त- तत्वानून यांस सामर्थ्य नाही- असें त्याचें भाषण ऐकोन का ळ संतुष्ट झाला आणि विक्रमास हातानें कुरवाळिता झाला- तेणें करून त्यास हातपाय फुटले आणि शरीर सुंदर झालें- तें पा हून सर्वांस परमानंद झाला- आणि आपआपल्या स्थानास गे ले- मग विक्रमराजा त्या तेल्यास तिथलें अर्धराज्य देऊन स्त्री स हित आपण उज्जनीस आला- हीकथा ऐकोन- भोजराजा माघारा गेला

गेला पुनः दुसरे दिवसीं आला तेव्हां प्रेमावती तिसार्व पुतळी बोलली- राजा आतां मी एक कथा सांगत्यें ऐक

कथा-३०

विक्रमराजा राज्य करीत असतां कपिला षष्टीचें पर्व आलें तेदिवसीं राजा गंगास्नानास गेला तेथें- विद्वान तपोतिथी-असे ब्राह्मण व गरीब दुबळे ही बहुत मिळाले होते- त्यांसपाहोन राजाच्या मनांत आलें- कीं- असें पर्व पुढें येईल- मग मी धर्मकरीन असा भरंवसा धरूं नये- आयुष्यादिक सर्व चंचळ आहेत यास वचन

अस्थिरं जीवितं लोके अस्थिरे धनयौवने अस्थिराः
पुत्रदाराश्च धर्मः कीर्तिर्द्वयं स्थिरं

अर्थ- मृत्युलोकीं आयुष्य अशाश्वत आहे- तशींच धन-तारुण्य-पुत्र-स्त्रिया ही ही क्षणिक होत- धर्म आणि कीर्ति हीं दोनच शाश्वत- तर जें शाश्वत तें संपादावें- असा निश्चय करून त्याणें ब्राह्मणास अनेक प्रकारचीं दानें दिलीं- व इतर याचकांसही बहुत धन दिलें- सर्वांस अन्नदान केलें- आणि आपण भोजनकरून सभा आहे- तेथें एक गारोडी आला- तो म्हणाला- महाराज मी खेळकरितों तो अवकाशकरून पाहावा- असें बोलून तो साहित्य लागावयास लावून

घून गेला- तों एक शिपाई घोडयावर बसून स्त्रीसहित तेथें आला- आणि राजास रामराम करून उभा राहिला- त्यास प्रधानानें पुसलें- तुं कोण कोठून आलास- तो ह्मणाला मी इंद्राचा दूत- मला इंद्रानें कांहीं कारणास्तव शापिलें ह्मणोन मी मृत्युलोकीं राहात असतों- माझी कांहीं विनंती आहे ती ऐकावी- आज देवां दैत्यांशीं युद्धप्रसंग होणार- त्याकरितां मला इंद्रानें स्वर्गी बोलाविलें आहे- ही माझी स्त्री सुकुमार- व लाहान आहे- इला युद्धांत नेतां येत नाहीं- भलत्या जवळ ठेऊनही जातवत नाहीं- अशा अडचणींत मी पडलों ह्मणोन मी येथें आलों आहें- विक्रमराजास परस्त्री कन्ये सारिखी- असी तुझी कीर्त्ति ऐकोन मी असें इछितों- कीं- तुजपाशीं ही स्त्री ठेऊन स्वर्गास जावें- तेथून येईं तोंपर्यंत माझ्या स्त्रीचा सांभाळ तुवां करावा- राजा बरें ह्मणाला- नंतर तो शिपायी राजाजवळ स्त्री ठेऊन आकाशांत उडून गेला- त्यास अर्धी घटिका झाली नाहीं- तों अकस्मात् मोठा शब्द होऊन आकाशांतून एक भुज भूमीवर पडली- ती पाहून ती स्त्री राजास ह्मणाली- हे महाराज माझा पती युद्धांत पडला- ह्मणून त्याची भुज येथें आली- आतां ईच्या बरोबर मी सती जातें- राजानें सांगीतलें- कीं- तुला जें पाहिजे तें देतों- तूं सहगमन करूं नको- तीणें उत्तर [illegible]- पतीनें मला स्वर्गास न्यावयाकरितां ही भुज मूळ पाठविली- आतां मी कशी राहूं- तर आपण माझे आईबाप- माझी पाठवणी करावी- तें ऐकोन विक्रमानें तीचें साहित्य केलें मग तिणें त्या भुजेबरोबर अग्नींत प्रवेश केला- इतक्यांत तो स्वा

र आकाशांतून खालीं उतरला- आणि राजास नमस्कार करून ह्मणाला-म हाराज- माझें बळ पाहून इंद्रानें मला कुटुंबासहीत स्वर्गास बोलाविलें आहे- तर माझी स्त्री मला द्यावी- राजा बोलला- कीं- तीणें सहगमन केलें- सर्व तीही तसेंच सांगीतलें तें ऐकून तो ह्मणाला मी जीवंतअसतां तीसती को णाबरोबर गेली- व तुह्मी अशी विपरीत साक्ष कशी देतां- तें ऐकोन राजा लज्जेने खालीं पाहूं लागला- इतक्यांत तोच गारोडी होऊन राजास रामराम करून बोलला- महाराज मी हा एक चमत्कार दाखविला- आतां दुसरा पा हावा- नंतर त्याणें त्यास्त्रीस हाक मारितांच ती अग्नींतून बाहीर येऊन वि क्रमापुढें हात जोडून उभीराहिली- तें पाहून सर्व लोक आश्चर्य करूंलागले मग विक्रमानें त्या गारोड्यास लक्ष रुपये व पानगांव इनाम दिले- ही कथा ऐकोन भोजराजा माघारा गेला- पुनः दुसरे दिवसीं आला तेव्हां गुणत्रियाग कतिसाची पुतळी बोलली राजा ऐक-

कथा - ३१

महादेवाने विक्रमराजास कमळाचें फूल दिलें होतें तें सुकलें असें पाहोन विक्रमराजास कळलें कीं- आपला मृत्यु साहामहिन्यांनी होणार- तेव्हां राजा नें सर्वराज्य प्रधानाचे स्वाधीन केलें आणि आपण वाईक्षेत्रीं जाऊन राहिला आणि सर्वराज्यांत दौंडी पिटविली- कीं- ज्यास काहीं मागावयाचें असेल त्याणें वाईत येऊन मागावें- तें ऐकून नानादेशींचे याचक- भट पंडित- भिकारी- फ कीर- वाईस आले- राजा सर्वांस मागीतलें देऊन संतुष्ट करीतो आहे- हे वर्तमान कळून देवही परीक्षापाहावयाकारितां तेथें आले- आपणी वहुनकरा

पा

ण मागणी मागीतली ती विक्रमाने अनेकप्रकारचे कष्ट भोगूनही त्यांस दिली-
तेव्हां देव प्रसन्न होऊन बोलले- हे राजा- तुजसारिखा पुरुष या कलियुगांत दुस
रा होणार नाहीं- मागें सत्ययुगांत जसा सत्यवादी हरिश्चंद्र राजा झाला- त्रेतायु
गांत जसा वली महादाता झाला- द्वापारयुगांत दशरथ राजा जसा महाप्रतापी झा
ला- ते त्यांचे तीन्हीगुण तुझ्यांत आहेत- याकरितां तुं त्यांहून श्रेष्ट होस- असें
बोलोन देव गेले- एकेदिवशीं विक्रमराजा कृष्णेचे तीरी बसला होता तेथें एक
सुवर्ण कांतीचे हरण आलें आणि ते मनुष्य वाणीने राजास बोललें- राजा मी
पूर्वजन्मी ब्राह्मण होतों- एके दिवशीं भुकेने पीडित होऊन फिरत असतां मला
एक सिद्ध भेटला- त्याजवळ मी क्षुधेच्या दुःखास्तव मरण मागीतलें- तेव्हां त्या
णे मला हरण करून सांगीतलें- की- आजपासून तुला भुकेची पीडा होणार
नाहीं पुढें राजा वीर विक्रमादित्य होईल त्याजवळ तूं आपलें वर्तमान सांगी
तलेंस म्हणजे हरिणजन्मापासून सुटशील- तो तुला आपल्ये पुण्यानें स्वर्गा
स पोहोंचवील- असें बोलून हरिणाने प्राण सोडिला- नंतर विक्रमाने त्याचें
प्रेताचें दहन करून त्यास स्वर्ग प्राप्त व्हावा याकरितां यज्ञ- दानें- बहुत केलीं
तेणें करून तो दिव्य शरीरी होऊन स्वर्ग लोकास गेला- ही कथा ऐकून भोजरा
जा माघारा गेला- पुनः दुसरे दिवसी आला तेव्हां चित्रकला वत्तिसावी पुतळी
बोलली- हे भोजराजा सर्वांनीं कथा तुला सांगीतल्या आतां शेवटील कथा
मीहि सांगत्यें ती ऐक

कथा-३२

त्यावेळेस विक्रमाचा अंत समय आला तेव्हां इंद्रानें विक्रमास आणा

बया

वयाकरितां आपलें विमान पाठविलें त्यांत बसून विक्रम स्वर्गलोकास गेला- त्याकाळी अवंतीनगरींत मोठा अनर्थ झाला- सर्व लोक हाहाकार करूं लागले- कारभारी भट भिक्षुक फकीर गरीब दुबळे व सर्व जन ह्मणूं लागले- की- आज धर्म बुडाला- परोपकार दया दान इत्यादि सर्वगुण लयास गेले- राजाच्या स्त्रिया सत्या गेल्या व दास दासी सेवक शिपायी सरदार मानकरी ह्मणूं लागले- धिक् आमचे जन्म की- आमच्यांत कोणी असा नाहीं की जो राजास माघारा फिरवील- असा राज्यांत मोठा अनर्थ झाला- नंतर प्रधानानें जैत्रपाळ राजपुत्रास राज्याचा टिळा करून सर्व राज्यांत त्याचे नावाने दौंडी फिरविली आणि विक्रमानें क्रिया कर्म करविलें- नंतर जैत्रपाळ सिंहासनावर बसों लागला तो तत्काळ मूर्छा येऊन वरून खाली पडला- तेव्हां मंत्री ह्मणाला- महाराज आज रात्रीं राजाचें स्मरण करून प्रार्थना करावी आणि भुमीवर निजावें मग जशी आज्ञा होईल त्याप्रमाणे करावें- तें ऐकून रात्रीं जैत्रपाळ भूमीवर निजला त्यास दृष्टांत जाहला- की- तूं उज्जनी व धारानगरी ही दोन्ही सोडून अंबावतींत रहा- आणि हें सिंहासन भुमींत पुरून ठेव- याप्रमाणे स्वप्नांत विक्रमाने सांगितलें- नंतर प्रातःकाळीं उठून प्रधानादिकांस तें सर्व वर्तमान जैत्रपाळाने सांगितलें- तेव्हां बेलदारास बोलाऊन तें सिंहासन भूमींत पुरून ठेविलें आणि आपण अंबावतींत येऊन राज्य करूं लागला- इतकी कथा सांगून चित्रकला बोलली हे भोजराजा आतां आमचें वर्तमान ऐक- आह्मी बत्तीसजणी पार्वतीच्या सख्या होतों- एके दिवशीं शिवाचें स्वरूप अत्यंत वृद्ध- रुंडमाळांनीं वेष्टित- गजचर्माच्छादित

SINGASUN BUTTISHEE.

महाराष्ट्र सिंहासन बत्तीशी

लोकपरिज्ञानार्थ

मुंबापुरीं पाषाणयंत्रांत

छापिली आहे

इसवी सन
१८३४

शालीवाहन शक
१७५६

Printed at the New Bombay Lithographic Press.

अनुक्रमणिका

श्री

सिंहासनी बत्तीशी

प्रारंभ

श्रीमंत प्रौढप्रताप शौर्यौदार्याद्यनेक-गुणविराजमान श्री
भोजराजा धारानगराचेठायीं राज्यकरीत असतां कोणएके
समयीं अवंतिनगराजवळ एक ब्राह्मणानें नवी भूमि साधू
न शेत पेरिलेंहोतें तें ओलें तेसमयीं त्याच्या संरक्षणाकरि
तां शेतामध्यें माळा करून तो ब्राह्मण त्याजवर नित्य बस
त असे त्याणें जेसमयीं वरतें बसावें तेसमयीं त्याची
बुद्धि मोटी उदार व्हावी आणि खालीं आला असतां पुनः
पूर्ववत् व्हावी हा चमत्कार अनुभवून त्या ब्राह्मणानें जाऊ
न भोजराजास सांगीतलें तेव्हां मोटें आश्चर्य मानून राजा
त्या ब्राह्मणाबरोबर शेतांत येऊन माळ्यावर चढला त्या
वेळेस त्यास असें वाटलें कीं सर्वजनाचें दरिद्र दूर करावें
नंतर खालीं येऊन पाहातो तों ती बुद्धी नाहीं-हा प्रत्यक्ष
बुद्धिभेद अनुभव घेऊन राजानें मनांत विचार केला
कीं हा भूमीचा गुण किंवा येथें कांहीं वस्तु आहे तीचा
गुण

गुण हें पाहावें- नंतर त्या ब्राह्मणास बहूत द्रव्य देऊन राजानें तें शेत घेतलें आणि तेथें खाणिलें तों रत्नखचित चंद्रकांतमणीचें सिंहासन ज्यास बत्तीस रत्नपुतळ्या जडल्या आहेत असें पाहिलें तें मोटे प्रयासानें बाहेर काढून आपले नगरांत आणिलें आणि राजमंडपांत ठेविलें मग अनेक तीर्थोदकें अष्टोत्तरशत औषधी, छत्र, चामर, खड्ग [illegible]दिक राज्याभिषेक समयीं सिद्ध करऊन सुमुहूर्तीं श्री भोजराजा [illegible] हासनावर बसूलागला तेव्हां त्याजवरील जया [illegible] तळी मनुष्यवाणीनें बोलूलागली हे भोजराजा [illegible] यीं फार असेल त्याणें या सिंहासनावर बसावें [illegible] धिकार नाहीं असें तीचें वाक्य ऐकून भोजराजा [illegible] विस्मित होऊन तिला पुसूंलागला कीं मी याचकांस लाखो रुपये सहज देतों मजहून दुसरा उदार कोण आहे तें ऐकून त्या पुतळीनें उत्तर केलें कीं जो आपल्या मुखानें आपली स्तुती करितो तो लघुता पावतो याविषयीं वचन

परैः प्रोक्ता गुणा यस्य निर्गुणोऽपि गुणी भवेत् [illegible]
ऽपि लघुतां याति स्वयं नख्यापितैर्गुणैः [illegible]

याचा अर्थ- दुसऱ्यानीं ज्याच्या गुणाची [illegible]
अल्पगुणी जरि असला तरि थोरी पा[illegible]

र आपला थोरपणा आपल्ये तोंडानें वर्णितो आहे तर तो ल
घुता पावतो तें ऐकून भोजराजा लज्जायमान झाला परंतु हीर
त्नाची पुतळी मनुष्यासारिखें बोलत्ये हें आश्चर्य मानून तिला
पुसतो-हें कोणाचें सिंहासन व याजवर बसणाराचें औदार्य
कसें होतें तें सांग-याप्रमाणे राजाचें बोलणें ऐकून त्याप्र
ती कथा सांगों लागली

उज्जनीनगरीत भर्तृहरी राज्यकरीत असतां कोणी एक ब्रा
ह्मण जवळ तपकरीत होता त्यास देवी प्रसन्न होऊन व
र माग म्हणाली तेव्हां त्या ब्राह्मणाने अमरत्व मागीतलें असतां
देवीनें त्यास एक फळ देऊन बोलली कीं हें फळ जो खाईल
तो अमर होईल नंतर तें फळघेऊन ब्राह्मण घरास आला
आणि विचारकरूं लागला कीं दरिद्री मी अमर झालों तर फा
र दिवस भिक्षा मागावी लागेल यास्तव हें फळ राजास द्यावें म्ह
णजे तो बहुत दिवस पृथ्वीचें पालन करील असा निश्चय क
रून ब्राह्मणाने अतिआदरानें तें फळ भर्तृहरीस दिल्हें आ
णि आपलें वर्तमान सांगीतलें तें ऐकून राजानें बहुत द्रव्य
ब्राह्मणास देऊन तें फळ आवडीनें आपल्या स्त्रीस दिल्हें ति
[illegible] दिल्हें-जारानें आपल्या वेश्येस दिल्हें तीचें
[illegible]ली होती तिणें राजास नेऊन दिल्हें-त्याणें
[illegible]चौकशी केली तेंव्हां सर्व वर्तमान कळलें मग
[illegible]न बोलला

यांचिंतयामिसततंमयिसाविरक्ता साचान्यमिछतिज
नंसजनोन्यसक्तः अस्मत्कृतेतुपरितुष्यतिकाचिदन्या
धिक्तांचतंचमदनंचइमांचमांच २

• याचा अर्थ- मीं जीचें नित्य चिंतन करितों ती मला सोडूनदु
सऱ्यावर प्रीति करित्ये-तोही दुसऱ्या स्त्रीची इछा करितो ती स्त्री
माझेठायीं प्रीति करित्ये तस्मात् त्यास्त्रीला- त्यापुरुषाला- अशी
प्रीति उत्पन्नकरणाऱ्या मदनाला- ह्यास्त्रीला- आणि मलाही धिक्कार
असो- याप्रमाणें सर्वांची निंदा करून तें फळ त्याणें आपणच
भक्षिलें आणि त्या तिरकाऱ्यानें राज्य सोडून वनवासास
गेला- मग त्याचेठिकाणीं प्रधानानी जो राजा बसवावा तो
वेताळानें मारावा याप्रमाणे बहुत राजे मारिले हें वर्तमान
भर्तृहरीचा धाकटा बंधू विक्रम देशांतरीं गेला होता त्यास
कळलें तेसमयीं तो सामान्य पुरुषाचा वेषधरून उज्जनीस
आला आणि प्रधानांस विचारूं लागला कीं येथें कोणी रा
जा नाहीं याचेंकारण काय तेव्हां त्याणी वेताळाचें वर्तमा
न सांगीतलें- तें ऐकून विक्रम ह्मणतो मला राज्यपदी ब
सवाल तर मी हें राज्यचालवीन तेव्हां प्रधानानीं विचार के
ला की हा कोणी मोठा धैर्यवान आहे ह्मणून असें भाषण
करितो तर यास राज्याभिषेक करावा- असा निश्चय करून
त्यांही त्यास राज्यपदीं स्थापिलें मग त्याणें सायंकाळपर्यंत

राज्य

राज्यकारभार करून रात्रीं नानाप्रकारचें अन्न सिद्ध करऊन आपल्या पलंगाजवळ ठेविलें आणि आपण तरवार घेऊन जागत बसला इतक्यांत तेथें वेताळ आला त्यास राजा बोलतो हे वेताळा हें बहुत प्रकारचें अन्न तुजसाठीं ठेविलें आहे तें आधीं खाऊन मग मला खा-तें ऐकून वेताळानें सर्व अन्न भक्षिलें आणि तितक्यांतच तृप्त होऊन आपल्या ठिकाणीं गेला-त्या दिवसापासून वेताळ नित्यानें अन्न खाऊन जात असे-एके दिवशीं विक्रमानें त्यास पुसलें कीं तुझी शक्ती आणि ज्ञान किती आहे तें सांग-तेव्हां वेताळ ह्मणाला मी जें इछिन तें करिन आणि मला भूत भविष्य वर्तमान कळतें तें ऐकून विक्रम ह्मणतो कीं माझे आयुष्यांत पांच वर्षें उणीं अथवा अधीक कर बरें-वेताळानें उत्तर केलें कीं हें कोणाचे स्वाधीन नाहीं असें बोलून आपल्या ठिकाणीं गेला दुसरे दिवशीं विक्रमानें अन्न ठेविलें नाहीं तेव्हां वेताळ रागें भरून बोलला कीं अरे आज अन्न कां नाहीं ठेविलेंस-विक्रम बोलला कीं तुझ्यानें माझें आयुष्य उणें किंवा अधिक करवत नाहीं मग तुला नित्य बळी उगाच कशासाठीं द्यावा-तुझी इछा असली तर युद्धास सिद्ध हो-याप्रमाणें भाषण करून विक्रम हातेंत तरवार घेऊन लढायीस उभा राहिला हें पाहून वेताळ ह्मणतो विक्रमा तुझ्या धैर्यानें मी संतुष्ट झालों यास्तव तूं कांहीं वर माग विक्रम बोलला ज्या वेळेस तुझें स्मरण करीन त्या

वेळेस

येळेस येऊन माझें कार्य करावें नें मान्य करून वेताळ गेला-मग मोठ्या समारंभानें विक्रमानें आपणास राज्याभिषेक करविला आणि राज्य करूंलागला तों एके दिवसीं सिद्धसेननामा कवि उज्जनीस येऊन राजास आपण आलों असें कळविताझाला तेव्हां विक्रमानें भेटीच्या अगोदरच त्यास चवदालक्ष रुपये आणि नऊ गांवांचें दानपत्र पाटऊन सेवेकास सांगीतलें अणखी कांहीं कवीची इछा असली तर त्या ऊन या-याप्रमाणें राजाज्ञा ऐकून दूतानीं रुप कवीस दिल्हें असतांही कवी सभेस गेला तों रा रव करून बसला होता तेसमयीं कवीनें हा श्लो

अपूर्वेयं धनुर्विद्या भवता शिक्षिता कुतः मार्गणौ
घ: समभ्येति गुणो याति दिगंतरं १

याचा अर्थ-हे विक्रमा ही अपूर्वधनुर्विद्या तूं कोणाजवळ शिकलास ज्याविद्येनें बाण तुजकडे येतात आणि धनुष्याची दोरी बाहेर जात्ये याप्रकारें श्लोकाचा अर्थ रंतु वास्तविक अर्थ असाहोतो कीं तुं मा च्य देतीस ही कीर्ति दिगंतिं जात्ये ह्मणू तात असा अर्थ समजून पूर्वदिशेचें राज्य तांत आपून विक्रम दक्षिणेकडे फिरून

सरा श्लोक ह्मटला

सर्वदा सर्वदोऽसीति मिथ्या त्वं कथ्यसे बुधैः नारयो
लेभिरे पृष्ठं न वक्षः परयोषितः

याचा अर्थ- हे राजा तुं सर्वदा सर्व देतोस असी लटकीच तु
... लोक करितात- ती लटकी कसी ति ऐक- तूं शत्रूंस
... परस्त्रियांस हृदय हीं कधींही दिलीं नाहींस- हा
... न त्याकवीस दक्षिण दिशेचें राज्य द्यावें असें नांत
... क्रम पश्चिमेस बसला नंतर त्याणें तिसरा श्लोक ह्मट

अरयस्ते भयत्रस्ताः स्फुटिता घटवद्धृदि गलितं नेत्र
पाताच राजन् चित्रमिदं महत् १

याचा अर्थ- हे विक्रमा तुझ्या भयानें तुझे शत्रु त्रास पावोन
त्यांचे हृदयघट फुटले त्यांतून उदक गळावें नेत्रांतून गळलें
... त्कार आहे तें ऐकून राजा उत्तरेस बसला
... था श्लोक ह्मटला

... स्थिता कंठे लक्ष्मीः करसरोरुहः राजेंद्रकु
... र्तिस्तेन देशांतरं गता -

याचा अर्थ- हे विक्रमा तुझ्या कंठाचेठाई सरस्वती आणि हस्ताचेठाई लक्ष्मी राहिली ह्मणून रागाने कीर्ति देशांतरी गेली असें श्रवणकरून विक्रमाने कवीस नमस्कार करून सांगीतलें कीं तुला चाही दिशांचें राज्य दिल्हें तेव्हां कवीनें उत्तर केलें मी राज्य घेऊन काय करूं तें तु[illegible]च असय असो- तुझ्या दातृत्वाने मी फार संतुष्ट झालों नंतर राजास आशिर्वाद देऊन कवी आपल्ये ठिकाणास जाताझाला याप्रमाणें विक्रम दाता परोपकारी शूर असा लौकीक स्वर्गी कळून इंद्रानें त्यास सिंहासन पाठऊन दिल्हें मग त्याजवर दसू[illegible] बहुत दिवस राज्यकरून शेवटीं तो स्त्रीसहित स्वर्गवासी झाला तें समयीं आकाशवाणी झाली कीं त्या सिंहासनावर बसावयास आतां कोणी योग्य नाहीं यास्तव हें भूमींत पुरून ठेवा- मग प्रधानानीं तसेंकेलें तें हें सिंहासन आज तुला सहज सांपडलें आणि तूं याजवर बसावयास सिद्ध झालाआहेस परंतु विक्रमाची योग्यता तुझे आंगीं नाहीं ह्मणून तूं याजवर बसूंनयेस- याप्रमाणे जयापुतळीचें बोलणें ऐकून भोजराजा खिन्नहोऊन आपल्या महालांत गेला आणि मनांत विचार करितो आहे कीं ही एक पुतळी बोलिलीयावरून दुसऱ्याही बोलतीलसें वाटतें तर आपण कौतुकानें नित्य सिंहासनावर बसावयास जात असावें असें मनांत आणून पुनः दुसऱ्या दिवसीं सिंहासना जवळ आला [illegible]व्हां वि

जयानामें

जयानामें दुसरी पुतळी बोलूं लागली हे भोजराजा विक्रमा सारिखें औदार्य तुझें असेल तर या सिंहासनावर चढ तें ऐकून भोजराजा विचारितो- त्याचें औदार्य कसें होतें तें सांग- मग विजया सांगत्ये

कथा- २

एके समयीं विक्रमराजा सभेस बसला असतां एक दरिद्री ब्राह्मण येऊन उगाच उभा राहिला तेव्हां प्रधानानी विनंती केली कीं हा बहुत दरिद्री आहे ह्मणून आपल्या जवळ आला आहे- तें ऐकून राजानें त्यास लक्षरुपये दिले तेव्हां ब्राह्मण संतुष्टहोऊन श्लोक ह्मटला

संग्रहेणकुलीनानां राज्यंकुर्वंतिपार्थिवाः आ
दिमध्यावसानेषु नत्यजंतिचतेनृपं -

याचा अर्थ- हे राजा कुलीन पुरुषाचा संग्रह करून राजे राज्य करितात ह्मणून ते पुरुष राजांस कधींही सोडित नाहींत याविषयीं एक कथा सांगतों ऐक

विशाल नगरींत नंदराजा होता तो भानुमती स्त्रीच्या स्वरूपास मोहित होऊन राज्यकारभार सोडिता झाला तेव्हां त्यास बहुश्रुत प्रधानानें विनंती केली कीं हे राजा गुरु वैद्य आणि

प्रधान

प्रधान याणीं केवळ मर्जीसारिखें बोलूं नये जें खरें असेल तें सांगा वें- अशी नीत आहे ह्मणून बोलतों ऐक आपण सभेस यावयाचें सोडिलें हें समजून शत्रू राज्यांत बहुत उपद्रव करूं लागले असें प्रधानाचें भाषण ऐकून नंदराजा ह्मणतो तूं खरें सांगतोस परंतु भानुमतीस सोडून मला क्षणभरही राहावत नाहीं यास काही उपाय करशील तर मी दरबारीं येईन [illegible] बोलणें ऐकून बहुश्रुत प्रधानानें चितान्याकरवीं भा[illegible] त्र काढून राजास दाखविलें तें राजानें शारदानंद[illegible] दिल्हें तें पाहून त्याणें सांगीतलें-हें चित्र भानुमती [illegible] आहे परंतु तिच्या मांडीवर चिन्ह आहे तें येथें नाही [illegible] चें वाक्य ऐकून नंदराजास फार राग येऊन प्रधानास [illegible] ली कीं शारदानंदास अरंण्यांत नेऊन मारून टाक- तें मान्य करून प्रधानानें त्यास आपल्या घरीं नेला- आणि विचार केला कीं भानुमतीच्ये मांडीवरील चिन्ह याणें अंतर्ज्ञानानें सांगीतलें तें न जाणून राजाचे मनांत दुष्टबुद्धि आली आणि यास मारावयास आज्ञा केली परंतु मारला असतां प्रभूस पातक [illegible] यास लपुन ठेवावा- असा निश्चय करून [illegible]दा[illegible] आज्ञा सांगून तळघरांत लपऊन ठे[illegible]ला [illegible] लटकेंच राजास सांगीतलें यानंतर [illegible]पु[illegible] यपाळ अरंण्यांत शिकारीस गेला तेथें [illegible]ऊन त्याचे पाठिमागें एक लाग लागला तेव्हां डुक[illegible]च्या गुहेंत शिरला

मग

मग राजपुत्र बहुत श्रमून पाणी पिण्यां करितां घोड्याखालीं उ.
तरला इतक्यांत एक वाघ येत होता त्यास पाहून भयानें झाडा
वर चढला तों त्या झाडावर एक आस्वल वाघाच्या भयास्तव पू
र्वींच बसला होता त्याची याची एकदृष्टी होतांच राजपुत्र घाब
रा झाला तेव्हां आस्वल ह्मणाला तूं भिऊन को मी तुझा घात क
[illegible]हीं तें ऐकून तो विश्वासानें त्याजवळ बसला आणि वा
घ[illegible] घांस पाहून वृक्षाखालीं उभा राहिला मग रात्रीचे वेळां
हे वि[illegible]ाळास झोंप येऊं लागली तेव्हां आस्वल बोलिला तूं कां
[illegible] नधरितां माझे मांडीवर नीज ते ऐकून त्याच्या मांडीव
र डोकें ठेऊन राजपुत्र निजला तेव्हां वाघ आस्वलास ह्मणाला
तूं मी नित्य अरंण्यांत राहाणारे आणि हा मनुष्य आपला शत्रू
यास्तव यास खालीं लोटून दे ह्मणजे दोघांचेंही कार्य होईल- आ
स्वलानें उत्तर केलें कीं तूं कितीही सांगीतलेंस तरी मी विश्वास
घात करणार नाहीं तेव्हां वाघ उगाच बसला मग मध्यरात्र झा
ल्यावर विजयपाळ उठला त्याची मांडी उशास घेऊन आस्वल नि
[illegible] तेसमयीं वाघ राजपुत्रास ह्मणतो तूंया आस्वलाचा विश्वा
[illegible]रून कीं कां राजनितींत सांगीतलें आहे श्लोक

नदीनांनखीनांच शृंगिणां शस्त्रपाणिनां विश्वासो
नैवकर्तव्यः स्त्रीषुराजकुलेषुच १

याचा अर्थ-नदी-तिखटनखांची जनावरें- तसेच शिंगाचे पशु-हातियारी-स्त्रिया-राजे-यांचा विश्वास धरूनये अशी निति आहे ह्मणून तुला सांगतों तूं या आस्वलास खालीं ढकलूनदे ह्मणजे मी त्यास खाऊन तुला वाटदेईन-तें ऐकून राजपुत्रानें त्यास खालीं लोटिलें तेव्हां-तो पडतां पडतां सावधहोऊन एका खांदीस धरून पुनः आपल्या ठिकाणी आला तें पाहून राजपुत्र भयानें थरथरां कांपुंलागला-त्यास आस्वल ह्मणतो तूं माझें भय मानूं नको मी तुझ्या शरीरास उपद्रव करणार नाहीं परंतु माझ्या शापानें तुला ससेमिरा या अक्षरांचें वेड लागेल-जेव्हां हीं अक्षरेंआधीं आहेतज्यांस असे चार श्लोक माझ्या मनांत आहेत ते तुला कोणी ऐकविणारा भेटेल तेव्हां तुझें वेड जाईल मग सूर्योदय होतांच वाघ आणि आस्वल आपल्या ठिकाणीं गेले-विजयपाळ विश्वासघाताच्या पातकामुळें ससेमिरा हीं अक्षरें ह्मणत वेडाहोऊन रानांत फिरोंलागला-त्याचा घोडा नगरांत एकलाच आला तो पाहून नंदराजा चिंतायुक्त होऊन पुत्राच्याशोधार्थ सैन्यघेऊन वनांत गेला तों विजयपाळ ससेमिरा ह्मणत फिरत आहे असा पाहिला त्यास घरीं आणून उपाय बहुत केले परंतु त्याचें वेड जाईना तेव्हां बहुश्रुतप्रधानास ह्मणतो कीं जर आज शारदानंद असता तर यास बरेंकरिता-प्रधान बोलला कीं आपल्या शहरांत दौंडी पिटऊन लोकांस कळवावें ह्मणजे कोणीतरी यास बरेंकरणारा भेटेल-तें ऐकून नंदराजानें तसेंकरायास आज्ञाकेली नंतर बहुश्रुतप्रधान आपल्या घ

रीं येऊन शारदानंदास तें वर्तमान सांगता झाला तेव्हां तो ह्मणाला तूं राजाजवळ जाऊन सांग कीं माझी कंन्या बहुत चतुर आहे ती कांहीं उपाय करील तें ऐकून बहुश्रुतानें तसेंच राजास सांगून पुत्रासहित त्यास आपल्या घरास आणिलें नंतर कंन्या पडद्यांत बसवितों असें बोलून शारदानंदास पडद्याचे आंत बसवून बाहेर राजास पुत्रादिकांसहवर्तमान बसविलें तेसमयीं शारदानंद अंतर्ज्ञानानें अरंण्यातील सर्व वर्तमान जाणून हे चार श्लोक पढता झाला

सद्भावप्रतिपन्नानां वंचनेकाविदग्धता- अंकमारुह्य
सुप्तानां हंतुःकिंन्नामपौरुषं १

याचा अर्थ- ज्याणें आपल्यावर विश्वास ठेविला त्यास ठकविलें तर त्यांत काय चातुर्य- मांडीवर निजला त्याचा जीव घेतला तर त्यांत काय पराक्रम केला हा श्लोक ऐकतांच राजपुत्रानें एक अक्षर सोडून दिल्हें आणि सेमिरा हें बोलुं लागला तों शारदानंदानें दुसरा श्लोक ह्मटला

सेतुंगत्वासमुद्रस्य गंगासागरसंगमं ब्रह्महत्याविमुच्येत मित्रद्रोहीनमुच्यते २

याचा अर्थ- गंगेचा समुद्राशीं जेथें संगम झाला त्याठिकाणीं अ

यवा

थवा सेतुबंधरामेश्वरीं गेलें असतां ब्रह्महत्येचा दोष जातो परंतु मित्रद्रोही पापापासून कोठेंच मुक्त होत नाहीं हें ऐकतांच विजय पाळ दुसरें अक्षर सोडून मिरा हें ह्मणूं लागला तेव्हां शारदानंदानें तिसरा श्लोक ह्मटला

मित्रद्रोही कृतघ्नश्च तथा विश्वासघातकः त्रयस्ते न
रकं यांति यावच्चंद्रदिवाकरौ ३

याचा अर्थ - मित्राचा घात करणारा - उपकार न जाणणारा - विश्वास देऊन घात करणारा - हे तिघे जों वर सूर्यचंद्र आहेत तोंपर्यंत नरकीं राहातात - हा श्लोक ऐकून राजपुत्रानें तिसरें अक्षर टाकिलें आणि रा ह्मणूं लागला तेव्हां शारदानंदानें चवथा श्लोक ह्मटला

सिद्धांतः सर्वशास्त्राणा मयं नकलुषं परं विश्वासघा
तान्नपुण्यंच नपरोपकृतेः परं ४

याचा अर्थ - सर्वशास्त्रांचा सिद्धांत असा आहे कीं विश्वास घाता परतें दुसरें थोर पातक नाहीं - आणि परोपकाराहून दुसरें मोटें पुण्य नाहीं हा श्लोक ऐकून राजपुत्राचें वेड गेलें आणि तो रानांतील झालेलें वर्तमान राजास सांगता झा

ला

ला तेवेळीं राजा पडद्यांतिल्ये कन्येस पुसतो हे मुली तूं गांवांत राहातेस अरंण्यांत कधींही जात नाहींस असें असतां तेथील वर्तमान तुला कसें कळलें तें सांग तेव्हां शारदानंद बोलिला देव ब्राह्मणाच्या प्रसादेंकरून माझ्याजिव्हाग्री सरस्वती आहेति च्या योगानें मीं सर्व जाणतों असें भानुमतीचे मांडीवरचें चिन्ह जाणिलें तें ऐकतांच नंदराजाची खुण पटली आणि पडदा वर करून पाहिलें तों शारदानंद बसला आहे त्यास राजानें आणि विजयपाळानें साष्टांगनमस्कार घालोन आपल्या घरीं नेलें अशी कथा ब्राह्मणानें विक्रमास सांगीतली तेव्हां त्याणें त्या ब्राह्मणास कोटिरुपये दिल्हे याप्रमाणें तुझें औदार्य असेल तर या सिंहासनावर बैस असें विजयापुतळीचें भाषण ऐकून भोजराजा खिन्नहोऊन आपल्या माहालीं गेला-पुनः दुसरेदिवशीं सिंहासनाजवळ आला तेव्हां तिसरी पुतळी जयंती बोलिली हे भोजराजा विक्रमासारिखें तुझें धैर्य असेल तर या सिंहासनावर बैस तेव्हां भोजराजानें विचारिलें त्याचें धैर्य कसेंहोतें तें सांग मग जयंती सांगत्ये

कथा ३

विक्रमराजा राज्यकरीतअसतां पृथ्वीवर कोठें कायचमत्कार आहे तो आपणास कळावा ह्मणोन दूत चहुंकडे पाठवीत असे-एके दिवशी दूतानें येऊन सांगीतलें कीं चित्रकूटपर्वतावर

टपर्वतावर देवीचें देऊळ आहे त्याच्या पुढें नदी आहे त्यांत जो पु
ण्यवान् आहे त्याणें स्नान केलें असतां तीचें पाणी स्वछ होतें-आ
णि पापी मनुष्यानें केलें तर सर्वपाणी गढूळ होतें- हा मोटा च
मत्कार आहे-दुसरें-त्या देवीजवळ एक ब्राह्मण बहुत दिव
स तपश्चर्या करित आहे परंतु त्यास भवानी प्रसन्न होतना
हीं- असें ऐकून विक्रमानें त्या पर्वतावर जाऊन नदींत स्ना
न केलें तों उदक स्वछ झालें त्यावरून आपण पवित्र आहें अ
सें समजोन त्याणें देवीस नमस्कार केला नंतर ब्राह्मणाजव
ळ जाऊन त्यास विचारिलें कीं तूं येथें किति दिवस अनुष्ठा
न करित आहेस-त्याणें उत्तर केलें- तीनतपें परंतु अझून
देवीस माझी करुणायेत नाहीं असें ऐकून विक्रमराजा देवी
ची स्तुती करूंलागला तथापि ती प्रसन्न होइना तेवेळीं राजानें
विचार केला कीं हें शरीर कधींतरी व्यर्थ जाणार त्यापेक्षां ब्रा
ह्मणाच्या कार्याकरितां आज देवीस अर्पण करावें हें बरें-अ
सा निश्चय करून हातांत तरवार घेऊन आपलें शिर तोडूं ला
गला तें राजाचें धैर्य पाहुन देवी प्रत्यक्ष होउन त्याचा हात
धरून बोलली कीं तुला जें पाहिजे तें माग- राजा बोलला
कीं मला तूं एक घटिकेंत प्रसन्न झालीस आणि हा ब्राह्मण
बहुत दिवस तप करितो यास कां वर देत नाहींस तें सांग
भवानी सांगत्ये- अरे याचा भाव शुद्ध नाहीं म्हणून मी याव
र कृपा करीत नाहीं-म्हटलें आहे

नको

नकाष्ठेविद्यतेदेवो नपाषाणेनमृन्मये भावेहिवि
द्यतेदेव स्तस्माद्भावोहिकारणं १

अर्थ - काष्ठ पाषाण मृत्तिका - यांचे ठाईं देव राहातनाहीं तर भावाचे ठाईं राहातो - ह्मणून माझी कृपा व्हावयास भावच कारण आहे - असें ऐकून विक्रमह्मणाला हे भवानी तुं जर मला प्रसन्न झालीआहेस तर या ब्राह्मणाचें कार्य कर हें मागतों - तें मान्य करून देवी ब्राह्मणाची इछा परिपूर्ण करितीझाली नंतर विक्रमराजा अवंती नगरास येताझाला - हीकथा सांगोन जयंती बोलली असें तुझें धैर्य असेल तर या सिंहासनावर बैसतें ऐकून भोजराजा फार खंती होऊन माघारा फिरला पुनः दुसरे दिवशीं सिंहासनावर बसूंलागला तेव्हां अपराजिता चवथी पुतळी बोलली हे भोजराजा विक्रमासारिखें तुझें औदार्य असेल तर यासिंहासनाचे पायरीवर पायदे - तेव्हां त्याणें विचारिलें त्याचें उदारत्व कसें होतें तें तूं सांग - मग अपराजिता सांगते

कथा ४

अवंतीनगरींत विक्रमराजा राज्यकरितअसतां त्याचा पराक्रम पाहून स्वर्गलोकीं इंद्रादिकदेवहि त्यास भीतहोते ह्मटलें आहे

उद्यमःसाहासंधैर्यं बलंबुद्धिःपराक्रमः षडेतेयत्र तिष्ठंति तत्रदेवोपिशंकते १

अर्थ- उद्योग- आचार कर्म- धैर्य बळ बुद्धि-पराक्रम-हे सहा गुण ज्याचे विशेष आहेत त्यास देवहि भितात- असा सर्व गुणयुक्त विक्रम होता एकदिवसीं त्याणे विचार केला कीं लक्ष्मी अतिचंचल आहे- इचा भरवसा नाहीं-तर सत्कर्मानें इचा व्ययकरून पुण्यजोडावें असा निश्चय करून यज्ञास आरंभ करिताझाला- नंतर सर्व यज्ञसामग्री सिद्ध करवून सर्वांस बोलावणीं पाठविलीं आणि एका ब्राह्मणास सांगीतलें कीं तूं जाऊन समुद्रास आमंत्रण कर- तेव्हां तो ब्राह्मण गंधाक्षता घेऊन समुद्राजवळ येऊन उभा राहिला आणि म्हणतो हे सागरा- तुला विक्रमराजानें यज्ञाच्या समारंभास बोलाविलें आहे कृपाकरून आलें पाहिजे- तें ऐकून समुद्र प्रत्यक्ष होऊन बोलतो हे ब्राह्मणा विक्रमानें प्रीतीकरून आमंत्रण पाठविलें तेणेंकरून मला बहुत संतोष झाला परंतु ईश्वरानें मला आज्ञा केली आहे कीं तुं आपली मर्यादा सोडून जाऊन कोठेंही जाऊं नये तरमी त्यास हीं चार रत्नें देतों तीं नेऊन दे- यांचेगुण सांगतों ऐक- ह्या पहिल्या रत्नाची पूजा करून प्रार्थना केली असतां जितकें द्रव्य पाहिजे तितकें उत्पन्न होईल- दुसऱ्या पासून जें अन्न पाहिजे तें निघेल तिसऱ्या

पासून

पासून जें सैन्य पाहिजे तें सिद्ध होईल-चवथ्यापासून ज्या अलंकारांची इछा असेल ते प्राप्त होतील-असें सांगून रत्नें ब्राह्मणाकडे देता झाला-ब्राह्मणानें तीं रत्नें घेऊन विक्रमाजवळ येऊन सर्व वर्तमान सांगीतलें-तेव्हां विक्रम त्या ब्राह्मणास ह्मणाला तुं समुद्राजवळ जाऊन थोर कार्य केलेंस-तर तुला जें रत्न पाहिजे तें एक यांतून घे-ब्राह्मण ह्मणाला मी आपल्या घरीं जाऊन सर्वांस विचारीन नंतर जें घेणें तें घेईन-राजानें तीं चारी रत्नें त्याच्यास्वाधीन केलीं-मग तो ब्राह्मण आपल्या घरीं येऊन सर्वांस तें वर्तमान सांगता झाला तेव्हां त्याची स्त्री ह्मणाली अन्नप्राप्तीचें रत्न घ्यावें ह्मणजे आयास न करितां अन्नें मिळतील-पुत्र बोलला सैन्य उत्पन्न होईल तें घ्यावें-कन्या ह्मणाली द्रव्येंकरून सर्व अनुकूळ होतें तें आपल्याजवळ नाहीं ह्मणोन बहुत श्रम करावे लागतात यासाठीं द्रव्यप्राप्तीचेंच रत्न घ्यावें-सून ह्मणाली माझ्या आंगावर कांहीं वस्त्र नाहींत ह्मणून मला माझ्या बहिणी हिणावितात तर ज्यापासून अलंकार उत्पन्न होतात तें घ्यावें-अशा सर्वांच्या इछा निरनिराळ्या होऊन चौघेंही कलह करूं लागलीं-तें पाहून ब्राह्मणानें चारी रत्नें विक्रमास परत देऊन सांगीतलें कीं राजा माझे घरीं चार मनुष्यें आहेत त्या चवघांचीं बोलणीं चार प्रकारचीं पडतात यास्तव मला एकहि रत्न नको-तें ऐकून विक्रम त्या ब्राह्मणास तीं चारही रत्नें देऊन संतुष्ट करिता झाला-अशी कथा सांगोन अपराजिता ह्मणाली हे भोजराजा याप्रमाणें

सुद्धें

तुझें औदार्य असेल तर यासिंहासनावर बैस-तेव्हां भोजराजा लज्जायमान होऊन आपल्या रंगमाहालांत गेला पुनः प्रातःकाळीं सिंहासनावर बसूंलागला तों पांचवि पुतळी जयघोषा बोलली हे भोजराजा विक्रमासारिखा उपकार जाणता तुं आहेस तर त्या सिंहासनावर बैस-राजानें विचारिलें विक्रम उपकार जाणता कसा होता तें सांग-जयघोषा सांगत्ये

कथा-५

अवंती नगरांत देवदत्त नामा एक ब्राह्मण अग्निहोत्री राहात असे तो समिधा आणावयाकरितां अरण्यांत गेला होता-तें दिवसीं विक्रमराजा त्याच अरण्यांत शिकारीस जाऊन एकटाच एका डुकरामागें लागला होता तेव्हां डुकर पळोन गेला आणि राजा वाट चुकून इकडेतिकडे फिरूंलागला-तें देवदत्त ब्राह्मणानें पाहून राजास आपल्ये आश्रमांत आणिलें आणि फळें उदक देऊन स्वस्थ केलें-आणि आपण बरोबर येऊन नगरास पोंचिविलें-तेव्हां विक्रमानें त्या ब्राह्मणास बहुत द्रव्य देऊन सांगीतलें हे ब्राह्मणा हा तुझा उपकार माझ्यानें फिटणार नाहीं-मी तुझा ऋणीआहें-ब्राह्मण संतुष्टहोऊन आपल्या घरास गेला त्यादिवसापासून तो ब्राह्मण राजाचेघरीं येतजात असे-एकेदिवसीं ब्राह्मण मनांत ह्मणतोकीं राजा जें बोललाहोता तें खरें किंवा खोटें याची प्रचीत पाहुं ह्मणोन त्याणें राजपुत्राला

हान

हान होता त्यास खेळवायानिमित्तें आपणाकडे घेवून कोणास नक ळतां आपल्या घरीं नेऊन ठेविला-तेव्हां राजपुत्रास कोणी नेलें हें समजून विक्रमादिक सर्व दुःखी झाले आणि त्याचा शोध करूं लागले तों त्या ब्राह्मणानें पुत्रावरचा एक अलंकार काढून सेव कानें हातिं विकावयास दिल्हा तो राजसेवकानी पाहिला आणि त्यास विचारिलें कीं ही वस्तु तूं कोठून आणिलीस तेव्हां तो ह्मणा ला देवदत्त ब्राह्मणानें मजजवळ विकावयास दिल्ही-तें ऐकून रा जसेवकानीं देवदत्तास राजसभेस आणिलें तेसमयीं विक्रमा नें त्यास पुसलें हीवस्तु तुला कोठें सांपडली-ब्राह्मण बोलला हे महाराज तुझा पुत्र मी लोभास्तव मारिला हीवस्तु त्याचे अं गावरली-तें ऐकून सर्वलोक बोलूंलागले कीं या दुष्टब्राह्मणास बहुत शासन करावें विक्रमह्मणाला हे देवदत्ता तूं माझा पुत्र मारिलास तथापि मी तुला शिक्षा करावी हें योग्य नव्हे-कांमी तुझा अगोदरचा उपकारी आहें-याप्रमाणें भाषण करून पु त्राचा किमपि खेद नकरितां त्या ब्राह्मणास विक्रम बहुत द्रव्य देताझाला-असा विक्रमाचा आचार पाहून देवदत्त संतुष्ट झा ला आणि पुत्रास आणून राजाच्या स्वाधीन करिताझाला-ही कथा सांगोन जयघोषापुतळी ह्मणाली-हे भोजराजा असा तूं उ पकार जाणता आहेस तर यासिंहासनावर पाय दे-तें श्रवण करून भोजराजा माघारा गेला-पुनःदुसरे दिवसीं प्रधानादिक बरोबर घेऊन सिंहासनाजवळ आला तेव्हां साहावी पुतळी

लीलावती

लीलावती बोलली हे भोजराज विक्रमासारिखा तूं गुणजा णता असशील तर यासिंहासनावर बैस भोजराजानें विचारिलें विक्रमामध्यें गुणज्ञता कसी होती तें सांग- मग लीलावती सांगत्ये

कथा ६

विक्रमराजा राज्यकरितअसतां एका जोहाऱ्यानें एक उत्तम रत्न आणून राजास दाखविलें कीं ज्याच्या प्रकाशें करूनपाहाणाराचे डोळे दिपतअसत- राजानें रत्न पारखी बोलाविले त्याणी त्या रत्नाची कीमत कोटिरुपये केली- ते थोडे वाटूनविक्रमानें तेसमयीं अकराकोटिरुपये त्या जोहाऱ्यास देऊन आज्ञा केली कीं अशींच आणखी दाहा रत्नें घेऊन एकामहिन्याचे आंत ये- ती राजाज्ञा मान्य करून तो जोहारी देशांतरीं गेला तेथोन त्याप्रमाणें दाहारत्नें घेऊन येतअसतां वाटेंत मोठा पर्जन्य पडोन एकानदीस उतार होत नाहीं असें पाहिलें तेव्हां जवळचे गांवांत गेला तेथेंएक रामदास सावकार होता त्याला आपलें वर्तमान सांगीतलें- रामदास ह्मणाला- मला जर यातलीं पांचरत्नें देशील तर मी नाव देऊन तुला अवंतीस नेऊन घालीन- तें ऐकुन जोहाऱ्यानें विचार केला कीं यासजररत्नें न दिल्हीं तर एक महिन्याचा आंत यावें असी राजाज्ञा आहे ती मोडेल आणि राजास क्रोध येईल कां राज्याचें फळ हेंच

कीं

कीं आज्ञा व्यर्थ होऊं नये - म्हटलें आहे

आज्ञामात्रफलं राज्यं ब्रह्मचर्यफलं तपः परिज्ञानफ
लाविद्या दत्तभुक्तफलं धनं १

अर्थ- राजाची आज्ञा सर्वांनी मान्य करावी हेंच राज्याचें फळ- ब्रह्मचर्य असावें हेंच तपाचें फळ - विद्याभ्यासाचें फळ हेंच कीं ज्ञान व्हावें - धनाचें फळ हेंच कीं भोग आणि दान करणें ह्मणोन राजाज्ञा नमोडेल तें करून मग झाला व्यवहार विक्रमास कळवावा - असा निश्चय करून पांच रत्नें त्या सावकारास देऊन त्या च्यानावेंत बसला आणि अवंतीनगरास आलाझाला - नंतर विक्रमापुढें पांच रत्नें ठेऊन तो जोहारी उभा राहिला - राजानें त्यास पुसलें कीं दुसरीं पांच रत्नें कोठें आहेत तेव्हां त्याणें हात जोडून राजास सर्व वर्तमान सांगीतलें आणि बोलला महाराज आपली आज्ञा पालन व्हावी ह्मणून मी असें केलें आणि तिसा दिवसांचे आंत आलों तें ऐकून विक्रमानें विचार केला कीं हा मोठा प्रमाणिक आणि बुद्धिवान् होय राजाज्ञा नपाळिल्यास मोठा दोष घडतो हें खरेंच आहे

आज्ञाभंगो नरेंद्राणां विप्राणां मानखंडनं पृथक्शय्या च नारीणाम् शस्त्रविहितो वधः

अर्थ-

अर्थ- राजाची आज्ञा मोडणें- ब्राम्हणाचा मानभंग करणें- कारणावांचून स्त्रीस निराळी निजविणें- हीं तिन्हीं त्यांच्या वधासमान होतात- असें जाणोन याणें पांच रत्नें सावकारास दिल्हीं असा त्याचा गुण घेऊन विक्रमराजाने त्या ब्राह्मयास तीं आणलेलीं पांच रत्नें बक्षीस केलीं ही कथा सांगोन लीलावती पुतळी ह्मणाली हे भोजराजा विक्रमा सारिखे गुण तुझमध्यें नसतां व्यर्थ तूं या सिंहासनाची आशा कां धरितोस तें ऐकून भोजराजा माघारां गेला पुनः दुसरे दिवसीं सिंहासनाजवळ गेला तों मंजुघोषा सातवी पुतळी बोलली दुसऱ्याची इछा तृप्त करणें हा गुण विक्रमा सारिखा तुजमध्यें असेल तर या सिंहासनावर बैस- तेव्हां त्याणें विचारिलें तो त्यांत कसा होता तें सांग मंजुघोषा सांगते

कथा ७

विक्रमराजा एकेदिवसीं वसंत ऋतुमध्यें चंपक वनांत गेला तें वन असें पाहिलें कीं रम्य पुष्करिणी अनेकप्रकारच्या कमळें करून युक्त- हंस मयुर कोकिळ यांहीं करून शोभित नाना प्रकारचे वृक्ष वेली आणि जाई जुई चमेली मालती मोगरी इत्यादिकानी वेष्टित असें पाहुन तेथें एक रमणीय बंगला बांधवून त्यांत बहुत कारंजीं करवून स्त्रियांबरोबर जळक्रीडा करूं लागला- त्या वनांत एक तपस्वी तप करीत होता

होता त्याणें तो राजाचा विलास पाहुन आपल्या मनांत विचार केला
कीं ह्यालोकीचें सुखसोडून स्वर्गलोकींच्या सुखाची इछा करणें यांत
काय विशेष येथें अनेक प्रकारिचे कष्ट भोगून मेल्यानंतर त्या लो
कचे भोग भोगावे यापेक्षां येथेच विषयसुख भोगावें हे फार
बरें दिसतें- असें मनांत आणून तो तपस्वी विक्रमाजवळ गेला
राजाने त्याचा सत्कार करून पुसलें कीं आपली इछा काय आहे
तो बोलला हे राजा मी देवीजवळ तपकरितअसतां देवीने दृष्टांत
दिलाकी तूं तप पुरे कर तुझ्यातपाने मी प्रसन्न झाल्यें तर तुं
विक्रमाजवळ जाऊन संसार सुखाचा अनुभव माग असा दृष्टां
त झाला तो तुला सांगीतला- संसार सुख भोगायाविषयीं देवी
ची आज्ञा आणि माझीही इछा आहे- असें त्या तपस्याचें भाष
ण ऐकून विक्रम आपल्या मनांत ह्मणाला याला देवी दृष्टांत देऊ
अथवा नदेऊ परंतु यास माझी क्रीडा पाहुन येथें आपण क्रीडाक
रावी अशी इछा झाली आहे ती आपण पुरवावी- मग विक्रमानें
तेथें मोटें नगर वसऊन त्या नगराचा राज्याभिषेक त्या तपस्या
स केला आणि त्याचे उपजीविके करितां दुसरेंहि बारा गांव त्यास
दिल्हे तेणेंकरून तो तपस्वी संसार सुखातें अनुभविता झाला-
ही कथा श्रवणकरून भोजराजा अंतःपुरांत गेला पुनः प्रातःका
ळीं सिंहासनाजवळ येऊन उभा राहिला तों जयसेना आदरिपु
तळी बोलली हे भोजराजा विक्रमासारिखें ज्याचें साहासकर्म असे
ल त्याणेंच त्या सिंहासनावर बसावें तेव्हां भोजराजानें विचारिलें

त्याचें कर्म कसें होतें तें सांग जयसेना सांगत्ये.

कथा-८

अवंतीनगरांत विक्रमराजा राज्यकरीत असतां धनशेटनामा एक सावकार अनेक व्यापार करून बहुत द्रव्यमिळविता झाला-कोणे एके दिवसी धनशेटाच्या शरीरीं समाधान नाहिसें झालें तेसमयीं त्याणें विचार केला कीं त्या मृत्युलोकिंची वस्ती फार अशाश्वत आहे हें समजोन शाहाण्यानें परलोकाचें साधन करावें तें सोडून मूर्खजन पापकर्में करितात आणि कोट्यावधि रुपये असले तरी आणिखी इछितात त्यांस चांगलें इहलोक सुखही प्राप्त होत नाहीं आणि पारलौकिक सुखाचाही लाभ नाहीं तर आतां सर्वव्यवहारटाकून आपण दानधर्मादि पुण्य कर्म करावें-हेंचबरें असा निश्चय करून तो सावकार कर्मविपाकादिक शास्त्रा प्रमाणें सकळ दानें करून तीर्थयात्रेस गेला तेथें बहुत धर्म करून माघारी येत असतां त्याणें समुद्राचे कांठीं एक देवालय पाहिलें त्यांत जाऊन देवीचें दर्शन घेतलें तों तिचे डावेबाजूस स्त्रीपुरुषांचीं धडें व मस्तकें निराळीं होऊन पडलीं होतीं आणि उजवे बाजूस एकाचिऱ्यावर लिहिलेलें होतें कीं जो पुरुष अचाट करणीचा असेल त्याणें आपल्या हातानें आपलें शिर देवीचे पुढें तोडावें म्हणजे हीं स्त्रीपुरुषें जिवंत होतील-तेंपाहून सावकार विस्मित होऊन अवंतीनगरास आला आणि देवीचा प्रसाद व काही जवाहीर घेऊन विक्रमाचा भेटीस

स गेला ह्मटलें आहे

> रिक्तपाणिर्नपश्येतु राजानंदेवतांगुरुं दैवज्ञंभिषजं
> मित्रं फलेनफलमादिशेत्

अर्थ- कांहीभेट नेल्यावांचून रिकाम्याहातीं राजा-देव-गुरु-ज्योतिषी-वैद्य-मित्र यांचें दर्शन घेऊंनये- आपल्या शक्तीप्रमाणें फलादिकजें अनकुल असेल तें पुढें ठेऊन कार्यबोलणें तें बोलावें त्या सावकाराने भेट पुढें ठेविली तेसमयीं विक्रमानें त्यास विचारिलें कीं कोठें कांहीं विशेष चमत्कार पाहिला असलास तर सांग- तें ऐकून धनशेटानें देवीजवळ पाहिलेला चमत्कार सांगीतला तेव्हां राजास फार आश्चर्य वाटलें आणि त्या सावकारास बरोबर घेऊन त्याठिकाणी गेला तों तेथें धनशेटानें सांगीतल्या प्रमाणेंच आहे तें पाहून विक्रमाचें हृदय त्या स्त्रीपुरुषां विषयीं बहुत कळवळलें- आणि परोपकाराकरितां तो आपलें शिर तोडूंलागला तेव्हां देवी प्रत्यक्ष त्याचा हात धरून बोलली हे विक्रमा तु दुसऱ्यासाठीं आपले प्राण कां देतोस- राजानें उत्तर केलें हे जगदंबे सर्वांचें कल्याण असावें सर्वांनी सुखी व्हावें असें माझ्या मनांत आहे परंतु तें माझ्या स्वाधीन नाहीं ह्मणून मी आपले प्राण अर्पण करितो की जेणेंकरून हीं स्त्री पुरुषें उठोन सुख पावतील तें ऐकून देवीनें तीं स्त्रीपुरुषें जिवंत केलीं मग विक्रम तेथील राज्य त्यास देऊन आपण अवंतीस येता झाला

वी

ही कथा ऐकून भोजराजा खिन्न होऊन माघारा गेला- पुनः प्रातः का ळीं सिंहासनाची पायरी चढूं लागला तों मदनसेना नववी पुतळी बो लली हे भोजराजा विक्रमासारिखें तुझें धैर्य असेल तर यासिंहास नावर तुं बैस तें ऐकून आणें विचारिलें विक्रमाचें धैर्य कसें होतें तें सांग मग मदनसेना सांगत्ये

कथा-९

विक्रमराजा राज्यकरीत असतां त्याचें जासूद कोठें काय आ हे हें पाहावयाकरितां सर्वदेशांत फिरत असत हें राजास योग्य च होय म्हटलें आहे

गावः पश्यंतिगंधेन वेदैः पश्यंति वाडवाः चारैःप
श्यंतिराजान श्चक्षुर्भ्यामितरेजनाः

अर्थ- वासानें पशु जाणतात- वेदानें ब्राह्मण पाहातात-दूत द्वारा राजे जाणतात-आणि इतर लोक प्रत्यक्ष नेत्रानेंच पाहून समजतात- असा तो राजा राज्यकरीत असतां एके दिवसीं का श्मीर देशाहून जासुद आला त्याणें वर्तमान सांगीतलें कीं काश्मीर देशांत निर्जलपुर नामें एक नगर आहे त्यांत पाण्याचा मोठा दुका ळ होता म्हणून हरिदास सावकारानें लाखों रुपये खर्चून मोठें एक तळें बांधिलें तेणेंकरून सर्वनगरास उदक पुष्कळ झालें आ

णि

णि तळ्यास पाट बांधिले त्या पाण्याने जी शेतें पिकुं लागलीं तीं ब्राह्मणा
स दान दिल्हीं - कांहीं एकां दीवसीं असें झालें कीं त्या तळ्यांत एक देवी ये
ऊन राहिली तिणें त्यांतील सर्व उदक शोषून तळें कोरडें पाडिलें आ
णि सावकारास दृष्टांत दिला कीं मी येथें येऊन राहिलें असतां म
ला तुं बळी दिला नाहींस ह्मणोन मी हें कृत्य केलें आतां जर तूं मला
बत्तीस लक्षणी पुरुषाचा बळी देशील तर मी संतुष्ट होऊन तळ्यांत
सर्वदा अपार पाणी करीन असें स्वप्न पाहून सावकाराने एक लक्ष
रुपयांचा सुवर्णपुतळा करून तळ्यांत ठेविला आणि त्याच्या जवळ
एक खांब पुरून त्याजवर लिहिलें आहे कीं जो बत्तीस लक्षणी पुरुष
असेल त्याणे आपलें रक्त या तळ्यांतील देवीस देऊन तळ्यास पाणी
लावावें आणि हा सुवर्णाचा पुतळा घ्यावा. जासूद ह्मणतो हे माहा
राज असें वर्तमान मी आपल्या दृष्टीनें पाहून आलों - तें ऐकून विक्र
म जासुदास घेऊन त्या तळ्याजवळ गेला तेथें त्याणें सांगीतल्याप्रमा
णें पाहून त्या नगरांत एका ब्राह्मणाच्या घरीं उतरला नंतर त्या ब्राह्म
णास ह्मणाला तुं हरिदासाकडे जाऊन त्यास विचार कीं ह्या तळ्या
स पाणी लाविलें तर सोन्याचा पुतळा देऊन आणिखी काय देशील
तें स्वहस्तें लिहून दे - ब्राह्मणानें सावकारास तसें पुसलें तेव्हां त्याणें
स्वसंतोषानें लिहून दिल्हें कीं दुसरे पन्नास हजार रुपये देईन - तें
पत्र घेऊन ब्राह्मण आला - रात्रौ विक्रमराजा हातांत ढाल तरवा
र घेऊन एकटाच तळ्यांत गेला आणि जळदेवतेची स्तुती करून

ह्मणाला

ह्मणाला हे देवि मी बत्तीसलक्षणी पुरुष तुला आपलें सर्वशरीर अ र्पण करितों हें घेऊन लौकर जळानें तळें पूर्ण करावें- असें बो लोन खड्गानें आपलें शिर तोडूं लागला तेव्हां देवी राजाचें धैर्य पाहून प्रसन्न झाली आणि त्याचा हात धरून बोलली हे विक्रमा कांही वर माग- तो ह्मणाला हें तळें सर्वदा उदकानें भरलेलें अ सावें येवढें मागतों तें देवीनें मान्य करितांच तळें परिपूर्ण भर लें नंतर विक्रमराजा त्या ब्राह्मणास सुवर्णाचा पुतळा आणि त्यास सहस्ररुपये देवबून आपण अवंतीस येता झाला- ही क था सांगोन मदनसेना ह्मणाली हे भोजराजा असे विक्रमाचे प रोपकार करण्या विषयीं धैर्य ऐकोन अद्यापि त्याच्या सिंहासना वर बसावयाची इछा धरितोस तस्मात् तुजसारिखा अवि चारी पुरुष दुसरा कोणीच नाहीं असें ऐकोन भोजराजा अंतः पुरांत जाता झाला पुनः दुसरेदिवसीं सिंहासनाजवळ गेला तों मदनमंजरी दाहाची पुतळी बोलली हे भोजराजा विक्रमासारि खा तुझा पराक्रम असेल तर या सिंहासनावर बैस त्याणें पुसलें विक्रमाचा पराक्रम कसा होता मदनमंजरी सांगत्ये

कथा १०

विक्रमराजाचा उपाध्याय शंकरशर्मा होता त्याचा पुत्र कम लाकर नामा होता तो सोळा वर्षांचा झाला तथापि कांही वि

द्याभ्यास करीना ह्मणून त्याचा पिता ह्मणाला अरे कमलाकरा तुं मो
टा झालास अद्यापि विद्याभ्यास करीतनाहीस हें फार वाईटकरितो
स कां विद्ये वांचून पुरुषानें जिणें व्यर्थ होय-ह्मटलें आहे

विद्याविधिविहीनेन किंकुलीनेनदेहिना अकुलीनो
पिविद्वान्यो देवतैरपिपूज्यते

अर्थ–विद्यारहित जो पुरुष तो मोट्याकुळांतला असला त
थापि त्यास कोणी पुसत नाही- नीच कुळांतही झालेला असोनावि
द्वान आहे तर त्याची पूजा देवही करितात- असा पित्याचा उपदे
श ऐकुन कमळाकराने विचार केला कीं पित्यानें जी गोष्ट सांगी
तली ती खरी आहे-विक्रमराजा पंडितांस बहुत धन देऊन सन्मान
करितो आणि मूर्खांशी भाषणही करीत नाही तस्मात् विद्येवांचून ज्ञा
पली प्रतिष्ठा होणार नाही तर आतां देशांतरीं जाऊन विद्याभ्यास क
रावा हें बरें- मग तो काश्मीर देशास गेला तेथें विमलभट्टउपाध्याय
माह्याथोर विद्वान् होता त्याच्या घरीं जाऊन त्यास साष्टांग नमस्कार
करून सर्व वर्तमान सांगताझाला तेव्हां उपाध्यायानें त्यासजवळ ठे
ऊन घेतला असतां त्याणे उपाध्यायाची सेवा केली तेणेंकरून तो प्र
सन्न होऊन त्यास सर्व विद्या सांगताझाला ह्मटलें आहे.

गुरु

गुरुशुश्रूषयाविद्या पुष्कलेनधनेनवा अथवाविद्यया
विद्या चतुर्थेनोपलभ्यते-

अर्थ गुरुच्याशेवेकरून अथवा पुष्कळ धन देऊन किंवा आ
पली विद्या सांगून दुसऱ्याची विद्या घ्याची - या तीन उपायावांचू
न चौथ्या प्रकारानें विद्याप्राप्त होत नाहीं - नंतर तो कमलाकर
बहुत विद्या शिकला आणि गुरूची आज्ञा घेऊन आपल्या गावां
स येत असतां वाटेंत कांती पुरीस राहिला तेथें नरमोहिनी
नामें एक कलावंतीण फार सुंदर होती तिला पाहून त्यास का
म विकार झाला तेव्हां तेथील लोकानीं सांगीतलें की हिच्या
घरीं जो पुरुष जातो त्यास राक्षस मारितो तें ऐकून तो खि
न्न होऊन अवंतीस आला आणि राजाचें दर्शन घेतलें राजा
नें विचारिलें की देशांतरि कांहीं नवल पाहिलें असेल तर सां
गावें तेव्हां कमलाकरानें नरमोहिनीचें वर्तमान सांगीतलें -
विक्रमानें मनांत विचार केला कीं या ब्राह्मणाचें मन तीजक
डे लागलें आहे ह्मटलें आहे

वेधाद्वेधाभ्रमंचक्रे कांतासुकनकेषुच तासुतेष
प्यनासक्तः साक्षाद्भर्गोनराकृतिः

अर्थ

अर्थ- ब्रह्मदेवानें मोहकरणारे पदार्थ दोन उत्पन्न केले-एक स्त्रिया-दुसरें धन- यांस पाहून जो मनुष्य भुलत नाहीं तो केवळ महादेव जाणावा मग विक्रमराजा त्या वेश्येचे गावां गेला आणि रात्रो राक्षसास मारून तीस सुखी केलें- दुसरे दिवसीं तिला कमलाकरासमोर उभीकेली तिचीं सर्व भूषणें काढविली डोईचे केश मोकळे सोडविले तेव्हां तीचें सौंदर्य फार उणें दिसोंलागलें मग राजा भट्टजीस ह्मणतो ब्राह्मणा अशीला पाहून तूं कायह्मणोन भुललास अरे हे स्तन मासाचे गोळे आहेत हें हिचें तोंड थुंकी लाळ याणी भरलेलें असें आहे अशादुर्गंध पदार्थाचा अंगीकार करणे तो संतती करितांच करावा असा राजाने विषयाचा उपहास केला तेणेंकरून भट्टजीचा मनांतील काम विकार शांत झाला नंतर राजाने एक सुंदर स्त्री मेळवून भट्टजीचें लग्न करून दिल्हें ही कथा सांगोन मदनमंजरी ह्मणते हे भोजराजा असा पराक्रम तुजमध्यें असेल तर या सिंहासनावर बैस तें ऐकोन तो माघारा गेला दुसरे दिवसीं सिंहासनाजवळ गेला तों श्रृंगारकलिका नामे अकरावी पुतळी बोलली भोजराजा विक्रमासारिखें ज्याचें दयालुत्व असेल त्याणेंच याजवर बसावें इतरांस अधिकार नाही याणें विचारिलें कीं विक्रमाचें तें कसें होतें सांग श्रृंगारकलिका सांगत्ये

कथा ११

विक्रमराजा राज्यकरीत असतां कोणी एकयोगी नर्मदेच्या कांठीं योगाभ्यास करीत असे त्यास राजाने पालखी पाठवून बोलाविलें तेव्हां त्याणे उत्तर केलें मी विषयाची आशा सोडिली आतां राजाजवळ यावयाचें मला काय प्रयोजन आहे ह्मटलें आहे

आशायायेदासास्तेदासाः सर्वलोकस्य- आशायेषां
दासीतेषांदासायतेविश्वं १

अर्थ- जे आशेचे स्वाधीन झाले ते सर्वलोकांचे दास होतात आणि आशा ज्यांचे स्वाधीन झाली त्यांचे सर्वलोक दास होताहेत- आणिखी- आशा धरिल्यानें पापेंही घडतात ह्मटलें आहे

लोभमूलानिपापानि व्याधयोरसमूलकाः स्नेहमूला
निदुःखानि त्रयंत्यक्तासुखीभवेत्

अर्थ- पापाचें मूळ लोभ- रोगाचेंमूळ आवडेल तें खाणें दुःखाचें मूळ स्नेह होय- तस्मात् हीं तीन ज्याणें सोडिलीं तो सुखी होतो असा त्याचा निरोप ऐकोन विक्रमराजा त्याच्या दर्शनास गेला आणि त्याचि सेवा बहुत दिवस करिताझाला एके दिवसीं योग्यानें संतुष्ट होऊन योगबळानें एक फळ उत्पन्न केलें आणि हें भक्षिलें असतां मरण येईतोंपर्यंत शरिरास काहीं रोग हो

पार

णार नाहीं असा त्याचा गुण सांगोन फळ विक्रमास दिल्हें तें घेऊ
न राजा अवंतीस येतअसतां वाटेंत एक रोगी रक्तपित्तीने हातपा
य झडोन पडला होता त्यास पाहून विक्रमास कळवळा आला
आणि विचार करिताझाला कीं याचें दुःखपाहून आपण सुखा
ची इछा करणें हें योग्य नव्हे नंतर त्याणें तें फळ रोग्यासदिल्हें
आणि आपण अवंतीस येताझाला अशी कथा ऐकोन भोजरा
जा सिंहासना पासून परतला पुनः दुसरे दिवसीं सिंहासना
जवंळ गेला तों नरमोहिनी बारावी पुतळी बोलली हे भोजराजा
विक्रमासारिखे परोपकार तुझ्यानें होतील तर या सिंहासना
वर बैस त्याणें विचारिलें कीं विक्रमानें कोणावर उपकार केले
ते सांग नरमोहिनी सांगत्ये.

कथा-१२

विक्रमराजाने नियम केला होता कीं साहामहिने राज्यकार
भार करून प्रजांचें संरक्षण करावें आणि सांहामहिनें प्रधाना
स कारभार ओपून आपण अनेक देशाटन करीत असावें तेथें
जें कोणी गरीबदुबळे आढळतील त्यांस दुःखापासून सोडवावे
असा काळ वांटिला होता तेणेंकरून सर्वजन सुखी असत आ
णि राजाही निश्चिंत पणाचें सुख भोगीत असे ह्मटलें आहे

मात्रासमंनास्तिशरीरपोषणं भार्य्यासमंनास्तिशरी

रसोषणं

रतोषणं विद्यासमंनास्तिशरीरभूषणं चिंतासमंनास्ति शरीरशोषणं

अर्थ- आईसारिखें शरीराचें रक्षण करणार दुसरें नाहीं स्त्रीसारिखें शरीरास सुखदेणार आणखी नाहीं विद्येसारिखें शरीरास अन्यभूषण नाहीं चिंतेसारिखें शरीरास क्षीणकरणारें दुसरें नाहीं

अर्थातुराणांनपितानबंधुः कामातुराणांनभयंनलज्जा क्षुधातुराणांनबलंनतेज श्चिंतातुराणांनसुखं ननिद्रा

अर्थ- द्रव्याची इछा ज्यास फार आहे ते बाप आणि भाउबंद यांची भीड राखित नाहीत जे स्त्रीच्या व्यसनी लागले त्यांस भय आणि लाज वाटत नाहीं जे भुकेनें व्याकुळ त्यास तेज आणि बळ नसतें ज्यास चिंता आहे त्यांस कोटेही सुख होत नाहीं आणि निद्रा येत नाहीं— एके समयी राजा ज्योतिलिंगाचे दर्शनास जातअसतां वाटेंत एकारात्रीस वृक्षाखाली वसतीस राहिला त्या वृक्षावर अनेक देशीचे पक्षी बसून नाना प्रकारच्या गोष्टी बोलत होते त्या ऐकोंलागला- राजास पक्ष्यांची बोली समजत असे- त्यांतील एकपक्षी दुसऱ्यांस सांगतो अहो संवाळ

देशांत

देशांत उमरबेट नामेंनगर आहे तेथें एका राक्षसानें बहुत मनुष्यें भक्षिलीं तेव्हां सर्वांनी त्याची प्रार्थना केली कीं हे समर्था तूं अशीं माणसें मारशील तर कांहीं दिवसांनी सर्व नाहिंशीं होतील मग तुझाच निर्वाह चालणार नाहीं तर आह्मी तुला नित्यानें एक एक माणूस देत जाऊं तें खाऊन तुवां स्वस्थ राहावें यांत तुझें आणि आमचें बरें आहे- राक्षसानें तें मान्य केलें नंतर त्या नगरकऱ्यांनी दर घरास पाळी लाविली ती पाळी उद्यां एका फकीरावर आली आहे तो फकीर बहुत पस्थांस पोशित असतो त्यास राक्षसानें मारिल्यावर तेथें आह्मास दाणापाणी मिळणें कठीण आहे-असें त्याचें भाषण ऐकून सर्व पक्षी श्रमी होऊं लागले त्यांचें दुःख पाहून विक्रम राजा त्याक्षणीं दिव्यपादुका पायीं घालून त्या नगरास गेला आणि त्या फकीरास ह्मणाला तूं बहुत जीवांचें पालन करितोस आणि माझ्यानें कांहींच होत नाहीं ह्मणोन मी आपल्या जीवास कंटाळलों आहें तर तुझ्याजागीं मी राक्षसापाशीं जातों तें ऐकून तो ह्मणाला बाबा तुझी इच्छा मी तुला जा ह्मणोन सांगणार नाहिं- मग विक्रम त्या राक्षसाचे जेवायाचे शिळेवर जाऊन बसला- विक्रमास पाहतांच राक्षसाची दुष्टबुद्धि गेली आणि त्यास पुसतो तूं कोण आहेस- राजानें उत्तर केलें तूं आपलें काम कर माझी चौकशी कशास करितोस राक्षस बोलला नाहीं नाहीं तुला पाहतांच माझी दुष्टबुद्धी गेली- तुझें धैर्य पाहून मी प्रसन्न झालों काय पाहिजे तें माग- विक्रम ह्मणाला तूं आजपासून मनुष्यें खाऊं नको तें मान्य करून

तो राक्षस द्वीपांतरीं गेला आणि विक्रमराजा अवंतीस आला- अशी कथा ऐकून भोजराजा माघारां गेला पुनः दुसरेदिवशीं सिंहासनाजवळ आला तों भोगनिधी तेरावी पुतळी बोलली हे राजा तुझें धैर्य विक्रमासारिखें असेल तर यावर बैस भोजराजानें विचारिलें विक्रमाचें धैर्य कसें होतें तें सांग भोगनिधी सांगत्ये

कथा- १३

विक्रमराजा राज्यकरीत असतां अवंतीचेठाई कोणी एक भद्रसेननामा सावकार मरण पावला तेव्हां त्याचा पुत्र पुरंदरनामक विचार करीता झाला कीं सर्व हें नाशवंत आहे- जी बापाची अवस्था झाली तशीच माझी होणार असें विचारून तो प्रपंच्यावर निस्पृह होऊन घरच्या सर्वसंपत्ती ब्राह्मण दीन अंध इत्यादिकांस देता झाला ह्मटलें आहे

उदारस्यतृणंवित्तं शूरस्यमरणंतृणं विरक्तस्यतृणंभार्या निःस्पृहस्यतृणंजगत्

अर्थ- उदार पुरुषास द्रव्य तृणवत् शूरास मरण विरक्तास स्त्री- निःस्पृहास सर्वजग तृणाचेपरी तुछ वाटतें याप्रकारें तो विरक्त होऊन तीर्थयात्रा करावयास जाताझाला कोणे एके रात्रीस भद्रेश्वरनामक देवाचे देवळांत राहिला होता तेथें रात्रीं कोणी

णी मोटयानें रडूं लागलें तें ऐकून त्याणें तेथील राहाणारांस पु
शिलें कीं हें कोण रडतें - लोक ह्मणाले आह्मीही असेंच नित्य ऐ
कतों परंतु आमच्यानें रात्रीचें अरण्यांत जाउन शोध करवत
नाहीं - जो मोटा धैर्यवान असेल तोच याचा शोध करील - पु
रंदर यात्राकरून अवंतीस आला तेव्हां त्याणें तीगोष्ट विक्रमास
सांगीतली तीऐकून राजा त्यास बरोबर घेऊन त्या देवळांत गे
ला. तेथें रात्रीस रडणें ऐकून त्याच्या सुमारानें अरण्यांत गेला
तों मोटा एक राक्षस एक्या स्त्रीस मारितो आणि ती रडत्येआ
हे असें पाहून राजा त्यास ह्मणतो अरे दुष्टा ही गरीब स्त्री इला
तुं कां व्यर्थ मारितोस. तुजमध्यें सामर्थ्य आहे तर ये मजशीं ल
ढ - पाहुं तुझा पराक्रम - असें ऐकतांच तो राक्षस चालोन आला
तेव्हां विक्रमानें युद्धकरून त्यास मारिलें आणि त्या स्त्रीस वि
चारिलें तुं कोण तुला हा कां छळित होता ती सांगत्ये मी ब्रा
ह्मणी आहें आपल्या पतीस बहुत गांजीत होत्यें ह्मणून राग
नें त्याणें प्राण दिला आणि राक्षस होऊन मला नित्य मारी
त होता त्या दुःखापासून आज मला तुं सोडविलेंस मी तुझी
फार उपकारी झाल्यें तर पतीचें द्रव्य बहुत आहे तें सर्व तुला
मि देत्यें - असें बोलोन मोहोरांचे सात हांडे राक्षसानें रानांत
पुरुन ठेविले होते ते दाखविले विक्रमराजा दुसरे दिवसीं तें
सर्व द्रव्य गरीबगुरीबांस देऊन आपण अवंतीस येता झाला -
अशी कथा ऐकून भोजराजा माघारा जाता झाला दुसरे दिव

सीं

सीं सिंहासनाजवळ आला तों रतिप्रिया चौदावी पुतळी बोलली हे भोजराजा विक्रमासारिखा दाता असेल तोच यावर बसेल इत रांस अधिकार नाहीं तें ऐकून त्याणे विचारिलें विक्रमाचें दातृत्व कसें होतें सांग - रतिप्रिया सांगत्ये

कथा - १४

राजा विक्रम देशाटण करीत असतां कृष्णातीरीं गेला तेंहुं राण कथन चाललें होतें तें ऐकत बसला त्यासमयीं पुराणिकानें हा श्लोक वाचिला

परोपकाराय फलंति वृक्षाः परोपकाराय वहंति
नद्यः परोपकाराय दुहंति गावः परोपकारार्थमि
दं शरीरं

अर्थ - परोपकारासाठीं वृक्ष फळतात - परोपकारासाठीं नद्या वाहातात - गाई परोपकारासाठीं दूध देतात हें शरीर परोपकारासाठींच ईश्वरानें दिलें आहे इतक्यांत एक ब्राह्मण पलीकडुन स्त्रीस घेऊन येत होता तो कृष्णेंत बुडों लागला तेव्हां त्यापीं पुराणास लोक बसले होते त्यास बहुत हाका मारिल्या परंतु त्यास काढायास कोणही गेला नाहीं तेव्हां विक्रमानें नदींत उडी घालली आणि त्यास बाहेर काढिलें मग त्या ब्रा

त्मण

ह्मण राजास ह्मणतो मी आज स्त्रीसहित प्राणास मुक्त होतों तो तुझ्यायोगानें वांचलों तर मीं जें बारावर्षे तप केलें आहे त्याचें पुण्य तुला दिलें - असें ह्मणून तो राजाच्या हातीं उदक घालताझाला नंतर विक्रम अवंतीस येत असतां वाटेंत विकाळ स्वरूप एक ब्रह्मराक्षस उभाराहिला आणि ह्मणाला हे महापुरुषा मी या ब्रह्मराक्षस योनीत दुःख पावतों माझा उद्धार कर तें ऐकून राजानें ब्राह्मणानें दिलेलें पुण्य त्या ब्रह्मराक्षसास दिलें तेणेंकरून तो पापांसून मुक्त होऊन स्वर्गास गेला आणि विक्रम अवंतीस येताझाला अशी कथा ऐकून भोजराजा माघारा गेला पुनः दुसरे दिवशीं सिंहासनाजवळ गेला तेव्हां सुमित्रानामें पंधरावी पुतळी बोलली हे भोजराजा विक्रमासारिखा तुझा ईश्वरावर भरंवसा असेल तर या सिंहासनावर बैस त्याणें विचारिलें विक्रमाचें तें कसें होतें सांग सुमित्रा सांगते

कथा १५

विक्रमराजा तीर्थयात्रा करीत असतां कोणेएके समयीं आवढ्या नागनाथास गेला तेथें देवळांत एक योगी होता त्याणें त्यास बोळखिलें आणि विचारिलें हे विक्रमा तूं राज्य टाकून असा कां फिरतोस - विक्रम बोलतो आपणासारिख्या साधूंचें दर्शन घ्यावयास योगी ह्मणतो तिकडे कोणी शत्रु आला त्यास तुझें राज्य कोण रक्षील - जरी प्रधानादिक असले तरी धन्यावांचून त्यांस तेज अ

मन नाहीं - विक्रम ह्मणतो ही चिंता मी कशास करूं - आणे मला राज्य दिलें त्यास याची काळजी आहे याविषयीं मी एक कथा सांगतो ऐक

पूर्वी जयखंड नगरींत जयशंकर नामा राजा राज्य करीत होता - एकेसमयीं दायादानीं त्याचें राज्य कपटानें घेऊन त्यास गांवा बाहेर लाऊन दिलें मग तो स्त्रीसहित देशोदेशीं फिरत असतां भद्रावती नगरी जवळ रात्रौ एके वडाखालीं निजला त्या वडावर पांच यक्ष राहात होते ते आपआपल्यांत बोलूं लागले ह्या नगरीचा राजा मरण पावला आहे आस पुत्र नाहीं आतां हें राज्य कोणास द्यावें - त्यांतील एक बोलला हीं स्त्रीपुरुषें फार संकटांत आहेत यांस देऊंयां - तें सर्वांनी मान्य केलें तें ऐकून राजा दुसरे दिवशीं स्त्रीला घेऊन त्या नगरांत गेला तों तेथें प्रधानादिकानीं हत्तीण ज्याला माळ घालील तो राजा करावा असा निश्चय करून सोंडेंत माळ देऊन हत्तीण सोडिली होती तेव्हां यक्षानीं आपल्या सामर्थ्यानें हत्तीणी करवीं शंकर राजाचा गळ्यांत माळ घालिविली मग प्रधानानीं त्यास राज्याभिषेक केला असा तो राजा राज्य करीत असतां त्यावर शत्रू चढून आला तेसमयीं जयशंकर राजाची स्त्री ह्मणाली हे महाराज परचक्रानें सर्व नगरास वेढा घातला अद्यापि आपण कांहीं उद्योग करीत नाहींत याचें कारण काय त्याणें उत्तर केलें ज्याणी मला राज्य दिलें तेच यक्ष रक्षण करतील मी कशास काळजी करूं असें बोलोन जयशंकर राजा

जा स्वस्थ बसला मग यक्ष आपल्या मनांत ह्मणतात कीं याणें आ
मच्यावर विश्वास ठेविला आहे तर आह्मास याचें राज्य रक्षण क
रणें प्राप्त आहे नंतर यक्षानीं आकाशांतून पाषाणवृष्टी करून प
रचक्राचा पराभव केला तें कौतुक पाहून राणी बोलली हें कर्म यक्षा
वाचून दुसऱ्याचें नव्हे- बरें येवढे उपकार यक्ष आह्मांवर कां क
रितात असें बोलत असतां तेथें यक्ष येऊन ह्मणाले आह्मी पूर्व
जन्मी कांहीं एक दीषारत्तव मत्स्य होऊन लाहानशा तळ्यांत पाण्या
वांचून घाबरे होऊं लागलों तेव्हां हा तुझा पती कुंभार होता याणें
आह्मास मोट्या सरोवरांत नेऊन सोडिलें तो उपकार स्मरून आ
ह्मीं यास राज्य दिलें आणि संरक्षणही केलें असे त्यांचें भाषण
ऐकून राजाने त्यांस नमस्कार केला नंतर ते आपल्या स्थानास
गेले ही कथा ऐकून योग्यानें प्रसन्न होऊन विक्रमास चिंताम
णी रत्न दिलें- तें घेऊन तो उज्जनीस येत असतां वाटेंत ए
क ब्राह्मण येऊन ह्मणाला मी दरिद्रानें बहुत त्रासलों माझें दरि
द्र दूर करावयास तूं समर्थ आहेस तें ऐकून विक्रम त्यास चिं
तामणी देऊन आपल्या नगरास गेला ही कथा श्रवण करून भो
ज राजा माघारां गेला पुनः दुसरे दिवसीं सिंहासनाजवळ आ
ला तों प्रेमावती सोळावी पुतळी बोलिली हे भोजराजा विक्रमा
सारिखें ज्याचें सामर्थ्य असेल तोच याजवर बसेल- भोज राजा पु
सूं लागला विक्रमाचें सामर्थ्य कसें होतें सांग प्रेमावती सां
गत्ये

कथा

कथा १६

विक्रमाचा एक मित्र सुमतिनामा होता तो काशीयात्रा करून अवंतीस येत असतां वाटेंत एका देवालयांत उतरला तेथें येक कढई तेलानें भरून तीच्याखालीं जाळ लाविला होता आणि लग्नाचें सर्व साहित्य करून ठेविलें होतें तें पाहून सुमतीनें लोकांस विचारिलें कीं येथें काय आहे त्याणीं सांगीतलें या गांवांत मदनमंजरी राजकन्या बहुत सुंदर आहे तिणें नियम केला आहे कीं जो या कढईंत उडीटाकून जीवंत निघेल त्याची मी स्त्री होईन आणि सर्व राज्य त्यास देईन यासाठीं बहुत राजपुत्र आले आहेत कितीएक या कढईंत उडीटाकून मेले- असें लोक सांगतात हेत तों मदनमंजरी देवीच्या दर्शनास आली तिला पाहातांच सुमति बहुत मोहित होऊन मनांत ह्मणतो आहा- काय हें सौंदर्य अशीसुंदर स्त्री ज्यास मिळेल तो धन्य तोच पुण्यवान्- व्यर्थ माझा जन्म असा तो तीच्या चिंतेनें फार शुष्क होऊन अवंतीस आला विक्रमाची भेट झाली तेव्हां त्याणें विचारिलें सख्या तूं सुष्क कां झालास त्याणें मदनमंजरीचें वर्तमान सांगीतलें तें ऐकून विक्रम मनांत ह्मणतो हा माझा मित्र याचें दुःख दूर करावें हें भला योग्य होय संकटकाळीं जो कामास न पडे तो मित्र कशाचा- नंतर तो सुमतीस ह्मणतो सख्या मदनमंजरीच्या गांवांत जाऊं चल तें ऐकून सुमतीस बहुत आनंद झाला- मग दोघेजण योगपादुकांवर बसून त्या देवळांत गेले तेथें सु

मतीने सांगीतल्याप्रमाणें पाहून राजा त्या कढईजवळ गेला इतक्यां त मदनमंजरी तेथें आली आणि विक्रमास पाहून आपल्यामनांत खिन्नहोऊन ह्मणत्ये हायहाय असा दिव्यपुरुष मजकरितां आला आणि आतां माझी दुष्टप्रतिज्ञा पाहून माघारा जाईलकीं- मग ती राजास ह्मणाली हे माहापुरुषा मी मनासारिखा पती मिळा वा ह्मणोनच अशीप्रतिज्ञा केलीहोती ती आतांराहो- मीतुलावर थें विक्रम बोलला हेंठीकनव्हे जरकां मी कढईंत उडीनघालितां तुझा पती झालों तर यांत दोघांचीही अपकीर्ति होईल आणि सर्व लोकहां सुं लागतील ह्मणोन तुझीप्रतिज्ञा मी शेवटास नेतों नंतर तुंमीसां गेन तसेंकर- असें तिशीं बोलोन विक्रमानें वेताळाचें स्मरण क रून त्या कढईंत उडी टाकिली तेसमयीं वेताळानें अमृत शिंपूनरा जास बाहेर काढिला- तो बाहेर यैतांच पहिल्यापेक्षां अधिक सुंदर दिसोंलागला तेव्हां मदनमंजरी त्यास नमस्कार करून बोलली रा जा तुझा जयजयकार असो तुझ्या सारिखे अवतारी पुरूषांचे आधा रानेंच ही पृथ्वी राहिली आहे- ह्मटलें आहे

येदीनेषुदयालवः स्पृशातियानस्पोपिनश्रीमदोव्यग्रायेच परोपकारकरणेहृष्यंतियेयाचिताः स्वस्थाः सतिन्दचोय नोन्मदमहाव्याधिप्रकोपेपियैर्नैः स्तंभैरिवसुस्थिरैःकि लभरक्रांताधराधार्यते

अर्थ

अर्थ-जे पुरुष दीनांचेठाई दयाळु-ज्यांस संपत्तीने गर्व होत नाही जे परोपकार करण्यांविषयीं सर्वांचे पुढें-कोणी कांहीं मागीतलें असतां ज्यांस हर्ष होतो-तारुण्याचे भरामध्यें असतां उन्मत्त होऊन ज्यांचें चित्त चंचळ होत नाही-ते पुरुष मला वाटतें कीं या पृथ्वीचे टेंके होत-असी मदनमंजरीने विक्रमाची स्तुती केल्यानंतर विक्रम तीस ह्मणाला तूं माझ्या मित्राची स्त्री हो-ती बोलली मी तुझीच स्त्री होईन दुसऱ्यास पती करणार नाहीं-विक्रम ह्मणाला तूं सांगशील तें मी ऐकेन असें तूं आगोदर मान्य केलेंस ह्मणोन मी येवढें हें साहस कर्म केलें तर आतां तुला माझें ह्मटलेलें करणें प्राप्त आहे तें ऐकून मदनमंजरी निरुपाय झाली आणि तीणे सुमीत्रास वरिलें-मग विक्रमराजा सुमीत्रास तें राज्य देऊन आपण अवंतीस आला-ही कथा ऐकून भोजराजा माघारीं गेला पुनः दुसरे दिवसीं आला असतां सुप्रभा नांवाची सत्रावी पुतळी ह्मणाली राजा विक्रमासारिखें दान तुझ्यानें होईल तरच यासिंहासनावर बैस-त्याणें विचारिलें विक्रमानें दान कोणास केलें सुप्रभा सांगते-

कथा-१७

राजा विक्रम कोणेएके दिवसीं शिकारीस गेला होता तो मोठा एक डुकर पाहून त्याच्या पाठीस लागला असतां डुकर पर्वताचे गुहेंत शिरला ह्मणोन त्याचें पाठीमागें राजाही गुहेंत गेला-तो तेथें पाताळांत जाण्याचा मार्ग होता तो पाहून त्याणें विचार केला कीं या विवरांत उतरलें असतां कोठें जातो तें पाहुंया-मग तो बोराच्या रवांचावर बसून.

न त्या मार्गानें गेला तों पाताळांत पावला- तेथें बळीचे दाराजवळ शं
ख चक्र गदा पद्म असीं चार आयुधें हातांत घेऊन विष्णु उभा होता
त्यास पाहिलें आणि साष्टांग नमस्कार घातला तेव्हां विष्णुनें वि
क्रमास आलिंगन देऊन बळीचे घरांत नेला- बळीनें त्यास आप
ल्याजवळ बसऊन विचारिलें तूं येथें कोणीकडे आला आहेस- विक्र
म ह्मणाला आपलें आणि श्रीविष्णुचें दर्शन व्हावें ह्मणांन आलों- ती
इछा माझी परिपूर्ण झाली- मग उभयतांनी नाना प्रकारच्या गोष्टी के
ल्या- नंतर बळीनें विक्रमास सांगीतलें- माझे राज्यांतील तुला जी
वस्तू पाहिजे ती माग- मी देईन- तें ऐकून विक्रम ह्मणाला महारा
जा तुमचें दर्शन झालें यांत माझे सर्व मनोरथ पूर्ण झाले- दुसरें मला
काहीं नको- बळी ह्मणतो विक्रमा तूं संकोच धरितोस- तुला माझे मै
त्रीची आठवण राहावी असें माझ्या मनापासून आहे यासाठीं तुला
आवडेल तें मी द्यावयास सिद्ध आहें- ह्मटलें आहे

ददातिप्रतिगृण्हाति गुह्यमाख्यातिपृछति भुंक्ते भोजयते
चैव षड्विधंप्रीतीलक्षणं

अर्थ- आपली वस्तू मित्रास देतो- मित्रानें दिली ती घेतो- आपली
गुजगोष्ट मित्रास सांगतो- मित्राची पुसतो- मित्रानें घरीं जेवायास ना
तो- आणि त्यास आपल्या घरीं जेवायास बोलावितो- हे साहा प्रकारची
तीचे आहेत- याप्रमाणें बळी बोलला असतां विक्रम उगाच राहिला नं

तर

तर बळीनें सर्पाच्या मस्तकावरचा एक अमोलीक मणी विक्रमास दिला तो घेऊन विक्रम गेलेल्या मार्गानें माघारा भूतलावर आला- आणि अवंतीस येत असतां वाटेंत एका ब्राह्मणानें त्याची प्रार्थना केली- राजा मी फार दळिद्री आहें माझें दळिद्र दूर कर- तें ऐकून राजास दया आली आणि तो दिव्यमणी जवळ होता तो देऊन त्या ब्राह्मणास संतुष्ट केलें अशी कथा ऐकून भोजराजा माघारा गेला पुनः दुसरे दिवसीं आणि खीविक्रमाची कीर्ती श्रवण करावयाकरितां सिंहासनाजवळ आला तो कुरंगनयना अठरावी पुतळी बोलली राजा विक्रमासारिखा परोपकार तुझ्यानें होईल तर या सिंहासनावर बैस- त्याचा परोपकार कसा होता तो मी सांगत्ये ऐक

कथा-१८

कोणी एका ब्राह्मणानें चंद्रसेनराजाजवळ विक्रमाची बहुत स्तुति केली ती ऐकून त्याणें मनांत आणिलें कीं विक्रम आपला शत्रू होय- तर त्यापेक्षां आपली कीर्ति अधीक होईल तें करावें असा निश्चय करून चंद्रसेनानें देवाजवळ तपश्चर्या केली तेव्हां देवीनें प्रसन्न होऊन त्यास वर दिला कीं तू आपल्या शरीराची आहुती दे म्हणजे मी तुझ्या भारंभार सोनें देत जाईन- त्यावरून तो राजा नित्यानें बहुत वेळ अग्नींत उडी [illegible] आणि वरा प्रमाणें देवी त्यास जीवंत करून त्याचें भारंभार [illegible] ली- तितकेंही सोनें तो विक्रमाच्या ईर्षेस्तव ब्राह्मणास देत [illegible] मान विक्रमास कळलें तेव्हां त्याणें विचार केला कीं चंद्रसेन [illegible]

करितां एवढें दुःख भोगितो तर आपण त्याचें दुःख दूर करावें असा निश्चय करून तो देवीजवळ गेला आणि तिची प्रार्थना करून ह्मणतो- हे जगदंबे तूं सर्वांचें दुःख दूर करितेस अशी तुझी कीर्ति लोकामध्यें गाजत आहे- तर आतां माझ्या देहाची एकदांच आहुती घेऊन चंद्रसेनास अक्षय लक्ष्मी यावी त्यास वारंवार अग्नींत पडायाचा श्रम देऊं नये- अशी प्रार्थना करून विक्रमानें कुंडांत उडी टाकिली- तेव्हां देवी प्रसन्न झाली आणि त्यास जीवंत करून ह्मणते- हे राजा तुजसारिखा परोपकार कर्ता दुसरा होणार नाहीं दुसऱ्याचें दुःख दूर करायासाठीं आपल्या प्राणावर उदार होणें हें फार कठिण आहे त्यांतही चंद्रसेन तुझा द्वेष करीत असतां तूं त्यास दुःख न व्हावें ह्मणोन आपला प्राण दिल्हास तस्मात् तुझी बरोबरी करणारा कोण आहे राजा- तर आतां तुझी प्रार्थना मी मान्य केली असें बोलोन देवी गुप्त झाली- विक्रमराजाही अवंतीस गेला अशी कथा ऐकोन भोजराजा माघारा गेला- पुनः दुसरे दिवशीं सिंहासनाजवळ आला तेव्हां एकुणीसाची पुतळी चंद्रज्योती बोलली हे भोजराजा विक्रमासारिखें दुर्घट कर्म तुझ्यानें होईल तर या सिंहासनावर बैस तें ऐकोन भोजराजा विचारितो त्याणें कोणतें दुर्घट कर्म केलें तें सांग- चंद्रज्योती सांगते

कथा- २०

राजा विक्रम राज्य करित असतां कोणी एक ब्राह्मण विंध्यपर्वतावरून येऊन राजास भेटला- राजानें त्यास विचारिलें- आपण कांहीं

चमत्कार

(८०)

चमत्कार पाहिला असेल तो सांगावा- ब्राह्मण बोलला राजा मी जो चमत्कार पाहिला आहे तो सांगीतला असतां तुला खोटें वाटेल-ह्मणोन मी सांगावयास अशंकतों- असें ऐकोन राजानें बहुतच आग्रह केला तेव्हां तो ब्राह्मण सांगुं लागला राजा ऐक मी पृथ्वी प्रदक्षणा करावयास निघालों तो विंध्याचलावर पावलों तेथें एक तळें पाहिलें त्या तळ्यांत एक खांब आहे त्यावर रत्नजडित सिंहासन आहे तो खांब सूर्य उगवला ह्मणजे दिसों लागतो मग जसाजसा सूर्य चढतो तसातसा तो खांब उंच वाढत जातो- तेथील लोक असें सांगतात कीं मध्यान्हीं सूर्य त्या खांबावरच्या सिंहासनावर बसोन अमृत प्राशन करीत असतो- नंतर जसाजसा सूर्य उतरतो तसातसा तो खांब पाण्यांत बुडतो सूर्य मावळतांच खांब दिसेनासा होतो- त्या तळ्यांत जो स्नान करितो त्याचीं सर्व पापें जातात तें ब्राह्मणाचें भाषण ऐकोन विक्रमास बहुत आश्चर्य वाटलें- मग आपण योग पादुका पायांत घालून त्या तळ्याजवळ गेला- तेथें दिवस उगवतां ब्राह्मणानें सांगीतल्याप्रमाणें खांब दिसों लागला त्यास नमस्कार करून विक्रम त्याजवर जाऊन बसला तोंडानें सूर्यमंत्राचा जप करितो आहे- मग जसाजसा खांब उंच गेला तसातसा विक्रमास अधिक दाह होऊं लागला तो प्रहर दिवस येतां येतां प्राण कासावीस होऊन मरण पावला- नंतर दोन प्रहरीं सूर्य त्या सिंहासनावर बसोन अमृतप्राशन करीत असतां [illegible] शिंपुन विक्रमास जीवंत केलें- तेसमयीं विक्रमानें स्तुति [illegible] स प्रसन्न केला- तो वर मागह्मणाला तेव्हां विक्रमानें प्रा[illegible]

देवा तुझें दर्शनच होणें दुर्घट - तें होऊन तुजशीं भाषण झालें आतां आण
खी काय मागुं - तें ऐकोन सूर्यानें आपले कानांतील कुंडलें काढून विक्रमा
स दिलीं आणि मागीतलें या कुंडलांपासून नित्य एक भार सोनें उत्पन्न हो
ईल - असें बोलुन सूर्य आकाशीं गेला - सायंकाळीं विक्रम पृथ्वीतळीं ये
ऊन अवंतीस जात असतां वाटेंत त्याणें एक ब्राह्मण कुटुंबवत्सळ अत्यंत
दरिद्री पाहिला तेव्हां त्यास तीं सूर्यानें दिलेलीं कुंडलें अर्पण केलीं आणि
आपण अवंतीस आला - ही कथा ऐकोन भोजराजा माघारा गेला पुनः दु
सरे दिवशीं सिंहासनाजवळ आला तों चंद्रकांती विसावी पुतळी बोलली
विक्रमासारिखें साहसकर्म तुझ्यानें होईल तर या सिंहासनावर बैस - तें
ऐकोन त्याणें विचारिलें कीं विक्रमानें कोणतें साहस कर्म केलें - चंद्रकां
ती सांगते

कथा - २०

कोणीएक माधवनामी ब्राह्मण बहुत चतुर गाणारा स्वरूपवान असा हो
ता - त्याणें ज्या राजाजवळ जावें त्या राजाचे मनांत यावें कीं हा मदनासारिखा
सुंदर आणि गुणवंत आहे यास पाहून आपल्या स्त्रिया मोहित होतील -
[illegible]ला आपले राज्याबाहेर लाउन द्यावा - असें बहुत ठिका
[illegible] तो माधव पश्चात्ताप पावोन तीर्थयात्रा करीत असतां
[illegible] नगरीस आला - तेथें कामसेनराजाचे घरीं कामकंदला ना
[illegible]यकीण गात होती तेथें दरवाजांत उभा राहिला आणि तें
[illegible]ला कीं गायन करणारी तर बहुत चतुर आहे परंतु एक

पारे

णारे सर्व मूर्ख आहेत- असें दोनतीनवेळ बोलला तें सेवकानें राजाससांगीतलें- राजा सेवकास ह्मणाला कीं त्यास विचार कीं तूं सर्वांस मूर्ख ह्मणतोस तें कसें तें सांग- सेवकानें तसें विचारिलें तेव्हां माधव ह्मणाला येथें जो मृदंग वाजवितो आहे त्यास आंगठा नाहीं ह्मणोन त्याची थाप चांगली उठत नाहीं इतकें या गाण्यांत उणें आहे तें कोणाचे लक्षांत येत नाहीं सेवकानें तें राजास सांगीतलें असतां राजानें चौकशी केली तेव्हां समजलें कीं मृदंगी याणें मेणाचा आंगठा लाविला आहे मग कामसेन राजानें दुसरा मृदंगी आणवुन माधवास वस्त्रें भूषणें दिली आणि सभेंत आणून बसविलें आणि कामकंदलेस सांगीतलें हा ब्राह्मण फार चतुर आहे तर जितका तुझ्यांत गुण असेल तितका आज यास दाखीव- तें ऐकोन तिणें उत्कृष्ट नाच व गायन केलें- तो तिचा गुण पाहून माधव फार प्रसन्न झाला आणि ब्राह्मण ह्मणोन त्याणें राजानें दिलेलें सर्व तिला दिलें तें राजास न साहाइन त्याणें सेवकास आज्ञा केली कीं यासणी यास गांवाबाहेर लाऊन द्या- आज्ञा होतांच तितके रात्रीं सेवकानीं त्यास गांवा बाहेर नेऊन सोडिला ते समयीं माधव एके झाडाखालीं बसोन विचार करितो

माता यदि विषं दद्यात विक्रीणाति पिता सुतं राजा हरति स
र्वस्वं तत्र का परिदेव[illegible]

अर्थ- जरकां आई न विष देईल- अथवा बापच पु[illegible] विकील- किंवा राजाच सर्वस्व हरील- तर तेथें कोणाचा उपाय चालणार [illegible]

असा

असा तो चिंता करीत बसला आहे तंव इकडे कामकंदला नाच करून
घरास आली आणि आपल्या चाकरांस ह्मणाली त्या ब्राह्मणास शोधक
रून याक्षणी घेऊन या- तें ऐकोन तितके रात्रीस सेवकानी शोधकरू
न माधवास तीचे घरीं नेला- नंतर ती फार श्रमी होऊन बोलली-
माधवा मजकरितां तुझा अपमान झाला तर आतां जितका वेळ आ
नंदांत जाईल तितका घालवुंया- प्रातःकाळीं तुजकरितां राजानें मा
झा प्राण घेतला तथापि मला मान्य आहे असें ह्मणून तीणें गायना
स आरंभ केला तें सुस्वर गायन ऐकोन माधवास वाटलें कीं ही कोणी
स्वर्गींची अप्सराच आली आहे काय- मग तीनें गाणें संपल्यावर माध
वानें गाईलें तें ऐकोन कामकंदलेचा गर्व जाऊन तीचे आंगावर रोमां
च उभे राहिले आणि डोळ्यांवाटे आनंदाश्रूंच्या धारा चालों लागल्या- ते
व्हां तीस वाटलें कीं हा कोणी साक्षात गंधर्वच आहे काय- याप्रमा
णें तीं उभयतां गायनाचे रंगांत होतीं तव इतक्यांत पाहाट झाली ते
व्हां माधवास राजाज्ञेचें स्मरण होऊन तो कामकंदलेस बोलला आतां
मी जातों नाहींतर मजकरितां राजा तुला यातना करील कामकंदला
बोलली माधवा तुझेसारिखा गायनाचा भोगी सोडून मी या मूर्खांज
वळ याउपरांत राहात नाहीं मी तुझे बरोबर येतें माधव ह्मणाला ही
गोष्ट सध्या अवघड आहे ईश्वराचे इछेनें जेव्हां घडेल तेव्हां घडो
परंतु आतां तर मी निघोन जातों मागाहून तुला नेण्याचा य
त्न करीन- तें ऐकोन तिस बहुत दुःख झालें माधवास ही ग
हिंवर आला मग तो तसाच उठोन रडतरडत गावांबाहेर गेला नं
तर

र तीच्या वियोगानें अत्यंत दुःखित असा देशोदेशीं फिरत असतां विक्रमा
ची कीर्ति ऐकोन अवंतीस आला आणि एका देवळांत राहिला तेथें रा
त्रीस कामकंदलेचा अतिशय शोक करीत बसला आहे इतक्यांत विक
माची स्वारी आली त्याणें त्यास पाहिलें आणि पुशिलें हे ब्राह्मणा तुला का
य दुःख आहे तें सांग रे मी विक्रमराजा तुझें दुःख दूर करीन तें ऐकोन मा
धवानें सर्व वर्तमान सांगीतलें तेव्हां विक्रम ह्मणाला ब्राह्मणा - आधीं वे
श्येशीं प्रीति करणें - मग तीच्या विरहमानणें हा मोटा वेडेपणा - रे तीध
ना करितांच पुरुषाला आपली प्रीति दाखवित असत्ये - माधव बोलला रा
जा तू ह्मणतोस हें खरें आहे परंतु ती तशी नव्हे - ती माझ्या गुणाची जा
णती आहे ह्मणोन आह्मी उभयतां एकत्र असल्यावांचून फार दिवस वां
चणार नाहीं - तें ऐकोन विक्रमानें त्या ब्राह्मणास आपल्ये घरीं आणिलें आ
णि सुंदर वेश्या गायन करणेंत निपुण अशा त्याचेपुढें उभ्या करून त्यास
ह्मणाला यां स्त्रियांतून जी तुला पाहिजे ती घे - माधव बोलला राजा
कामकंदलेसारखी कामकंदलाच तर तीचा आणि माझा योग करशी
ल तरच हा देह ठेविन - तो त्याचा निश्चय पाहून दीनदयाळु राजा त्या
स बरोबर घेऊन सर्व सैन्यसुद्धां देवनगरीजवळ गेला आणि कामसे
न राजास पत्र लिहिलें कीं मी विक्रमराजा कामकंदले
सी आहें - तिला पाठऊन दे नाहीं तर युद्धास सिद्ध हो - स
त्तर लिहिलें कीं मी कामकंदला देत नाहीं युद्ध कराया
व्हां विक्रमानें विचार केला कीं आधीं कामकंदलेचे
पाहूं नंतर युद्ध करूं - मग तो येकटाच तीच्या घराज

णि मी वैद्य आहें असें बोलला- तें ऐकून दासीनीं त्यास माडीवर नेऊ
न कामकंदलेस दाखविलें तेव्हां राजा तीचें नाव विचारून तीची परिक्षा
करून बोलला- इला विरहाचें दुखणें आहे तें ऐकोन कामकंदला बो
लली- तर याचा उपाय तुह्मापाशीं नाहीं- मग उगाच कां श्रम घेतोस
राजानें उत्तर केलें खरेंच- गोष्ट गतली- नाहींतर तुला ज्याचा विरह
आहे तो पुरुष आणून दिला असता परंतु थोडेच दिवस झाले- मा
धव तुझें नांव घेतांघेतां मरण पावला- ते शब्द कर्णीं पडतांच ती
वेश्या माधवा माधवा असें ह्मणोन प्राण सोडिती झाली तें पाहून
घरांतील सर्व मनुष्यें रडोंलागलीं त्यांस विक्रम बोलला तुह्मीं रडूं
नका इला मूर्छा आली आहे- औषध आणून मी आतां सावध करीन
असें सांगोन राजा माधवाजवळ आला आणि त्यास कामकंदलेचें
वर्तमान सांगीतलें ते ऐकतांच कामकंदले कामकंदले असें बोलोन
त्याणेंही प्राण सोडिला- तेव्हां विक्रम पश्चात्ताप पावोन ह्मणतो- हाय
हाय दोघांची हत्या मला झाली आतां हा दोष घेऊन माघारें जाण्या
पेक्षां येथेंच मरावें हें बरें- असा निश्चय करून अग्नी पेटऊन आंत
उडी टाकूं लागला तेसमई वेताळ प्रगट होऊन ह्मणाला- राजा प्राण
[illegible] मी एकवस्तु देतों ही त्यांच्या मुखांत घाल ह्मणजे तीं जीवं
[illegible] असें बोलोन तो विक्रमास अमृतसंजीवनी औषधी देता
[illegible]ऊन विक्रमानें तसें करीतांच दोघेंही जीवंत झालीं- तें
[illegible]मसेनास जिंकिलें आणि कामकंदला माधवाचे स्वाधीं
[illegible] कामसेनाचे राज्यावर स्थापिला आणि आपण अवंती

स गेला-ही कथा ऐकोन भोजराजा माघारा गेला दुसरे दिवशीं आला तेव्हां एकविसावी पुतळी सौभाग्यमंजरी बोलली-हे भोजराजा विक्रमा सारिखें खरें खोटें पाहाणें तुझ्यानें होईल तर यासिंहासनावर बैस त्या णें पुसिलें कीं विक्रमाचें तें कसें होतें तें सांग तेव्हां सौभाग्य मंजरी-सांगते

कथा-२१

एके दिवसी विक्रमानें प्रधानास विचारिलें कीं मनुष्यांस बुद्धि ये ते ती त्याच्या पूर्वकर्मानें किंवा मातापिता गुरू यांच्या शिकविण्यानें ये ते तें सांग-प्रधानानें उत्तर केलें-हे महाराज जर दुसऱ्याच्या शिकवण्या ने बुद्धी येती तर मूर्ख कोणीच नहोते सर्व लोक पंडितच होते-कां-सर्व मनुष्यांस असें वाटतें कीं आपल्यास सर्व विद्या याव्या आणि सुख व्हावें-परंतु हें कोणाच्ये स्वाधीन नाहीं म्हणोनच कित्तीएक शाहाणे व कित्तीएक मूर्ख असे होताहेत-राजा-बोलला हें जर खरें तर लोक मुलांस विद्या शिकवण्याविषयीं श्रम कां घेतात-प्रधान म्हणाला पूर्वकर्मांचेंच नाव दैव तें प्रत्यक्ष येऊन मनुष्यास शिकवित नाहीं उद्योग द्वारा शिकविलें-यासाठीं उद्योग करावा-म्हटलें आहे

उद्योगिनं पुरुषसिंह मुपैति लक्ष्मीर्दैवं प्रधान मिति का
पुरुषा वदंति दैवंविहाय कुरु पौरुषमात्मशक्त्या यत्नेकृते
यदि नसिध्यति कोत्र दोषः

अर्थ-

अर्थ-उद्योग करणारास फळ प्राप्ती होत्ये-दैवच मुख्य असें जे को णी ह्मणतात ते शाहाणे नव्हत-ह्मणोन दैवावर भार न घालतां यत्न करावा-मग यत्न करूनही कार्य सिद्धि न झाल्यास आपणाकडे दोष नाहीं-असें दोघांचें बोलणें झाल्यानंतर मंत्री ह्मणाला हे महाराज या गोष्टी विषयीं आपणास संशय असेल तर अनुभव घेऊन पाहिल्या नंतर निःसंशय होईल-तें ऐकोन विक्रमानें अरण्यांत एक बंगला बांधविला-त्यांत बारा वर्षांचें साहित्य ठेवून आपला पुत्र प्रधानाचा पुत्र कोतवालाचा पुत्र आणि ब्राह्मणाचा पुत्र असीं लाहान लाहान वयाचीं चार मुलें त्यांत ठेविलीं-आणि त्यांच्या रक्षणाकरितां मुक्या बायका ठेविल्या आणि घराभोंवताले रक्षक ठेऊन त्यां मुलांस मनुष्याचा शब्दही ऐकूं येऊं नये असें केलें त्यास दोनतीन वर्षें गेलीं तेव्हां एके दिवसीं तेथें देवरूपी एक पुरुष प्रकट झाला-त्याणें सर्व रक्षकांस मोह घालून मुलांस बोलायास शिकविलें-आणि आपण अदृश्य झाला-मग बारा वर्षें झालीं तेव्हां विक्रमानें मुलांस आणविलें-आणि प्रथम आपल्या पुत्रास विचारूं लागला हे पुत्रा तूं सुखी आहेस की-त्याणें उत्तर केलें-तुमच्या पुण्यानें सुखी आहे-नंतर प्रधानाच्या पुत्रास विचारिलें-तो हात जोडून ह्मणाला आपल्ये कृपेनें कुशल आहे-मग ब्राह्मणाच्या मुलास पुसिलें-तो आशिर्वाद देऊन ह्मणाला-राजा ईश्वरावांचून कोणी सुखी नाहीं-मनुष्य मात्रास कोणती तरी एकादी चिंता असत्ये-शेवटीं कोतवालाच्या पुत्रास पुसिलें तो प्रमाण करून बोलला-हे महाराज लोक चोरीचा वाडी लवाडया करितात त्यांस शिक्षा कसी होईल या काळजीनें मी आहें-अ

सी

र्शी त्यां चौघांचीं भाषणें ऐकोन विक्रमानें पुसिलें तुह्मास बोलायास को णी शिकविलें तें सांगा- ते बोलले- कोणी एक पुरुष आला होता त्याणें आह्मास बोलायास शिकवून मी देव असें सांगून गुप्त झाला- तें श्रवण करून विक्रम प्रधानास ह्मणाला तूं बोलत होतास तें खरें झालें- आतां माझा निःसंशय झाला कीं देवच मुख्य कारण होय- शिकविणारादीक सर्व हीं निमित्त मात्र- ही कथा ऐकोन भोजराजा माघारा गेला पुनः दुस रे दिवसीं आला असतां लावण्यवती बेवीसावी पुतळी बोलली- हे भोज राजा जो विक्रमामारिखा पुण्यवान् असेल त्यासच हें सिंहासन प्राप्त हो ईल त्याणें विचारिलें विक्रम कसा पुण्यवान् होता तें सांग मग लावण्य वती सांगत्ये

कथा-२२

विक्रमानें कोणी एक शंखचूड नामक दुष्ट राजा होता त्यास मारून त्याचें राज्य घेतलें- तेव्हां जुने कारभारी घरीं बसवून नवे ठेविले आणि आपण तेथें काहीं दिवस राहिला असतां एके दिवसीं शंखचूडाचा प्रधान दीन स्नान करीत होता तो वरून एक सुंदर फुल वाहात आलें- तें घे ऊन तो घरीं आला आणि मनांत ह्मणतो हें फुल बहुतकरून इंद्राचे वनां तलें असेल याचे सुगंधास आणि चांगुलपणास या लोकीं उपमा नाहीं-त र अशी ही अप्रतिम वस्तु विक्रमास दिली असतां तो प्रसन्न होऊन आ पणास काहीं कामकाज सांगेल असें मनांत आणून तें फुल त्याणें राजास नेऊन दिलें- तें पाहातांच विक्रमास पूर्व जन्माची आठवण झाली- तेव्हां त्या

त्या प्रधानास बोलतो- त्या फुलाचा वृक्ष आणून देशील तर मी तुला जें पाहिजे तें देईन आणि नआणिलास तर तुझें सर्वस्व घेऊन तुला गांवा बाहेर घालवून देईन- तें ऐकोन तो प्रधान घरीं आला आणि चिंता करितोआहे कीं ईश्वरानें मजवर मोठें संकट आणिलें- आतां वृक्ष आणायास नगेलों तर राजा सर्वस्व हरील- गेलोंतर तो सांपडला तर बरें- नाहीं तर देशांतरीं राहावें लागेल- असो- परंतु नजाऊन परिणाम नाहीं- मग तो प्रधान एके नावेंत बसोन त्या नदिच्ये ओघासमोर चालला- जातांजातां बहुत दूर गेला- तों मोठें एक अरण्य लागलें त्यांतील सिंह बाघ आदिकरून पशु नदीतीरीं पाणी पीत होते- त्यांस पाहून भयभीत झाला- इतक्यांत अकस्मात वरून तसेंच एक फूल वाहात आलें तें पाहून थोडासा त्यास भरवंसा आला- पुढें जातोआहे तों असें दृष्टीस पडलें- कीं- त्या नदिचे तीरावरून एक मोठें झाड झुकलें आहे- त्याचे खांदीवर एक मासाचा पिंड आहे- त्यापासून एक एक रक्ताचा थेंब उदकांत पडतो- त्याचें फूल होऊन वाहात जातें- असें पाहून नावेंतून उतरला आणि तीरास येऊन न्याहाळूं लागला तों त्या झाडाच्ये वरल्ये आंगी दुसरे तसेच पिंड दृष्टीस पडले परंतु त्या पिंडापासून रक्ताचे थेंब पडत नव्हते- याप्रमाणें पाहून तो प्रधान पुनः नावेंत बसून आपल्ये नगरास आला- आणि त्याणें तें वर्तमान विक्रमास सांगीतलें- तें ऐकोन विक्रम बोलला- ज्या पिंडापासून फुलें उत्पन्न होतात तो माझा देह आहे- आणि दुसरे पिंड पाहिलेस- ते- जे- माझे बरोबर राज्य कारभार करिताहेत त्यांचे देह होत- पूर्वीं मी असें उग्र तप केलें ह्मणोन मला राज्य प्राप्त झालें-

आणि

आणि माझ्या बरोबरच्यानींही तसेंच तप केलें म्हणोन ते आज हें वैभव भोगिताहेत- जो प्राणी जसें कर्म करितो त्यासारिखें त्यास फळ प्राप्त होतें- याचा प्रत्यय दाखवायाकरितां तुला मी तेथें पाठविलें- असें बोलोन विक्रमानें त्या प्रधानास मोठें राजकाम सांगून संतुष्ट केला- अशी कथा ऐकोन भोजराजा माघारा गेला दुसरे दिवशीं आला असतां करुणावती तेविसावी पुतळी बोलली- हे भोजराजा आतां मी एक विक्रमाची गोष्ट सांगत्यें ऐक

कथा-२३

एके दिवशीं विक्रमराजा सभेंत बसला असतां सुतारानें बहुत सुंदर एक लांकडाचा घोडा आणिला- आणि राजास म्हणाला- हे महाराज- हा घोडा घेऊन माझें कसब पाहावें- विक्रमानें त्यास विचारिलें कीं- यांत कोणता गुण आहे- सुतार बोलला- याजवर बसून कळ दाबिली म्हणजे हा जिकडे पाहिजे तिकडे मनुष्यास अंतरिक्षानें नेतो- हा यामध्यें गुण आहे- राजा म्हणाला- तर यास फेरून दाखीव- तेव्हां तो सुतार वर बसोन अनेक प्रकारच्या चाली राजास दाखवून शेवटीं त्यास धांवडूं लागला- तेव्हां त्याजवर दृष्टीही ठरेनाशी झाली- असा त्याचा गुण पाहोन विक्रमानें तो घोडा घेतला आणि सुतारास एक लाख रुपये दिले- तेव्हां तो बहुत संतुष्ट होऊन म्हणाला- राजा त्या घोड्यास फिरविण्येवेळेस टांच लावूं नये- जरकां ती लाविली तर मग तो कोणासही आटोपणार नाहीं- म्हणोन एवढ्या गोष्टीचें मात्र पक्कें स्मरण ठेवावें- नंतर तो घोडा राजानें

आपल्या

आपल्या पागेंत ठेविला त्याग कांहींदिवस लोटल्यानंतर एकेदिवसीं
विक्रम अश्वशाळेंत गेला- आणि जवळ सरदार होते त्यांस ह्मणतो- अ
हो- याजवर तुह्मास बसतां येईल- त्यांणीं उत्तर केलें- यावर बसोन याला
फिरविणें हें कर्म सामान्याचें नव्हे- तेव्हां- राजा मी बसतों असें ह्मणो
न त्याजवर बसला- आणि त्यास फेरूं लागला असतां फिरून त्या
स टांच मारिली- मारतांच तो उडोन आकाशमार्गानें जाऊं लागला-
तें पाहून सर्वलोक हाहाकार करूंलागले- मग तो घोडा मोठ्याघ
का अरण्यांत जाऊन एका वृक्षास अडकला तेव्हां विक्रम झा
डाखालीं उतरोन त्या अरण्यांत चहूंकडे फिरूं लागला तों एका झा
डा जवळ दोन विहिरी आणि एक बंगला आहे असें पाहून ते
थें जवळ गेला- तों त्या बंगल्यांत पलंगादिक सर्व साहित्य ठेविलें आ
हे- आणि एक वानरी बसली आहे- असें पाहिलें- आणि चित्तां
त ह्मणतो- येथें कोणी रहून राहिला आहे काय- किंवा- कोणी
काहीं कारणास्तव हें साहित्य आणिलें असेल काय- मग तो त्याचा
शोध लागावा ह्मणून झाडावर बसला- इतक्यांत तेथें एक ज
ती येऊन त्याणें डावे हाताच्या विहिरीतलें पाणी काढिलें आणि
त्या वानरीच्या अंगावर शिंपिलें तेव्हां ती स्त्री होऊन त्याजनी बरोब
र विलास करूंलागली- नंतर त्याणें आल्ये समयीं उजव्या हाताच्या
विहिरींतलें पाणी तिजवर शिंपून पुनः तीस वानरी केली- आणि
आपण निघोन गेला- तें आश्चर्य पाहून विक्रम झाडाखालीं उतरला
आणि त्याणें त्या विहिरीतलें पाणी काढून वानरीच्या अंगावर शिं

शिंपिलें

किलें - तेव्हां - ती स्त्री रडून बोलली हे उदारा मला या दुःखापासू न सोडीव - विक्रम ह्मणाला तूं येथें कशी आलीस - ती बोलली मी लाहानपणीं न कळतां आईबापाची कांहीं अमर्यादा केली - ह्मणोन त्याणीं मला या तरीच्या स्वाधीन केलें हा दुष्ट माझे फार हाल करितो - असें तिचें भाषण ऐकोन विक्रमास - तिची दया आली - आणि त्यानें श्रीरामाचें स्मरण केलें - तेव्हां तीन वीर समोर येऊन उभे राहिले - मग विक्रम एकाच्या खांद्यावर त्या स्त्रीस बसवून आपण एकावर बसला - आणि एका करवीं तो लांकडाचा घोडा घेववून अवंतीस येता झाला - अशी कथा ऐकोन भोजराजा माघारा गेला दुसरे दिवशीं सिंहासनाजवळ गेला तो हंसगमना चौविसावी पुतळी बोलती झाली - राजा ऐक

कथा - २४

एके दिवशीं अवंतींत कोणएका स्त्रीनें एका सावकाराच्या पुत्रास - आज रात्रीं माझ्या घरीं ये - ह्मणोन खूण केली - तें विक्रमानें पाहिलें आणि मनांत ह्मणतो - हरहर माझ्या राज्यांत असा अधर्म घडोनये - मी याचें निवारण करावें - ह्मटलें आहे - राज्यांत अधर्म होतो तो समजला असतां जो राजा त्याचें निवारण करीत नाहीं तो त्या पातकाचा करविता होतो - असें मनांत आणून रात्रीं त्या स्त्रीच्या घराजवळ गेला - आणि खिडकींतून अंतरीक खडे मारूं लागला - तेव्हां ती समजली - कीं आप

ण

.ण त्यास दिवसा बोलाविलें तो आपली खुण समजून आला
आहे- तर अशा चतुरा बरोबर देशांतरीं जाऊन यथेष्ठ सुखभो
गावें- असा निश्चय करून ती रत्नभूषणाची पेटी घेऊन त्याच्या
जवळ आली- आणि बोलिली सख्या चल आपण दोघें देशांतरीं
जाउं आणि सुखानें राहुं राजा बरें ह्मणाला- आणि तिला घेऊन चा
लला तो नदीउतरोन एका रानांत गेला तेथें एके झाडाखालीं उभ
यतां बसलीं- मग राजा तीस ह्मणतो- गड्या हें कर्म तूं वाईट केलें
स या व्यभिचारकर्मास परलोकीं तर सुखनाहींच- या लोकीं आहे
ह्मणावें तर तेंही नाहीं- जो- लबाड- ठक- कृत्रिमी- घातकी- गरज्ञ
असतो- तोच पुरुष जारकर्मास झटतो- तर अशाच्या संगतीनं सु
ख कैंचें व्यभिचारकर्मास राजाचें भय- स्वजनाचें भय- ज्ञातीचें भय-
असें हें कर्म मोठें निंद्य होय ह्मणोन यांत कांहीं सुखनाहीं- पाहा ब
रें- जर मी तुला येथें या तरवारीनें हाणून हें तुझें द्रव्य घेऊन गे
लों- तर तूं काय करिशील- असें राजाचें भाषण ऐकोन तिची व्य
भिचारबुद्धी गेली- आणि ती राजास नमस्कार करून बोलली- तूं
धन्य आहेस- मी नरकांत पडत होतें ती मला तूं आज राखिलीस-
तर आतां मला घरीं नेऊन घाल- अतःपर मी असें कर्म करणार
नाहीं- नंतर राजानें तिला तिच्या घरीं पोंचविली- आणि आपण घ
रीं येता झाला ही कथा ऐकोन भोजराजा माघारीं गेला- दुसरे दि
वसीं सिंहासनाजवळ आला तेव्हां रूपकांता पंचविसावी पुतळी बो
लली- राजा मी एक विक्रमाची कथा सांगतें ऐक

कथा-

कथा-७५

एके दिवसीं विक्रमराजा आपल्या रंगमहालांत गायन ऐकत असतां शिवपूजेचा वेळ टळला - तेव्हां पश्चात्ताप पावोन ह्मणतो - हरहर मला धिक्कार असो कीं मी विलासांत पडून आज एवढे वर्षांचें व्रत मोडिलें - मी विषयांत पडून मोठें मूर्खपण केलें - तर मी आतां तप करून शिवाची कृपा संपादीन - असा निश्चय करून त्याणें प्रधानाचे स्वाधीन राज्य केलें - आणि तत्क्षणींच आपण नर्मदातीरीं एका अरण्यांत तप करायास गेला - तेथें अनेक तपस्वी तप करीत होते - कोणी पंचाग्नि साधक - कोणी धूम्रपानी - कोणी ऊर्ध्वबाहु - पर्णाशनी - वायुभक्षक - मौनी - धूम्र - देहातिचारी - चांद्रायणादिक व्रत करणारे - योगाभ्यास करणारे - कोणी आपल्या शरीराचा ह्रास करणारे - असे तेथें विक्रमानें तीस वर्षें तप केलें तेव्हां महादेव प्रसन्न होऊन वर माग ह्मणाला - विक्रम साष्टांग नमस्कार करून बोलला - हे देवा - मला आपल्या चरणाजवळ ठेवा - आणि हे येथें तुझ्या दर्शनाकरितां आज बहुत वर्षें तप करिताहेत आणि हे करतां करतां मरण पावले त्या सर्वांस कृपा करून भेट द्यावी - एवढें मागतों - असें विक्रमाचें भाषण ऐकून ईश्वरानें आपल्या गणास आज्ञा केली - कीं - जे तपस्वी मरण पावले आहेत त्यांला जीवंत करा हें ऐकोन तो गण तपस्व्यांचे अस्थींवर अमृत शिंपिता झाला तेसमयीं एक एक तपस्वी जीवंत होऊन शिवशिव हरहर असा जप करीत आनंदानें नाचूं लागला - मग त्या सर्वांस महादेवानें दर्शन दिलें

लें आणि विक्रमास एक कमळाचें फुल देऊन सांगीतलें-कीं-हें कमळ जेव्हां कोमेल तेव्हां तूं समज कीं-आतां आपलें आयुष्य साळामहिनें राहिलें आहे मग तूं माझ्याजवळ ये-आतां तूं जाऊन आपलें राज्यकर-असें सांगोन महादेव गुप्त झाला-नंतर विक्रम ईश्वराच्या आज्ञेस्तव उज्जनीस आला-आणि पुनः राज्य करूं लागला-ही कथा सांगोन रूपकांता ह्मणाली-आला महादेवानें राज्य कर असी आज्ञा केली-अशाचे आसनावर बसणारा असा समर्थ कोण आहे-तें ऐकोन भोजराजा माघारा गेला-दुसरे दिवसीं आल्या असतां देवनंदा सखिसाची पुतळी बोलली हे राजा तुला सर्वांनी कथा सांगीतल्या आतां मीहि सांगत्ये ऐक

कथा-२६

कोणेएके दिवसीं विक्रमराजा आपल्या प्रधानांस नीतिसांगता झाला-रे प्रधानहो ऐका-ज्ञानावांचून लटकेंच वैराग्य दाखवूंनये मित्रास दुखवूंनये अपराधावांचून कोणावर रागें भरूंनये-कोणास वाईट बोलूंनये-दुर्जनाची संगत करूंनये-मोठ्या अन्यायाशिवाय स्त्रीस टाकूंनये-स्त्रियांवर विश्वास ठेऊन त्यांस गुह्यगोष्ट सांगूंनये कोणी भविष्य सांगेल त्याची काळजी वाहूंनये लक्ष्मी स्थिर राहील असा भरवंसा धरूंनये-चोरास वोळख देऊंनये वाईट भाषण करूंनये-दानपुण्यावांचून

सुनादिवस जाऊंदेऊंनये-ईश्वराचें भजन निरंतर करावें-आई बापाचा उपदेश ऐकावा-नीचांची संगत धरूंनये-खोटीसाक्ष देऊंनये मोठ्याही लाभाकरितां पाप कर्म करूंनये-देश-काळ-वर्तमान जाणोन जें करणें तें करावें कोणाच्या लाभास आड येऊंनये-थट्टा करूंनये-सर्वांशीं मिळून असावें-बहुतांचे मनास येईल तें करावें-अडल्याचें साहित्य करावें-दुसऱ्याच्या भाग्याची आदेखाई न करावी-यौवन-धन-आणि-आयुष्य-ही चंचळ जाणावी-एकल्यानें देशांतरीं जाऊंनये-आपल्या सामर्थ्याप्रमाणें धर्म करावा-पुत्राचे फार लाड करूंनये-ज्याला देऊं केलें त्याला सत्वर द्यावें-काया वाचा मनानें नित्य परोपकार करावा-मर्म कोणाचें काढूंनये-कोणाचें गुह्य उघडें करूंनये-सत्कर्मास द्रव्य खरचलें तें व्यर्थ गेलें असें मानूंनये-नास्तिकपणा धरूंनये-आपल्या योग्यतेप्रमाणें इच्छा करावी-प्रसंगास भुलूंनये-अंतःकरण स्वस्थ ठेवावें-आपली विपत्ती निष्फळ सांगूंनये-द्यूतकर्म करूंनये-दुसऱ्याचें विश्व हरण करूंनये-परस्त्रीवर इच्छा करूंनये-प्राणीपशूंचा उगा स्पर्श करावा विना काढून सण करूंनये-आपल्ये पराक्रमानें पोट भरावें-विंचे विणयी नृसदीऊंनये-आशा मारावी-काम जिंकावा-क्रोध आवरावा-मत्सर सोडावा-मद जिंकावा-मोह खंडावा मृत्यूची आठवण नित्य ठेवावी-मनांत ईश्वराचें भय बाळगावें-प्राणिमात्रावर दया करावी-संपत्तींत पूर्वस्थिती विसरूंनये-विपत्तींत धैर्य सोडूंनये-चुकी पदरीं घ्यावी-दुसऱ्याचा गुण घ्यावा-चोधां

ये कल्याणाच्ये कामांत पुढें सरावें- ज्यांत आपला नाश आहे तें कर्म इंद्रियांस आवडतें ह्मणून करूं नये- देह सोडिल्यावर मागें कीर्ती राहील असें कर्म करावें- नम्र आणि मधुर असें भाषण करावें- दुसऱ्यास बरा मार्ग दाखवावा- याप्रमाणें देवांगनेचें मुखांतून विक्रमाची नीती ऐकोन भोजराजा माघारी गेला- दुसऱ्ये दिवशीं सिंहासनाजवळ आला- तेव्हां देवांगना सत्ताविसावी पुतळी कथा सांगत्ये

कथा-२७

राजा विक्रम राज्य करीत असतां एक सिद्धांती जोशी आला- त्याणें राजास सांगीतलें- मी भूत- भविष्य- वर्तमान- हीं सर्व जाणतों- त्यास राजानें पुसलें या वर्षीत प्रजेस पर्जन्य सुख कसें आहे- जोशी ह्मणाला- महाराज यंदां रवि मध्य योग आहे- याकरितां पर्जन्य पडणार नाहीं- यास वचन

बुधशुक्रौसमीपस्थौ कुर्वतः सजलां महीं तयोरन्तर्गतो
भानुः समुद्रमपिशोषयेत्

अर्थ- बुध आणि शुक्र हे दोघे जवळ असले तर वृष्टी पुष्कळ होत्ये- आणि त्यांच्यामध्यें सूर्य असला तर पर्जन्य पडत नाहीं- तेव्हां विक्रमानें थोरथोर ब्राह्मणांस बोलावून विचारिलें- कीं- पर्जन्य पडायास काय उपाय करावा- ते ह्मणाले वाजपेय यज्ञ करावा-

मग

मग विक्रमानें यज्ञास आरंभ केला- त्या यज्ञ समारंभामध्यें जे जे याचक आले त्यांचा त्याणें यथा योग्य सत्कार केला-यज्ञ समाप्तीच्येवेळेस इंद्रादिक देव प्रत्यक्ष येऊन विक्रमास बोलले- राजा आम्ही प्रसन्न झालों- आतां वर मग- विक्रम ह्मणाला- आजपासोन कधींही माझ्या देशांत अवर्षण होऊं नये- तें मान्य करून देव आपल्या स्थानास गेले- मग विक्रमानें कोट्यावधी ब्राह्मणास व इतर याचकांस मिष्टान्न भोजन घातलें आणि दक्षणा देऊन संतुष्ट केलें- त्यादिवसापासून आजपर्यंत मालव देशांत कधींही अवर्षण पडलें नाहीं- ही कथा ऐकोन भोजराजा माघारां गेला-दुसरे दिवसीं आला तेव्हां त्रिविणी अठ्ठाविसावी पुतळी बोलली- हे भोजराजा मीही तुला एक विक्रमाची कथा सांगत्ये- ती ऐक- आणि मग यासिंहासनावर बैस

कथा- २८

एके समयीं विक्रमराजा अरण्यांत शिकारीस गेला होता-तेथें यम- आणि- वरुण-दोघे देव त्याचें सत्त्व पाहावयास आले-यम वाघाचें रूप धरून पाठीमागें लागला आणि वरुण रोडक्या गाईचें रूप धरून भयानें घाबरा घाबरा राजाजवळ धांवत आला- आणि ह्मणाला-राजा-मी तुला शरण आल्यें- मला राख- तें ऐकोन विक्रमास दया आली आणि तरवार घेऊन त्या गाईभोंवता फिरों लागला-वाघ राहून राहून गाईवर झडपा मारितो आहे- असा संधींत मोठा पाऊस येऊन बहुत चिखल झाला- त्यांत ती गाय फसली-तेव्हां वाघभूमी

वर

वर पुढें आपटून मोठा भयंकर शब्द करीत घटकेघटकेस चवताळून ति जवर येतअसे आणि विक्रमराजा त्याचें शस्त्रानें निवारण करीत असे- या प्रमाणें राजानें पावसांत उभाराहून सर्वरात्र काढिली- प्रातःकाळ होतांच यम आणि वरुण दोघेही देव प्रगट होऊन बोलले- राजा आह्मी देव-तु झें सत्व पाहावयास आलों होतों तें तुझे पाहून प्रसन्न झालों- आतां तु झ्या इछेस येईल तो वर माग- राजा ह्मणाला तुमच्या प्रसादाने मला स र्व आहे उणेंकाहीं नाहीं- तरहें मागतों- कीं- आपली कृपा असावी- तें ऐ कोन त्याणी स्वर्गींची कामधेनू दिली- ती घेऊन राजा उज्जनीस येतअसतां मार्गी एका दरिद्री ब्राह्मणानें ती मागीतली- विक्रमराजा त्यास ती देता झाला- असी कथा ऐकोन भोजराजा माघारा गेला- दुसरे दिवसीं आला ते व्हां सुलोचना एकुणतिसावी पुतळी ह्मणाली हे भोजराजा मीही एक कथा- सांगत्यें ऐक

कथा- २९

एके दिवसीं विक्रमराजा उज्जनींत चोरबातमींस रात्री फिरत असतां एका दरिद्री ब्राह्मणाच्या घराजवळ पावला- तों ब्राह्मण आणि त्याची स्त्री उभयतां कांही बोलत होतीं- तें ऐकावें ह्मणोन बाहेर उभाराहिला-तेस मयीं स्त्री-पतीस ह्मणत्ये- स्वामी आपण दरिद्रामुळें फार दुःख पावतां तें विक्रमराजाजवळ यांचनेस कां जातां- ब्राह्मण सांगतो- अगे- सद्यः आपल्यास काळ प्रतिकूळ आहे- माझी विपत्ती राजाच्यानेंही दूर हो णार नाहीं- तें ऐकोन विक्रम आपल्या घरास गेला- दुसऱ्ये दिवसीं प्रातःका

प्रातःकाळीं त्या ब्राह्मणास बोलाऊन आणिलें आणि कोहळ्यांत गुप्त धन भरून तें त्यास दान दिलें- तें नसमजतां ब्राह्मणानें एका सराफास-विकलें आणि पैसें घेऊन घरास आला- पुनः त्या रात्रीस राजा ब्राह्मणाचे घराजवळ आला- आणि ऐकतो आहे- तो ब्राह्मण स्त्रीस ह्मणतो- पाहिला स नमस्कार- कीं जो राजा याचकांस लाखो रुपये देतो त्याणें मला मुजरास बोलावून एकच कोहळा दिला- तो बाजारांत एका चवलास गेला- हा शब्द माझे प्रारब्धाकडे राजाकडे नाहीं- तें ऐकोन विक्रम खिन्न झाला- आणि मनांत ह्मणतो हा काळ यास प्रतिकूळ आहे खरा- यास आणखी द्रव्य देऊन तरी कायफळ- तर आतां काय करावें- कसें केल्यानें हा सुखी होईल- असी चिंता करितो आहे- तों तेथें एक पुरुष आला आणि ब्राह्मणाचे घरांत जाऊं लागला- त्यास राजानें विचारिलें- तूं कोण आहेस- आणि येवढ्या रात्रीस या घरांत जायाचें तुझें काय काम आहे- तें सांग- त्याणें उत्तर केलें ज्यास काळ ह्मणतात तो मी- ह्या ब्राह्मणाला छळायास जातों आहे- राजा नमस्कार करून बोलला- देवा माझी एवढी प्रार्थना ऐक- कीं- तूं याचें वाट्याचें मला छळ आणि यास सुखदे- काळ बोलला- बरें तर एक वर्ष पर्यंत तुला मी पीडीन- असें बोलोन गुप्त झाला- राजा आपले घरीं येऊन निजला- ब्राह्मणासही झोंप लागली- दुसरे दिवसीं प्रातःकाळीं सराफानें कोहळे चिरले तों आंत रत्नें निघालीं- तीं पाहून सराफ समजला आणि ह्मणतो- हें राजानें त्या ब्राह्मणास गुप्त दान दिलेलें आहे- हरहर हें ब्राह्मणाचें द्रव्य कोणी घ्यावें- ह्मटलें आहे- दुसऱ्यानें नकळोन दिलेली किंवा मार्गावर पडलेली दुसऱ्याची वस्तू घेणें-

हें

...र्म होय- मग तो-तीं रत्नभरित कोहळ्याची दोन अर्धे घेऊन ब्राह्मणाचे घरीं आला- आणि नमस्कार करून बोलला- भट्टजी बावा- आपल्यास राजानें गुप्त दान दिलें होतें तें हें आपलें संभाळावें- तें पाहोन ब्राह्मण बहुत हर्षला आणि स्त्रीसहित आनंदानें प्रपंच करूं लागला- इकडे त्याच रात्रीस राजाच्या भांडारशाळेंत चोरी झाली- तीची प्रातःकाळीं चौकशी करिताहेत- तों कोठी- मोहाल- पागाच- राजवाडा- यांस एकदांच आगलागली आणि सर्व जळालें- तेव्हां विक्रम राजा प्रधानांस रात्रीचें सर्व वर्तमान सांगोन आपण सेतुबंधरामेश्वरास गेला- तेथें देवळांत तपकरीत होता- तों एके दिवसीं चंद्रिचंदावरचा राजा देवाच्ये यात्रेस आला- तो विक्रमाचें अत्यंत सुंदररूप पाहून परमआनंद पावला आणि बोलतो हे महापुरुषा तुला पाहोन भी फार समाधान पांवलों- मी इछितों कीं माझ्याजवळ तूं सदां असावेंस- विक्रम बरें ह्मणाला- मग तो राजा विक्रमास आपल्ये पट्टणास घेऊन गेला- तेथें एके दिवसीं असें झालें- कीं- राजाची स्त्री विक्रमाशीं गोष्टी सांगत बसली आहे तों तीची न्हायाची वेळ झाली- तेव्हां ती गळ्यांतील नवरत्नांचा हार समोरच्या खुंटीवर टेऊन- बोलली- हे गुरूजी मी न्हाऊन येई पर्यंत आपण हा हार पाहावा- असें बोलोन ती गेली- विक्रम हाराकडे पाहात बसला आहे- त्यावेळीं काळानें त्या खुंटींत प्रवेश करून हार गिळिला- तें पाहून- विक्रम विचार करितो- कीं- हें अघटित कर्म घडलें- हें जर लोकांस सांगावें तर खरें वाटणार नाहीं- परंतु आपण सांगावें- जें होणार तें होऊ असत्य भाषण सर्वथा करूंनये- असा निश्चय करून तसाच

बसला

यसला आहे-इतक्यांत राजपत्नी येऊन पुसोंलागली-कीं येथ[illegible]
र काय झाला-त्याणें झालेलें वर्तमान सांगीतलें ती ह्मणाली तुह्मी मा
झी मस्करी करितां-विक्रम उगाच राहिला-तीणें तें वर्तमान आप
ल्या पतीस सांगीतलें-राजा येवोन विक्रमास एकांतीं पुसोंलागला-
कीं-हार काय झाला तें सांग-त्याणें झालेलें वर्तमान सांगीतलें तें खरें
न वाटोन राजास फार क्रोध आला आणि त्याचे हात पाय तोडविला झा
ला-विक्रमराजा त्या दुःखानें फार व्याकुळ झाला आणि रस्त्यांत पड
ला आहे-तों-तेथें एक तेली आला-त्यास दया येऊन विक्रमास त्या
णें आपल्ये घरीं नेलें आणि औषध लाऊन बरें केलें-मग ह्मणाला
थोंटया-तूं माझे घाण्यावर बसून बैल हाकीतजा-तें ऐकोन विक्रम
ह्मणाला तुझ्या घरांत जितक्या तेलाच्या घागरी असतील तितक्या
मी मंत्रानें भरून टेवितों-त्यांतून तूं कितीही तेल काढिलेंस तरी
उणें होणार नाहीं मग घाण्याचें काय काम-असें बोलोन विक्रमानें
तसें केलें तेव्हां हजारों रुपयांची विक्री नित्य होऊंलागली-नंतर
तो तेली-मोटा एक बंगला बांधून त्यांत त्या थोंटयास टेविताझा
ला-तेथें जवळच राजकन्येचा वाडा होता एके दिवसीं सांजवेळेस-
विक्रमराजा गायन करीत असतां दीपराग आलापूं लागला-तेणेंकरू
न राजकंन्येच्या मंदिरांतील दिवे विझाले होते ते पुनः लागले तिणें
तो शोध करून आपल्या पित्यास सांगीतलें-कीं-जो पुरुष दीपराग
ह्मणोन दीप लावील त्यास मी पती करीन असा माझा निश्चय झाला-
ह्मणोन तेल्याच्या पुत्रास मी नवरा करित्यें-तें ऐकोन मातापित

रानीं

नीनें बहुत निषेध केला तथापि तिणें तोच थोंटा पती केला- एके सम
यीं एकांतीं राजकन्येनें थोंटयास पुशिलें- कीं- तूं कोटचा- कोण आहेस
त्याणें झालेलें सर्व सांगीतलें तें ऐकोन ती- विक्रम माझापती असा स
तोषानें त्याची बहुत सेवा करूं लागली- तेंव्हां एके दिवसीं असें झालें- कीं-
त्या चंदीचंदावरच्या राजाकडे विलायतेचे राजानें तीन सोन्याच्या पुतळ्या
वजनांत व आकृतीत एकसारिख्या- पाठवून विचारिलें- कीं- यांत- उत्त
म मध्यम- कनिष्ठ- कोणती ती सांगावी- राजानें चार चतुर लोक बोला
वून परीक्षा केली- परंतु कोणासही त्यांत उणें अधीक आटळेना- रा
जा चिंतेंत पडला आहे- इतक्यांत. तेथें- लक्ष्मी- बुद्धी- सत्य- आणि काळ
ही चोघेंजणें आली आणि बोलली- राजा आह्मांत थोर कोण तें साग-
राजानें विचार केला परंतु चोघेंही थोरच दिसोन आली- लाहान मोटें
कांहीं कळेना तेव्हां तो फार चिंतेंत पडला- तें वर्तमान राजकन्येनें थों
टयास सांगीतलें- थोंटा ह्मणाला- माझे संकटकाळाचे दिवस तीन उ
रले आहेत ते सरले ह्मणजे मी निवाडा करीन- नंतर- चोथे दिवसीं-
राजानें थोंटयास बोलावून आणिलें- तो ह्मणाला- मागें मी जेथें बसलों
असतां खुंटीनें हार गिळिला आहे तेथें. बैठक करवा- प्रधानानें तैसें केलें
नंतर थोंटयानें त्या तीन पुतळ्या आणवून फार वेळ परीक्षा केली परंतु
त्यांत कांहींच अधीक उणें दिसेना- तेव्हां तीघींच्या कानांत काडी घा
लविली- तों एकीची तोंडांतून बाहेर निघाली- दुसरीची दुसऱ्या का
नांतून निघाली- तिसरीची पोटात गेली असें पाहून त्याणें राजास सां
गीतलें- कीं- जिच्या तोंडांतून बाहेर काडी निघाली- ती उतरती कनि

ष्ट होय- कीं- तिला काही गोष्ट सांगीतली तर दुसऱ्या जवळ
च्या कानांतून निघाली ती मध्यम- कीं- ती- एका कानानें गे
सऱ्या कानानें सोडील- मनांत धरणार नाहीं- जीच्या पोटांत
ली ती उत्तम कीं- तिला कोणी काही गोष्ट सांगीतली तर
वील कोणापाशीं बोलणार नाहीं- तें विक्रमाचें चातुर्य पाहोन सर्वांस
आनंद झाला नंतर लक्ष्मी पुढें होऊन बोलली- कीं- सर्वांपेक्षां मी थोर आ
हें- तीस विक्रमानें विचारिलें- कीं- जरतूं थोर तर विक्रमास काळ प्रति
कूळ झाला तेसमयीं तुझें काहींच कां चाललें नाहीं- तीनिरुत्तर झाली-
मग बुद्धी ह्मणाली मी थोर- त्याणें तिलाही तसेंच विचारिलें- तें ऐको
न तीही उगीच बसली- मग धर्म बोलला सर्वांपेक्षां मी मोटा- त्यासही त्या
णें तसेंच पुसिलें तोही निरुत्तर आला- मग मुर्तिमंत काळ येऊन उभा
राहिला- त्यास पाहातांच थोरयानें नमस्कार केला- इतक्यांत खुंटीत
हार गेला होता तो बाहेर आला- तेव्हां थोरा काळास ह्मणतो- तूं प्र
तिकूळ असतां कोणाचाही उपाय चालत नाहीं- ह्मणोन तूंच थोर-
लक्ष्मी- बुद्धी- धर्म- हीं तूं अनुकूळ आहेस तरच सुख देऊं शकता
त- तुजवाचून यांस सामर्थ्य नाहीं- असें त्याचें भाषण ऐकोन का
ळ संतुष्ट झाला आणि विक्रमास हातानें कुरवाळिता झाला- तेणें
करून त्यास हातपाय फुटले आणि शरीर पुर्ववत् झा
लें- ह्मणून सर्वांस परमानंद झाला- आणि आपआपल्या स्थ
ले- मग विक्रमराजा त्या तेल्यास तिथलें अर्धराज्य देववून स्त्री स
हित आपण उज्जनीस आला- हीकथा ऐकोन- भोजराजा माघारा
गेला

नः दुसरे दिवसीं आला तेव्हां प्रेमावती तिसावी पुतळी
-राजा आतां मी एक कथा सांगत्यें ऐक

कथा-

क्रमराजा राज्य करीत ... पिला षष्ठीचें पर्व आलें
तेदिवसीं राजा गंगास्नानास ... य-विद्वान तपोनिधी-अ
सि ब्राह्मण व गरीब दुबळे ही बहुत मिळाले होते-त्यांसपाहोन
राजाच्या मनांत आलें-कीं-असें पर्व पुढें येईल-मग-मी धर्मक
रीन असा भरवंसा धरूं नये-आयुष्यादिक सर्व चंचळ आहेत
यास वचन

अस्थिरंजीवितंलोके अस्थिरे धनयौवने अस्थिराः
पुत्रदाराश्च धर्मःकीर्तिर्द्वयंस्थिरं

अर्थ-मृत्युलोकीं आयुष्य अशाश्वत आहे-तशींच धन-तारुण्य-
पुत्र-स्त्रिया-ही ही क्षणिक आन-धर्म आणि कीर्तिहीं दोनच शाश्वत-
शाश्वत तें संपादावें-असा निश्चय करून त्यांणें ब्राह्मणास अ
काराची दानें दिलीं-व इतर याचकांसही बहुत धन दिलें-म
न्नदान केलें-आणि आपण भोजनकरून बसला आहे-
क गारोडी आला-तो ह्मणाला महाराज मी खेळ करितों तो
अवकाश करून पाहावा-असें बोलून तो साहित्य आणावयास ग
ऊन

णून गेला- तों एक शिपाई घोड्यावर बसून स्त्रीसहित
आणि राजास रामराम करून उभा राहिला- त्यास प्र
तुं कोण कोठून आलास- तो ह्मणाला मी इंद्राचा दूत- मला
कारणास्तव शापिलें ह्मणोन मी मृत्युलोकीं राहात अस
ही विनंती आहे ती ऐकावी- आज देवा दैत्यांशीं युद्ध प्रसं
करितां मला इंद्रानें स्वर्गी बोलाविले आहे- ही माझी स्त्री
लाहान आहे- इला युद्धांत नेतां येत नाहीं- मलत्या जवळ
वत नाहीं- अशा अडचणीत मी पडलों ह्मणोन मी येथें
विक्रमराजास परस्त्री कन्ये सारिखी- असी तुझी कीर्त
असें इच्छितों- कीं- तुजपाशीं ही स्त्री ठेऊन स्वर्गास आ
ई तोंपर्यंत मांझ्या स्त्रीचा सांभाळ तुवां करावा- रा
ला- नंतर तो शिपायी राजाजवळ स्त्री ठेऊन आक
गेला- त्यास अर्धी घटिका झाली नाहीं- तों अकस्मा
होऊन आकाशांतून एक भुज भूमीवर पडली- ती
राजास ह्मणाली- हे महाराज माझा पती युद्धांत पड
ची भुज येथें आली- आतां ई-च्या बरोबर मी सती
सांगीतलें- कीं- तुला जें पाहिजे तें देतों- तूं सहग
तीणें उत्तर केलें- पतीनें मला स्वर्गास न्यावया क
क पाठविली- आतां मी कशी राहूं- तर आपण
माझी पाठवणी करावी- तें ऐकोन विक्रमानें तीचे
मग तिणें त्या भुजेबरोबर अग्नींत प्रवेश केला- इ

र आकाशांतून खालीं उतरला- आणि राजास नमस्कार करून सांगीतला-
महाराज- माझें बळ पाहून इंद्रानें मला कुटुंबासहीत स्वर्गास बोलावि
लें आहे- तर माझी स्त्री मला द्यावी- राजा बोलला कीं- तीणें सहग
मन केलें- सर्वांनीही तसेंच सांगीतलें- तें ऐकून तो म्हणाला मी जीवंत अ
सतां ती सती कोणाबरोबर गेली- व तुम्ही अशी विपरीत साक्ष कशी देतां-
तें ऐकोन राजा लज्जेनें खालीं पाहूं लागला- इतक्यांत तोच गारोडी होऊ
न राजास रामराम करून बोलला- महाराज मी हा एक चमत्कार दाख
विला- आतां दुसरा पाहावा- नंतर त्याणें आरसीस हाक मारितांच ती आ
रसींतून बाहीर येऊन विक्रमापुढें हात जोडून उभी राहिली- तें पाहून सर्व
लोक आश्चर्य करूं लागले- मग विक्रमानें त्या गारोड्यास लक्ष रुपयें व पांच
गांव इनाम दिले- ही कथा ऐकोन भोजराजा माघारा गेला- पुनः दुसरे दि
वसीं आला तेव्हां गुणाभिरा एकतिसावी पुतळी बोलली राजा ऐक.

कथा- ३१

महादेवानें विक्रमराजास कमळाचें फूल दिलें होतें तें सुकलें असें पा
होऊन विक्रमराजास कळलें- कीं- आपला मृत्यु साहा महिन्यानीं होणार- ते
व्हां राजानें सर्वराज्य प्रधानाचे स्वाधीन केलें आणि आपण वाईक्षेत्रीं जाऊन
राहिला- आणि सर्व राज्यांत दौंडी पिटविली- कीं- ज्यास कांहीं मागावयाचें-
असेल त्याणें वाईंत येऊन मागावें- तें ऐकून नानादेशींचे याचक- भट-
पंडित- भिकारी- फकीर- वाईस आले- राजा सर्वांस मागीतलें देऊन संतु
ष्ट करितां आहे- हें वर्तमान ऐकून देवही परीक्षा पाहावयाकारितां तेथें आ

ले

ण मागणी मागीतली तें विक्रमाने अनेकप्रकारचे कष्ट [illegible]
तेव्हां देव प्रसन्न होऊन बोलले- हे राजा- तुजसारिखा पु[illegible]
रा होणार नाही- मागें सत्ययुगांत जसा सत्यवादी हरिश्चं[illegible]
गांत जसा बली महादाता झाला- द्वापारयुगांत दशरथ रा[illegible]
ला- ते त्यांचे तीन्हीगुण तुझ्यांत आहेत- याकरितां तूं [illegible]
बोलोन देव गेले- एकेदिवशीं विक्रमराजा कृष्णेचे तीरी बसला [illegible]
सुवर्ण कांतीचे हरण आले आणि ते मनुष्य वाणीने राजास [illegible] राजा [illegible]
पूर्वजन्मी ब्राह्मण होतों- एके दिवशीं भुकेने पीडित होऊन फिरत असतां मला
एक सिद्ध भेटला- त्याजवळ मी क्षुधेच्या दुःखास्तव मरण मागीतले- तेंव्हां त्या
णे मला हरण करून सांगीतले- की- आजपासून तुला भुकेची पीडा होणार
नाहीं पुढे राजा वीर विक्रमादित्य होईल त्याजवळ तूं आपले वर्तमान सांगि
तलेंस म्हणजे हरिणजन्मापासून सुटशील- तो तुला आपल्या पुण्याने स्वर्गा
स पोहोंचवील- असें बोलून हरिणाने प्राण सोडिला- नंतर विक्रमाने त्याचे
प्रेताचें दहन करून त्यास स्वर्ग प्राप्त व्हावा याकरितां [illegible] दान [illegible] केलें
तेणे करून तो दिव्य शरीरी होऊन स्वर्ग लोकास गेला- ही कथा ऐकून भोजरा
जा माघारा गेला- पुनः दुसरे दिवशी आला तेव्हां विक्रम [illegible] बनिशाची पुत
ळी बोलली- हे भोजराजा सर्वांनीं कथा तुला सांगीतल्या आतां [illegible]
मीहि सांगत्यें ती ऐक

कथा- ३२

ज्यावेळेस विक्रमाचा अंत समय आला तेव्हां इंद्राने विक्रमास [illegible]

[illegible] सों आपलें विमान पाटविलें त्यांत बसून [illegible] स्वर्गलोकास-
[illegible] त्या काळी अवंतीनगरीत मोठा अनर्थ झाला [illegible] लोक [illegible] हाहाकार
[illegible] आणि [illegible] भिक्षुक फकीर गरीब दुबळे [illegible]
[illegible] की आज [illegible] पुण्य दान इत्यादि [illegible]
[illegible] राजाच्या स्त्रिया [illegible] दासी सेवक [illegible]
[illegible] मानकरी [illegible] आमचे [illegible] की [illegible]
[illegible] की [illegible] असा [illegible] मोठा अनर्थ
झाला [illegible] [illegible] [illegible] [illegible]
[illegible] आणि [illegible] किंवा [illegible]
नंतर [illegible] सिंहासनावर [illegible] मुखी [illegible]
[illegible] महाराज [illegible] राजा [illegible]
[illegible] आणि [illegible] भाग [illegible]
[illegible] भोजपाल [illegible]
[illegible] नगरी [illegible] दोन्ही [illegible]
[illegible] [illegible] हे [illegible]
विक्रमाचें [illegible] [illegible]
[illegible] सिंहासन
[illegible] ठेविलें आणि [illegible]
[illegible] [illegible] [illegible]
[illegible] [illegible] [illegible]
[illegible] [illegible] [illegible]

[illegible]

मीन पुरून ठेविले आणि आपण अंतरावरील येऊन राज्य [illegible]
रू लागला- इतकी [illegible] कथा सांगून [illegible] विक्रमा येतसीं हे भोजराजा
[illegible] पार्वतीच्या
[illegible] होती- एके दिवशीं [illegible] [illegible]
[illegible] गजनमी [illegible] [illegible]
[illegible] पाहून [illegible] मा [illegible] आ [illegible]
शाप दिला- कीं- तुम्ही [illegible] होऊन [illegible] राहाल- तें ऐकून
[illegible] प्रार्थना केली- मग महादेवानें कृपाळू होऊन [illegible]
शाप दिला- कीं- कलियुगांत राजा विक्रम होईल त्याचें चरित्र
भोजराजास सांगाल तेव्हां तुम्हास आपलें पूर्वरूप प्राप्त होईल-
[illegible] आज तुमच्या प्रसादानें [illegible] [illegible]
[illegible] राजा- आतां तुला [illegible] [illegible] ते ऐकी
भोजराजा म्हणाला तर [illegible] [illegible] ही माझी कथा
[illegible] [illegible] [illegible]
[illegible] [illegible] [illegible]
[illegible] होऊन [illegible] गेल्या- त
[illegible] सिंहासन [illegible] पुरून [illegible]
[illegible] स्वाधीन करून आपण [illegible]

सिंहासन बत्तिशी

समाप्त